ISSN 2319 - 359x

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed and
UGC Listed Journal No. 47026

ISO 9001 : 2015 QMS
ISBN / ISSN

# IDEAL



Volume - XIII, Issue - II
March - August - 2025

MARATHI / HINDI PART - I

Impact Factor / Indexing
2023 - 7.537
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY

HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XIII | Issue - II | March - August 2025

MARATHI / HINDI PART - I

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed and
UGC Listed Journal No. 47026

Impact Factor / Indexing
2023 - 7.537
www.sjifactor.com

EDITOR

Dr. Vinay Shankarrao Hatole
Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

PUBLISHED BY

AJANTA PRAKASHAN
Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"IDEAL"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad), also Published the same at Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad)

**Printed by**

Ajanta Computer,
Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra, India

**Published by**

**Ajanta Prakashan,**
Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra, India
Cell No. : 9579260877, 9822620877
E-mail : ajanta2023@gmail.com, www.ajantaprakashan.in

**IDEAL- ISSN 2319-359X - Impact Factor - 7.537 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Mehryar Adibpour**
Faculty of Computing London
Metropolitan University,
Holloway Road, London.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science,
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Altaf Husain Pandi**
Dept. of Chemistry University
of Kashmir, Kashmir, India.

**Dr. Ramdas S. Wanare**
Associate Professor & Head Accounts & Applied Stat,
Vivekanand Art's Sardar Dalip Sing Commerce
& Science College Samarth Nagar, Aurangabad (M.S.)

**Dr Harish Kumar**
Assistant Professor Department of History,
Mangalayatan University, Extended,
Ncr 33rd Milestone, Mathura - Beswan
Aligarh (U.P.) 202146.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd),
Dept. of Economics, Shivaji University,
Kolhapur - (M.S.) India.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean School for Environment Science,
Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University
of Raebareily, Lucknow- India.

**Dr. Joyanta Barbora**
Head Dept. of Sociology University of
Dibrugarh- India.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D., SNJB College of Pharmacy,
Neminagar, Chandwad, Nashik (M.S.) - India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. of Physics,
University of School of Sciences,
Gujarad University, Ahmedabad- India.

**Dr. Binoy Musahary**
Department of Political Science,
Nalbari College, Nalbari Assam, P. O. Bidyapur.

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. of Computer Science and Applications,
Bhavnagar University, India.

**Dr. S. Jeyakumar**
Assistant Professor, PG & Research Department of
Commerce, P. M. T. College, Melaneelithanallur,
Sankarankovil Tirunelveli, Tamil Nadu.

**Dr. P. S. Buvaneswari**
Asst. Professor of Commerce,
University of Madras Chepauk, Chennai-05.

**Dr. (CA) Subrahmanya Bhat K. M.**
Principal, Department of Commerce,
Swami Vivekananda College, Borim Ponda, Goa.

**Dr. G. B. Lamb**
Associate Professor & Head,
Department of Mathematics
Baliram Patil College, Kinwat, Dist.Nanded. (M.S.)

# EDITORIAL BOARD

**Dr. Priyanka A. Masatkar**
Assistant Professor, Dept. of Botany,
Ghulam Nabi Azad Arts Commerce and
Science College, Barshitakli, Akola, Maharashtra.

**Dr. Dhirajkumar S. Kotme**
Head, Department of Marathi,
Jaikranti Airts & Com. Sr. College,
Latur. (Maharashtra)

**Dr. Harish Kumar**
Associate Professor, Noida College of Physical
Education, Doom Manikpur Dadri. (U.P)

**Mr. Nitish Pandurang Shinde**
Assistant Professor, Department of English,
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Dist.- Sangli, Maharashtra.

**Mr. Hariprasad Vitthal Pawar**
Assistant Professor, Department of History,
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Dist.- Sangli, Maharashtra.

**Mr. Shrikant Namdev Phakade**
Assistant Professor, Department of Political Science,
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Dist.- Sangli, Maharashtra.

**Mr. Nishikant Savanta Waghmare**
Assistant Professor, Department of Political Science,
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Dist.- Sangli, Maharashtra.

**Dr. Sujata Pandurang Solage**
Assistant Professor, Department of English,
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Dist.- Sangli, Maharashtra.

**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537** (www.sjifactor.com) **CC - 10**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अनु क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेले राजकीय विचार<br>**प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव** | १-११ |
| २ | कोल्हापूर जिल्ह्यातील उचंगी धरण : विस्थापित लोकांच्या समस्या<br>**श्रीराम ईश्वरा सुतार** | १२-१५ |
| ३ | अण्णाभाऊ साठे यांचे जातिअंत चळवळीसाठी योगदान<br>**प्रा. डॉ. डी. पी. खराडे** | १६-२० |
| ४ | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि महाराष्ट्राचे योगदान (व्यक्ति व कार्य) - भाई माधवराव खंडेराव बागल<br>**सौ. वेदा उदयराज माळकर** | २१-२६ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्यायाचा लढा<br>**डॉ. आनंदा पांडूरंग कांबळे** | २७-३७ |
| ६ | भारतीय जातीयभेद आणि आरक्षण धोरणातील ऐतिहासिक दृष्टीकोन<br>**रविराज रामचंद्र साळुंखे** | ३८-४४ |
| ७ | कोल्हापूर जिल्ह्यातील दुग्धजन्य उत्पादनांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक ठसा<br>**डॉ. डी. आर. पाटील** | ४५-४९ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय दलित चळवळीमधील भूमिका<br>**डॉ. सोमनाथ दऱ्याप्पा हुबाले** | ५०-५६ |
| ९ | 'आदिवासी समुदायातील मानव विकास निर्देशांकाचे मूल्यांकन' - विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा<br>**प्राचार्य. डॉ. दिलीप रामभाऊ जगताप**<br>**प्रा. रामदास रमेश वसावे** | ५७-६४ |
| १० | संत गाडगेबाबांची सत्यशोधकीय भूमिका-एक चिकित्सक अभ्यास<br>**Mr. Hariprasad Vitthal Pawar** | ६५-७० |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय<br>**डॉ. शिवाजी संभाजी गायकवाड** | ७१-७५ |
| १२ | भारतीय राज्यघटना आणि स्त्रिया<br>**सनदकुमार शंकर खराडे** | ७६-७९ |
| १३ | स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखन: तत्त्वज्ञान, पद्धती आणि प्रभाव<br>**श्री. विशाल तानाजी भानुसे** | ८०-८२ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अनु क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | सामाजिक न्याय: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका<br>**प्रा. डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत** | ८३--८५ |
| १५ | भारतातील जातीव्यवस्था आणि आर्थिक असमानता<br>**श्री. सागर हरिचंद्र एडके** | ८६-९० |
| १६ | हिंदू खाटिक समाज-सामाजिक सुधारणा चळवळ ऐतिहासिक आढावा<br>**मेघाराणी रमेश सरगर** | ९१-९४ |
| १७ | १८५७ च्या उठवामधील दलित महिलांचा सहभाग<br>**शुभम शामराव खरात** | ९५-१०१ |
| १८ | ऐतिहासिकदृष्ट्या दलितांचे सशक्तिकरणामध्ये शिक्षणाची भूमिका<br>**श्री. माने प्रशांत पांडुरंग** | १०२-१०६ |
| १९ | जातिनिर्मुलनाबाबत आंबेडकरांचे विचार<br>**हणमंत शिवाजी नरळे** | १०७-१११ |
| २० | महाराष्ट्रातील दलितांच्या आर्थिक स्थितीचा आढावा<br>**दिपक लक्ष्मण सकट** | ११२-११६ |
| २१ | संत चोखामेळा यांच्या अभंगातील दलित वेदना<br>**डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार** | ११७-१२१ |
| २२ | विदर्भातील विविध संस्था मंडळांचे अस्पृश्यता निवारण कार्य-एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. अनिल आसाराम तुपकर** | १२२-१२३ |
| २३ | संत तुकारामांच्या अभंगातील पर्यावरणविषयक विचार<br>**श्री. अर्जुन बंडू राठोड** | १२४-१२७ |
| २४ | भारतीय राजकारणात दलित महिलांसामोरील आव्हाने<br>**वैभव कृष्णा जानकर** | १२८-१३३ |
| २५ | दलित आत्मकथानातील संवेदना<br>**प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे** | १३४-१३७ |

# CONTENTS OF HINDI PART - I


| अनु क्र. | लेख और लेखक के नाम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समकालीन हिंदी कविता में दलित चेतना<br>**डॉ. विनायक शिवाजी शिंदे** | १-५ |
| २ | 'धरती धन न अपन........' में चित्रित दलित विमर्श<br>**डॉ. धमेंद्र पंडित थोरात** | ६-९ |
| ३ | उचल्या (उचक्का) आत्मकथा में चित्रित दलितों की समस्या<br>**डॉ. कैलासकुमार गुंडोपंथ पाटील** | १०-१५ |

# १. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेले राजकीय विचार

**प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई.

**प्रास्ताविक**

वैयक्तिक सुख दु:खाचा विचार न करता आपले विचार, कार्य व प्रतिभा यांच्या सहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे जातीप्रथेमुळे अनेक शतके विकासापासून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्व. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनात अद्भुतता, अतिशयोक्ती, अतार्किकता आहे असे म्हटले जाते. ते काही अंशी बरोबरही आहे, पण त्यात जीवनातील विदारक वास्तवही प्रगट झालेले आहे. लोककथेतील अद्भुतता, अतिशयोक्ती मानवी मनाला भुरळ घालते. पण त्यातून प्रगट झालेले जीवनातील तत्त्वज्ञान व वास्तवाचे दर्शन मनाला अंतर्मुख करून विचार करायला लावते. खरे म्हणजे अण्णा भाऊंचे जीवनच एक अद्भूत अशी कथा आहे. अक्षर शत्रू असलेल्या माणसाने एका अनभिषिक्त साम्राटाप्रमाणे अक्षर जगावर अधिराज्य गाजवावे, अक्षर क्रांतीच नव्हे तर विचार क्रांती आणि वांग्मय क्रांती घडवावी असे त्यांचे जीवन अद्भूत आहे. आण्णा भाऊ साठे यांच्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने **COVID-19** च्या काळात **online** व्याख्यान देण्याचा योग आला तेंव्हा व्याख्यानासाठी कोणता विषय निवडावा असा विचार करीत असताना, मी स्वतः राज्यशास्त्राचा विद्यार्थी आणि शिक्षक असल्याने अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेले राजकीय विचार आपणास शोधता येतील काय? असा प्रश्न पडला. त्यादृष्टीने वाचन व अभ्यास करून शोध घेतला आणि अण्णा भाऊ साठे यांचे राजकीय विचार एकत्रित केले आणि व्याख्यानातून मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु लेखी स्वरुपात या अभ्यास संकलनाला प्रसिद्धी देणे राहून गेले. दलित राजकीय विचारावर आपण जी कॉन्फरन्स घेत आहात त्यामध्ये निश्चितच या संदर्भातील मांडणी उचित ठरेल असे वाटल्याने त्याविषयावर शोधनिबंध लिहिण्याचा हा प्रयत्न केलेला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

1. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अध्ययन करणे.
2. त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले राजकीय विचार संकलित करून सूत्रबद्ध रित्या मांडणे.

**विषय प्रवेश**

अण्णा भाऊ साठे हे काही राजकीय विचारवंत, तत्वज्ञ किंवा राजकीय नेतेही नव्हते. त्यामुळे अण्णा भाऊने राजकीय विचारावर ग्रंथ लिहिलेला नाही किंवा त्यांचे राजकीय तत्वज्ञान काही एका ठिकाणी एकत्रितपणेही त्यांनी मांडलेले नाही. ते त्यांच्या साहित्यात निश्चितच आहे, परंतू चौफेर पसरलेले आहे. त्याचा शोध घेवून त्यास एकत्र गुंफावे लागते व त्याची सुसंगत मांडणी करावी

लागते. असा प्रयत्न अनेकांनी केलेला आहे. परंतू य. दि. फडके यांनी म्हटल्या प्रमाणे थोर महात्म्याचा प्रत्येकाने आपापल्या परीने शोध घेतला पाहिजे. कदाचित प्रत्येकास त्यातून नवीन पैलू समोर आणता येईल. अण्णा भाऊ कसे घडत गेले, राजकीय मूल्यांच्या विवक्षित प्रेरणा त्यांच्यात कशा भीनत गेल्या हे समजून घेत आपण त्यांच्या साहित्यातून व्यक्त झालेले ते विचार आणि त्या मूल्य प्रेरणा समजून घेवूयात. प्रतिमा पब्लिकेशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या 'लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे समग्र वांगमय' खंड **1** आणि **2** मधील अण्णा भाऊ यांचे साहित्य या शोध निबंधासाठी अभ्यासण्यात आलेले असून काही विशेषांक किंवा अनुषंगिक उपलब्ध झालेली संदर्भ पुस्तकेही वापरण्यात आलेली आहेत.

आपल्या सारख्याच इतर समाज बांधवाचे दुखः दूर करून त्यांच्या जीवनात समाधान, आनंद आणि तृप्तता भरण्यासाठी उपायांचा शोध घेणारी अण्णांची विचार दृष्टी आणि साहित्य सृष्टी सांप्रत व्यवस्थेतील दोष दूर करून नवीन, अनुकूल व्यवस्था शोधण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होती असे दिसते. त्यांच्या या प्रयत्नातूनच समाज, समाजकारण, वृत्ती, प्रवृत्ती, रीती-भाती, राजकारण यांची मीमांसा अण्णा भाऊ करतात. त्याच बरोबर आदर्श राजकीय आणि सामाजिक व्यवस्था यांचा आपल्या परीने शोध घेण्याचा प्रयत्नही ते करतात. शोषण मुक्त समाज आणि शोषण मुक्त माणूस निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, मानवतावाद या सारख्या संकल्पनांचे तत्वज्ञान आपसूकच विविध रूपातून- म्हणजे पोवाडे, कथा, कादंबरी, नाट्य, गाणी, स्तवने ई. मधून अभिव्यक्त होत होते. अनायासेच अवतीभोवती घोंगावणारे साम्यवादी वारे आणि साम्यवादी तत्वज्ञान आपल्या हेतू सिद्धीच्या जवळ जाणारेच असून त्यातून आपली समस्या सोडविण्याचा मार्ग सापडू शकतो असे वाटल्यामुळे अण्णांची साहित्यिक दृष्टी त्या दिशेने अग्रेसर झाली आणि सरतेशेवटी डॉ आंबेडकरी तत्वज्ञानात, चळवळीत आसरा शोधू लागली.

**अण्णा भाऊ साठे यांची जडणघडण**

अण्णा भाऊचे लहानपण आणि ५०-६० च्या दशकातील अण्णा असे दोन वेग वेगळे दृश्य कदाचित कोण्या दिग्दर्शकाने चितारले आणि स्वतंत्रपणाने ते कोणाच्या पाहण्यात आले तर विश्वास बसणार नाही की हे दोन्ही दृश्य एकाच व्यक्तीचे जीवन चित्रित करणारे आहेत. शाळेतल्या मास्तरला दगड भिरकावणारे, रानोमाळ, डोंगर-कपारी अनवाणी हिंडणारे, आणि आपल्या समवयस्क मित्रांसमवेत यात्रा, जत्रा नि तमाशाचे फड धुंडाळणारे अण्णा, साहित्य संमेलनाचे उद्घाटन करतात, बलाढ्य रशियाचा अभ्यास दौरा करतात, तेथे रशियात याच अण्णा साठी फुलांचे गुच्छ घेवून विमानतळावर रशियन नेते, कार्यकर्ते आणि साहित्यिक डोळे लावून बसतात....अद्भुत, आश्चर्यकारक, एखाद्या सिनेमाला शोभावा असा अण्णांचा जीवन पट आहे. प्रा. बजरंग कोरडे म्हणतात, ई.१९३२ ते १९३६ या काळात अण्णा भाऊ यांच्या सवयी बदलल्या. ते साहस कथा, पोवाडे, स्तवने ऐकणे आणि म्हणणे अशा बाबीकडे वळाले. त्यासाठी समवयस्क गट तयार करून त्यांचे समवेत वेळ घालवणे, भटकणे असे करत करत राजकीय चळवळीकडे ते आणि त्यांचे मित्र वळाले.**1** कदाचित किशोर अवस्थेचा, भटकंतीचा आणि सवंगड्यांच्या प्रभावाचा हा परिणाम असेल. वाळवा आणि सातारा परिसरातील राजकीय, सामाजिक परिवेश आणि तेथील राजकीय चळवळी यांचा अण्णांच्या व्यक्तित्वावर मोठा प्रभाव पडलेला

दिसतो. स्वतःचे आणि आप्त स्वकीयांचे अनुभव यातूनही अण्णांमधील बरेच गुण, विचारशैली आणि साहित्य दृष्टी घडल्याचे दिसून येते. मुंबईला आल्यानंतर तेथे ज्या वातावरणात आणि परिस्थितीत अण्णा राहिले त्यातूनही त्यांच्यातील साहित्यिक घडत गेला.

मुंबईतील सुरुवातीची काही वर्ष अण्णा भाऊच्या जडण घडणीची महत्वाची वर्ष होती. मुंबईतील विविध ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय, राजकीय आणि सामाजिक चळवळी आणि त्यावरून होणाऱ्या चर्चेकडे अण्णा आकर्षित झाले. विविध राजकीय संघटना त्यांना आपल्याकडे ओढू लागल्या. मित्रांबरोबर राजकीय चर्चा करणे, चळवळीत, सभा-कार्यक्रमात सहभाग घेणे, संघटनेचे कार्यकर्ते म्हणून काम करणे या बाबी कडे ते ओढल्या गेले. मुंबईत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. परंतू १९३६ मध्येच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले होते.[2]

कॉ. डांगे सोबतच आचार्य अत्रे यांच्या विचार व्यक्तित्वाचा आणि साहित्याचा अण्णांचे व्यक्तित्व घडविण्यात मोठा प्रभाव दिसून येतो. मुंबईहून मध्ये-मध्ये अनेकदा अण्णांना वाटेगावला आपल्या कुटुंबीया सोबत यावे लागे. १९४२ च्या चलेजाव चळवळी प्रसंगी ते वाटेगाव येथे होते. मुंबईत परतताच त्यांना मॅक्झिम गार्कीचे साहित्य वाचायला मिळाले. रामविजय, पांडवप्रताप, वाचणे आणि छ.शिवाजी महाराजांच्या वीरकथावर आधारलेले चित्रपट पाहणे याही गोष्टी अण्णांनी केल्या. मार्क्स, त्याचे साम्यवादी तत्वज्ञान आणि त्यावरील पुस्तकांचे वाचन करणे. स्वातंत्र्य लढ्याबाबत आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी बाबत वर्तमान पत्रातून आणि नियतकालिकातून येणारे लेख हे सर्व अण्णा वाचत होते. लिखाणाची उर्मी त्यांना याच साहित्यानं दिली. त्यांच्या राजकीय विषयावरील वगनाटयांनी जनतेमध्ये भारतीय आणि विशेषतः महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती बद्दल जागृती निर्माण केली, वाढवली. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, बेळगाव कारवार सीमावाद आणि गोवा मुक्ती आंदोलन या आंदोलनामध्ये हिरीरीने भाग घेणाऱ्या समितीचे अण्णा एक सक्रीय कार्यकर्ते बनले होते. त्यांनी सामान्यजणांना आपल्या भोवतीच्या राजकीय घडामोडीबद्दल जागरूक करण्याचे मोठे कार्य केले. ते **communist** पक्षाचे कार्ड होल्डर आणि निष्ठावान कार्यकर्ते होते. लाल बावटा कला पथकाच्या माध्यमातून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि द. ना. गव्हाणकर या त्रीमुर्तींनी लोकांना आपल्या भोवतीच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती बद्दल सचेतन केले.

**देशाचे स्वातंत्र्य आणि मानव मुक्ती या बाबत व्यक्त झालेले अण्णांचे विचार**

सातारा परिसरात त्याकाळी पत्री सरकार क्रांतिसिंह नानापाटील यांनी ब्रिटिशाविरुद्ध सशस्त्र लढा उभारलेला होता. सवंगड्या समवेत त्यांचे भाषण ऐकून अण्णा भाऊ प्रभावीत झाले. क्रांतिसिंह नानांच्या व्यक्तिमत्वा एवढेच त्यांचे भाषणही प्रेरणादायी, ओजस्वी आणि जोरदार होते. त्यामुळेच अण्णा भाऊ साठे स्वातंत्र्य लढयाकडे वळाले.[3] उपरोक्त त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिले. या लढ्यात सहभागी असल्याने ते अधून मधून भूमिगत असत. मुंबईहून मध्ये मध्ये अनेकदा अण्णांना वाटेगावला आपल्या कुटुंबीया सोबत यावे लागे. १९४२ च्या चलेजाव चळवळ प्रसंगी ते वाटेगाव येथे होते. **42** चे आंदोलन चहूकडे पेटलेले होते. महात्मा गांधींनी ब्रिटिशांना चलेजाव चा आदेश दिलेला होता. स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने लोक झपाटले होते. ब्रिटिशांना हरप्रकारे विरोध चालू

होता. सातारा जिल्हा याबाबतीत आघाडीवर होता. वाटेगाव भागातल्या अने तरुणांनी बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली टेलीफोन लाईन्स कापून टाकल्या होत्या. ब्रिटिशांविरुद्ध अनेक घडामोडी होत होत्या. त्यापैकी काहीमध्ये अण्णा भाऊ देखील सहभागी होते. त्यामुळे त्यांचेवर अटक वारंट निघालेले होते. या घटनेने त्यांना आपले घर कायमचे सोडावे लागले. अटक टाळण्यासाठी ते डोंगर दर्यातून लपून राहिले. नंतर कुटुंबासह मुंबईला आले. मास्तर ही कथा कदाचित अण्णांना या प्रसंगावारूनच सुचली असावी. अण्णा जे जगले तेच त्यांनी साहित्यात उतरवले असे दिसून येते. अण्णांनी आपल्या साहित्याला स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि मानव मुक्ती या उदात्त मूल्यांचे अधिष्ठाण दिलेले होते. प्रा डॉ बाबुराव गुरव म्हणतात, अण्णा भाऊंच साहित्य पुरुषाचा स्वाभिमान, स्त्रीचे चारित्र्य आणि देशाचे स्वातंत्र्य यांचे रक्षण करण्याच्या उद्दात्त हेतूने लिहिलेले आहे.[4]

वारणेच्या खोऱ्यात या कादंबरीमध्ये अण्णा भाऊ यांनी भारत छोडो आंदोलनात हौतात्म्य पत्करणाऱ्या तरुण स्वातंत्र्य सैनिकाच्या साहसी कृत्याचे आणि त्यास मदत करणाऱ्या 'मंगला' या त्याच्या प्रेयसीचे चित्रण केलेले असून स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचे बलिदान करण्यास तयार असल्याचा भाव त्याकाळी अण्णा आणि त्यांच्या अवतीभवती कसा उपस्थित होता हेच त्यातून प्रकट होते.[5] 'वारणेचा वाघ' या आपल्या साहसी कादंबरी मधून ब्रिटीशांचा अरेरावीपणा, उद्दामपणा आणि गुलामगिरी लादण्याची त्यांची वृत्ती यांच्या विरुद्ध बंड करणाऱ्या सतू भोसले याच्या रूपाने अण्णांनी साहस, स्वाभिमान, प्रामाणिकपणा, आत्मविश्वास, दृढता आणि स्वातंत्र्य मिळविण्याची अदम्य इच्छा या वैश्विक मूल्यांची पूजाच बांधलेली आहे. 'मास्तर' या आपल्या कादंबरीत अण्णा भाऊने श्रद्धेने आणि त्यागी वृत्तीने स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणाऱ्या एका बंडखोर शिक्षकाचे जीवन चित्रित केलेले आहे. या त्यांच्या पात्रातून त्यांच्यातील स्वातंत्र्या बद्दलची श्रद्धा आणि त्यासाठी त्याग करण्याची तयारी हा भाव व्यक्त होतो. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अण्णा भाऊंचा मास्तर शस्त्राचा वापर करण्यावर विश्वास ठेवणारा आहे.[6]

स्वातंत्र्यलढा, गोवा मुक्ती संग्राम आणि संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यामधील अण्णाभाऊंचे योगदान मोलाचे होते. 'माझी मैना गावाकडे राहिली' या त्यांच्या छकडीने सारा महाराष्ट्र निनादून सोडला होता. हिंदवी स्वराज्याचे निर्माते आणि उभ्या हिंदुस्थानचे दैवत, स्वातंत्र्याचे जाज्वल्य स्फूर्तीस्थान छत्रपती शिवरायांचे चरित्र अण्णाभाउंनी रशिया पर्यंत पोवाड्यातून सांगितले. पुढे त्याचे रशियन भाषेमध्ये भाषांतर झाले आणि राष्ट्राध्यक्षांकडून त्यांचा सन्मान देखील झाला. अण्णा भाऊंना देशाचे स्वातंत्र्य तर हवे होतेच परंतू मानव गुलामीतून मुक्त होणे आणि खऱ्या अर्थाने तो स्वतंत्र होणे आवश्यक असेल तर आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य निर्माण करण्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या विविध साहित्यातून अनेक ठिकाणी देशाच्या स्वातंत्र्याची, सामाजिक स्वातंत्र्याची आणि व्यक्ती स्वातंत्र्याची आच प्रकट होताना दिसते.

**'समता' या मूल्याबद्दल व्यक्त झालेले विचार**

समाजातील दलित शोषित जनतेने जात-पात, धर्म, मान-पान यांचा त्याग करावा व एक समतेवर आधारीत समाज निर्माण करण्यात पुढाकार घ्यावा असे अण्णाभाऊंना प्रकर्षाने वाटत होते. समाजातील विषमतेवर त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून

मार्मिकपणे कोरडे ओढले आहेत. अनेक कथामधून ग्रामीण महाराष्ट्रातील आणि मुंबई सारख्या औद्योगीक महानगरीतील उच्चनिचता, दारिद्र्य, विषमता, शोषण याचे चित्रण त्यांनी केलेले आहे.

**राहयाला गुलाबाचे फूल की।।**' या शब्दांत पठ्ठे बापूराव मुंबई मायानगरीचे वर्णन करतात.

मुंबई नगरीचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात -

**'मुंबईत उंचावरी। मलबार हिल इंद्रपुरी।।**

**कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती।।**

**परळात राहणारे। रात दिवस राबणारे**

**मिळेल ते खाऊन घाम गाळती।।**

पठ्ठे बापूरावांना मुंबई गर्भश्रीमंत दिसते, तर अण्णाभाऊंना तीच मुंबई विषम व्यवस्थेचे प्रतीक वाटते! अण्णाभाऊंच्या वेगळ्या जीवनदृष्टीचा येथे प्रत्यय येतो असे प्रा. विश्वनाथ शिंदे लोकराज्य च्या आपल्या लेखात म्हणतात. ‘स्मशानातील सोनं’ या कथेत पोट जाळण्यासाठी भीमाने केलेल्या घनघोर लढाईचे वर्णन अण्णाभाऊंनी समर्थपणे केले आहे. भुकेच्या तीव्रतेचे भयानक दारिद्र्याचे वास्तव या कथेत आहे.(स्मशानातील सोनं) धनदांडग्यांकडून होणारे शोषण, श्रेष्ठकनिष्ठतेचा भाव, हळूहळू कोसळणारा गावगाडा, बलुतेदाराची स्थितीगती, सावकारशाही, श्रीमंतीच्या जोरावर चालणारा इष्काचा बाजार, घराण्याचा बडेजावपणा, मोठे दगडी चौसोपी वाडे, महारवाडा, मांगवाडा, भटके-फिरस्ते अशा साऱ्या गोष्टींचे त्यांच्या बारीक-सारीक तपशिलांसह केलेले चित्रण अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आले आहे. प्रा बाबुराव गुरव म्हणतात शोषणाचा आणि सामाजिक व आर्थिक विषमतेचा अंत करण्याच्या प्रबळ प्रेरणा घेवून घेवून संघर्ष उभा करणारे, भल्यांचा पुरस्कार आणि बुऱ्यांचा तिरस्कार करणारे हे (अण्णा भाऊचे) साहित्य आहे.**7** परंतू स्वातंत्र्या नंतर निर्माण झालेले आमचे देशी सरकार जेंव्हा सामाजिक विषमता, दारिद्र्य, भूक आणि बेरोजगारी याकडे दुर्लक्ष करू लागते तेंव्हा “ये आझादी झूठी है, देश की जनता भुकी है. हे सांगायला अण्णा डगमगले नाहीत.

**सामाजिक न्यायाबाबत साहित्यातून व्यक्त झालेली कळकळ**

अण्णाभाऊ सामाजिक बांधिलकी मानणारे, समाजपरिवर्तनाचे शस्त्र हाती घेऊन लेखन करणारे साहित्यिक होते. कम्युनिस्ट चळवळीशी त्यांचा जवळून संबंध होता. पण सर्वसामान्य कष्टकरी, दलित, उपेक्षित आणि धर्मव्यवस्थेने हक्क नाकारलेले स्त्री-पुरुष हे त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी होते. त्यांच्या साहित्यातून प्रगट झालेली त्यांची सर्वसामान्य माणसांविषयीची आंतरिक तळमळ व त्यांच्या सुखदु:खाचे चित्रण करण्याची त्यांची पद्धत सामाजिक न्याय आणि सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य या मूल्यांचा ध्यास घेणारीच आहे. अण्णा भाऊ यांच्या लेखना मागील दृष्टीकोन सांगतांना डॉ बाबुराव गुरव यांनी त्यांचे अंतरंग उलगडून दाखवलेले आहे, 'मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही', अशी त्यांची लेखनामागील भूमिका असल्याचे गुरव सांगतात 'माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसे फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती फार महान आहे, त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज आणि त्यांचं यश यावर माझा विश्वास आहे', असे त्यांचे मत होते.

त्यामुळेच त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी तीच माणसे आहेत. साहित्य मग ते ललित असो की दलित असो खऱ्या श्रेष्ठ साहित्याचा माणूस हा केंद्रबिंदू असला पाहिजे असा त्यांचा(अण्णांचा) आग्रह होता.[8]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंझार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकीरा' मध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिबांना, दलितांना वाटप करणाऱ्या फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आलेले आहे. "सापळा" या कथेतून दलित सवर्ण संघर्ष मांडण्यात आलेला असून उच्चवर्णीयांच्या वृथा वर्णाभिमानास आणि त्यांनी रचलेल्या सापळ्यास दलित कसे भेद्तात याचे वर्णन आलेले आहे. त्याच प्रमाणे अस्पृश्यता आणि उच्चनिचता हा संसर्गजन्य रोग असून तो खालच्या स्तरापर्यंत कसा झिरपत गेलेला आहे हे "उपकाराची फेड" या कथेतून मांडण्यात आलेले आहे. सामाजिक अन्याय आणि मागासलेपण दूर करण्यासाठी डॉ आंबेडकरांनी जे आंदोलन सुरु केले त्या आंदोलनाच्या परिणामाचे विविध पैलूंचे चित्रण करणारी "वळण" ही कथा अनिष्ठ चालीरीती, सवयी बदलविण्यास उत्तेजन देणारी आहे. "विष्णुपंत कुलकर्णी" या कथेत जेंव्हा दलितांच्या जीवन मरणाचा प्रश्न येतो, सामाजिक न्यायाचा प्रश्न येतो तेंव्हा दलीतेत्तर विष्णुपंत कसे जहाल होऊन १९१८ च्या दुष्काळात रोगराई आणि दुष्काळ तसेच सावकार आणि अन्यायी ब्रिटीश यांच्या जाचातून सुटण्यासाठी आणि जगण्यासाठी सल्ला देतात आणि अन्याय दूर करण्यासाठी पाठबळ, सहकार्य देतात याचे वर्णन आलेले आहे. मांग ही जात गुन्हेगार जात म्हणून जाहीर करणारा अन्यायकारक कायदा पास झाल्यामुळे या कायद्याविरुद्ध पेटून उठलेला "सावळ्या मांग" आणि त्याचे साथीदार कसे बंड करतात हे 'डोंगरचा राजा' (सावळा मांग) या कथेतून चितारलेले आहे. 'कोंबडीचोर' या कथेत गरिबी आणि दारिद्र्य दूर केल्याशिवाय चोरी आणि तत्सम गुन्हे थांबणार नाहीत हे सांगून अण्णा भाऊ स्वतंत्र भारतातील सरकार दारिद्र्य आणि भूक कमी करेल अशी अपेक्षा स्वातंत्र्यापूर्वी गृहीत धरतात. पण स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष उलटूनही अद्याप सरकारला या कार्यात यश आलेले नसल्याची खंत ते प्रकर्षाने व्यक्त करतात. 'अकलेची गोष्ट', 'खापऱ्या चोर', 'देशभक्त घोटाळे', 'शेटजीचे इलेक्शन', 'माझी मुंबई' इत्यादी लोकनाट्ये लिहून यातून आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न त्यांनी मांडले. प्रा विश्वनाथ शिंदे म्हणतात भांडवलदार, शेतकऱ्यांचे शोषण करणारे सावकार, शेटजीभटजी हे अण्णा भाऊंच्या टीकेचे लक्ष्य होते. 'धोंड्या' नावाचे एक पात्र निर्माण करून अक्षरशः पुंजापतींच्या वृत्तीप्रवृत्तींवर त्या माध्यमातून अण्णांनी दगड भिरकावण्याचा प्रतीकात्मक प्रयत्न केला. प्रबोधन करून परिवर्तन घडविणे. विषमता घालवून वर्ग संघर्ष कमी करण्याची दृष्टी पेरणे, सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य मराठी माणसांना देणे असे प्रयत्न अण्णा भाऊ यांच्या साहित्यातून विचारातून दिसून येते. परिवर्तनासाठी त्यांना मार्क्सचा विचार पटला होता म्हणूनच मार्क्सवादी विचारांची पेरणी त्यांनी आपल्या साहित्यातून केली. आपसातले हेवेदावे, गरीब जनतेला, शेतकऱ्यांना छळणारा दारिद्र्याचा झगडा त्यांनी न्याहाळला होता. त्यातच मॅक्झिम गार्कीच्या साहित्यानं प्रभावित झालेल्या त्यांच्या अंतरीच्या उर्मीला-प्रतिभेला बहर आला. अण्णा भाऊंच्या जीवनातील या वळणावर अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्टालिनग्राडचा पोवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लाल बावटा' कलापथक स्थापन केले. परंतु सरकार विरूद्ध काहीतरी होत आहे अशा संशयाने या

कलापथकावर सरकारने बंदी घातली. 'अमळनेरचे अमर हुतात्मे' आणि 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या त्यांच्या काव्यरचना १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींनी एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

**अण्णा भाऊ यांच्या साहित्यातून डोकावणारे मार्क्सवादी विचार**

अण्णाभाऊ साठे मार्क्सवादी आहेत. त्यांच्या साहित्यातून आधीपासूनच समतावादी विचारांचा आविष्कार दिसत असला तरी मुंबईला गेल्यावर श्रीपाद अमृत डांगे यांच्या सान्निध्यात ते आले आणि त्यांची मार्क्सवादी जाणीव अधिक पक्की झाली. मुंबईत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. परंतू १९३६ मध्येच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले होते. मुंबईतील कामगार जीवन, त्यांचे वर्गसंघर्षाचे तत्त्वज्ञान, तेथील संप, मोर्चे, त्यांच्या रोजीरोटीचा सवाल, कामगारांच्या चळवळीतील फाटाफूट या साऱ्या अनुभवातून अण्णाभाऊंच्या विचारांना पाठबळ मिळत गेले. मुंबईच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांचे जीवनचित्रण करताना त्यांच्यातील मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आविष्कार प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. मुंबईतील सुरुवातीची काही वर्ष अण्णा भाऊच्या जडण घडणीची महत्वाची वर्ष होती. मुंबईतील विविध ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय, राजकीय आणि सामाजिक विषयावरील चर्चेकडे अण्णा आकर्षित झाले. विविध राजकीय संघटना आणि मित्रांबरोबर राजकीय चर्चा करणे या बाबी कडे ते ओढल्या गेले.

मुंबईतील आजूबाजूचे वातावरण कामगार, त्यांच्या संघटना, त्यांचे मोर्चे, आंदोलने यासोबतच कष्टकरी, मजूर, कामगार यांच्यासाठी काम करणाऱ्या मार्क्सवादी विचाराच्या कामगार संघटना. त्यांच्या सभा, कार्यक्रम हे सर्व अवती भवती घडत असतांना अण्णा त्याकडे वळणे साहजिकच होते. एखादी व्यक्ती तिच्या कौटुंबिक आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमीमुळे विशिष्ठ विचारसारणी कडे ओढला जातो असे बजरंग कोरडे म्हणतात ते बरोबरच आहे. तारुण्यात पदार्पण करण्यापूर्वीच अण्णा **communist** विचारप्रणाली कडे आकर्षित झाले. पोस्टर चीटकवणे, प्रचार पत्रक वाटणे, घोषवाक्य आणि प्रचारकी माहिती भिंतीवर लिहिणे ही कामे करता करता अण्णा भाऊ **communist party** च्या **youth wing** चे सदस्य झाले. प्रचारसभा, मोर्चे, कार्यक्रम, बैठका यांचे आयोजन आणि तयारी यातही ते पुढाकार घेवू लागले. सभा आणि विविध कार्यक्रमातून कानावर पडणारे बौद्धिक, **communist** विचार यामुळे त्यांच्या बौद्धिक पातळीत भर पडत गेली. जीवनात घेतलेले कठोर आणि संघर्षशील अनुभव आणि **communist** विचार यामुळे त्यांचे स्वतः चे विचारही प्रवाही बनले आणि विविध गाणी, कवने, कविता, पोवाडे ते लिहू लागले. विविध कार्यक्रमातून आणि सभामधून पट्टीच्या सुरात म्हणू लागले. **42** च्या आंदोलनानंतर पुन्हा मुंबईला आल्यानंतर यावेळी त्यांचे ध्येय निश्चित झालेले होते. त्यांना आकर्षित करणाऱ्या राजकीय विचारसरणीचा एक धागा त्यांना मिळाला होता. अण्णा भाऊ **communist** पक्षाचे पूर्णवेळ प्रचारक बनले.(कोरडे). पक्षाचा प्रचार करण्यासाठी ते सर्व वेळ देवू लागले. त्यासाठी त्यांनी अमर शेख आणि गव्हाणकर यांच्या समवेत "लाल बावटा कलापथक" स्थापन केले. १९४४ [9]

त्यांनी १९४२ मध्ये स्टॅलिनग्राडचा पोवाडा लिहिला. त्या पोवाड्याने कम्युनिस्ट पार्टीच्या वर्तुळात कम्युनिस्ट शाहीर म्हणून प्रसिद्ध झाले. शाहीर अमर शेख, द. न. गव्हाणकर यांच्या सहकार्याने 'लाल बावटा' कलापथक काढले. त्यांच्या मार्क्सवादी भूमिकेचा सर्वाधिक आविष्कार पोवाड्यांमधून व लोकनाट्यातून झाला आहे. लाल बावट्याच्या माध्यमातून वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान आणि साम्यवादी विचार त्यांनी महाराष्ट्रात रुजवला. वर्गीय क्रांतीची उकल करण्यासाठी त्यांनी तमाशाचा बाज नेमकेपणानं उचलला. पारंपारिक गण- गवळणीच्या ऐवजी श्रमशक्तीला अभिवादन करणारा गण मोठ्या तडफेनं साकारला. तमाशाला लोकआरंभालाच खऱ्या-खोट्याचे कोडे घालून सामान्यातल्या सामान्य माणसाचं कुतूहल वाढवीत त्यांनी आदिवासींची, कोळी-भिल्लांची, मांग-महार, रामोशांच्या जीवनाची कथा आणि त्यांच्या व्यथा वेदनांचा हुंकार शाहिरीच्या लोकबाजातून मांडला. हाच आशय त्यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून देखील मांडला.

आपल्या "वैर" या कादंबरीतून ग्रामीण महाराष्ट्रातील जमीनदार(आहेरे) आणि शेतकरी, शेतमजूर (नाहीरे) या वर्गातील वर्गसंघर्ष अण्णांनी जिवंत केलेला असून हा संघर्ष आपल्या प्रत्यक्ष जीवनात स्वीकारलेल्या वर्गसंघर्षाच्या साम्यवादी तत्वज्ञानाशी सुसंगतच ही मांडणी आहे. छोट्या कथामधुनही अण्णांनी आपल्या साम्यवादी विचारांची अभिव्यक्ती केल्याचे दिसते. "सुलतान" ही कथा मार्क्सवादी दृष्टीकोनातून लिहिलेली असून कथेतील नायक आपल्या मुलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा भागवण्यासाठी कसा प्राणांतिक आणि प्रामाणिक प्रयत्न करतो, अनेक वर्ष प्रामाणिकपणे कष्ट करूनही जेंव्हा तो आपल्या जगण्याची आवश्यकताही पूर्ण करू शकत नाही तेंव्हा बंड करून उठतो, संघर्ष करण्यास सिद्ध होतो. कामगारांना मार्क्सने दिलेल्या उपदेशाप्रमाणे अण्णा कदाचित कष्टकरी, कामगार यांना या कथेच्या माध्यमातून संघर्ष आणि बंड करण्यास प्रेरणाच देत आहेत.

**अण्णांच्या साहित्यातून व्यक्त झालेले मानवतावादी विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा' मध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिबांना, दलितांना वाटप करणाऱ्या फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आहे. आपल्या "भोमक्या" या कथेतून अण्णा भाऊ आमच्या भारतीय संस्कृतीचा तथाकथित पोकळ मोठेपणा उघडा पाडून हे दाखवून देतात कि, या देशात ज्यांना माणसे म्हणून म्हटले जाते, त्यांना समाजात काहीही स्थान नाही. या देशातील लाखो लोक दारिद्र्यात आणि गुलामगिरीत भरडून निघत आहेत. भारतातील गरिबी, भूक, अशिक्षितपणा आणि बेकारी याचे नष्टचर्य "स्मशानातील सोने" या कथेतून मांडलेले दिसते. अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक होते. शोषणमुक्ती हा त्यांचा ध्यास होता. कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. आपल्या साहित्यातून शोषण, अन्याय, अत्याचाराला विरोध करणे हेच त्यांनी ध्येय मानले व मानवी वृत्ती, प्रवृत्तीचे वास्तव दर्शन वाचकांना घडविले. शब्दांना अंगाराचे रूप देऊन दलितांच्या निर्जीव मनाला चेतवत अण्णाभाऊ मराठी साहित्यातील अढळ पदावर विराजमान झाले आहेत. वर्गविरहित समाजाचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी आपले सारे आयुष्य पणाला लावले. खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे ध्येयवादी लोकशाहीर होते. मानवमुक्तीचे शिलेदार होते! १६ ऑगष्ट १९४७ साली "ये आझादी झुठी है देश कि जनता भुकी है" असा नारा छ. शिवाजी पार्कवर त्यांनी दिला त्या दिवशी पावसाने रौद्र रूप धारण केले होते. मात्र, तरीही अण्णाभाऊ मागे हटले नाहीत.

**भाषावार प्रांतरचना – मराठी भाषेचे राज्य (अर्थात संयुक्त महाराष्ट्र चळवळ)**

अण्णाभाऊ साठेचं नाव घेतल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास पूर्ण होणार नाही. अण्णाभाऊंनी अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या महाराष्ट्राच्या परंपरेचं स्मरण देऊन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनासाठी उभ्या महाराष्ट्राला प्रेरणा दिली. तत्कालीन मोरारजी सरकारने त्यांच्या 'माझी मुंबई अर्थात मुंबई कुणाची?' या नाटिकेवर बंदी आणली तरी अण्णाभाऊ आणि त्यांच्या साथीदारांनी तिचे प्रयोग करून महाराष्ट्र पेटता ठेवला. 'माझी मैना' हे गाजलेले गीत लिहून अण्णाभाऊंनी मुंबईबद्दलच्या सर्वसामान्यांच्या भावनाच व्यक्त केल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी आपल्या साहित्य कृतीतून राजकीय प्रश्नाबद्दल जागृती निर्माण केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये त्यांनी शाहिरीतून दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होतीया काह्यली।।`ही त्यांची गाजलेली लावणी होती.

सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले म्हणतात, अण्णभाऊ दलितांचा विचार करतांना मराठी माणूस विसरले नाहीत. दलित म्हणून त्यांना अनेक यातना भोगाव्या लागल्या परंतू महाराष्ट्र हा मुंबईसह अखंड राहिला पाहिजे ही त्यांची तळमळ मराठी माणसाच्या भवितव्याशी निगडीत आहे. माझी मैना ही लावणी शृंगारीक नाही, ती मराठी मनाचा ठाव घेणारी आहे. पती पत्नीच्या दुराव्याने उभयतांना जी दुखः सहन करावी लागतात तशी अवस्था मुंबई वेगळी करण्याने मराठी माणसाची झाली असती. हेच अण्णा पटवून देतात.[10] शाहिरी पोवाडे, लावण्या, वगनाट्य आणि लोकनाट्य ई. च्या माध्यमातून अण्णा भाऊ आणि त्यांच्या सहकारी शाहिरांनी मराठी भाषिक राज्याची मागणी लावून धरली. जनतेला मराठी भाषिक राज्य आणि मुंबईसह महाराष्ट्र ही न्याय बाजू पटवून देवून आंदोलनासाठी वन्ही पेटविला. लोक संघटन, प्रचार आणि साहित्य निर्मिती या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीस या शाहिरांनी जे बळ दिले ते हा महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.

**स्त्रीपुरुष समता- स्त्रीवादी विचार**

अवती-भोवतीच्या आयाबायांच्या तोंडची गाणी, ओव्या, गोष्टी-आख्यायिकांचा ठसा त्यांच्या कोवळया मनावर कोरला गेला होता. पातिव्रत्य धर्माचे पालन करणाऱ्या अनेक स्त्रिया त्यांच्या भोवताली वावरत होत्या. त्या निष्ठावान स्त्रियांचे राजरोस होणारे शोषण त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले होते,[11] मुंबईतील औद्योगीकरण होत असलेल्या आधुनिक समाजातही स्त्रियांचे होणारे शोषण अण्णा पाहत होते आणि त्याविषयीचा संताप व चीड त्यांच्या मनात धुमसत असावी. तरण्याताठ्या देखण्या पोरीबाळींवर होणारे अत्याचार या साऱ्या गोष्टी अण्णाभाऊ आपल्या साहित्यात मांडत होते. श्रीमंतीच्या जोरावर चालणारा इष्काचा बाजार, गरती स्त्रियांची घराण्याच्या प्रतिष्ठेपोटी होत असणारी घुसमट, स्त्रीचे शील इत्यादी बाबी त्यांच्या साहित्यातून प्रकट होतांना दिसतात. विशेषतः अण्णा भाऊंच्या कादंबरी या साहित्य प्रकारातून स्त्रियांवर होणारे अत्याचार, स्त्रियांचे शोषण, स्त्रियांचे गुलामीचे जीवन अशा विविध स्त्रियांच्या समस्यांची मांडणी केलेली दिसून येते. या कादंबऱ्यापैकी चित्रा, वैजयंता, चिखलातील कमळ, फुलपाखरू, टिळा लावते मी रक्ताचा आणि रत्ना यांचा उल्लेख करावा लागेल.

"चित्रा" या कादंबरीत मुंबईत औद्योगीकरणा सोबतच शरीरविक्रयाचा व्यवसाय कसा वाढला आणि कशा प्रकारे पैशाच्या लोभापायी अगदी जवळचे नातेवाईकही स्त्रियांना या व्यवसायात ढकलतात याचे वर्णन या कादंबरीत आलेले आहे. हजारो निष्पाप स्त्रियांना दलालांकडून कसे बळी बनविण्यात येते, याचे चित्रण करून अण्णा भाऊंनी आधुनिक समाजातील पुरुषीवृत्तीही स्त्रियांचे कसे

शोषण करते हेच प्रकट केलेले आहे.[12] 'वैजयंता' कादंबरीत तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या लैंगिक, सामाजिक, आर्थिक आणि भावनिक शोषणाचे चित्रण करण्यात आलेले आहे.[13]

"चिखलातील कमळ" या कादंबरीत ग्रामीण महाराष्ट्रातील 'वाघ्या-मुरळी' या अनिष्ठ प्रथेचे वर्णन आलेले असून मुरळयांना कसलेही संरक्षण नसल्याने त्यांचे शोषण होत असल्याची मांडणी करण्यात आलेली आहे. तसेच चिखलातील दलदलितही स्त्रिया पवित्र आणि शुद्ध राहण्याचा आटापिटा करतात, परंतू विकृत पुरुषी वृत्ती मात्र त्यांना त्रास देते या सर्व बाबी मांडलेल्या आहेत. "चंदन" कादंबरीत अण्णा भाऊ यांनी पतीच्या मृत्यूनंतर वासनांध पुरुषी प्रवृत्ती विरुद्ध लढणाऱ्या स्त्रीचे साहस चित्रित केलेले आहे. "फुलपाखरू" ही कादंबरीही फसवणूक झालेल्या स्त्रीची, ती वेश्याव्यवसायात कशी अडकते हे सांगणारी कथा असून त्यातून तिला मुक्त करून सन्मानाचे जीवन देणाऱ्या सकारात्मक पुरुषी वृत्तीचीही दखल घेणारी आहे. टिळा लाविते मी रक्ताचा या कादंबरीत घराण्याच्या आणि उच्च जातीच्या खोट्या प्रतीष्ठेपायी स्त्रियांच्या भावनांचा कसा बळी दिला जातो याचे वर्णन, एवढेच नव्हे तर '**Honor killing**' या सामाजिक समस्येस वाचा फोडण्याचे कार्य अण्णा भाऊ यांनी केलेले आहे. जातिभेदाच्या भिंती नष्ट करण्याचा कदाचित कादंबरीकाराचा उद्देश असावा असे लक्षात येते. देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकाच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या पत्नीचे जीवन कसे असुरक्षित असते याचे वर्णन अण्णांनी 'रत्ना' या कादंबरीतून केलेले आहे. आपल्या मूर्ती या कादंबरीतून अण्णा भाऊ साठे जातिभेदाच्या भिंती तोडण्यासाठी आंतरजातीय विवाहाचे समर्थन करतात. डोळे मोडीत राधा चाले या कादंबरीत स्त्रियांच्या वागणुकीतील मनमोकळेपणाचा खलप्रवृत्तीचे लोक कसा चुकीचा अर्थ लावतात आणि त्यामुळे अनेक स्त्रियांना आपल्या जीवनात अनेक दुर्घटनाना कसे सामोरे जावे लागते याचे चित्रण आलेले आहे.

**थोडक्यात**

अण्णा भाऊंना देशाचे स्वातंत्र्य तर हवे होतेच परंतू मानव गुलामीतून मुक्त होणे आणि खऱ्या अर्थाने तो स्वतंत्र होणे आवश्यक असेल तर आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य निर्माण करण्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या विविध साहित्यातून अनेक ठिकाणी देशाच्या स्वातंत्र्याची, सामाजिक स्वातंत्र्याची आणि व्यक्ती स्वातंत्र्याची आच प्रकट होताना दिसते. समाजातील शोषण, विषमता यावर प्रखर कोरडे ओढणारे अण्णा भाऊ समता तत्वाचा जागर आपल्या साहित्य विचारातून करतात. विषमता घालवून वर्ग संघर्ष कमी करण्याची दृष्टी पेरणे, सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य मराठी माणसांना देणे असे प्रयत्न अण्णा भाऊ यांच्या साहित्यातून विचारातून दिसून येतात. परिवर्तनासाठी त्यांना मार्क्सचा विचार पटला होता म्हणूनच मार्क्सवादी विचारांची पेरणी त्यांनी आपल्या साहित्यातून केली. अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक होते. शोषणमुक्ती हा त्यांचा ध्यास होता. कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. आपल्या साहित्यातून शोषण, अन्याय, अत्याचाराला विरोध करणे हेच त्यांनी ध्येय मानले व मानवी वृत्ती, प्रवृत्तीचे वास्तव दर्शन वाचकांना घडविले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील विविध शाहीर आणि साहित्यिकांच्या योगदानात अण्णा भाऊ साठे यांचे योगदान आघाडीवरचे दिसून येते. मुंबईसह महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे यासाठी त्यांनी केवळ आपली लेखणी झिजवली नाही तर त्यासाठी मोर्चे, आंदोलने काढण्यात आणि शाहिरी आणि पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती चळवळ उभारण्यात त्यांनी अनेक खस्ता खाल्ल्या, कष्ट उपसले, प्रचंड मोठे कार्य केले. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि विचार स्त्रियांचे दुःख, शोषण यांचा ठाव घेणारे असून स्त्रियांना या परिस्थितीतून

बाहेर काढण्यासाठी त्यांची लेखणी त्वेषाने अभिव्यक्त होत होती. स्त्रीपुरुष समतेचे आणि खऱ्या अर्थाने मानवतेचे कैवारी असणारे अण्णा भाऊ परिवर्तनवादी चळवळीचे अग्रदूत होते.

**संदर्भ सूची**

1. भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे- बजरंग कोरडे- अनुवाद – विलास गित्ते, साहित्य अकादमी प्रकाशन पुणे-प्रकाशन **ISBN** ८१-२६०-११४२-४
2. उपरोक्त
3. उपरोक्त
4. लोकराज्य विशेषांक १ नोव्हेंबर १९९३ पृ. **20**
5. लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे समग्र वांगमय, प्रतिमा पब्लिकेशन पुणे- प्रथम आवृत्ती-२०१२, **ISBN 81-89569-11-2** पृष्ठ ९१३
6. भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे- बजरंग कोरडे- अनुवाद – विलास गित्ते, साहित्य अकादमी प्रकाशन पुणे-प्रकाशन **ISBN** ८१-२६०-११४२-४
7. लोकराज्य विशेषांक १ नोव्हेंबर १९९३ पृ. **20**
8. उपरोक्त.
9. भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे- बजरंग कोरडे- अनुवाद – विलास गित्ते, साहित्य अकादमी प्रकाशन पुणे-प्रकाशन **ISBN** ८१-२६०-११४२-४
10. लोकराज्य विशेषांक १ नोव्हेंबर १९९३ पृ. ४
11. भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे- बजरंग कोरडे- अनुवाद – विलास गित्ते, साहित्य अकादमी प्रकाशन पुणे-प्रकाशन **ISBN** ८१-२६०-११४२-४
12. लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे समग्र वांगमय, प्रतिमा पब्लिकेशन पुणे- प्रथम आवृत्ती-२०१२, **ISBN 81-89569-11-2)** पृ. ३०१ आणि ८०३
13. लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे समग्र वांगमय, प्रतिमा पब्लिकेशन पुणे- प्रथम आवृत्ती-२०१२, **ISBN 81-89569-11-2)** पृ. ३०१ आणि ८०३.

# २. कोल्हापूर जिल्ह्यातील उचंगी धरण : विस्थापित लोकांच्या समस्या

**श्रीराम ईश्वरा सुतार**
पीएच. डी. संशोधन विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**प्रस्तावना**

धरण हे विकासासाठी महत्त्वाचे असले तरी त्या धरणामुळे विस्थापित होणारे लोक त्यांच्या समस्या सोडवणे गरजचे आहे. शेतीसाठी, उद्योगद्यांसाठी, पिण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. हा उद्देश ठेऊनच धरणाची निर्मिती केली जाते. दक्षिण महाराष्ट्रात विशेषता: कोल्हापूर जिल्हामध्ये अनेक धरण प्रकल्प उभे केले गेले आहेत. यामध्ये राधानगरी, काळम्मावाडी, तुळशी, अशा अनेक मोठ्या प्रकल्पाबरोबर अनेक मध्यम व छोटे प्रकल्प निर्माण केले गेले आहे. पण या धरणामुळे विस्थापित होणारे लोकांचे प्रमाण ही जास्त आहे. त्यांची घरे, जमिनी घेऊन त्याठिकाणी धरण उभे केल्यामुळे त्यांचे जीवन उध्वस्त झालेले दिसून येते. या विस्थापितांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच शासनाकडून त्यांना योग्य त्या सुविधा न दिल्यामुळे त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे धरणग्रस्ताकडून पुर्नवसनासाठी आंदोलने झालेली दिसून येतात. कोल्हापूर जिल्हायातील एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे उचंगी प्रकल्पाकडे पाहिले जाते. या धरणामुळे धरणग्रस्तांच्या विस्थापनाचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो. प्रस्तुत शोधनिबंधात उचंगी प्रकल्प व विस्थापित समस्या व त्या अनुषंगाने झालेल्या आंदोलनाचा आढावा या ठिकाणी घेतला आहे.

**उचंगी धरण**

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील पूर्वभागात तारओहळ ओढ्यावर उचंगी गावाजवळ हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प भौगोलिक, आर्थिक व तांत्रिक निकषाणावर तयार करण्यात आला आहे. पण विस्थापितांच्या तीव्र विरोधामुळे हा प्रकल्प गाजला. या प्रकल्पाला १९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली असून या प्रकल्पाच्या पुनर्वसनासबंधी अधिसूचना राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाली आहे.[१] या पण प्रकल्पामुळे धरणग्रस्तांचा पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो. तसेच प्रकल्पाच्या जागेसबंधी वाद निर्माण झालेला दिसून येतो.

**उचंगी धरण विरोधी कृती समिती**

या प्रकल्पाला प्रथम उचंगी धरण विरोधी कृती समिती व चाफेवाडी ग्रामस्थांकडून विरोध करण्यात आला होता. धरणग्रस्तांकडून "आधी पुनर्वसन मग धरण" अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. त्यासाठी उग्र आंदोलन ही करण्यात आले. १९९७ साली जिल्हाधिकारीच्या आदेशानुसार मोजणीसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना प्रकल्पस्थळी धरणग्रस्तांनी घेराव ही घातला होता. त्यामुळे यासंबंधी जिल्हाधिकारी, प्रकल्पग्रस्त शेतकरी, धरण विरोधी कृती समिती व सबंधित शासकीय अधिकारी यांची

बैठकही घेण्यात आली. या बैठकीत धरण विरोधी कृती समितीने उचंगी प्रकल्पाला पर्याय प्रकल्प म्हणून खेतोबा हा प्रकल्प सुचवला होता. तसेच लेखी निवेदन ही देण्यात आले होते.[२] पण तो प्रकल्प मान्य झाला नाही.

**उचंगी प्रकल्प क्षेत्र व पुर्नवसन**

उचंगी प्रकल्पामुळे सुमारे १४०० हेक्टर क्षेत्र बुडणार असून सर्व बाधित गावे उठवावी लागणार आहेत. तसेच या प्रकल्पावर ५५ कोटी रु. खर्च होईल असे अपेक्षित धरण्यात आले होते. त्याऐवजी खेतोबा येथे धरण बांधल्यास ०१ टी.एम. सी पाणीसाठा होऊन सुमारे ३१८४ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळेल असे मानले जात होते. तसेच यावर खर्च १०-१२ कोटी रु. येईल असेही म्हटले गेले. या प्रकल्पाला पर्याय म्हणून धामणशेत हा पर्याय म्हणून सुचवण्यात आला. परतुं तो ही मान्य झाला नाही. त्यामुळे धरणग्रस्त शेतकरी परिषदने उचंगी प्रकल्पाला पर्याय देण्यासाठी १९९७ बैठकीनुसार खेतोबा प्रकल्पाची योग्ययोग्यता तपासण्याचा निर्णय घेतला. प्रकल्पग्रस्तामार्फत तज्ज्ञ अभियतांची समिती नेमून खेतोबा येथील पाण्याची उपलब्धता तपासणे, वनक्षेत्र किती लागेल हे तपासण्याचे ठरविले. तसेच त्यावळी उचंगी प्रकल्पाची तैलनिकता पाहून निर्णय घ्यावा असे ठरले होते. पण खेतोबा व धारणशेत हे प्रकल्प उचंगीला पर्याय ठरू शकले नाहीत.[३] शेवटी शासन उचंगी प्रकल्प निर्माण करण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे याला विस्थापित लोकांनकडून विरोध झालेला दिसून येतो.

**प्रकल्पासबंधी आंदोलन**

उचंगी धरण कृती समिती यांनी प्रकल्पाला विरोध केला तरी उचंगी प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करावे यासाठी उचंगी धरण कृती समितीच्या वतीने ही प्रांत अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. १९८५ मध्ये या प्रकल्पासंबंधी उचंगी धरण कृती समितीच्या माध्यमातून धरण परिषदेचे आयोजन ही करण्यात आले. परंतु धरणग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे प्रकल्पांचे काम रखडले गेले. धरणग्रस्तांनकडून “आधी पुर्नवसन प्रश्न मग धरण” या गोष्टींची मागणी सातत्याने केली गेली. तरी पण उचंगी कृती समितीने पुनर्वसन प्रश्न लवकर सोडवून हे धरण लवकर पूर्ण करावे ही मागणी केली. या प्रकल्पासंबंधी उचंगी धरण कृती समितीचे नेतृत्व के. आल्बर्ट डिसोजा, तुकाराम केळेकर, विष्णू वाके, बाबूराव दळवी इ. केले.[४]

**श्रमिक मुक्ती दल व महाराष्ट्र राज्य प्रकल्पग्रस्त परिषद**

या प्रकल्पासंबंधी धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त परिषद आजरा आणी श्रमिक मुक्ती दल आजरा यांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यासाठी गडहिंग्लज प्रांतअधिकारी कार्यालयासमोर हजारो स्त्री – पुरुषासह मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व धरणग्रस्त संघटनेचे नेते कॉ. धनाजी गुरव, कॉ. संपत देसाई, कॉ. अशोक जाधव, संजय तर्डेकर यांनी केले होते.

महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद व श्रमिक मुक्ती दल यांनी मे १९९९ रोजी प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रस्थापित उचंगी धरणाच्या लाभक्षेत्रातील जमिनीला सरकारी खर्चाने पाणी देण्याचे नियोजन काय आहे, सिंचन क्षेत्र काय आहे. त्यांपैकी विहिरी सिंचन क्षेत्र किती, धरणग्रस्तांना लाभ क्षेत्रातील एकूण दये जमीन किती, बुडणारे क्षेत्र किती, धरणाच्या पाण्याबाबत

वस्तुस्थिती काय, लाभ क्षेत्रातील पीक पद्धती कोणती अशा प्रकारचे नऊ प्रश्नांचे निवेदन ही देण्यात आले होते. तसेच दिं. १० मे १९९९ रोजी धरणग्रस्तांच्या बैलगाड्यांसह मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या आंदोलनाचे नेतृत्व दत्ता गुरव, संजय तर्डेकर, राजाराम चौगले, सौ. शांताबाई राणे, सरिता पोवार इ. नी केले. धरणग्रस्तांनी यावेळी आपल्या आडचणी याठिकाणी मांडल्या होत्या. कॉ. संपत देसाई यांनी आंदोलनाचा इतिहास सांगून "माणसे बुडाली तरी चालतील पण मते बुडता कामा नये" हा हेतू डोळ्यासमोर ठेऊनच गडहिंग्लजचे आमदार बाळासाहेब कुपेकर व चंदगडचे आमदार भरमूअण्णा पाटील हे दुटप्पी राजकारण करीत असल्याचा टीकाही त्यांनी केली होती. त्यामुळे पुनर्वसनासबंधी लेखी निवेदन घेतल्यानंतरच हे आंदोलन मागे घेण्यात आले. १२ मे १९९९ रोजी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंबंधी व्यापक बैठक बोलवण्याचे जाहीर करण्यात आले.५ व आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात आली.

या प्रकल्पासंबंधी धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी पाटण तालुक्यात मराठवाडी याठिकाणी धरणग्रस्तांचा मेळावाही घेण्यात आला. उचंगी धरणाचे काम हुकूमशाही पद्धतीने सुरु करण्याच्या सरकारच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त परिषदेच्या वतीने तीव्र निषेद ही यावेळी करण्यात आला. याठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेद मोर्चा ही काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी व मंत्रालय पातळीवर चर्चा केल्याशिवाय धरणाचे काम सुरु करू नये असा ठराव ही डॉ. भारत पाटणकर यांच्या नेर्तुत्वाखाली घेण्यात आलेल्या या मेळाव्यात करण्यात आला.६ या मेळाव्यात मोठ्या संख्येने धरणग्रस्त सहभागी झाले होते. त्यांनी आपल्या व्यथा या ठिकाणी मांडल्या व आपल्या हक्कासाठी संघटित लढा देण्याचा निर्णय ही घेण्यात आला. हे आंदोलन डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली श्रमिक मुक्ती दल या संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले. या संघटनेच्या माध्यमातून धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न केले गेले.

**जागेसबंधी पर्याय**

शासनाने उचंगी धरणाला मान्यता दिल्यानंतर चाफवडे, जेरुर, पितळे या गावांनी उचंगी धरणाला विरोध करण्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी या धरणाला पर्याय ही मांडला. उचंगी धरणाऐवजी छोटे बंधारे बांधून पाणी आडवण्याचा पर्याय ही त्यांनी मांडला.७ तसेच या धरणासंबंधी २६ जानेवारी १९९० साली धरणग्रस्तांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार आणि पाटबंधारे मंत्री यांना निवेदन ही दिले गेले. धरणामुळे होणारी हानी टाळून समृद्धी आणता येते. हा विचार त्यांनी मांडला. १९९५ ते १९९९ या काळात तत्कालीन सरकारने पर्यायी धरणाला विरोध करून उचंगी धरणच कायम ठेवला. तसेच जनतेने मांडलेल्या पर्यायाकडे गांभीर्यपणे पाहिले नाही.८ त्यामुळे त्या प्रकल्पाला विरोध झालेला दिसून येतो. तसेच १९८६ पासून येथील जनतेने शासनाकडे अनेक निवेदने पाठवली. इतर ठिकाणी धरण बांधावे यासाठी अनेक सर्वे केले. पण त्याचा उपयोग झाला नाही. तसेच धामणशेत या ठिकाणी छोटे धरण बांधावे हा पर्याय ही लोकांनी सुचवला होता पण तो ही मान्य झाला नाही. त्यामुळे या भागत शासकीय आधिकारी आले की या भागातील जनतेने त्यांना विरोध केलेला दिसून येतो.९ त्यामुळे प्रकल्प बराच काळ रखडला गेला. या प्रकल्पासंबंधी लोकांनी "आधी पुर्नवसन मग धरण" याची मागणी सातत्याने केलेली दिसून येते.

**निष्कर्ष**

धरणामुळे समाजाचा व सभोवलताच्या परिसर हा सुजलाम् सुफलाम् होणार असला तरी धरणामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या समस्येकडे पाहणे गरजचे आहे. त्यांचे योग्य ते पुनर्वसन करणे गरजचे आहे. उचंगी प्रकल्पाच्या पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे तेथील लोकांनी या प्रकल्पाला विरोध केलेला दिसून येतो. त्यामुळे प्रकल्प तयार करते वेळी तेथील लोकांना विश्वासात घेऊन तो करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प करण्याआधी तेथील लोकांच्या पुनर्वसनाचा आराखडा तयार असणे आवश्यक आहे. तरच असे प्रकल्प लवकर पूर्ण होऊन समृद्धी आणता येईल. तसेच धरणग्रस्तांच्या त्यागाचा विचार करता त्यांचे पुर्नवसन लाभ क्षेत्रात करणे आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या वसाहती मध्ये नागरी देणे आवश्यक आहे. तसेच

**सदर्भ सूची**

१. दैनिक पुढारी कोल्हापूर जिल्हा, १९ एप्रिल १९९१ पृ. ७ .

२. कित्ता.

३. कित्ता .

४. दैनिक पुढारी कोल्हापूर जिल्हा २० एप्रिल १९९९ पृ. १.

५. दैनिक पुढारी, कोल्हापूर जिल्हा ११ मे १९९९ पृ. २.

६. दैनिक पुढारी, कोल्हापूर जिल्हा १९ जून १९९९ पृ. ३.

७. (संपा) अनिल म्हमाने, संतोष गोटल, मानवमुक्तीसाठी, भारत पाटणकर भाग -१, ५ मार्च २०१२ पृ. १०७२.

८. कित्ता.

९. डॉ.भारत पाटणकर, उचंगी धरणाला पर्याय, प्रकाशक – कॉ. संपत देसाई, श्रमिक मुक्ती दल आजरा, ५ मार्च

१०. १९९९ पृ. २२.

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com)** **CC - 10**

# ३. अण्णाभाऊ साठे यांचे जातिअंत चळवळीसाठी योगदान

**प्रा. डॉ. डी. पी. खराडे**
इतिहास विभाग प्रमख, बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवाडी.

भारतीय समाजरचनेतील जात ही एक अपूर्व घटना आहे. ह्याचा परिणाम लोकांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर झालेला आहे. ह्यामुळे विविध जातीच्या लोकांमध्ये सामाजिक अंतर पडले. ह्यामुळे लोकामध्ये स्पृश्य-अस्पृश्य असे भेद निर्माण झाले. प्रबोधनापुर्वी महाराष्ट्रात जातिव्यवस्था व पितृसत्ताक कुटुंबपध्दती हा समाज रचनेचा पाया होता.[1] काळानुरूप, धर्माचे प्राबल्य, धर्मांधळेपणा ही येथील समाजजीवनाची वैशिष्ट्ये होती. जातीनुसारच व्यवसाय करावा. ही सुध्दा सक्ती होती. ही बंधने न पाळणाऱ्या व्यक्तीला वाळीत टाकले जाई. अस्पृश्यता हा तर महात्मा गांधीनी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाजाला लागलेला एक कलंकच होता.[2] पूर्वी अस्पृश्यांना 'अंत्यज' म्हणून संबोधले जात होते. अंत्यज म्हणजे शेवटी जन्मलेले, सर्वात खालच्या वर्गात जन्मलेले. संत नरसिंह मेहता यांच्या सुचनेवरून गांधीजीनी अंत्यजांना 'हरिजन' म्हणून नाव दिले. अस्पृश्यांनी गळयात मडके बांधुन फिरणे, जमीन विटाळेल म्हणुन कमरेला खराटा बांधणे, स्पृश्यांवर सावली ही पडू नये म्हणुन दुरून चालणे अशी अनेक सामाजिक बंधने त्यांना पाळावी लागत. काही सार्वजनिक पाणवठे व मंदिर या ठिकाणी जाण्यास अस्पृश्यांना मज्जाव होता. समाजातील सर्व संस्था या देव निर्मित आहेत व म्हणून त्यात कोणतेही बदल माणसाने करू नयेत असा सर्वसामान्य समज होता. अशा पांरपरिक, साचेबंद व सरंजामी वळणाच्या समाजावर जेव्हा ब्रिटिश अंमल प्रस्थापित झाला. तेव्हा भारतीय पारंपारिक जीवनाला एक पर्याय उपलब्ध झाला.

स्वातंत्र्य, समता, बुद्दीप्रामाण्यवाद, विज्ञान निष्ठा, इहवाद यासारख्या आधुनिक तत्वांशी परिचय झालेल्या मध्यमवर्गाने 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात धर्मसुधारणा व समाजसुधारणा चळवळी सुरू केल्या या चळवळी म्हणजे सामाजिक संख्या या सारख्या आधुनिक मुल्यांवर भारतीय समाजाची उभारणी करायची म्हटल्यावर भारतीय समाज व्यवस्थेत बदल घडवुन आणणे अपरिहार्य होते. महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात स्त्री-सुधारणा चळवळीचा अपवाद वगळता. जातीअंताची चळवळ व अस्पृश्यता निर्मुलनाची चळवळ अशा दोन चळवळी प्रामुख्याने विकसित झाल्या मात्र भारतीय समाज सुधारकांपुर्वीच जातीविषयक चर्चेला प्रथम हात घातला तो ख्रिस्ती धर्म प्रसारकांनी.[4] जातिव्यवस्थेच्या आधारे हिंदू धर्मावर टीका करण्यासाठी आणि ख्रिस्ती धर्माचे श्रेष्ठत्व सांगण्यासाठी ते खटाटोप करीत. ख्रिस्ती धर्मप्रसारक डॉ. जॉन विल्सन यांचा हिंदुधर्म प्रसिध्दीकरण नावाचा ग्रंथ या संबंधी या संबधी महत्वपूर्ण आहे.

माणसामाणसातील संबंध आधुनिक मुल्यावर प्रस्थापित करायचे असतील, तर जातिव्यवस्थेचा पुर्णपणे नायनाट केला पाहिजे. अशी अब्राह्मणी परंपरेतील समाजसुधारकांची धारणा होती. त्यामध्ये म. फुले, राजर्षि छत्रपती शाहु, गोपाळबाबा वलंगकर, सयाजीराव गायकवाड, शिवराम जानबा कांबळे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी अस्पृश्यांच्या कल्याणासाठी कार्य केलेले आहे. त्याच प्रमाणे संयुक्त महाराष्ट्र आणि जाति अंताची चळवळ हा महाराष्ट्राच्या निर्मितीचा आरंभ असुन या चळवळींमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊसाठी यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. "विचार क्रांती

झाल्याशिवाय आचारात फेरबदल होऊ शकत नाही. आचारात फेरबदल करावयाचा झाल्यास आधी मनावर बसलेल्या जुन्या विचारांची छाप काढुन टाकणे अगदी अगत्याचे आहे. अशा प्रकारची विचारक्रांती घडवुन आणण्यास साहित्या सारखा दुसरा उपयुक्त मार्ग नाही." अशा या काळातील लेखकांमध्ये अण्णाभाऊ साठे यांचा उल्लेख करता येईल. अण्णाभाऊ साठे यांनी पोवाडे, लोकनाट्य, कथा, कादंबरी असे विविध साहित्यप्रकार हाताळले.

**"जग बदल घालूनी घाव। सांगून गेले मला भीमराव।**

**गुलामगिरीच्या या चिखलात। रूतून बसला का ऐरावत।**

**अंग झाडूनी निघ बाहेरी। घे बिनीवरती धाव।।"[5]**

हजारो वर्षांचा अन्याय, सामाजिक गुलामगिरी झटकून टाकून जून्या समाजव्यवस्थेवर घाव घालण्याचे हे अण्णा भाऊ साठेंचे काव्य बहुजनांना आपल्या हक्कांसाठी जागरूक बनवणारे काव्य आहे. अण्णा भाऊंच्या याच नव्हे तर सर्व कविता, साहित्य, शाहिरी लावणी यात सामाजिक बदलाचं बाळकडू आहे. त्यांनी लिहिलेला प्रत्येक शब्द हा बहुजनांबद्दल कळवळा असणारा होता. प्रस्थापितांवर कोरडे ओढणारा होता. जे-जे वाईट आहे. अमानवी आहे ते माणसांनी झिडकारलेच पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. अण्णा भाऊंचे जे विपुल साहित्य उपलब्ध आहे ते पाहिल्यास असे आढळते की, प्रस्थापित समाजव्यवस्थेतील दोषांना प्रखर विरोध शोषितांच्या कल्याणासाठी सततचा विचार आणि अपेक्षित समताधिष्ठित नवसमाजाची निर्मिती ही त्यांच्या लिखाणाची तीन बलस्थानं आहेत.

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव या खेड्यात 1 ऑगस्ट 1920 रोजी झाला. अण्णांच्या जन्माच्या वेळी फकिराने दोन ओंजळी कलदार रूपये अण्णांच्या घरी दिले. त्याचवेळी फकिराने भविष्यवाणी केली. "भाऊचा हा मुलगा आपल्या कुटुंबाचंच नव्हे तर आपल्या समाजाचं सुध्दा नाव मोठे करणार आहे."[6] फकिराची ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली आणि भाऊंच्या या पराक्रमी पुत्रानी 'अण्णाभाऊ' नी स्वतःचे आणि समाजाचे नाव मोठे केलेले दिसते. भाऊ साठेंना आयुष्याच्या सुरूवातीपासूनच दारिद्र्याची मोठी साथ निभवावी लागली. भाऊ साठे अत्यंत मानी आणि उद्योगी होते. भाऊंना आपल्या मुलांनी विशेषतः अण्णाभाऊनी शिकावे असे वाटे. मुंबईहून देखील भाऊ आपल्या पत्नीला वालूबाईला सातत्याने तुकारामला (अण्णाभाऊंचे कागदोपत्री नाव) शाळेत घालण्याविषयी आग्रह करायचे. अण्णाभाऊंच्या शाळेचा दुसरा दिवसच त्यांच्या शाळेचा दुसरा दिवसच त्यांच्या शाळेचा शेवटचा दिवस ठरला. हे अण्णाभाऊंचे नव्हे तर त्या शाळेचे, समाजव्यवस्थेचे दुर्दैव होय. तो काळ समाजातील जातीव्यवस्थेचे प्राबल्य असणारा होता. सवर्णांना थेट वर्गात प्रवेश असे मात्र अण्णाभाऊ आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वर्गाबाहेर बसवले जाई. शिक्षक देखील सवर्णाच्या बाजूचे असल्याने दुसऱ्याच दिवसी एका सवर्णाशी झालेल्या भांडणातून अण्णाभाऊंची शाळा संपुष्टात आली. शिक्षकांनी पक्षपातीपणाने आपली काहीही चूक नसताना आपल्याला मारले ही गोष्ट मानी अण्णाभाऊंच्या मनात घर करून गेली. अण्णाभाऊंनी शिक्षकांवर सूड घेऊन शाळा कायमचीच सोडली. दुसऱ्या दिवशी आई वालूबाईंनी अण्णाभाऊंना शाळेत जायला सांगितले तेंव्हा निग्रहाने अण्णा म्हणाले, 'आई, मी कालच शाळा सोडली, तुम्ही मला ठार जरी मारलं तरी मी आता शाळेत जाणार नाही.'[7]

शाळेबद्दलचा अण्णाभाऊंचा ठाम निर्णय त्यांच्या आई-वडिलांनाही बदलता आला नाही. बालवयातच अण्णांच्या मनावर या शालेय जीवनातील प्रसंगामुळे विषमता हा एक समाजाला लागलेला भयंकर रोग आहे आणि तो संपवल्याशिवाय सामाजिक ऐक्य

निर्माण होऊ शकणार नाही या मताला अण्णाभाऊ पोहोचले. या बालवयातच अण्णाभाऊंनी विषमतेवर आधारलेल्या अनैसर्गिक अशा समाजव्यवस्थे विरूद्ध दंड ठोकले आणि पुढे आयुष्यभर समतेच्या निर्मितीसाठी संघर्ष केलेला दिसतो. बालवयातच शाळेतील दुसऱ्या दिवशीच विषमता नाकारून, ठोकरून सवर्णांबरोबर थेट वर्गातच बसण्याचे धाडस करणारा 'अण्णाभाऊ' हाच खरा समतेचा वारकरी होय. सामाजिक विषमते विरूद्ध अण्णाभाऊंनी सुरू कलेली ही लढाई त्यांनी आयुष्याच्या शेवटापर्यंत चालविली आणि त्यात तेवढेच दैदिप्यमान यशही मिळविले.

अण्णाभाऊंची शाळा संपली आणि खऱ्या अर्थानी त्यांचे शिक्षण जीवनाच्या शाळेत सुरू झाले. बालपणातच शाळे सारख्या इतरही अनेक प्रसंगामुळे विषमते विरूद्ध लढण्याचे बाळकडूच अण्णाभाऊंना मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरू नये. सतत सर्व ठिकाणी वाट्याला येणाऱ्या अपमानास्पद, कमी दर्जाच्या वागणूकीमुळे अण्णाभाऊंमधील सुधारक अधिकच धारदार बनत गेलेला दिसतो. माणसं एकमेकांशी अजिबात प्रेमाने वागत नाहीत ही गोष्ट अण्णाभाऊंना माणसांपासून दूर आणि निसर्ग सानिध्यात घेऊन गेली. ही बालपणातील अनेक वर्षे अण्णाभाऊंचा गुरू निसर्ग बनला. या काळातील निसर्गाच्या ओढीमुळेच अण्णाभाऊ लौकिक अर्थाने शाळेत गेले नाहीत तरी निसर्ग सहवासामुळे अण्णांचे समतेचे विचार अधिक परिपक्व झाले आणि त्यांच्या मनातील समताधिष्ठित समाज निर्मितीचे स्वप्न, उद्दिष्ट याच काळात अधिक पक्के झालेले दिसते. शाळाच नसल्या मुळे एका ठराविक साचाच्या जीवनाशी अण्णाभाऊ बांधील राहिले नाहीत. निसर्ग सहवासाबरोबरच या काळात अण्णांभाऊना गावाच्या जत्रेतील तमाशे, जलसे बघणे, पोवाडे ऐकणे याचा छंद नव्हे व्यसनच लागले. व्यसन यासाठी की इतरांसारखे अण्णाभाऊ या छंदाकडे केवळ आकृष्ठ झाले नाही तर पछाडलेच. हे पछाडलेपण अण्णाभाऊंमधल्या लेखकाचं, कवीचं, शाहीरचं, साहित्यिकाचं, सामाजिक द्रष्टयाचं, समताधिष्ठित नवसमाज निर्मिती करणाऱ्या निर्मिकाचं होतं. हे पछाडलेपण इतर सामान्य माणसांप्रमाणे व्यक्तीगत व्यसन, छंद नव्हता तर शाहिरी कला, पोवाडे हे सामाजिक बदलांसाठीचे अत्यंत उपयुक्त हत्यार आहे हे ओळखणाऱ्या द्रष्ट्या सामाजिक सुधारकाचं ते पछाडलेपण होतं. अण्णाभाऊंनी या काळात आपल्याला अपेक्षित असणाऱ्या नविन समतेवर आधारलेल्या समाजाचं स्वप्न पाहायला सुरूवात केली असे दिसते. शाळेचं तोंड न पाहिलेला मात्र सामाजिक बदलांबाबत कोणत्याही ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञालाही अचंबा वाटावा असे अण्णाभाऊंचे क्रांतिकारी विचार याच काळात तयार झालेले दिसतात.

याच काळात अण्णाभाऊंवर क्रांतिसिंह नाना पाटलांनी गारूड केले. ब्रिटीशांना देशाबाहेर घालवून देण्यासाठी नाना पाटलांनी सुरू केलेल्या चळवळीत अण्णाभाऊ सामिल झाले. आतापर्यंत तमाशा, पोवाडे यांच्याशी बांधल्या गेलेल्या आण्णाभाऊं वर नाना पाटलांनी जादू केल्याप्रमाणे अण्णाभाऊ या चळवळीत ओढले गेले. नानांबरोबर अण्णाभाऊ भूमिगत होऊन ब्रिटिशांच्या विरोधात कार्य करू लागले.[8] अण्णाभाऊंचे हे भूमिगत होणे त्यांच्या कुटुंबियांना चिंतित करून गेले. पोलिसांच्या वाटेगावच्या मांगवाड्यात वाढलेल्या चकरा साठे कुटुंबाला आणि मांगवाड्याला काळजीत पाडणाऱ्या ठरल्या. अण्णाभाऊ फकिराप्रमाणे ब्रिटिशांविरोधात बंड करण्याची स्वप्नं पाहू लागले. मात्र घरच्यांनी हे सर्व पाहून मुंबईला कायमचे जाण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय अण्णाभाऊंच्या आणि मातंग समाजाच्या भवितव्याला नवी दिशा देणारा ठरला यात शंका नाही. कारण अण्णाभाऊ मुंबईत आले आणि त्यांच्य कार्य-कर्तृत्वाला समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या स्वप्ला, काव्याला, साहित्याला हजारो नवीन घुमारे फुटले.[9]

मुंबईत अण्णाभाऊंचा परिचय ज्ञानदेव नावाच्या एका तमाशा कलावंताशी झाला. हा ज्ञानदेव साधा मात्र देवभोळा होता. त्याच्याकडे सर्व धर्मग्रंथ होते. अण्णाभाऊंचा मुक्काम आता ज्ञानदेवाकडे वाढू लागला. ज्ञानदेव धर्मग्रंथ वाचे आणि अण्णाभाऊ मनोभावे ऐकत. यातून अण्णाभाऊंची वैचारिक भूमिका पक्की झाली. एक वर्षापेक्षा अधिक काळच्या या मनोभावे ऐकण्याचे अण्णाभाऊंचे नव समाजनिर्मितीचे, स्वप्न अधिक बळकट झाले असे दिसते. या वर्षभराच्या श्रवण-मनन-चिंतन त्रयीने अण्णाभाऊ मधला द्रष्टा सुधारक कार्यरत केला. अण्णाभाऊ वैचारिक दृष्टीने दिवसेंदिवस अधिकाधिक प्रगल्भ होत चालले आणि जीवनाच्या लढाईत रोज अपयशी होत अधिकाधिक हलाखीचे जीवन जगत होते. आर्थिक प्रश्नांवर इलाज म्हणून अण्णाभाऊंनी मजूरी, हमाली, हॉटेलात काम, घरगडी, कुत्री सांभाळणे, मुले सांभाळणे, बूट पॉलिश ही व इतर सर्व प्रकारची कामे केली. मात्र प्रत्येक कामातून अण्णाभाऊ भरपूर शिकले असे दिसते. मुंबईतील या वास्तव्यात दोन प्रकारच्या नोकऱ्यांनी अण्णाभाऊंच्या जीवनाला मोठी कलाटणी दिलेली दिसते. पहिले काम म्हणजे सिनेमाची पोस्टर्स चिकटविणे आणि सिनेमागृहात डोअरकीपर म्हणून काम करणे. या कामातही झोकून देऊन काम केल्याने अण्णाभाऊ यशस्वी कथाकार, पटकथाकार बनले. पुढे त्यांच्या नऊ कथांवर सिनेमे निघाले.[10] ही थोरवी केवळ अण्णाभाऊ सारख्यांचीच. अन्यथा हे सर्व सिनेमातच पहायला मिळते. वास्तव जीवनातील मजूराचा चित्रपट कथाकार होणं हे दिवास्वप्नच ठरेल. अण्णाभाऊंच्या जीवनात खरा मोठा बदल घडवला तो त्यांच्या, 'गिरणी कामगार' या नव्या अल्पकालीन नोकरीने. अण्णाभाऊ काही काळ हंगामी गिरणी कामगार होते. या काळात कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगेंनी अण्णाभाऊंमधील 'धग' ओळखून त्यांना सभा, संमेलने, मिरवणुका, संप मोर्चे या कामगारांच्या आयुधांसी परिचित केले.[11] मात्र हा परिचय होता क्षणीच जणू याच कामासाठी आपला जन्म आहे एवढ्या आत्मियतेने अण्णाभाऊंनी या कार्यातही स्वतःला झोकून दिले. अण्णाभाऊंनी लिहिलेला 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' ही भारतीय कामगार चळवळीला दिलेली नवसंजिवनीच होती असे म्हटल्यास वावगे ठरू नये.[12] या काळात अण्णाभाऊंनी अतिशय झपाटून जी कामगार चळवळीत 'जान' आणली ती पाहता डांगेंनी हे झाकलेलं रत्न ओळखण्याची किमया कामगार चळवळीला एक नवीन ओळख देणारी ठरली.

अण्णाभाऊंच्या आयुष्यातील कामगार चळवळ हे पर्व फारच महत्त्वाचे ठरले. कारण याच पर्वात अण्णाभाऊंनी लिखाण शिकण्यापासून प्रचंड साहित्य निर्मितीचं कार्य अत्यंत कमी काळात केलं. हा काळ अण्णाभाऊंच्या कर्तृत्वाच्या वाढीचा, चौफेर यशाचा होता. कामगार चळवळीमुळे अण्णाभाऊ कम्युनिस्ट पार्टीकडे वळले. मार्क्सच्या विचारांचा अण्णाभाऊंवर मोठा प्रभाव निर्माण झाला आणि त्यांच्या समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या विचारांना अधिक गती मार्क्सच्या विचारामुळे आली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. कम्युनिस्ट पार्टीने पार्टीफंडा साठी दोन लाख गोळा करण्याची घोषणा केली. अण्णाभाऊंनी सांगितले. 'माझ्याकडे पैसे नाही, स्टॅलिनग्राडचा पोवाडे आहे. तो मी पार्टी फंडासाठी अर्पण करण्यास तयार आहे.'[13] पोवाडा इतका प्रभावी होता की त्या पोवाड्याच्या सादरीकरणातून अण्णाभाऊंनी पार्टीला दोन लाख म्हणता म्हणता जमवून दिले. पुढे अनेक वर्षे अण्णाभाऊ कम्युनिस्ट पार्टीला पैसे मिळवुन देत राहिले. याच काळातील लाल बावटा कलापथक हा अण्णाभाऊंच्या प्रतिभेचा एक उत्कृष्ठ नमूनाच होय. या कलापथकाच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी लाखो रूपये पार्टी फंडासाठी जमा केले. मात्र स्वतःच्या संसाराकडे या सामाजिक संसारामुळे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष झाले. 'अकलेची गोष्ट' या अण्णाभाऊंनी लिहिलेल्या वगनाट्याने संपूर्ण महाराष्ट्रात प्रबोधन घडवून आणले. याच काळात अण्णाभाऊंच्या साहित्याने संपूर्ण देश-परदेश गाजवला. अण्णाभाऊंच्या अनेक कथा हिंदी, सिंधी, बंगाली,

मल्याळी, जर्मन, झेक, इंग्लिश, पोलिश, रशियन अशा अनेक भाषांत प्रकाशित झाल्या.[14] आपोआप अण्णाभाऊंना ख्यातकीर्त लेखक म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली.

इंडो सोव्हिएट कल्चरल सोसायटी अण्णाभाऊंना रशियाला पाठवले. रशियात अण्णाभाऊंचे अनेक ठिकाणी जंगी स्वागत आणि सत्कार झाले. रशियतही अण्णाभाऊंच्या ओजस्वी विचारांनी हजारो रशियनांना जिंकुन घेतले. मॉस्कोतील आपल्या भाषणात अण्णाभाऊ म्हणाले, 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.'[15] रशियात अण्णाभाऊंनी रशियन कामगारांचे दैय, गरिबी शोधण्याचा प्रयत्न केला मात्र समानतेच्या आधारावर उभारलेल्या रशियात त्यांना दैन्य सापडले नाही. रशियात असलेली समता भारतात यावी असे अण्णाभाऊंना वाटत होते. अर्थात रशियाचे विघटन, साम्यवादाचे यशापयश हे नंतरचे मुद्दे बाजूला ठेवल्यास तेथील समतेचा विचार आपल्याला उपयुक्त आहे हे अण्णाभाऊंचे मत आजही आपल्या समाजाला उपयुक्त आहे हे निश्चित.

**संदर्भ**

1. नलिनी पंडित, 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे 1972 पृष्ठ क्र. 17.
2. मो. क. गांधी, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, अनुवादक सीताराम पुरूषोत्तम पटवर्धन, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 1994 पृष्ठ क्र. 78.
3. R. Desai, Social background of Indian Nationalism, Popular Prakashan, Bombay, 1984, P. No. 241.
4. यशवंत सुमंत व दत्तात्रय पुंडे (संपा.) महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे 1988 पृष्ठ क्र. 20.
5. कठाले नानासाहेब, अण्णाभाऊ साठे जीवन आणि साहित्य, अण्णाभाऊ साठे साहित्य प्रकाशन मंच, गपूर, प्रथम 1996.
6. सकटे मच्छिंद्र, अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम 2005.
7. भोसले एस. एस. (संकलक), प्रातिनिधिक कथा अण्णाभाऊ साठे, लोक वाङ्मय गृह, मुंबई, प्रथम, 1994.
8. सकटे मच्छिंद्र, उपरोक्त.
9. कठाळे नानासाहेब, उपरोक्त.
10. भोसले एस. एस. उपरोक्त.
11. कठाळे नानासाहेब, उपरोक्त.
12. सकटे मच्छिंद्र, उपरोक्त.
13. कठाळे नानासाहेब, उपरोक्त.
14. भोसले एस. एस. उपरोक्त.
15. कठाळे नानासाहेब, उपरोक्त.

# ४. भारतीय स्वातंत्र्यलढा आणि महाराष्ट्राचे योगदान (व्यक्ति व कार्य) - भाई माधवराव खंडेराव बागल

**सौ. वेदा उदयराज माळकर**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यपीठ, कोल्हापूर.

**गोषवारा**

भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आपण साजरे करत आहोत. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास परिषदेने रौप्य महोत्सवी अधिवेशनाच्या वर्षात केलेले पदार्पण, राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृति शताब्दी वर्ष तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यारोहण समारंभास ६ जून २०२३ ला ३५० वर्षे पूर्ण झाली. अशा या घटनांच्या योगायोगाचे हे महत्त्वाचे वर्ष .भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक स्तरातील व्यक्तींचे योगदान लाभले यामध्ये महाराष्ट्राचे योगदान खूप मोठे आहे .यातील महत्त्वाच्या व्यक्तींपैकी एक म्हणजे माधवराव खंडेराव बागल यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत.

**Keywords**

माधवराव बागल यांचा जन्म, शिक्षण, हंटरपत्र, परदेशी कपड्यांची होळी, राजधानीत मोर्चा ,संयुक्त महाराष्ट्र चळवळ, शेतकरी कामगार पक्ष, मिळालेले मानसन्मान ,अखेरचा कालावधी .

**उद्दिष्टे**

भारतीय स्वातंत्र्यलढा आणि महाराष्ट्राचे योगदान (व्यक्ति व कार्य)_ भाई माधवराव खंडेराव बागल या शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

१. माधवराव बागल यांच्या देशप्रेमाचा अभ्यास करणे.

२. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

३. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे .

४. त्यांच्या सामाजिक, राजकीय, साहित्यिक, कला इत्यादी विविध पैलूंचा विचार करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये माधवराव बागल यांच्याबद्दल लिखित पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, ऐतिहासिक घडामोडी व तत्कालीन संदर्भ साधनांचा अभ्यास केला आहे. या सर्व साधनांचे परीक्षण करून विश्लेषण केले आहे.

**प्रस्तावना**

कोल्हापूर राज्यातून एक छोटेखानी लोकसत्ताक राज्य निर्माण करू पाहणारा कारागीर म्हणजे माधवराव बागल होत .त्यांना या लोकसत्ताकात समाजवादाची प्राणप्रतिष्ठा करावयाची होती .ते जवळजवळ बारा वर्षे कोल्हापूर राज्यातील प्रजेचे एकमेव पूजा स्थान बनलेले नेते होते .हे नेतृत्व देशव्यापी असलेल्या प्रबळ राज्य शक्तीने हरण करून नेले आणि समाजवादी कोल्हापूर राज्याचे भव्य व भावुक रम्य स्वप्न खलास झाले.[१]

**जन्म व शिक्षण**

२८ मे १८९६ ला कोल्हापूर येथे भाई माधवराव बागल यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ गाव यळगुड होय. सर्वांचा लाडका म्हणून बाबुराव हे नाव पडले. मामलेदाराचा मुलगा ,तालुक्यातल्या मोठ्यातल्या मोठ्या अधिकाऱ्याचा मुलगा असल्यामुळे शाळेतल्या इतर मुलात त्यांची गणना होत नसे.[२] त्यांचे वडील खंडेराव गोपाळराव बागल. बी.ए .एल.एल.बी .कोल्हापूर संस्थांनाचे पहिले वकील, आई कमळाबाई सतत आजारी असे. वडील ऑफिसला जात .त्यामुळे घरी माधवरावांचीच हुकूमत चाले. घरी सात आठ पट्टेवाले वडिलांना त्यांच्याबद्दल चांगले सांगावे यासाठी ते माधवरावांना खुश करण्याचा प्रयत्न करीत.३ मॅट्रिक नंतर जे जे स्कूल ऑफ आर्ट्सला माधवरावांनी कलेचे शिक्षण पूर्ण केले.

**हंटर पत्र**

खंडेराव बागल यांनी सेवानिवृत्त झाल्यावर हंटर साप्ताहिक सुरू केले. जनजागृतीसाठी, सामान्य लोकांच्या विकासासाठी, त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी ते हंटर मधून लिहीत. या कामात माधवराव मदत करू लागले. बातम्या तयार करणे, प्रुफ तपासणे, छोटी स्फुटे लिहिणे, इंग्रजीचे भाषांतर करणे यातून सामाजिक जीवनाला सुरुवात झाली. एक निर्भीड पत्रकार हा व्यक्तिमत्वाचा पैलू तयार झाला.[४]

**परदेशी कपड्यांची होळी**

परदेशी कपडे जाळण्याची  लाट फार जोराने देशभर उसळली. माधवरावांची फॅशन, पेहराव वडिलांना व शाहू महाराजांना नापसंत होता. देशी कपडे करायला सांगून ती तयार होताच जवळजवळ हजार रुपयांची कपडे जाळून इस्लामपूरच्या सभेपासून ते खादी सूट वापरू लागले.[५]

**महात्मा गांधींच्या वाक्याचा परिणाम**

महात्मा गांधींनी कोल्हापूरला भेट दिली यासाठी खंडेराव बागलांनी बराच पुढाकार घेतला. फंड गोळा केला. त्यावेळी गांधींच्या शेजारी बसण्याचा माधवरावांना योग आला. गांधींनी विचारपूस केली. चित्रकार आहे म्हटल्यावर "चित्रकार आहात तर अशी चित्रे काढा की त्यामुळे जनसेवा घडेल" असे गांधीजी म्हणाले.[६]

**घरातील अस्पृश्य**

माधवरावांच्या घरी वाघमारे नावाचा अस्पृश्य जेवायला येत असे. त्यावेळी तशी शिवाशिव चालत असे .पण जेवायचे वेळी भेदभाव टाळणे झाले नव्हते त्याला आपल्याच पंक्तीत वाढ असे माधवरावांनी आईला सांगितले. पण तिने ऐकले नाही .माधवराव ताटे वाढल्यावर भरलेले ताट घेऊन त्या अस्पृश्याजवळ जाऊन बसू लागले. असे एक-दोन वेळ केल्यावर आईने त्यांच्या पंक्तीत त्या अस्पृश्याला वाढायला सुरुवात केली. पुढे महार, मांग, चांभार, मुसलमान त्यांच्या घरी पंक्तीत बसू लागले. वडिलांनी करून आणलेल्या चांदीच्या ताटात त्या लोकांना मुद्दाम जेवू घातले. त्याच ताटात आमदार डी. एस. पवार(चांभार), अकीवाटे मुसलमान , गोविंदा मांग, गंगाराम कांबळे इत्यादी महार मंडळीही जेवली होती. त्यानंतर त्या ताटात घरच्या मंडळींनी जेवायला सुरुवात केली.[७]

**राजधानीत मोर्चा**

कायदेभंगाच्या तयारीने राजधानीत जाण्याचे ठरवले. लोकांच्या मागण्या निश्चित केल्या. त्यांना चांगल्या समजावून दिल्या . या मागण्यांची हजारो पत्रके छापून घेतली. लोकांच्या हातात दिली. २५ डिसेंबर १९३८ हा मोर्चाचा दिवस ठरला.[८]

**कायदेभंगाला सुरुवात**

आतापर्यंत राजकीय मागण्याविषयी व सभाबंदी उठवण्याविषयी माधवरावानी अनेक लेख लिहिले. अर्ज, विनंती, ठराव, डेपुटेशन हे सर्व सनदशीर मार्ग झाले होते. याचा सरकारवर काही परिणाम झाला नाही. माधवरावांच्या तुरुंगात जाण्याने लोकात विश्वास उत्पन्न होणार होता. धैर्य वाढणार होते. संघटना मजबूत होणार होती. माधवराव तुरुंगाला हपापले होते. कितीतरी वर्षांची त्यांची मनीषा तृप्त होणार होती.

**अटक**

माधवराव बागल यांची भगव्या झेंड्याने नटलेली "मोर्चा ट्रेन "हजारो लोकांच्या जयजयकारात स्टेशनमध्ये घुसताच नागरिकांचा उत्साह अमर्याद होऊन सर्व दिशांनी लोक फळी फोडून आत गेले.११:२० गाडीची वेळ ११:४५ नंतर आगमन झाले . विद्यार्थी, व्यापारी, नागरिक यांनी घोषणा देत माधवराव बागलांना हारांनी भरून काढले. स्टेशनच्या पटांगणात हजारोंचा समुदाय हा बागल यांच्या वाणीने शांत झाला. पुढे मिरवणूक सुरू झाली .शिरगावकर बंगल्याजवळ मिरवणूक येतात एकच कल्लोळ उठला आणि कल्लोळ शांत होताच माधव बागलाना अटक करून नेल्याची बातमी पसरली.[९]

**प्रजा परिषदेची स्थापना व पुन्हा अटक**

६ फेब्रुवारी १९३९ ला रात्री साडेनऊला बागल यांच्या अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली. संस्थानातले बरेचसे कार्यकर्ते तयार झाले. सभेला सुरुवात होणार तेवढ्यात सब इन्स्पेक्टरनी बोलावून वॉरंट हाती दिले. सर्वांना शांत राहण्यास सांगून राजेद्रोहाचे १२४ अ कलमाखाली पकडण्याचे वॉरंट आले असल्याचे सांगितले. रत्नाप्पा व दिनकरराव देसाई यांनी जड अंतकरणाने शाश्रूपूर्ण नयनांनी माधवरावांना निरोप दिला. [१०]

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि माधवराव बागल**

भाषावार प्रांतरचना हा भारतापुढील मोठा प्रश्न होता. मराठी भाषिक लोकांचे महाराष्ट्र व्हावे या मागणीसाठी जी मोठी चळवळ झाली. यामध्ये अग्रभागी नाव असलेला नेता म्हणजे भाई माधवराव बागल होत.[११] कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र एकीकरण परिषदेचे ते अध्यक्ष होते. गडहिंग्लज येथे याची शाखा सुरू केली.[१२]

**कोल्हापूर जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना**

माधवरावांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली आणि कोल्हापूर जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन केली. कार्यकारणी तयार केली. अध्यक्षीय अधिकारात त्यांनी सदस्य निवडले. तालुक्यांना प्रतिनिधित्व दिले.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स्त्रियांचा सहभाग**

श्रीमती. विमलाबाई वसंतराव बागल. यांनी कॉंग्रेस सदस्यत्व व कोल्हापूर मुनिसिपल कौन्सिलचा राजीनामा देऊन या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. एम आर देसाई यांच्या पत्नी यांनीही या चळवळीत भाग घेतला. महिलांच्या अशा सहभागामुळे चळवळ विकसित होण्यास मदत झाली.[१३]

**शेतकरी कामगार पक्ष व माधवराव**

जेधे- मोरे गटाने कॉंग्रेस पक्ष सोडला. व जेधे गटाने १३ जून १९४८ ला शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली .तेव्हा कोल्हापूर प्रजा परिषदेचे नेतृत्व माधवरावांकडे होते. भारतीय कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. वैयक्तिक फायद्याचा विचार न करता त्यांनी कष्टाचे व त्यागमय जीवन जगणे पसंत केले व शेकाप मध्ये जाण्याचा निर्णय घेतला.१९५२ ला स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी प्रचाराचे काम केले.[१४]

**साहित्यिक माधवराव**

मूलतः चित्रकार असणारे माधवराव पण लवकरच त्यांनी कुंचला टाकून लेखणी हातात घेतली. वडिलांच्या हंटरपत्रात स्फुट लिहिता लिहिता पत्रकार बनले. लिखाणाची आवड पुढे त्यांचे ध्येयच बनले. माधवराव उत्तम लेखक बनले. त्यांनी विपुल लेखन केले. अनेक लेखकांचे ग्रंथ त्यांनी वाचले. गांधीजींच्या यंग इंडियाचे ते नियमित वाचक होते.[१५] त्यांचे स्वतःचे ग्रंथालय होते .रवींद्रनाथ टागोर, टॉलस्टॉय, महात्मा फुले, महात्मा गांधीजी यांचे माधवराव हे अनुयायी बनले. [१६] त्यांनी एकूण ५५ पुस्तके लिहिली. तीन पुस्तकांचे संपादन केले. समाजवाद, सामाजिक, कला, लघुकथा ,आत्मचरित्र ,व्यक्तीचित्रे इत्यादी विषयावर आधारित त्यांची ग्रंथसंपदा आहे.

**अखेरचा कालखंड**

१९६० नंतर माधवराव सत्याग्रह, मोर्चे, बंद यासारख्या विरोधी पक्षांच्या कार्यापासून मुक्त झाले होते .पटलेल्या किंवा न पटलेल्या सार्वजनिक गोष्टीबाबत पाठिंबा देणे किंवा निषेध करणे असे पत्रके काढणे यापेक्षा अधिक सार्वजनिक जीवन त्यांना उरले नव्हते.६ मार्च १९८६ रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.[१७]

**माधवरांना मिळालेले मानसन्मान**

- माधवरावांची पासष्टी पूर्ण झाली. गणपतराव जाधव, सर्जेराव पाटील, श्रीपतराव बोंद्रे (नगराध्यक्ष), आमदार पी .बी. साळुंखे इत्यादींच्या पुढाकाराने माधवरावांचा वाढदिवस यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला .[१८]
- वयाची पंचाहत्तरी ही पूर्ण झाली. या अमृत महोत्सवी समारंभाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते होते. भारतभूषण या पत्रकाने त्यानिमित्त माधवराव बागल अमृत महोत्सव विशेषांक प्रकाशित केला.
- १ मे १९६६ पासून महाराष्ट्र शासनाने दरमहा पाचशे रुपये माधवरावांना मानधन मंजूर केले.
- त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना २६ जानेवारी १९७२ रोजी पद्मभूषण हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.[१९]
- स्वातंत्र्य सैनिक म्हणून माधवरावांना २० ऑगस्ट १९७२ रोजी ताम्रपट देऊन गौरविले.
- महाराष्ट्र शासनाने रत्नाप्पा कुंभार करवी रौप्यपदक देऊन त्यांचा सन्मान केला .
- ४ मार्च १९७७ रोजी माधवरावांना महाराष्ट्र शासनाने दलित मित्र पुरस्कार आणि एक हजार रुपये देऊन गौरव केला.
- नागपूर येथे घोषित झालेला पुरस्कार तब्येत ठीक नसल्याने माधवराव स्वीकारण्यास जाऊ शकले नव्हते. म्हणून मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी कोल्हापूरला घरी येऊन माधवरावांना तो पुरस्कार प्रदान केला. यादरम्यान शिवाजी विद्यापीठ मराठवाडा आणि कृषी विद्यापीठ राहुरी यांनी माधवरावांना डिलीट पदव्या देऊन त्यांचा सन्मान केला.
- बालपणी चांदीच्या ताटात जेवलेला हा गृहस्थ आयुष्याच्या शेवटी निष्कांचन बनला .समाजसेवेच्या नावाखाली भौतिक सुख साधनांची रेलचेल करणारे, अमाप माया जमवणारे असंख्य नेते आपण बघतो पण माधवराव हे रावाचे रंक झाले.

**मूल्यमापन**

भाई माधवराव बागल यांनी कोल्हापूर संस्थानातून राजकीय लढाईला सुरुवात केली. पुढे भारताच्या स्वातंत्र्यानंतर कोल्हापूरमध्ये त्यांच्या विचारांच्या लोकांकडून कारभार सुरू करण्यात आला. पण प्रत्यक्ष पद स्वीकारण्यापेक्षा मार्गदर्शक म्हणून काम करणं त्यांनी पसंत केलं. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच देखील त्यांनी नेतृत्व केलं. आपल्याला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतात अनेक शहरांमध्ये पुतळे पाहायला मिळतात. पण कोल्हापुरातील बिंदू चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे एक वेगळेपण आहे. ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयात असताना उभारण्यात आलेला हा पहिला पुतळा आहे. कोल्हापूरच्या जनतेच्या हस्ते महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आलं होतं. या दोन महामानवाच्या पुतळ्यांची उभारणी करण्यासाठी झटणारं व्यक्तिमत्व म्हणजे भाई माधवराव बागल होय. कोल्हापूरमध्ये प्रजा परिषदेची स्थापना केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रचंड मोठा शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. अनेक वर्ष त्यांनी तुरुंगवास भोगला .अशा प्रकारे माधवराव बागल हे राजकारणी, क्रांतिकारक, समाजकारणी, प्रतिभावान साहित्यिक, चित्रकार आणि शिल्पकार देखील होते.

**संदर्भसूची**

१. बागल माधवराव, जीवन प्रवाह भाग १, प्रकाशक माधवराव खंडेराव बागल. राजाराम, कोल्हापूर .

मुद्रक -बा .ना. ठकार .

श्री. सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.

२. कित्ता पृ. २३

३. कित्ता पृ.२५

४. प्रा. डॉ. शिंदे पी.एन .चरित्र ग्रंथ माला भाई माधवराव बागल ,प्रकाशन श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर,पृ. १९

५. बागल माधवराव ,जीवन प्रवाह भाग १ पृ.७३

६. कित्ता पृ.८५

७. कित्ता पृ.८९

८. बागल माधवराव, जीवन प्रवाह भाग २ ,प्रकाशक- माधवराव खंडेराव बागल. राजाराम ,कोल्हापूर .

मुद्रक -बा .ना. ठकार श्री. सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.पृ.१३

९. कित्ता पृ.१७,१८

१०. कित्ता पृ.३७,३८

११. प्रा. डॉ. शिंदे पी .एन. चरित्र ग्रंथमाला भाई माधवराव बागल पृ.७७ १२) द टाइम्स ऑफ इंडिया २२ सप्टेंबर १९५५

१२. प्रा. डॉ. शिंदे पी. एन .चरित्र ग्रंथ माला भाई माधवराव बागल पृ.८२

१३. बागल माधवराव जीवन प्रवाह भाग २, प्रकाशक- माधवराव खंडेराव बागल. राजाराम, कोल्हापूर.

१४. मुद्रक -बा.ना. ठकार. श्री. सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर .पृ.१६६-१६८

१५. प्रा. डॉ. शिंदे पी. एन. चरित्र ग्रंथ माला ,भाई माधवराव बागल.पृ.९६

१६. पाटील भिकशेठ (संपा). कोल्हापूरची मोठी माणसे, महाराष्ट्राचे भाग्यविधाते माधवराव बागल हा धनंजय कीर यांचा लेख पृ.६

१७. प्रा. डॉ. शिंदे पी.एन. चरित्र ग्रंथ माला भाई माधवराव बागल.पृ.१०२,१०४

१८. कित्ता पृ.१०२

१९. यशवंतरावांचे माधवरावांना पत्र १ फेब्रुवारी १९७२

२०. प्रा. डॉ. शिंदे पी.एन. चरित्र ग्रंथ माला भाई माधवराव बागल पृ. १०२,१०३,१०४

# ५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्यायाचा लढा

**डॉ. आनंदा पांडूरंग कांबळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, भोगावती महाविद्यालय, कुरुकली.

**सारांश**

आधुनिक भारताचे एक महान समाज सुधारक डॉ. वाबासाहेब आंबेडकर हे आज जगातील एक राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक विचारवंत महणून ओळखले जातात. तसेच त्यांना मानवाधिकारांचा विजेता म्हणून ही ओळखले जाते. स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या लढ्याचे ते मानवतावादी नेते होते. डॉ. आंबेडकरांच्या प्रत्येक विचार आणि कार्यामध्ये एक विस्तृत सामाजिक न्यायाचा राष्ट्रीय दृष्टीकोन दिसतो. भारतीय समाजामध्ये दडपलेल्या प्रवर्गाचे ते प्रवक्ते बनले. त्यांनी प्रस्थापित सामाजिक भेदभावांना आव्हान दिले. भारतातील या असमान सामाजिक स्थिती विरूद्ध आदोलन केले. वर्ण, जाती आणि अस्पृश्यता निर्माण होण्याची कारण मीमांसा मांडली. भारतातील जातीभेदाच्या निर्मूलनासाठी एक कार्यक्रम तयार केला. त्यांच्या विचारांतून व कृतीकार्यक्रमातून वेगवेगळे सामाजिक न्यायचे लढे उभे राहिले. डॉ आंबेडकर हे मानवाधिकासचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे भारतीय समाजातील वंचित सामाजिक घटाकांना कायदेशीर अधिकार मिळवून देण्यासाठी अंतिमतः भारतीय संविधानात अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास वर्गासाठी तरतूदी केल्या. भारतीय समाजातील एकूण लोकसंख्येच्या ५०% लोकसंख्येला म्हणजेच स्त्रियांना मानवाधिकार मिळावेत. या हेतूने हिंदू कोड बिलाची निर्मिती डॉ आंबेडकरांनी केली. ज्यामध्ये स्त्रीला एक व्यक्ती म्हणून मान्यता देण्याचा विचार मांडला. या सर्वामध्ये सामाजिक न्यायाची आस दिसून येते.

**शोधनिबंधातील मुलभूत शब्द :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय, हिंदू कोड, संविधान, मागासवर्ग, अस्पृश, सवर्ण, क्रांतीसंग्राम, मानवमुक्ती.

**प्रस्तावना**

मानवतेचे उद्धारक व संपूर्ण मानवाला सामाजिक आर्थिक न्याय देणारे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला आज आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत असताना, त्यांच्या कार्याबाबत भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी असे म्हणतात, उन्हें दलित या हरिजन नेता कहना उनके साथ बडा अन्याय करना होगा I वे हमारे महान राष्ट्रीय नेताओं में थे और उनकी गणना, मार्टिन लुथर किंग की तरह, मानवमुक्तिदाता के रूप में की जाएगीI" यातून त्यांच्या कार्याची व्यापकता स्पष्ट होते. डॉ. आंबेडकर भारतीय समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी झटणारे नेते होते.यासाठी समाज व्यवस्थेमध्ये निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शास्त्रशुद्ध व सखोल अभ्यास करून, ते सोडवण्यासाठी सामाजिक परिवर्तनाचे पायाभूत मार्ग सुचवण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकरांच्या मते, कोणत्याही महान व्यक्तीला सामाजिक सुधारणांच्या प्रेरक शक्तीने प्रभावित केले पाहिजे व त्यांनी समाजाच्या

दुःखाचा कर्दनकाळ व अपमार्जक म्हणून काम करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने भारतीय समाज व्यवस्थेतील विविध अंगी विषमतेच्या परिवर्तनातून समता निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकर सामाजिक न्यायाचा लढा उभारताना दिसतात. त्यांना स्वातंत्र्य व समतेवर आधारित समाज अभिप्रेत असल्याने, त्यांनी लोकशाही मूल्य भारतीय समाजात रुजवण्यावर भर दिला. समाज सुधारणेबाबतचे संतांचे पारलौकिक तत्त्वज्ञान ही डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. कारण संतांनी देव आणि माणूस यांच्यातील संघर्ष सांगितला, पण माणसा- माणसातील संघर्षाला त्यांनी स्पर्शही केला नाही.

डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक न्यायासाठीचा लढा हा सामाजिक सुधारणांच्या प्रेरक शक्तीने प्रभावीत झालेला होता. समाज्याच्या दुःखाचा नष्टावा करताना, दुःख निर्माणाच्या मुळावर आघात करणारा होता. त्याबरोबर सर्व माणसे निसर्गाने समान निर्माण केली आहेत. या मानवी मनाच्या नैतिक मूल्यावर भारताच्या नवसमाज निर्मितीच्या कार्यासाठी होता असे दिसून येते.

**उद्दिष्टे**

१. मागासलेल्या जाती जमातींच्या विकासामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका तपासणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे विश्लेषण करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याची उपयुक्तता तपासणे. भारतातील ज्या घटकांची स्व - उन्नती झाली त्याचे अवलोकन करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे .यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधने - यामध्ये भारतातील सामाजिक न्यायाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारांचा परामर्श प्राथमिक साधनांच्या आधारे घेतला आहे. दुय्यम साधने- यात सामाजिक न्याय संदर्भात लिहिलेले लेख,संदर्भ ग्रंथ, मासिके व इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला आहे. अध्ययनासाठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून त्या साधनसामग्रीचे आकलन करून घेऊन विश्लेषणात्मक व विवेचनात्मक पद्धतीचा वापर करून सदर शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**विषमतेवर आधारित भारतीय समाज रचना व सामाजिक न्यायाचा लढा**

भारतीय समाज रचना ही जात विषमतेवर आधारित आहे. या विषमतेने समाजात वरिष्ठ जातींची मक्तेदारी टिकवणारी व्यवस्था ही निर्माण केली. त्यामुळे बहुसंख्य मागासलेल्या जाती या विषमतेमुळे अन्याय व शोषणाच्या बळी ठरलेल्या दिसतात. या जातींना अस्पृश्य मानले जाते. त्यांना कोणतेही मानवतेचे अधिकार हा समाज देत नाही. या उलट प्रस्थापित असणारी विषमताच पुढे चालू ठेवण्यात धन्यता मानणाऱ्या या समाजाला बदलण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी या विषमते विरुद्ध पाऊल उचलले. भारतातील काही समाजसुधारकांनी या विषमते विरुद्ध कार्य करताना फक्त कौटुंबिक सुधारणेपर्यंतच मर्यादित भूमिका घेतली. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापक भूमिका घेऊन भारताच्या सामाजिक सुधारणांच्या व राष्ट्रीय विकासाच्या संदर्भात तत्कालीन विषम परिस्थितीचे

विश्लेषण करतात. स्वतः डॉ. आंबेडकरांना या व्यवस्थेने शिक्षण घेण्याचा हक्क नाकारला. इतकेच नाही तर ही व्यवस्था उच्च विद्या विभूषितपणालाही कशी छेद देते याचा प्रत्यय ही त्यांना आला. या विषमते विरुद्ध संघर्ष करत असताना भारतीय राष्ट्रहिताच्या मुख्य प्रवाहापासून डॉ. आंबेडकर स्वतःला कुठेही वेगळे करत नाहीत हे ही अत्यंत महत्त्वाची बाब दिसून येते.

भारतीय समाजातील अन्याय, शोषण व विषमते विरूद्ध जी महात्मा फुलेंनी लढा उभारला. त्या लढ्याला कायदेशीर रित्या न्यायाधिष्ठीत समाजात परावर्तीत करण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले. कारण भारतात न्यायाधिष्ठीत समाज म्हणजे स्वातंत्र्य व समतेवर आधारलेला समाज निर्माण करणे हे डॉ. आंबेडकरांचे ध्येय होते. अशा न्यायाधिष्ठीत समाजव्यवस्थेला डॉ. आंबेडकरांच्या मते दोन मूलभूत तत्त्वे असतात. १) प्रत्येक व्यक्ती हे एक साध्य आहे (**end and itself**) आणि व्यक्तीचा विकास हेच समाजाचे ध्येय आहे. २) समाजातील निरनिराळया व्यक्तिच्या परस्पर संबंधाचे नियम स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर आधारलेले असले पाहिजेत. त्यामुळे डॉ. आंबेडकर व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देतात. व्यक्तीविकासाच्या आड येणाऱ्या भारतीय समाजातील रूढी, प्रथा व परंपरा ते नाकारतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची संकल्पना**

डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर सामाजिक अन्यायाचा सामना केला होता, त्यामुळे शोषित वर्गाला सामाजिक न्याय कसा मिळवून देता येईल. तसेच त्यांचे संरक्षण आणि विकास कसा करता येईल, हा विचार त्यांच्या मनात कायम राहिला. डॉ.आंबेडकर हिंदू समाजाच्या संदर्भात म्हणाले की, देशात असा एक वर्ग आहे. जो शतकानुशतके विषमतेच्या दर्दनाक वेदना सहन करत आला आहे, जो परकीयांचा गुलाम आहे तसेच, तो स्वदेशी लोकांचाही गुलाम आहे. ज्यांच्या सोबत पशूसारखा व्यवहार केला जातो. सर्व हिंदू कुत्रे, मांजर, गाय इत्यादी पाळीव प्राण्यांना प्रेमाने स्पर्श करतात, मुंगीला साखर अर्पण करतात. त्यात काहीही वाईट नाही. परंतु हेच लोक स्वधर्मी दलितांच्या स्पर्शाने ते अपवित्र होतात.

डॉ. आंबेडकर हे भारताच्या सामाजिक इतिहासातील पहिले महापुरुष आहेत, ज्यांनी दलितांच्या 'सामाजिक न्याया'च्या समस्येचे वर्णन राष्ट्रीय समस्या म्हणून केले. तसेच त्यांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांचा विचार होता, "स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक विषमता दूर झाली पाहिजे. जेणेकरून नंतर दलितांनाही स्वातंत्र्याचे लाभ मिळू शकतील. कारण जोपर्यंत दलित सामाजिक शोषण आणि अपमानाचे बळी राहतील, तोपर्यंत त्यांच्यासाठी स्वातंत्र्याला महत्त्व राहणार नाही. ते काल ही गुलामच होते, आज ही गुलाम आहेत आणि उद्याही गुलामच राहतील. त्यामुळे त्यांच्या जीवनात बदल होण्याची गरज आहे."

डॉ. आंबेडकरांच्या 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचे भारतातच नव्हे तर, जागतिक स्तरावरही कौतुक झाले. त्यांच्यामुळे मानवाप्रती सद्भावना, प्रेम आणि आदराची, प्रतिष्टेची वृत्ती प्रचलित झाली. म्हणूनच भारतीय संविधानाला मानवी हक्कांचा जाहीरनामा म्हटले गेले. ज्यावर संपूर्ण ठसा डॉ. आंबेडकरांचा आहे .

**सामाजिक क्षेत्रातील कार्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व मागासलेल्या घटकांच्या उत्थानासाठी सामाजिक स्तरावर वेगवेगळे प्रयत्न केले. त्यामध्ये वेगवेगळ्या संस्थांची स्थापना, वृत्तपत्रे, मासिके, बैठका ,सत्याग्रह इत्यादींचा समावेश होतो. माणगाव परिषद १९२० मध्ये झाली आणि या माणगाव परिषदेने बहुजन प्रजेला त्यांचा स्वतःचा नेता मिळाला असे म्हणावे लागेल. अस्पृश्यते विरुद्ध लढण्याची भूमिका या परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराज हे डॉ. आंबेडकर यांच्यावर सोपवतात व भारतीय समाजातील मानवीय उद्धाराची व्याप्ती सर्व समावेशक होतांना पहावयास मिळते.

डॉ. आंबेडकरांनी ९ मार्च, १९२४ ला परळच्या दामोदर हॉलमध्ये एक बैठक बोलावली. या या बैठकीमध्ये बोलताना डॉ. आंबेडकरांनी लोकांना सुशिक्षित करून, त्यांच्या हीन अवस्थेच्या कारणांचे स्पष्टीकरण देऊन , त्यांना संघटित करण्याच्या हेतूने निर्माण करावयाच्या संघटनेचे नाव 'बहिष्कृत हितकारणी सभा' असे सुचवले. त्या प्रमाणे 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हे ब्रीदवाक्य घेऊन ही संस्था २० जुलै, ११९२४ ला स्थापन करण्यात आली.

महाडचा क्रांती संग्राम - एक सार्वजनिक आंदोलन उभारून अस्पृश्यांच्या सर्वांगीण मुक्तीचा म्हणजेच पर्यायाने मानवी हक्कांचा लढा लढण्याचे निश्चित केले. डॉ. आंबेडकरांनी महाडचा क्रांतीसंग्राम घडवून आणला. या लढ्याचे उद्दिष्ट सत्यशोधक समाजाने बहुजनांची गुलामगिरी नष्ट करण्याचा केलेला अपूर्ण प्रयत्न, पूर्ण करणे असे डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत होते. गुलामगिरीला चांगला धक्का बसावा इतक्या व्यापक दृष्टीने डॉ. आंबेडकर महाडच्या क्रांतीसंग्रामाकडे पाहत होते.

महाडमध्ये सामाजिक क्रांतीची दुसरी परिषद २५ व २६ डिसेंबर, १९२७ रोजी भरवण्यात आली. या लढ्याला डॉ. आंबेडकर महाड येथील धर्मसंगर असे संबोधतात. या धर्मसंगराच्या पार्श्वभूमीवर हिंदू समाजातील अस्पृश्यतेच्या अमानवीय रूढीच्या विरोधात 'बहिष्कृत भारत' मधून डॉ. आंबेडकरांनी धर्मसंगराबाबत अस्पृश्यांचे कर्तव्य, स्पृश्यांचे कर्तव्य व सरकारचे कर्तव्य असे तीन महत्त्वपूर्ण अग्रलेख लिहिले. या अग्रलेखांच्या माध्यमातून महाडच्या दुसऱ्या सामाजिक क्रांतीची व्यापकता व वास्तववादी सामाजिक जीवनातील महत्त्व तर विशद केलेच. पण त्याचबरोबर समाजातील प्रत्येक वर्गाची जबाबदारी आधुनिक समाजाच्या निर्मितीच्या व्यापक पायावर स्पष्ट केली.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी २५ डिसेंबर,१९२७ ला डॉ. आंबेडकरांनी क्रांतिकारी भाषण केले. या भाषणात महाडच्या सामाजिक क्रांतीची तुलना फ्रान्समधील ५ मे, १७८९ च्या फ्रान्स लोकांच्या राष्ट्रीय सभेशी केली. फ्रान्समधील त्रैवर्णिक समाज व्यवस्था नष्ट करण्यासाठी या राष्ट्रीय सभेने जशी सामाजिक क्रांती केली. तशीच महाडची ही परिषद वर्णाश्रम व्यवस्थेच्या उच्छाटनासाठी सामाजिक क्रांतीचा स्त्रोत निर्माण करणारी राष्ट्रीय सभा बनणे आवश्यक आहे. यावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला. व्यापक पायावर हिंदू समाजामध्ये सुधारणा घडविण्यासाठी आरंभलेला हा क्रांतीसंग्राम आहे. याची जाण संपूर्ण भारतीयांना करून देण्याच्या हेतूने डॉ. आंबेडकर म्हणतात, 'अस्पृश्यता निवारणाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्व:हिताचे आहे तितकेच राष्ट्रहिताचे आहे. यात काही किंतू नाही.'

**मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह**

अमरावतीतील अंबादेवी मंदिरातील प्रवेश सत्याग्रह, पुण्यातील पर्वती मंदिर सत्याग्रह व नाशिक मधील काळाराम मंदिर सत्याग्रह. येथील मंदिरामध्ये प्रवेश मिळवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रह केला. पण या सत्याग्रहाचा उद्देश स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर म्हणाले, "मंदिरात प्रवेश न मिळाल्याने आपण काही मरणार नाही. तसेच प्रवेश मिळाल्याने आपण अमरही होणार नाही. माणूस म्हणून आपण समान हक्कांसाठी झगडत आहोत आणि यात कसलीही तडजोड करणार नाही." अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाचा उद्देश स्पष्ट केला. ह्या सत्याग्रहामागे माणूस म्हणून असणारा हक्क अस्पृश्यना मिळावा इतकी माफक अपेक्षा सामाजिक न्यायाच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांची होती.

**राजकीय प्रक्रियेतील योगदान**

२७ जानेवारी, १९१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साऊथबरो कमिशनला लेखी निवेदन दिले. या निवेदनातील आपल्या मागण्यांच्या द्वारे १) अस्पृश्य समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा मिळाल्या पाहिजेत. २) मुंबई प्रांताच्या जनगणनेनुसार कायदेमंडळात अस्पृश्यांना किमान ८% जागांवर प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे व ३) अस्पृश्यांना मतदानाचा अधिकार पाहिजे. पण मताधिकरासाठी शिक्षण व संपत्तीची अट असता कामा नये. असे डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन केले. कारण अस्पृश्यतेच्या प्रथेने व्यक्तिमत्व लुबाडलेला किंवा पुसला गेलेला असा दलित समाज असून. सामाजिक व धार्मिक दृष्ट्या हीन जीवन जगणारा होता. त्यामुळे अस्पृश्यांचे हितसंबंध म्हणजे मानवतेचे हितसंबंध आहेत असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. अस्पृश्य समाज व सवर्ण हिंदू यांच्यातील रोजचे संघटित सामाजिक जीवन जगत असताना, अस्पृश्यतेच्या प्रथेने अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विनाश होतो. तसेच सवर्ण हिंदूंना सुद्धा मानवतेच्या दृष्टीने विचार करता न शोभणारी अशी ती बाब आहे. म्हणजेच ती अमानवीय असून, समाज समतेकडे घेऊन जाण्यासाठी, सामाजिक न्यायासाठी ती प्रथा नष्ट करण्याची गरज आहे. या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी ही प्रथा नष्ट करण्यासाठीचे पहिले पाऊल म्हणून, मतदानाचा व राजकीय प्रतिनिधित्वाचा अधिकार मागितला. कारण ज्या अटींवर संघटित सामाजिक जीवन कंठावे लागते, त्या अटीबाबत प्रत्यक्ष क्रियाशील व उघड भाग घेण्याची संधी प्राप्त करून घेण्यासाठीच मतदानाचा व राजकीय हक्कांचा उपयोग करावयाचा असतो असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. कारण समाजाची पुनर्रचना करण्यासाठी वेगवेगळ्या समाजाचे खरे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिनिधींना एकत्रित कार्य करण्याची संधी दिल्यास जातीय विषमता नष्ट होण्यास मदत होईल. या हेतूने अस्पृश्यांच्या राजकीय मागण्यांकडे डॉ. आंबेडकर पाहत होते.

५ ऑगस्ट, १९२८ रोजी मांडलेल्या 'मुंबई वतनदारी किंवा महार वतन' अधिनियम दुरुस्ती विधेयकातील चर्चेत, वतनदार महारांच्या असहाय्य व दयनीय परिस्थितीचे वर्णन करून, त्यांच्या होणाऱ्या अमानवीय शोषणाची डॉ. आंबेडकरांनी सभागृहाला माहिती दिली. महार वतनाने त्यांचे आर्थिक व सामाजिक शोषण कसे होते, स्त्रीला घराबाहेर जाऊ न देणारा उच्चभ्रू समाज महार वतनाच्या चाकरीपोटी महार समाजातील स्त्रीला कसे काम करण्यास भाग पाडतो. या सामाजिक विषमतेच्या भेदभावाचे व विदारक स्थितीचे विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी करून समाजातील शोषणाचे वास्तव सरकार समोर व सभागृहातील अभिजन जातीतील

सदस्यांसमोर ठेवले. ह्या शोषणाला बळकटी देणारे महार वतन नष्ट करण्याबाबत डॉ. आंबेडकरांनी आपले मत मांडून या वर्गाची अशा अमानवीय कार्यातून सुटका केले.

१७ सप्टेंबर, १९३७ रोजी डॉ. आंबेडकर यांनी मुंबई प्रांतिक विधिमंडळात शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या अमानवी अशा खोती पद्धतीचे विश्लेषण केले व खोती पद्धती नष्ट करण्याचे व कुळ असणाऱ्या व्यक्तीला जमिनीचे मालकी हक्क देण्यात यावेत याबाबतचे विधेयक मांडले. कुळांचे होणारे शोषण नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष जमीन असणाऱ्या व्यक्तीला कसत्या शेतीचा ताबा द्यावा व प्रत्यक्ष सरकारशी त्यांचे संबंध प्रस्थापित करावेत. या प्रक्रियेत खोताने त्याचे अधिकार गमावल्यामुळे त्याच्या होणाऱ्या नुकसानीची योग्य ती भरपाई देण्याची तरतूद करावी. अशा समतोल शिफारशी करून प्रामुख्याने रत्नागिरी, कुलाबा, ठाणे जिल्ह्यातील प्रचलित असणारी ही अमानुष पद्धत नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर प्रयत्न करतात. तेव्हा ते सर्व जाती-धर्मातील शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते बनतात. ही व्यापकता त्यांच्या कार्यामध्ये दिसते. शेतकरी हा शारीरिक कष्ट करणारा घटक आहे. या समूहाला शोषणमुक्त करणे हे मानवी हक्कांशी निगडित बाब आहे. या मानवतेच्या भूमिकेतून डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कार्याकडे तितक्याच उदात्त दृष्टीने आधुनिक समाजाने पाहण्याची गरज आहे. अन्यथा त्यांच्या कार्याला आपोआपच संकुचित केली जाईल व मानव मुक्तीच्या उद्धार कर्त्याचे सत्य परिस्थितीवर अवलोकन न झाल्याने प्रचलित समाजातील प्रश्न सोडवण्याचे साधन म्हणून त्यांच्या विचारांकडे न पाहिल्याने आधुनिक समाजाचीच अतोनात हानी होईल.

मातृत्व लाभ विधेयकाबाबत २८ जुलै, १९२८ रोजी भाषण करताना डॉ. आंबेडकर स्त्रीला प्रसुती पूर्व व नंतर काही काळ विश्रांती मिळाली पाहिजे असे मत मांडतात. कारण ही बाब राष्ट्राच्या हिताची आहे असे त्यांचे म्हणणे होते. डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय पातळीपर्यंत हा प्रश्न उचलून स्त्रियांच्या हक्कांची जोपासना केली. लोककल्याणासाठी त्यांच्या म्हणजे स्त्रियांच्या विश्रांतीची खात्रीलायक हमी देणे हे सरकारचे कर्तव्य आहे असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच स्त्री कामगारांचा कमी वेतनात वापर करून मोठ्या प्रमाणात फायदा मिळवणाऱ्या मालक वर्गाने ही त्यामध्ये योगदान देणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त गरज भासली तर ग्राहकांनीही त्या खर्चाचा बोजा उचलावा. कारण ही सामूहिक जबाबदारी असून राष्ट्राच्या सुसंस्कृत जीवनासाठी ही बाब आवश्यक आहे. हे त्यांनी सरकारला पटवून दिले. कारण ती उद्याच्या राष्ट्राच्या सर्वांगीण कल्याणाची निर्मिती असते अशा व्यापक दृष्टीने डॉ. आंबेडकर स्त्रियांच्याकडे पाहताना दिसतात.

याचबरोबर १९३८ मध्ये आलेल्या कामगार संपावरील जाचक अटी संदर्भातील विधेयकाला डॉ. आंबेडकरांनी सर्व शक्ती व बुद्धिपणाला लावून विरोध केला व कामगारांच्या संप करण्याच्या अधिकाराला मान्यता मिळवली. भारतातील कामगारांचे न्याय हक्क डावलून त्याचे शोषण करणाऱ्या व्यवस्थेला थांबवण्याचे काम कायदेशीर रित्या डॉ. आंबेडकरांनी केले.

**गोलमेज परिषदा**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे नोव्हेंबर १९३० ते नोव्हेंबर १९३३ या कालखंडात झालेल्या तीन गोलमेज परिषदा होय. या कालखंडात भारतातील सर्व प्रमुख राजकीय नेते व संस्थानिकांचे प्रतिनिधी यांच्या भारताच्या

स्वातंत्र्याबद्दल व भावी राज्यघटनेबाबत विचारविनिमय करण्यासाठी तीन परिषदा इंग्लंडला बोलवण्यात आल्या. ह्या परिषदा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय घटना आहेत पण याबाबत सखोल व वास्तवदर्शी विश्लेषण दिसत नाही.

या गोलमेज परिषदांचे ऐतिहासिक महत्त्व डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने फार मोठे आहे .कारण भारतीय जनतेच्या प्रतिनिधींबरोबर विचारविनिमय करून भारताची भावी राज्यघटना बनविण्याचा भारतीय जनतेचा अधिकार ब्रिटिश सरकारने मान्य केला. त्यांची ह्या परिषदा म्हणजे पूर्तता होती. या अगोदरच्या भारताच्या इतिहासातील दोन हजार वर्षातील मोगल, मुसलमान व हिंदू अशा कोणत्याच अमदानीत भारतीय जनतेला राज्य कसे पाहिजे? हा जनतेचा हक्क कधीच मान्य करण्यात आला नव्हता. तो प्रथमता ब्रिटिशांनी दिल्यामुळे डॉ. आंबेडकर या परिषदेचे ऐतिहासिक महत्त्व स्वीकारतात.

डॉ. आंबेडकर या परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. ते आपल्या भाषणात म्हणतात, ‘भारतातील सरकार हे लोकांनी लोकांकरिता चालवलेले लोकांचे राज्य असावे’ ज्या अस्पृश्यांची स्थिती गुलामांपेक्षा वाईट असून, त्यांची लोकसंख्या फ्रान्सच्या लोकसंख्ये इतकी व भारताच्या लोकसंख्येच्या एक पंचमांश आहे. आणि त्यांचा प्रतिनिधी म्हणून मला संपूर्ण स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. पुढे जाऊन डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, ब्रिटीश सरकार सुध्दा भारताच्या सामाजिक, धार्मिक विषमतेचे बळी ठरुन, भारतातील अस्पृश्यांना न्याय देत नाही. हे प्रखडपणे त्यांनी मांडले. आम्हाला सरकार कसे पाहिजे, याचे स्पष्टीकरण देताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ‘जे देशाचे खरे हित निष्ठापूर्वक साधेल आणि न्याय व निकडीचे असे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कुणाच्याही रागलोभाची पर्वा न बाळगता सोडवील’ असे सरकार आम्हाला अभिप्रेत आहे. दुसऱ्या गोलमेज परिषदेत घटना समितीवर डॉ. आंबेडकर यांना निवडण्यात आले. या समितीचे काम भावी भारताचे संविधान बनवणे हे होते. या पार्श्वभूमीवर सामाजिक सुधारणेबाबत डॉ. आंबेडकरांच्या बरोबर विचार संघर्ष करणारे साप्ताहिक ‘कुलाबा समाचार’ ने म्हटले, ‘आंबेडकर हे पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे नेते असून, गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात स्वतःची व मातृभूमीची कीर्ती त्यांच्या हातून वाढो. तिच्या पायातील दास्यशृखला गोलमेज परिषदेत तोडण्याच्या कामीही त्यांचे महात्माजी प्रभूतींना भरपूर सहाय्य मिळो.’ तर ‘इंडियन डेली मिरर’ने ‘आंबेडकर हे राष्ट्रभक्त आहेत. भारताला स्वयंशासित सरकार प्राप्त व्हावे, असे त्यांना उत्कटपणे वाटत असते.’ असे लिहिले होते.

**जातीय निवाडा**

दुसरी गोलमेज परिषद अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवर वादविवाद होऊन संपली. पण या मुद्द्यांवर भारतातील नेत्यांमध्ये दोन गट पडले. डॉ. आंबेडकर बिगर काँग्रेस गटाचे नेते झाले. पण अधिवेशनातील तरतुदीप्रमाणे अधिवेशनानंतर ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय निवाडा जाहीर केला. या जाती निवाड्याच्या विरोधात महात्मा गांधींनी अमरण उपोषण सुरू केले. तसे पाहिले तर हा संघर्ष ब्रिटिश पंतप्रधान व महात्मा गांधी यांच्यातील होता. पण ब्रिटिश पंतप्रधान तो जातीय निवाडा बदलण्यास तयार नव्हते .मात्र सवर्ण हिंदू व अस्पृश्य समाजाच्या संमतीने दुसरा एखादा मुसदा पुढे आल्यास, अस्पृश्यांबाबतच्या मूळ निवाड्यात बदल करता येईल, असे आश्वासन ब्रिटिश सरकारने दिले. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या संमतीशिवाय निवाड्यातील कोणत्याही बदलाला कायदेशीर स्वरूप

येणार नव्हते. पर्यायाने डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रीय नेतृत्व मान्य झाले. २४ सप्टेंबर, १९३२ रोजी डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये पुणेकर झाला व जाती निवाड्यातील मूळ तरतुदींमध्ये बदल करण्यात आला.

तिसऱ्या गोलमेज परिषदेचे अधिवेशन जून, १९३३ मध्ये सुरू झाले. हे अधिवेशन ब्रिटिश पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त कमिटी पुढे चालले. भारताला द्यावयाच्या राजकीय सत्तेच्या घटनात्मक सुधारणांच्या बाबींची छाननी या अधिवेशनात करण्यात आली. ही छाननी किंवा उलट तपासणी करण्याचा अधिकार डॉ. आंबेडकरांना देण्यात आला होता. या तपासणीत भारताच्या प्रशासकीय रचना व राजकीय सत्ता वितरणाच्या प्रक्रियेत डॉ. आंबेडकरांचे विचार प्रतिबिंबित झालेले दिसतात. तर दुसऱ्या बाजूला ब्रिटीश उच्चपदस्थ वर्गामध्ये भारताबाबत असणारे अनेक गैरसमज डॉ. आंबेडकरांनी दूर केलेले पहावयास मिळतात. भारतातील प्रशासकीय यंत्रणा कशी असावी? प्रत्यक्ष तिच्या कार्यात काही दोष आहेत का? याची शहानिशा त्यांनी उलट तपासणीत करून घेतली. कायदा व सुव्यवस्था हे खाते कशाप्रकारे कार्य करील व भारतातील कायदेमंडळाच्या अधिकारात त्यांने कार्य केल्यास, त्यातील नोकरांच्याबाबत असणारा भारतीयांचा रोष कमी होईल. याचे विश्लेषण त्यांनी केले. भारताच्या संविधानाच्या प्रारूपामध्ये अंतिमता आली आहे की, त्यात उत्क्रांतीला अजून जागा आहे. याची चाचपणी डॉ. आंबेडकरांनी केली. तसेच भारतीयांचे राष्ट्रीयत्व ठरवण्याचा अधिकार भारतीय कायदेमंडळाला असून नये. हा दंड अनियंत्रितपणे ठेवावा असे तुमचे म्हणणे आहे काय? असे प्रश्न विचारून नोकरशाहीचे त्याबाबत मत जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. अंतिमत: भारतीय राष्ट्रीयत्व स्थापन करण्यास ब्रिटिश नोकरशाहीचा आक्षेप नाही,हे ब्रिटिशांच्याकडूनच मान्य करून घेतात.

गोलमेज परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात डॉ. आंबेडकरांनी वेगवेगळया क्षेत्रातील व्यक्तींच्या साक्षी घेऊन भारताच्या भावी संविधानाच्या प्रारुपामध्ये अधिक सक्षमता व स्पष्टता आणण्यासाठी कार्य केले. भारतातील सर्व घटकांकडे ब्रिटिश प्रशासनाचे लक्ष वेधले. स्वतंत्र भारताच्या संविधानात मागासवर्ग, अस्पृश्य, अशिक्षित, गरीब, स्त्रिया या सर्व घटकांना योग्य न्याय कायदेशीर आधारावर मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी घेतलेली भूमिका ही सामाजिक न्यायाची भूमिका असल्याचे दिसते.

**राजकीय पक्ष**

स्वतंत्र मजूर पक्ष हा सर्व धर्माच्या व जातीच्या लोकांसाठी डॉ. आंबेडकरांनी खुला ठेवला होता. त्या काळाचा विचार करता भारतातील सर्व प्रमुख पक्ष धर्मावर आधारित होते. तर काही पक्ष भांडवलदार, सावकार, जमीनदार, व्यापारी अशा शोषण करणाऱ्या घटकांचे होते. धर्म व जात विरहित व वर्ग विरहित अशा' स्वतंत्र मजूर पक्षा'ची स्थापना डॉ. आंबेडकरांनी केली. गरीब, मजूर, अस्पृश्य, मागासवर्गाचे हित संरक्षण व संवर्धन करणे हे या राजकीय पक्षाचे ध्येय होते. अशी वर्गीय भूमिका घेऊन स्वतंत्र मजूर पक्ष हा सर्व जाती धर्माच्या मागासवर्गाचे प्रतिनिधित्व करणारा राजकीय पक्ष होता.

अस्पृश्य समाज ही एक राष्ट्रीय घटक आहे, म्हणून त्याची पूर्वसंमती असल्याशिवाय कोणतीही राज्यघटना राबवली जाणार नाही. हा गोलमेज परिषद अस्पृश्यांना मिळालेला अधिकार राजकीय घडामोडीत नाकारला जात होता. ही अस्पृश्यांच्या दृष्टीने खूप अन्यायकारक बाब होती. नागपूर या ठिकाणी १७ ते २० जुलै,१९४२ ला अनुसूचित वर्गाची अखिल भारतीय पातळीवरील परिषद

भरवण्यात आली. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी असे मत मांडले की, आपली सर्वांगीण प्रगती झाली पाहिजे. पण आपल्याजवळ आर्थिक बळ नाही व सामाजिक सामर्थ्य नाही. याकरिता आपल्याला राजकीय सत्ता पाहिजे. हे राजकीय सत्ता आपण आपल्या संघटनेच्या बळावर हस्तगत केली, तरच आपण आपली प्रगती करू शकू. यासाठी 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' ची स्थापना करण्यात आली. तरीही अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशनचा १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. आंबेडकरांनी तयार केलेला जाहीरनामा हा संपूर्ण भारतीयांच्या कल्याणाचाच होता. या जाहीरनाम्यामध्ये कायद्यापुढे सर्व भारतीय समान,व्यक्ती केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास हे साध्य, तर विकासाचे राज्य हे साधन मानले जाईल. समता, बंधुता व स्वातंत्र्य प्रस्थापित करणे व संसदीय लोकशाही विकसित करणे हे धोरण स्पष्ट केले होते. यावरून डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेला 'अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' हा राजकीय पक्ष भारतातील सर्वच किंवा प्रत्येक नागरिकाच्या समतेचा, न्यायाचा, कायद्यापुढे समानतेचा व विकासाचा मुद्दा घेऊन सार्वत्रिक निवडणुकीत सामान्यांच्या समोर येतो, कारण डॉ. आंबेडकर लोकशाही तत्वांवर वाटचाल करणारे व त्यामध्ये भारताचे भविष्य शोधणारे नेते होते हे या वरून स्पष्ट दिसते.

डॉ. आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर,१९५६ ला 'अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या' स्थापनेची घोषणा केली. त्यांनी स्वतःच रिपब्लिकन पक्षाची घटनाही लिहिली. कारण डॉ. आंबेडकरांचा काँग्रेस पक्षाला एक प्रागतिक पर्याय देण्याचा प्रयत्न होता. यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकर लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक असणारा प्रबळ विरोधी पक्ष रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून भारताच्या राजकारणात निर्माण करू इच्छित होते. प्रत्येक भारतीयाला समतेचा हक्क, उत्कर्षाची समान संधी, माणसाला- माणसाच्या, वर्गाला- वर्गाच्या व राष्ट्राला- राष्ट्राच्या जुलमातून मुक्त करण्यासाठी कार्यरत राहण्याची दिलेली ग्वाही दिसून येते.

**अनुसूचित जाती-जमाती घटकांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कलम क्रमांक १४ मध्ये कायद्यापुढे प्रत्येक व्यक्ती समान आहे अशी हमी दिली. डॉ. आंबेडकरांनी कलम क्रमांक १५(४) व ३४० कलमानुसार मागासवर्ग निश्चित केला. १५(४) या कलमानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरीता अथवा अनुसूचित जाती व जनजाती यांच्याकरीता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही अशी तरतूद राज्यघटनेत केली. कलम १४(५) नुसार देखील तरतूदी करण्यात आल्या. अनुसूचित जाती-जमाती यांच्या उन्नतीकरीता कोणतीही विशेष तरतूद करण्यास कायद्याने त्यांच्या शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या अनुदानात किंवा विनाअनुदान खाजगी संस्थांमधील प्रवेशासहीत विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही या महत्त्वाच्या तरतूदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केल्या. भारतीय राज्यघटनेमध्ये कलम ३३१, ३४०, ३४१. ३४२ या कलमांमध्ये अनुसूचित जातींच्या प्रगतीसाठी व विकासासाठी घटनात्मक तरतूदी केल्या.

**इतर मागास वर्ग घटकाचे अधिकार**

भारतीय संविधानातील अनुच्छेद १६(४) नुसार मागासवर्गीयांसाठी विशेष तरतूद करण्याची मुभा राज्याला दिली आहे. पण मागासवर्ग म्हणजे कोण? याची व्याख्या भारतीय संविधानात केली नव्हती. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग भारतात कोणते

आहेत व त्या मागासवर्गाच्या उन्नतीकरीता कोणते उपाय योजना करता येतील  याबाबत शिफारस करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४० नुसार राष्ट्रपतींना एक आयोग नेमता येईल असे स्पष्ट करण्यात आले. या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास या घटकाचा अर्थ लावण्यासाठी उच्च व सर्वोच्च न्यायालयात ही चर्चा झाली.

डॉ. आंबेडकर भारतीय समाजव्यवस्थेतील शोषले जाणाऱ्या घटकांचे नेमके कारण काय आहे हे जाणत होते. त्यामुळे सामाजिक शोषणाच्या विरोधात त्यांनी भूमिका घेतली. हे सामाजिक शोषण अज्ञानातून येते त्यामुळे शैक्षणिक मागासलेपण नष्ट करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी आरक्षणाची तरतूद केली. ज्यामध्ये सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा स्त्रोत सुरू होतो. यातून स्वातंत्र्य, समता व बधुतेवर आधारलेला न्यायी आधुनिक भारतीय समाज निर्माण करणे हेच त्यांचे ध्येय होते असे स्पष्ट दिसते.

**स्त्रियांचे कायदेशीर अधिकार**

भारतीय संविधानाचा सरनामा स्त्री समानता बहाल करतो. 'त्यांच्या सर्व नागरिकास' असे संबोधन करताना राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यावरून नाकारु शकत नाही. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून डॉ. आबेडकर स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक मागासलेपणाची व वाईट प्रथांची मुळे नष्ट करू पहात होते. कारण पारंपरिक धार्मिक कायद्यांनी स्विला सर्वच क्षेत्रात परावलंबी बनले होते. तिचे शोषण सर्वांगांनी चालवले होते. या सर्व वाईट प्रथा, परंपरा नष्ट करण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणून डॉ. आबेडकरांनी  हिंदू कोड बिल तयार केले  होते. पण सनातन भारतीय समाजातील धर्म मार्तंडांना अशा सुधारणा नको होत्या. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाला पारंपरिक भारतीय समाजाने विरोध केला. पण काळाच्या ओघात ते टप्प्या टप्प्याने पास झाल्याने भारतातील विकसित स्त्री दिसते आहे.

डॉ. आंबेडकरांच्या स्त्री हक्कांच्या म्हणजेच मुक्तीच्या राष्ट्रीय विचारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण त्यांच्या भूमिकेतून आधुनिक समाजातील स्त्रियांचा विकास झालेला दिसून येतो. डॉ. आंबेडकर स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी हेतूपूर्वक कार्य करीत होते. राष्ट्राच्या पन्नास टक्के जनतेला फक्त राजकीय स्वातंत्र्य नाही, तर सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य देण्यासाठी त्यांचा हा लढा होता. जो खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा लढा होता असे म्हणता येईल. डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाजातील प्रचलीत न्यायाची संकल्पना केवळ नाकारली नाही, तर त्यांनी पर्यायी न्यायाची संकल्पना मांडली. त्यामुळे स्त्रियांच्या हक्कांबाबत संघर्ष करताना डॉ. आंबेडकर प्रचलीत विषमतावादी न्याय संकल्पना नाकारून थांबत नाहीत, तर समताधिष्ठीत न्यायाची संकल्पना नव्याने मांडतात. ती समताधिष्ठीत न्यायाची संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी स्त्रीच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास, सामाजिक अवकाश, राजकीय प्रतिनिधीत्व, आर्थिक समता व तिच्या प्रजनन कार्याचा सर्वच पातळीवर गौरव करतात. त्यासाठी आवश्यक असणारे समाज प्रबोधन तर करतातच, पण कायदेशीर नियमावली मध्ये स्वीच्या सर्वांगीण उन्नतीचा आलेख लिखित करतात त्या कायदेशीर प्रणालीचा प्रत्यय आधुनिक समाजातील स्त्रीच्या विकासाने आपल्याला पहावयास मिळतो.

**निष्कर्ष**

सामाजिक न्यायाचे तत्त्वामध्ये समाजातील सत्ता आणि संपत्ती यांचे योग्य असे वाटप करणे आवश्यक मानले जाते. समाजातील सर्वच लोकांना विकासाची संधी मिळाली पाहिजे आणि त्या सर्वांना समान दर्जा असला पाहिजे. जन्म, जात, वंश,लिंग,स्थान या कारणांवर त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाऊ नये. न्यायाच्या तत्त्वांमध्ये तीन प्रकारच्या न्यायांचा समावेश होतो. त्यातील पहिला प्रकार वितरणात्मक न्यायाचा आहे. यात सत्ता व संपत्ती यांचे समान वितरण अपेक्षित आहे. दुसरा प्रकार क्षतिपूरक न्यायाचा आहे. ज्यात नुकसान भरपाईचे तत्त्व अनुस्यूत असते आणि तिसरा प्रकार विनिमयाधारित न्यायचा आहे. ज्यात वस्तूच्या विनिमयात विहित असणाऱ्या न्यायाची तत्व महत्त्वाचे आहे. राखीव जागांची धोरण क्षतिपूरक किंवा नुकसान भरपाई करणाऱ्या न्यायाचे उदाहरण आहे. डॉ. आंबेडकरांच्या कार्यातून वरिल सर्व न्यायाची स्थापना करण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या पातळीवर केलेला दिसून येतो.

भारताचे कायदा मंत्री आणि मसुदा समितीचे अध्यक्ष असताना डॉ. आंबेडकर यांनी भारतासारख्या वैविध्यपूर्ण आणि विशाल देशासाठी सर्वोत्कृष्ट राज्यघटना लिहिली आणि शतकानुशतके पीडित आणि पिचलेल्या घटकांच्या मानवतेचे रक्षण करण्यासाठी सामाजिक न्याय देण्यासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न केले. हे मानवी संस्कृतीच्या इतिहासात सदैव चिंतन पटलावर राहील.

**संदर्भ ग्रंथ**

१. मून वसंत , (संपादक )'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक', शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन , १९९०.

२. कुलकर्णी प्रसाद, (संपादक) आरक्षण आणि सामाजिक न्याय , प्रबोधन प्रकाशन. इचलकरंजी, कोल्हापूर प्रथमावृत्ती –ओगस्ट २००३ .

३. डॉ. दहाट धनराज, (संपादक) 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार' खंड १ ते ५, संकेत प्रकाशन, नागपूर – २००९.

४. डॉ. गजभिये शेषराज, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय तत्त्वज्ञान', एस.के.पब्लिकेशन, नागपूर २००१.

५. जावडेकर शरद, (संपादक) , सामाजिक परिवर्तन आणि भवितव्य , सुगावा प्रकाशन, पुणे,२००९

# ६. भारतीय जातीयभेद आणि आरक्षण धोरणातील ऐतिहासिक दृष्टीकोन

**रविराज रामचंद्र साळुंखे**
संशोधक विद्यार्थी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**गोषवारा**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतातील जातीयभेद आणि आरक्षण धोरणांतील समन्वीत प्रतिक्रियांचे अन्वेषण करून त्यातील ऐतिहासिक पाळेमुळे आणि सामाजिक परिणामांचा परामर्श घेतलेला आहे. शोधनिबंधाच्या सुरुवातीला जातिव्यवस्थेचा उदय, ब्रिटिश काळात जातीय व्यवस्थेवर झालेले परिणाम आणि समाजातील विविध भूमिकांचे वर्णन केलेले आहे. त्यानंतर उपेक्षित व वंचित घटकांवर होणाऱ्या भेदभावासंबंधी इत्यंभूत चर्चा केलेली आहे. आरक्षण धोरणांचे मूल्यमापन व त्यांचे महत्त्व, शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर झालेल्या  टीकेसंबंधी मांडणी करण्यात आली आहे. शेवटी, हा शोधनिबंध समकालीन भारतीय समाजातील जातीभेद दूर करण्यासाठी आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी आवश्यक  व्यापक धोरणांवर भर देतो.

**बीज शब्द :** जात, भेदभाव, आरक्षण, अस्पृश्यता.

**प्रस्तावना**

व्यक्तीजीवनावर परिणाम करणारे जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश असे अनेक घटक आहेत. परंतु भारतीय समाजात जातीय भेद आणि अस्पृश्यता ही कल्पना काही नवी नाही. त्यामुळे अश्रूषयत म्हणजे ज्या व्यक्तीच्या व वस्तूच्या स्पर्शाने विटाळ होतो, तिच्या ठिकाणची विटाळकारक म्हणून कल्पिलेली खोटी अदृश्य शक्ती. जन्म व मृत्यु समयाचे सोयरसुतक, स्त्रीचे मासिक रजोदर्शन, निंद्य कृत्यामुळे झालेला दोष अशा गोष्टी व्यक्तीपुरत्या किंवा कुटुंबापुरत्या मर्यादित असतात. शुद्धीकरणानंतर विटाळातून व्यक्तीची व कुटुंबाची सुटका होऊन त्याचा दर्जा पूर्ववत होतो. म्हणजेच अस्पृश्यता अशा प्रसंगात नैमित्तिक असते. परंतु काही घटकांच्या बाबतीत ही अस्पृश्यता कायमची असते आणि त्यांच्या शुद्धीकरणास समाजाची मान्यता व शास्त्राचा आधार नसतो; तेव्हा त्यांच्या जातीजमाती बनतात आणि अशा लोकांना अस्पृश्यता जन्मतःच चिकटते.

भारतीय समाजात शेकडो जाती अस्पृश्य समजल्या जातात. सन २०११ च्या जनगणनेत भारतातील एकूण लोकसंख्येच्या १६·६३  टक्के लोक अस्पृश्य म्हणून नोंदविले गेले आहेत. या अस्पृश्य जातींची संख्या सबंध भारतात जवळजवळ ५०० आहे. अस्पृश्य जातीत जन्माला आलेला माणूस जन्मभर अस्पृश्यच राहतो व त्याला कोठल्याही शुद्धीकरणाने स्पृश्य होता येत नाही, अशी हिंदू रूढींची परंपरागत कल्पना आहे. अस्पृश्य जरी धर्माने हिंदू असले, तरी त्यांना हिंदूंच्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेत स्थान नाही; म्हणून त्यांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांखालचा पंचम वर्ण किंवा प्रतिलोम संकर जाती समजतात. अस्पृश्यांना अंत्यज, अतिशूद्र, दलित, हरिजन इ. नावे आहेत. वर्गीकृत किंवा अनुसूचित जाती म्हणूनही ते ओळखले जातात. काही अस्पृश्यांना विशेषतः महारांना महाराष्ट्रात ‘भूमिपुत्र’, ‘थोरल्या घरचे’ असेही संबोधले जाते. तसेच दक्षिणेकडे ‘आदिद्रविड’ आणि ‘आदिकर्नाटक’ नावाच्या अस्पृश्य जाती आहेत. ‘जाती’ हा घटक भारतीय समाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था

ही भारतीय समाजरचनेची जुनी वैशिष्टये आहेत. जाती व वर्णव्यवस्था परस्परांवर आधारित आहेत. किंबहुना जातिसंस्थेचे मूळ हे वर्णव्यवस्थेत आहे, असे मानले जाते. अशी ही तीन हजार वर्षापासून स्थिरावलेली हिंदू समाजाची रचना म्हणजेच जातीसंस्था होय. जातिसंस्था हा भारतीय समाजरचनेचा अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीचा प्रकार आहे. त्यामुळे तिचा उगम, विकास स्पष्ट करणे अतिशय अवघड आहे. जातिसंस्थेची निर्मिती वेदकाळाच्या अंतिम कालखंडात झाली असे मानले जाते. वेद, उपनिषदे, मनुस्मृति, रामायण, महाभारत यासारखी महाकाव्ये यात जातींच्या उत्पत्तीसंबंधी उल्लेख सापडतात.

**भारतीय समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्थेचा उदय व विकास**

जातींच्या उत्पत्तीसंबंधी सर्वात प्राचीन आधार ऋग्वेदातील पुरुषसूक्तात आढळतो. मनुस्मृतीमध्ये परमेश्वराच्या मुखातून ब्राह्मण, बाहूमधून क्षत्रिय, उदरातून वैश्य व पायामधून शुद्र वर्ण निर्मिती झाली आहे, असा उल्लेख आढळतो. ऋग्वेदात या चार वर्णाच्या कर्तव्यांचा उललेख केलेला आहे. ब्राह्मण वर्णाकडे वेद पठणाचे कार्य, क्षत्रियांकडे संरक्षणाचे कार्य, वैश्याकडे शेती व व्यापाराचे कार्य तर शूद्रांकडे त्रैवर्णिकांच्या सेवेचे कार्य होते. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून शेकडो जाती, उपजाती व पोटजाती निर्माण झालेल्या आहेत. मूळ चार वर्णाच्या संस्कारातून इतर जातींची निर्मिती झाली आहे. त्याकाळी समाजात प्रचलित असणा-या अनुलोम व प्रतिलोम विवाहातून म्हणजे वर्णसंकरातून अनेक जाती निर्माण झाल्या व वर्णपध्दतीनुसार त्यांच्यात श्रमविभागणी करण्यात आली. अशाप्रकारे मनुच्या काळात हिंदू समाजाची जातिसंस्थेच्या आधारावर निश्चित अशी स्तररचना निर्माण झाली. कालांतराने ती दृढ होऊन विकास पावली व ती भारतीय समाजरचनेचे वैशिष्टय बनली.

भारतीय जातीची रचना सामाजिक विषमतेच्या व शोषणाच्या पायावर उभी आहे. ब्राह्मण जातीसारख्या काही उच्च जातींना विशेष अधिकार प्राप्त झाले. याउलट अस्पृश्य जाती अगदी मूलभूत हक्कांपासून दूर राहिल्या. विद्याग्रहण व द्रव्याप्ती हे अधिकार उच्च जातींपुरते मर्यादित होते. त्याचा उपयोग त्यांनी आपले स्थान बळकट बनवण्यासाठी आणि शूद्र जातींवर वर्चस्व ठेवण्यासाठी केला. उच्च जातींनी धर्मशास्त्रांचा व वचनांचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावून शूद्र जातींचे जीवन पशुक्त बनवते. जाती-जातींमध्ये सामाजिक अभिसरणाची क्रिया अत्यंत मर्यादित असल्यामुळे त्यांच्यात भावनिक बांधिलकी निर्माण होऊ शकली नाही. परिणामी परस्पर दुराव्याची दरी सातत्याने वाढत गेली आणि जातीव्यवस्थेच्या विषमतेचे दुष्परिणाम व्यक्तीजीनावर व समाजजीवनावर होऊ लागले.

थोडक्यात, वेद व तत्सम धर्मग्रंथात चातुर्वर्ण्य व्यवस्थेची व त्यावर आधारलेली जातीव्यवस्थेची मूळे आढळतात. परंतु त्यानंतरच्या काळात जातिबंधने हळूहळू शिथिल बनत गेली. मात्र जातिभेद नष्ट झाला नाही. प्राचीन धर्मग्रंथामध्ये वर्णव्यवस्था व प्रत्येक वर्गाची वृत्ती यांचा उल्लेख असला तरी संपूर्ण सगजाचे विभाजन या चार वर्गाच्या व्यवस्थेत होउन प्रत्येक मनुष्य आपल्यावर्गाचा शास्त्रसंमत व्यवसाय करीत असे, असे आढळत नाही, परंतु, जरी या वर्णांना शास्त्राने निरनिराळी कामे लावून दिलेली होती तरी त्या त्या वर्णातील लोक केवळ शास्त्रानेच लावून दिलेली कामे करीत असत असे समजणे हा भ्रम आहे. खुद्द वेदकाळात वेदविद्येशिवाय २७ प्रकारचे धंदे ब्राह्मण लोक करीत असत. त्यानंतरच्या काळात लोकसंख्या वाढत गेली. प्राचीन वर्णव्यवस्थेतील चाकोरीबद्ध व्यवसाय वाढत्या संख्याबळासाठी अपुरे पडू लागले आणि काही जण आपल्या व्यवसायाच्या आसपासची कामे करू लागले. त्या त्या वर्णातील मोठा गट जरी लावून दिलेले व्यवसाय किंवा तत्सम धंदे करीत असला तरी त्या प्रत्येक वर्णातून धंदयासाठी

अनेक लोक बाजूला सरकत होते. बाजूला निघालेल्या लोकांनी आपल्या वर्णाच्या आसपासची कामे निवडली. उदा. ब्राह्मणांनी सरकार दरबारी हिशोब, नोंदी ठेवणे, कारकुणी करणे, कर गोल करणे अशा कामांना सुरुवात केली. क्षत्रिय व वैश्यांनी देखील जमेल तो व्यवसाय निवडून आपली सुटका करून घेतली. तरी या त्रैवर्णिकांच्या मनातून सनातन वर्णव्यवस्था हद्दपार झाली नाही. त्यामुळे शूद्र आणि अतिशूद्र यांना त्यांच्या जन्मजात व्यवसायापासून सोडवणूक मिळाली नाही. कालांतराने या वर्णव्यवस्थेतून हळूहळू पण निश्चितपणे जातीव्यवस्था निर्माण झाली आणि ती स्थिरावली.

भारतीय समाज विविध जातींमध्ये विखुरला गेल्यामुळे मध्य आशिया व अफगाणिस्थानातून आलेल्या मूठभर मुसलमान आक्रमकांनी हिंदूंचा पराभव करून सर्व भारतभर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या धार्मिक आक्रमणांच्या काळात कनिष्ठ जातींनी मोठ्या प्रमाणात मुसलमान धर्माचा स्वीकार केला. परंतु, त्यामुळे जातिबध्द हिंदू समाजात फारसा बदल झाला नाही. उलट जातिसंस्था संरक्षक व जास्त ताठर बनली, उच्च जातींचे वर्चस्व वाढले. त्यातून जातिसंस्थेच्या तत्त्वज्ञानाला विरोध करणारा भक्तीमार्ग उदयास आला. नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, बसवेश्वर, रामानुजाचार्य, गुरु गोरखानाथ, गुरुनानक, कबीर, रोहिदास आदि संतानी भक्तीमार्गाचा प्रसार केला. भारतीय समाज हा सरंजामशाहीच्या जोखडात सापडला होता. संतांचा समतावादी विचार प्रत्यक्षात येण्यासाठी भौतिक प्रगती झालेली नव्हती. नंतर हा बदल १९ व्या शतकात ब्रिटिश सत्ता स्थिरावल्यावर झाला.

**ब्रिटिश राजवटीतील जातीव्यवस्थेवरील परिणाम**

ब्रिटीश राजवट भारतात स्थिर झाली त्यावेळी भारतातीत जातीय व्यवस्थेची स्थिती अत्यंत दयनीय होती. पराकोटीचे अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, प्रयत्नवादापेक्षा दैववादाला शरण जाण्याची प्रवृत्ती, धार्मिक रुढींचा पगडा यामुळे समाज गतीहीन बनला होता. जूनी सरंजामशाही समाजरचना पूर्णतः नासलेली होती आणि त्यातून बाहेर कसे पडायचे याचा मार्ग लोकांना सापडत नव्हता. ब्रिटीशांनी भारतात राज्य स्थापन करून नव्या विचारांना, परिवर्तनाला सुरुवात केली. इंग्रज हे राज्यकर्ते असल्यामुळे साहजिकच समाजावर पाश्चात्य संस्कृती व शिक्षण यांचे दूरगामी परिणाम झाले. प्रामुख्याने ब्रिटीशांच्या काळात जातिव्यवस्थेवा पुनर्विचार करण्याच्या प्रयत्नांना विशेष चालना मिळाली. ब्रिटीशाबरोबर भारतात आलेल्या नव शिक्षण पध्दती व नवविचारामुळे भारतीय समाज जागृत होऊ लागला. शिक्षण पध्दतीमुळे परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी नवी सुशिक्षितांची पिढी समाजात निर्माण झाली. नव्या ज्ञानामुळे भारतीयांना आपल्यातील दोषांची व उणीवांची जाणीव झाली. आत्मपरिक्षणातून पारंपारिक भारतीय जीवनाला विकृती प्राप्त करून देणाऱ्या प्रथांचा व रुढींचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांमधून काही समाज सुधारकांनी जातिसंस्थेचे शोषित व अन्यायकारक स्वरुप लोकांसमोर आणले. अर्थात, सर्व दु:खाचे मूल जातिसंस्थेत आहे याची जाणीव झाली. जातीसंस्था समाजाच्या नैतिक व आर्थिक अध:पतनास जबाबदार आहे. त्यामुळे तिचा पुनर्विचार करण्याची व शक्य ते सर्व बदल घडवून आणण्याची आवश्यकता निर्माण झाली.

ब्रिटीश राजवट भारतात स्थिर झाल्यानंतर ख्रिश्चन धर्मप्रचारक धर्मप्रसाराच्या हेतूने भारतात येऊ लागले. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी आपल्या कार्याला अत्यंत योजनाबध्द रितीने सुरुवात केली. ख्रिश्चन धर्माची महती व श्रेष्तत्व पटवून देण्याबरोबरच हिंदू धर्मातील विकृती व दोष दाखवून देण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला. या प्रयत्नामागे भारतात धार्मिक व सामाजिक सुधारणा व्हाव्यात अशी सदिच्छा नव्हती. तर प्रचलित विकृत हिंदू धर्माच्या तुलनेने ख्रिश्चन धर्म कसा श्रेष्ठ व समताधिष्ठित आहे हे दाखवण्याचा त्यांचा

हेतू होता. याच हेतूने त्यांनी हिंदू धर्माचे वैशिष्ट्य असलेल्या जातिसंस्थेवर कठोर असे वैचारिक हल्ले केले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी एकीकडे जातिव्यवस्थेचे शोषणप्रधान स्वरुप स्पष्ट केले, तर दुसरीकडे जातिव्यवस्थेमुळे उपेक्षा व दारिद्र्य वाटयास आलेल्या लोकांची सेवा करून त्यांची सहानुभूती मिळविली. परिणामी अस्पृश्य वर्ग ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित झाला. या आकर्षणातून अनेक लोकांनी हिंदू धर्माचा त्याग केला व ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे हिंदू धर्मला गळती लागली. या संकटामुळे महाराष्ट्रतीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील विचारवंत, समाजसुधारक अंतर्मुख झाले. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी जातिसंस्थेची टीकात्मक चिकित्सा केल्यामुळे तिच्या पारंपारिक स्वरुपाविषयी वैचारिक संघर्ष निर्माण झाला. त्यातून समाजसुधारकांना व तत्त्वचिंतकांना जातिव्यवस्थेचे दोष जाणवू लागले. तिच्या दुष्परिणामांचे स्वरुप गंभीर व सर्वव्यापी असून व्यक्तीजीवन, समाजजीवन व राष्ट्रजीवन अडचणीत असल्याचे जाणीव अनेकांना झाली.

**आरक्षणाचा विकास आणि महत्त्व**

भारतात आरक्षणाचा उदय १९ व्या शतकाच्या मध्यात ब्रिटिश वसाहत काळापासून सुरू आहे. सन १८५० मध्ये ब्रिटिशांनी अस्पृश्यांना होणाऱ्या अन्याय वागणुकीची जाणीव करून दिली आणि त्यांना मदत करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली. सन १८७१ मध्ये ब्रिटिश सरकारने पहिली जनगणना केली की, ज्यामध्ये जातीनुसार लोकांचे वर्गीकरण करण्यात आले. ज्यामुळे सामाजिक रचना अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत झाली. २० व्या शतकाच्या सुरुवातीला, ब्रिटिशांनी १९१९ च्या भारत सरकार कायद्याद्वारे अस्पृश्यांसह काही जातींसाठी स्वतंत्र मतदारसंघ सुरू केले. यामुळे उपेक्षित समुदायांना प्रशासनात आवाज उठवता आला. परंतु समाजात अधिक विभाजन निर्माण झाले. ज्योतिबा फुले हे एक महत्त्वाचे समाजसुधारक होते. त्यांनी उपेक्षित जातींच्या हक्कांसाठी कठोर परिश्रम करून जातिव्यवस्थेला विरोध केला. त्यांचा असा विश्वास होता की शिक्षण आणि सामाजिक समानता समाज सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या तत्कालीन प्रयत्नांनी भविष्यातील चळवळींचा पाया घातला. त्यामध्ये त्यांचा उद्देश शोषितांसाठी हक्क आणि प्रतिनिधित्व मिळवणे होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीभेदाविरुद्ध एक प्रमुख नेते म्हणून हा लढा सुरू ठेवला. भारतीय संविधानातील आरक्षण तरतूद व डॉ आंबेडकर याचे योगदान कसे होते हे पाहणे महत्वाचे आहे. आंबेडकर पूर्व फुले आणि शाहू महाराजांनी आरक्षणाचा पाया घातला. तसेच १५ मार्च १९४७ रोजी शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनच्या वतीने काही महत्वाच्या तरतूदी असाव्यात असे सुचविले. अनुसूचित जातीचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण लक्षात घेता त्यांना किमान प्रतिनिधित्व द्यावे. सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. नंतर सन १९५० मध्ये संविधान स्वीकारण्यात आले. त्यामध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचा विकास व्हावा, यासाठी आरक्षणाचा समावेश केला. राज्यघटनेचे कलम १७ नुसार अस्पृश्यता रद्द तर झालीच, तसेच कलम ३३० आणि ३३१ नुसार अनुसूचित जाती आणि जमातींसाठी संसद आणि राज्य विधानसभांमध्ये जागा राखीव ठेवल्यामुळे त्यांना प्रतिनिधितवाची खात्री झाली. कालांतराने, भारतीय सरकारने विविध जाती आणि जमातींचा ओळखी लक्षात घेऊन याद्या अद्ययावत केल्या. एकंदरीत, दुर्लक्षित जातींना शिक्षण, नोकऱ्या आणि राजकारणात संधी उपलब्ध करून देण्यासाठी, समानता आणि सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि भारतात एक न्याय समाज निर्माण करण्यासाठी आरक्षण महत्त्वाचे आहे. आंबेडकर

पूर्व दलित चळवळ जाती पुरत्या मर्यादित होत्या आणि या चळवळीला राजकीय स्वरूप प्राप्त झाले नव्हते. अस्पृश्य जातीच्या चळवळीला एकसंघ स्वरूप देवून त्यांना राजकीय अस्तित्व मिळवून देण्योच काम डॉ. आंबेडकरांनी केले.

ऐतिहासिकदृष्ट्या भारतातील आरक्षणाचा उद्देश कोणत्याही समुदाय किंवा धर्मातील उपेक्षित घटकाचा विकास करणे. उदा. महाराष्ट्रातील महार जातीला त्यांच्या भेदभावाच्या दीर्घ इतिहासामुळे अनुसूचित जातीचा दर्जा देण्यात आला आहे. तर आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातील अनुक्रमे माला आणि कपू जातीला सामाजिक-आर्थिक संघर्षांना तोंड देण्यासाठी इतर मागासवर्गीय वर्गात समावेश करण्याची मागणी केली. आरक्षण धोरण हे वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये लक्षणीयरीत्या बदल करू शकतात, हे दाखवून दिले. शिवाय, सन २०१६ मध्ये आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या हरियाणातील जाटांना व्यापक निषेधांनंतर इतर मागासवर्गीय वर्गाचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे जाती आधारित आरक्षण हे स्थानिक गतिशीलता आणि मागण्यांशी कसे जुळवून घेताहेत, हे दिसून येते. विशेषतः आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये आरक्षणाची परिस्थिती गुंतागुंतीची आहे. माला आणि मडिगा या जाती अनुसूचित जाती म्हणून मान्यताप्राप्त दर्जा असूनही त्यांना संसाधनांच्या उपलब्धतेत असमानतेचा सामना करावा लागत आहे. उलटपक्षी, पल्ली आणि गोल्ला या जातींना ओबीसीचे आरक्षण मिळाले आहे. परंतु अधिक मान्यता मिळावी म्हणून परिस्थिती आणखी गुंतागुंतीची केली जात आहे. दुसरे उदाहरण म्हणजे रेड्डी आणि कम्मा जातींना महत्त्वपूर्ण सामाजिक आणि आर्थिक फायदे मिळत असले तरी, त्यांच्यामध्ये आरक्षणाची मागणी वाढतच आहे. जात किंवा धर्म कोणताही असो ज्यांनी अत्याचार सहन केला आहे, त्या सर्वांसाठी आरक्षण असायला हवे. समाजात समानता चालना देण्यासाठी, सामाजिक असलेले वादविवाद मिटवून विविध जातीय गटांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनुकूल आरक्षण धोरण राबविणे आवश्यकता आहे, जेणेकरून कोणताही सामाजिक घटक मागे राहणार नाही व सामाजिक समानता निर्माण होईल, याची खात्री होईल.

**आरक्षणाला दोष देणे योग्य आहे का**?

भारतातील व्यवस्थेत आरक्षणाला दोष देणे पूर्णपणे न्याय्य नाही, कारण हे आरक्षण ऐतिहासिक भेदभावाचा सामना करणाऱ्या उपेक्षित समुदायांना सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक न्याय देण्यासाठी स्थापित दिले होते. जरी ऐतिहासिकदृष्ट्या त्यांचा उद्देश उपेक्षितांना समान संधी प्रदान करणे हा असला तरी, अनेकदा या धोरणांची अंमलबजावणी विविध कारणांमुळे होऊ शकत नाही. मर्यादित प्रभावामुळे अनेक व्यक्ती आरक्षण व्यवस्थेबद्दल अनभिज्ञ आहेत. अलीकडील बनावट जात प्रमाणपत्रांचा गैरवापर यासारख्या समस्यांमुळे अपेक्षित घटकांना योग्य लाभ मिळत नाही. यामुळे काहींना अन्यायी लाभ मिळतो तर पात्र उमेदवारांकडे दुर्लक्ष केले जाते. आरक्षणाला दोष देण्याऐवजी, अंमलबजावणी सुधारण्यावर, पारदर्शकता सुनिश्चित करण्यावर आणि अधिक समतापूर्ण समाज निर्माण करण्यासाठी लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल सजग करणे अत्यंत महत्वाचे आहे. भारतातील सामाजिक समानता आणि उपेक्षित जातीच्या उन्नतीसाठी शिक्षण क्षेत्रात आरक्षण दिले जाते. सध्या अनुसूचित जातीसाठी १५ टक्के, अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के, इतर मागासवर्गासाठी २९ टक्के आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के असा विशिष्ट कोटा आहेत. मात्र आज आरक्षण असलेला विद्यार्थी कमी गुण असतानाही प्रवेश मिळवतो, तेव्हा इतर समुदायांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक पायाभूत सुविधांबद्दल चिंतेची बाब निर्माण होते.

आरक्षणे ही वर्षानुवर्षे भेदभाव आणि दुर्लक्ष केलेल्या समाज घटकांना समान सामाजिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी केलेली तात्पुरती उपाययोजना आहेत. समाज खऱ्या समानतेकडे वाटचाल करत असताना अशा आरक्षणांची गरज कमी झाली पाहिजे. तथापि, राखीव श्रेणीतील अनेक विद्यार्थ्यांना अपुरे शालेय शिक्षण, संसाधनांचा अभाव आणि सामाजिक दबाव यासह अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते, अशी वास्तविकता आहे. शिवाय, अनेकदा "व्यवस्थापन कोटा" किंवा खाजगी संस्थांमध्ये पेमेंट सीट्स म्हणून संबोधले जाणाऱ्या उच्चभ्रू विद्यार्थ्यांसाठी आरक्षणाचा विचार करणे आवश्यक आहे. या जागा सामान्यतः उच्चभ्रू विद्यार्थ्यांसाठी राखीव असतात जे जास्त शुल्क भरू शकतात. त्यामुळे उच्चभ्रू कुटुंबांनी स्पर्धात्मक दृष्टिकोण पूर्णपणे टाळला असून समाजात असमानता कायम ठेवली गेली आहे. केवळ अनुसूचित जाती आणि जमाती, इतर मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गांच्या आरक्षणावर लक्ष केंद्रित करून, समाज शिक्षण व्यवस्थेत असलेल्या विशेषाधिकार आणि प्रवेशाच्या गुंतागुंतीकडे दुर्लक्ष करण्याचा धोका पत्करत आहेत. अशाप्रकारे आरक्षण हे उपेक्षित गटांना संधी प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असून समाजातील विविध असमान समस्यांना तोंड देण्याची आवश्यकता आहे. अंतिम ध्येय म्हणजे खरोखरच समतापूर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण करणे, जिथे सर्व विद्यार्थ्यांना त्यांची पार्श्वभूमी काहीही असो, दर्जेदार शिक्षण आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध असतील तरच आरक्षणाच्या गरजेचा पुनर्विचार करता येईल. कारण समाज समानतेचा एक स्तर गाठू शकेल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आरक्षण धोरणावर टीका**

भारतातील आरक्षण धोरणांसाठी डॉ. बी.आर. आंबेडकरांना दोष देणे म्हणजे उपेक्षित समुदायांसाठी सामाजिक न्याय आणि समानता वाढवण्यासाठी त्यांनी केलेल्या व्यापक कार्याकडे दुर्लक्ष करणे होय. भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार डॉ. आंबेडकर हे जाणून होते, की अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यावर शतकानुशतके होणाऱ्या अत्याचारांवर उपाय म्हणून सकारात्मक कृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समानतेचे संविधानिक वचन पूर्ण करण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. सन १९३२ च्या पुणे करारात आंबेडकरांची जी भूमिका होती ती दलित हक्कांच्या संघर्षाला एक महत्त्वपूर्ण वळण देणारी ठरली. आंबेडकर आणि गांधी यांच्यातील या कराराने अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघांच्या मुद्द्याला संबोधित केले, ज्याला आंबेडकरांनी सुरुवातीला राजकीय प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी पाठिंबा दिला. तथापि, त्यांनी दबावाखाली येऊन सामान्य मतदार संघात राखीव जागांसाठी परवानगी देणाऱ्या तडजोडीला मान्यता दिली. हा एक महत्त्वाचा निर्णय होता की, जो शोषित समुदायांमध्ये एकतेची गरज ओळखून सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी त्यांच्या व्यावहारिक दृष्टिकोन प्रतिबिंबित करतो.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्याय आणि आर्थिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट तयार केली. कामगार मंत्री म्हणून त्यांची वचनबद्धता तितकीच उल्लेखनीय होती; त्यांनी कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले, योग्य वेतन आणि सुधारित कामाच्या परिस्थितीसाठी वकिली केली. त्यांनी जातीची पर्वा न करता कामगारांना सक्षम करण्यासाठी कामगार संघटनांच्या स्थापनेवर भर दिला. आंबेडकरांचे कार्य धोरण ठरवण्याच्या पलीकडे गेले; त्यांनी जनतेला त्यांच्या हक्कांबद्दल आणि सामाजिक सुधारणांचे महत्त्व याबद्दल सजग केले. "जातीचे उच्चाटन" या त्यांच्या प्रभावशाली ग्रंथात जातीभेदावर टीका केली आणि समाजाची आमूलाग्र पुनर्रचना करण्याचे आवाहन केले. आंबेडकरांनी अशा भविष्याची कल्पना केली की, जिथे उपेक्षित समुदाय राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनात पूर्णपणे सहभागी होऊ शकतील. आरक्षणाबाबत टीका

करण्याऐवजी समाजाने अधिक समतापूर्ण भारत घडवण्यासाठी त्यांच्या अथक प्रयत्नांना ओळखले पाहिजे आणि त्यांचा सन्मान केला पाहिजे. जात किंवा लिंग विचारात न घेता सर्वांना न्याय आणि संधी उपलब्ध केल्या पाहिजेत. तसेच हक्क आणि समानता वाढू शकेल अशा त्यांच्या योगदानाने समाजाची पायाभरणी करून न्याय्य आणि समावेशक भारताचे त्यांनी स्वप्न पाहिले होते.

**निष्कर्ष**

कायदेशीर संरक्षण आणि आरक्षण धोरणे असूनही अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव हे भारतीय समाजात महत्त्वाचे आव्हान आहे. हा ऐतिहासिक दृष्टिकोन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी कसे जोडलेले आहे, हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आरक्षणाने उपेक्षित जातींना सामाजिक विकासाच्या संधी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सामाजिक समाता आणि न्यायाला चालना देण्यासाठी सक्रिय प्रयत्नांबरोबरच जाती आणि तिच्या ऐतिहासिक संदर्भाची सखोल जाणीव आवश्यक आहे. आजही भारत हा जातीय बंधनांपासून मुक्त करणे, सामाजिक संवादाला चालना देणे, जन कल्याणाची प्रभावी धोरणे राबविणे आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची**

१. करडे जगन्नाथ, (२००५), 'आरक्षण: धोरण आणि वास्तव'', सुगावा प्रकाशन, पुणे

२. हाटोळे विनय (संपा.)/ शेळके अरुण, (मार्च-ऑगस्ट-२०२१), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्यता निवारणासंबंधी कार्य', आयडियल- अजंठा प्रकाशन, औरंगाबाद, खंड-११, अंक- २,

३. हाटोळे विनय (संपा.)/ निकम रमेश, (ऑक्टो-नोंव्हे-डिसें-२०२१), 'भारतातील आरक्षण धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी', आयडियल- अजंठा प्रकाशन, औरंगाबाद, खंड-१०, अंक- ४,

४. धनगर धनराज (संपा.)/ जगताप प्रदीप, (ऑक्टो-नोंव्हे-डिसें-२०१८), 'आरक्षण: दशा आणि दिशा', रिसर्च जरनी- स्वातीधन इंटरनॅशनल प्रकाशन, खंड – ५, अंक- ४

५. गायकवाड जयदेव, (२००७), 'जातिभेदाचे अंत:प्रवाह', पद्मगंधा प्रकाशन, पुणे

६. http://ijehss.com

७. https://www.prajasattakjanata.page/**2023/12**/blog-post_**55.**html

# ७. कोल्हापूर जिल्ह्यातील दुग्धजन्य उत्पादनांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक ठसा

**डॉ. डी. आर. पाटील**
इतिहास विभाग, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली.

**प्रस्तावना**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या दुग्धजन्य उत्पादनाने देशाबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा आपली गुणवत्तेद्वारे छाप निर्माण केली आहे. गोकुळ दूध संघाने श्रीलंके सारख्या देशाला मोठ्या प्रमाणात दूध भुकटी पाठवून पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्तरावर पाऊल टाकले होते. तर वारणा दूध संघाने सुद्धा आपले सुगंधी दूध ट्रेट्रापॅक मधून आखाती राष्ट्रांमध्ये पाठवून लौकिक प्राप्त केला आहे. कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादनात अग्रेसर आहे. कोल्हापूर जिल्हा दूध संघ (गोकुळ), वारणा दूध संघ, यळगुड दूध संघ, स्वाभीमानी दूध संघ, शाहू दूध संघ असे अनेक सहकारी व खाजगी दूध संघ संकलन करतात.अमुल हा ब्रँन्ड देशात अग्रेसर मानला जातो. परंतु जिल्ह्यातील दूध संघांची सहाय्यकारी दुग्ध उत्पादने राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात विकली जातात. गोकुळ, वारणा व यळगुड यांच्या सहाय्यकारी दुग्ध उत्पादनांचा या संशोधन पेपरमध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

**राज्यातील दूध संकलनाची स्थिती काय** ?

आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये सरासरी मध्ये प्रतिदिन दूध संकलन १ कोटी ७१ लाख १८ हजार लिटरवर गेले आहे. हे आजवरचे प्रतिदिन उच्चांकी दूध संकलन आहे. यापूर्वीची आकडेवारी पाहता २०१६-१७ मध्ये १०७.९१ लाख लिटर, २०१७ - १८ मध्ये १२४.३९ लाख लिटर, २०१८ -१९ मध्ये १३१.२८ लाख लिटर, २०१९-२० मध्ये - ११६.४१ लाख लिटर, २०२० - २१ मध्ये ११६.९९ लाख लिटर, २०२१ - २२ मध्ये १२१.५१ लाख लिटर, २०२२ - २३ मध्ये१२४.९५ लाख लिटर, २०२३ - २४ मध्ये १७१.१८ लाख लिटर दूध संकलन झाले आहे.

**दूध उत्पादन, संकलनात वाढीची कारणे** ?

सलग दोन वर्षे राज्याच्या बहुतेक भागांत दमदार पर्जन्यवृष्टीमुळे चारा आणि पाण्याची चांगली उपलब्धता झाली असल्यामुळे शेतकऱ्यांनी पशुपालनाला प्राधान्य दिले आहे. पश्चिम महाराष्ट्र प्रमुख दूध उत्पादक पट्टा आहे. पश्चिम महाराष्ट्रात खासगी आणि सहकारीदूधसंघांकडून स्पर्धात्मक दराने दूध खरेदी होते. नैसर्गिक आपत्तींमुळे फळबागा अडचणीत आल्यामुळे अनेक फळबागायतदारांनी फळबागा तोडून ऊस, मक्यासह चारा पिके घेऊन दुग्ध उत्पादनाला सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्राने दूध उत्पादनात मोठी आघाडी घेतली आहे.

**दूध उत्पादनाचा दूध दराशी संबंध किती** ?

दूध उत्पादनात दर चार वर्षांनी वाढीचा काळ असतो. या काळात जागतिक बाजारात बटर, पावडरचे दर कमी झाल्यास दूध दरात मोठी पडझड होते. २०१६ १७ मध्ये जागतिक दुधाचे दर १७ रुपये प्रति लिटरवर आले होते. यंदा दूध संकलन आजवरच्या उच्चांकी पातळीवर गेले आहेत. राज्यात सरासरी १ कोटी ७१ लाख १८ हजार लिटर दुधाचे संकलन होते.जागतिक पातळीवरही दूध उत्पादनात वाढझाली आहे. बटर आणि दूध भुकटीच्या दरातघसरण झाल्यामुळे राज्यात दूध खरेदी दर २५ रुपयांवर आले होते. राज्यातील दुधाचे दर दूधउत्पादनाशी संबंधित आहेत. पण, दूध दरावर जागतिक बाजारातील बटर आणि दूध पावडरच्या दराचा मोठा परिणाम दिसून येतो. यंदा जागतिक बाजारात बटरचे दर सरासरी ३४० ते ३५० रुपये किलो आणि दूध भुकटीचे दर सरासरी २२६ ते २३० रुपये किलो राहिले. त्यामुळे दुधाच्या दरात घसरण झाली. बटरचे दर ४०० रुपये किलो आणि दूध भुकटीचे दर २६० ते २७० रुपयांवर राहिल्यास सरकारी अनुदानाची गरज भासत नाही. दूधसंघ स्पर्धात्मक दर देऊन दूध खरेदी करतात.

**देश आणि राज्यातील दुग्ध उत्पादन**

महाराष्ट्रा बरोबरच राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तरप्रदेश या राज्यांना खास करून अतिरीक्त दूध आणि दूध दर या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. १९१९ मध्ये देशात पशुगणना सुरू झाली. तेव्हा पासून दर पाच वर्षानी सदरची पशुगणना केली जाते. २०१२ मध्ये १९ वी गणना झाली. त्यानुसार देशात दूध देणाऱ्या एकुण गाय व म्हैशी ११.८५ कोटी आहेत. २००७ च्या पशुगणनेच्या तुलनेत ६.७५ टक्के जादा वाढल्या आहेत. कधी काळी भारत दूध उत्पादनात खुप मागे होता. परंतु सध्या भारताचा दूध उत्पादनात जगात प्रथम क्रमांक लागतो. यानंतर अनुक्रमे ब्राझील, चीन, फ्रान्स, जर्मनी, न्यूझीलंड या देशांचा क्रमांक लागतो. पूर्वी म्हैशीचे व देशी गायीचे दूध उत्पादक उत्पादीत करायचा. परंतु या दूध व्यवसायाचे गणित जसे बदलत गेले तसे यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्याही वाढली. अनेक कुटुंबाचा दूध व्यवसाय हाच प्रमुख आधार बनला. पुर्वीचे जोडधंदयाचे स्वरूप बदलले. १९६६-६७ मध्ये विदेशी जनावरांच्या जाती पासून संकरीत करणाचा महत्वाकांक्षी प्रकल्प कार्यक्रम केंद्र शासनाने हाती घेतला. यातून विदेशी गायींच्या दूधा पासून दूध भुकटी तयार करण्यात आली. दूध भुकटी बनवण्यासाठी साधारण प्रतिकिलो १९० ते २३० रूपयांच्या आसपास खर्च आला. परंतु गेल्या काही महीन्यांपूर्वी अंतरराष्ट्रीय बाजार पेठेत दूध भुकटीचे दर कोसळले व ते १३० ते १४० रूपयांवर येऊन ठेपल्याने देशात दूध व्यवसायास मोठया संक्रमण अवस्थेतून जावे लागले.

महाराष्ट्रात शासनाचा १९५८ मध्ये स्वतंत्र दुग्ध व्यवसाय विभाग सुरू झाला. १९६० मध्ये प्रतिदिनी सरासरी एक लाख लिटर असणारे दूध संकलन २०१६-१७ मध्ये सरासरी १९१५ लाख लिटर्स दूध संकलनझाले आहे. यातूनच या व्यवसायाची वाढ आणि यावर असणारे अवलंबीत्व लक्षात येते. सध्या राज्यात ३०७१४ सहकारी दूध संस्था, ७७ तालुका सहकारी दूध संघ तर २९ जिल्हा दूध सहकारी संघ नोंदणीकृत आहेत. यामध्ये सर्वात जास्त खाजगी दूध संघ ही मोठया प्रमाणत उभे राहीले आहेत. महाराष्ट्रात ४० टक्के सहकारी तर ६० टक्के दूध खाजगी दूध संघ संकलीत करतात. राज्यात २७६ दूध प्रकल्प आहेत.महाराष्ट्राचे दूध उत्पादन

सरासरी २ कोटी ८० लाख लिटर प्रतिदिनी आहे. तर जगात सुमारे ९९८ मिलीयन टन दूध उत्पादीत होते. पैकी १९ टक्के दूध भारतात उत्पादीत होते.

**कोल्हापूर जिल्हयातील दूध उत्पादन**

कोल्हापूर जिल्हयात कोल्हापूर जिल्हा दूध संघ (गोकुळ), वारणा दूध संघ, यळगुड दूध संघ स्वाभीमानी दूध संघ, शाहू दूध संघ, त्याच बरोबर खाजगी दूध संघ मोठया प्रमाणात दूध संकलन करतात.एकटया गोकुळचेच प्रतिदिनी सुमारे १२ ते १३ लाख लिटर, वारणाचे सुमारे ४ लाख लिटर संकलन होते. गोकुळ दूध संघ देशातील सर्वात मोठा सहकारी दूध संघ आहे. नुकताच ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संघास मल्टिस्टेट करण्याचा ठराव झाला आहे. जिल्हयात सुमारे २० ते २५ लाख लिटर दूध उत्पादित होते.कोल्हापूर जिल्हयाचे दूध इतर राज्यातील दुधाच्या तुलनेत सकस असल्याने एकटया गोकुळचेच सुमारे सात लाख लिटर दूध मुंबईत विक्री होते. कोल्हापूर जिल्हयात असणारा मुबलक ओला चारा, बारमाही पाणी यामुळेच जिल्हयातील सुमारे ९० ते ९५ टक्के कुटुंबे या व्यवसायाशी जोडली गेली आहेत.

**दुग्ध उत्पादने**

जिल्ह्यातील दूध संघ दूध भुकटी, देशी लोणी, कुकींग बटर, टेबल बटर, तूप, श्रीखंड, पनीर, दही,लस्सी, ताक, आम्रखंड, आईस्क्रिम, बासुंदी इत्यादी उत्पादने तयार केली जातात. जेवढे आवश्यक तेवढेच दूध विक्रीसाठी पाठवून अतिरिक्त दुधाचे हे पदार्थ बनवले जातात. खरे तर काही-काही दूध संघ या सहाय्यकारी दुग्ध उत्पादनांच्या उत्पादनासाठीच दूध खरेदी करत असतात. कोल्हापूर जिल्ह्यातील दूध संघांची सहाय्यकारी उत्पादने बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात चालतात. किंबहुना तेवढी त्यांनी गुणवत्ता संपादन केली असल्याने बाजारपेठेत या उत्पादनांना मोठी मागणी आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील दूध व्यवसाय**

कोल्हापूर जिल्ह्यात दूध व्यवसाय शेतीला पुरक व जोडधंदा म्हणून राहिला नसून तो आता मुख्य व्यवसाय बनला आहे. शेती एवढेच महत्व या व्यवसायाला प्राप्त झाले आहे. गोकुळ, वारणा, यळगुड,स्वाभीमानी, शाहू, समाधान असे सहकारी व खाजगी दूध संघांचे सुमारे ३० ते २५ लाख लिटर दूध संकलन होते. याशिवाय गवळी पध्दतीने संकलन होणारे दूध, घरगुती विक्री होणारे दूध असे मिळून दूध साधारण ३० लाख लिटर्सच्या घरात दूध उत्पादीत होत असते.कोल्हापूर जिल्ह्यातील वातावरण दूध उत्पादनास अत्यंत पोषक असे आहे. मोठ्या प्रमाणात कोल्हापूर जिल्ह्यात दूध उत्पादन होत असल्याने सहाजिकच जिल्हा दुग्ध संपन्न असाच आहे.

**दुग्ध उत्पादनांची गुणवत्ता**

कोल्हापूर जिल्हा दूध संघाने (गोकुळ) सर्वच पदार्थात आपली गुणवत्ता जोपासली आहे. संघाचे 'लोणी' सर्वांच्या पसंतीस उतरले असून संरक्षण दलाच्या गोवा येथील विभागास लोण्याचा पुरवठा केला जातो. शिवाय कोल्हापूर येथील मिलिटरी बेसलाही लोणी पुरविले जाते. एवढेच नव्हे तर कोल्हापूर पोलीस दलातील कर्मचाऱ्यांसाठी पोलीस सबसिडीअरी कॅन्टीनमधून तर डी मार्ट,

रिलायन्स बझार चेनद्वारे आणि विविध दुग्धजन्य शॉपीमधून लोण्याबरोबरच इतरही दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करून देण्यात येतात. देशात सहकारी तत्वावरचा गोकुळ सर्वात मोठा दूध संघ आहे. राज्यात सर्वाधिक संकलन याच संघांचे होते. अर्थात गोकुळने या जोडीला गुणवत्ताही जोपासली आहे. त्याच बरोबर वारणा आणि यळगूड दूध संघांतून उत्पादित दुग्धजन्य उत्पादनांनीही गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केलेली दिसून येत नाही. राज्य आणि देशभरात एवढी जीवघेणी व्यावसायिक स्पर्धा असतानाही कोल्हापूर जिल्ह्यातील दूध संघ केवळ गुणवत्तेच्या जोरावर देश-विदेश पातळीवरील बाजारपेठेत टिकून आहेत.

**गोकुळची २०१६-१७ मधील दुग्धजन्य पदार्थांची विक्री (मे.टन)**

| **अ.नं.** | **दुग्धजन्य पदार्थ** | **मुख्यालय** | पुणे शाखा | **मुंबई वाशी शाखा** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १ | दूध भुकटी | २१६६ | २ | ९९ | २२६७ |
| २ | बासुंदी | ७१ | १ | ५ | ७७ |
| ३ | कुकिंग बटर | ६ | ४ | ६ | १६ |
| ४ | तूप (ग्राहक प्याकिंग) | ९२ | १६४ | ७८ | ३३४ |
| ५ | श्रीखंड | १८४ | २४ | ९ | २१७ |
| ६ | पनीर | १०२ | ४ | २ | १०८ |
| ७ | दही | १२१२ | ११५४ | ४२४० | ६६०६ |
| ८ | लस्सी | १९२ | ५ | ६ | २०३ |
| ९ | टेबल बटर | ४३ | १६ | १ | ६० |
| १० | ताक | १४६० | ७२ | १८२ | १७१४ |

* (लस्सी, तूप, ताक यांची आकडेवारी हजार लिटर्स मध्ये)

वारणा दूध संघानेही आपला दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीमधील त्याचबरोबर गुणवत्तेमधील दबदबा कायम राखताना आपल्या 'वारणा' ब्रँडची मोहिनी सर्वांनाच घातली आहे. गोकुळप्रमाणेच यांचेही सर्वच उपपदार्थ गुणवत्तेत कमी नाहीत. परंतु या सर्वात 'वारणा लस्सी' सर्वाधिक पसंतीस उतरली आहे. वारणा दूध संघ संरक्षण दलास मोठ्या प्रमाणात दूध विक्री करतो. वारणा लस्सी प्रमाणेच अन्य दुग्धजन्य पदार्थग्राहकांच्या पसंतीस उतरले आहेत.

वारणा दूध संघ तयार करत असलेली दुग्धजन्य उत्पादने पुढीलप्रमाणे-

१) म्हैस दूध २) गाय दूध ३) तूप ४) श्रीखंड ५) दूध पावडर ६) लोणी ७) ड्रिलींग चॉकलेट

८) लस्सी ९) टेबल बटर १०) चीज ११) दही १२) ताक १३) पनीर १४) मसाला ताक १५) क्रिम स्थिक क्रिम १६) आईस्क्रिम १७) पॅकिंग टेडा १८) वारणा ज्यूस १९) बोर्नव्हिटा २०) कोला पावडर पॅकिंग गोकुळ, वारणा प्रमाणेच यळगूड दूध संघाची सर्व दुग्धजन्य उत्पादने गुणवत्तेत सरस आहेत. खरेतर यळगुडपेक्षा जिल्ह्यात अनेक दूध संघ जास्त दूध संकलन करतात. परंतु गुणवत्तेमुळे यळगूड आघाडीवर राहीला आहे. विशेषतः यळगुडची बेकरीची उत्पादने, स्वीट ग्राहकांच्या अधिक पसंतीस उतरली आहेत.पानपट्टीपासून मोठमोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सहकारच्या (यळगुड) उत्पादनांना मोठी मागणी आहे.सन २०१६-१७ मध्ये श्री हनुमान सहकारी दूध

व्यावसायिक व कृषिपूरक सेवा संस्थेने एकूण मालाची विक्री रूपये ३२,२९,३१,४६४.१६ एवढी झाली आहे. त्यामध्ये बेकरी पदार्थांची विक्री रूपये ११,९६,०६,०१५, दूध व दुग्धपदार्थांची विक्री रूपये १२, १८, २८, ४५०, प्रपंच वस्तू भांडार वस्तूंची विक्री ५४,६०,११५, विभागीय कार्यालयातून वस्तूची विक्री रूपये ३,२०,१३,२९९ आणि निपाणी शाखेतून वस्तूची विक्री रूपये ४,४०,२३,५९० एवढी झालेली आहे.

वरील तिन्ही दूध संघांची दुग्धजन्य उत्पादने केवळ जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात आणि राज्याबाहेर प्रसिध्द आहेत. यळगुड दूध संघ महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांच्या सिमेवरच उभा असल्याने या संघाची उत्पादने महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यात अधिक खपतात. एकमात्र निश्चित, या संघांनी केवळ विक्री आणि नफा एवढेच व्यावसायिक गणीत लक्षात ठेवून कारभार वाढवला नसून सर्वात महत्वाचे म्हणजे गुणवत्ता या संघांनी प्रथमस्थानी ठेवल्यानेच या संघांचा लौकीक झाला आहे. म्हणूनच राज्याबरोबरच इतर राज्यातही या संघांची दुग्धजन्य उत्पादने ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहेत.

**निष्कर्ष**

कोल्हापू जिल्ह्यातील दूध संघांच्या माध्यमातून हजारो कुटूंबे या दूध व्यवसायाशी जोडली गेली आहेत. दुग्ध व्यवसाय कोल्हापूर जिल्ह्याचा एका अर्थाने कणा समजला जातो. दुग्धजन्य पदार्थ निर्मिती मधून हजारोंना कोल्हापूर जिल्ह्यातील दूध संघांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. दूध संघांना दूध उत्पादकास दराच्या माध्यमातून अधिकचे चार पैसे जादा देणे या सहाय्यकारी दुग्धजन्य पदार्थामुळे शक्य झाले आहे. सामाजिक परिवर्तन हा जिल्ह्यातील दूध संघांचा पाया आहे. या सामाजिक परिवर्तनाला या दुग्धजन्य उत्पादनांनी मोठा हातभार लावला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात वर्षाला किमान ३ ते ४ हजार कोटी रूपयांची उलाढाल या दूध व्यवसायाची आहे. यात या दुग्धजन्य पदार्थांचा मोठा वाटा आहे. व्यवसायवाढीबरोबर दर्जा, गुणवत्तेच्या कसोट्या वाढल्यानेच जिल्ह्यातील दूध संघांच्या दुध उत्पादनांचा ब्रँण्ड ग्राहकांच्या पसंतीस आहे. शिवाय यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात मार्गी लागला आहे.

**संदर्भ**

१. कोरे तात्यासाहेब, मी : एक कार्यकर्ता, १९९०.
२. नरके अरूण, गोकुळ गाथा.
३. धवलक्रांतीचा दिपस्तंभ- गोकुळ दूध संघाने प्रकाशित केलेली पुस्तिका.
४. गोकुळ, वारणा, यळगुड दूध संघांचे वार्षिक अहवाल.
५. श्री हनुमान सहकारी दूध व्यावसायिक व कृषीपूरक सेवा संस्था मर्या; यळगूड, ५० वा वार्षिक अहवाल,२०१६-१७.
६. श्री. वाडेकर चंद्रकांत जोती, जिल्हा सहकारी परिषद स्मरणीका, ९ मार्च २००३, पृ.क्रं. ८३-८४
७. कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ, वारणा दूध संघ व यळगूड दूध संघ यांची माहिती.
८. दैनिक ‘लोकसत्ता’, ३१ जानेवारी, २०२५.
९. दैनिक ‘पुढारी’, ता. ३ डिसेंबर, २०२४.

# ८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय दलित चळवळीमधील भूमिका

**डॉ. सोमनाथ दऱ्याप्पा हुबाले**
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहंकाळ, सांगली.

**गोषवारा**

भारतीय सामाजिक चळवळीमध्ये पर्यावरण, आदिवासी, लिंग अशा अनेकविध प्रकारच्या चळवळी निर्माण झाल्या आहेत.भारतीय समाजाच्या सम्यक परिवर्तनात सामाजिक चळवळींचे योगदान हे अतिशय महत्वाचे मानले जाते. प्रस्तुत शोधनिंबध हा भारतामध्ये एक प्रचलित जातीव्यवस्था कशी राहिली आहे? भारतीय समाजात दलित भेदभावाच्या वाईट प्रथांबद्दलचे ज्ञान चळवळींमध्ये कसे रूपांतरित झाले? आणि पीडित वर्गांला सजग करण्यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांची असलेली भूमिका आदी विषयावर प्रकाश टाकणारा आहे. तसेच सध्याच्या भारतीय जातीय परिस्थितीबद्दलची मांडणी करणारा आहे.

**बीज शब्द :** दलित, जात, सामाजिक चळवळ

**प्रस्तावना**

भारताच्या सम्यक परिवर्तनात ज्या सामाजिक चळवळींनी आपले योगदान दिलेले आहे. त्यातील एक महत्वाची चळवळ म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभी केलेली दलित चळवळ. त्यांच्या विचारातून, कर्तृत्वातून प्रेरणा घेतभारतातील दलितांच्या सामाजिक-राजकीय आणि आर्थिक सुधारणा सुरू झाली. उच्च जातींकडून दलितांचे शोषण शतकानुशतके दीर्घकाळ चालू राहिले. भारतातील प्रचलित वर्ण व्यवस्था आणि जातिव्यवस्थेमुळे, दलित नेहमीच शोषण आणि दडपशाहीचे बळी ठरले आहेत. भारतात प्रचलित असलेली चातुर्वर्ण्य प्रणालीमध्ये प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे पदानुक्रम होते. ज्या अंतर्गत शूद्र म्हणजेच दलितांना सर्वात खालच्या पायरीवर ठेवले जात असे ज्यांचे मुख्य कार्य वरील तीन वर्गांची सेवा करणे होते.तथापि, बदलत्या परिस्थितीत, चातुर्वर्ण्य व्यवस्थेत बदल झाला. त्यामुळे संक्रमण काळात जातिव्यवस्थेने एक वेगळेच रूप धारण केले होते. भारतातील बदलत्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचा दलित जातींवरही परिणाम झाला. काळाच्या ओघात दलितांच्या सामाजिक रचनेत आणि जाणीवेत बदल झाला. नवीन राजव्यवस्था, आधुनिकोत्तर प्रशासकीय रचना, तर्कसंगत न्यायव्यवस्था, सध्याचे भाडेपट्टी आणि कर आकारणीचे प्रकार, व्यवसायाच्या नवीन पद्धती, उदारमतवादी शिक्षण व्यवस्था आणि संसूचन जाळे यांनी दलितांसाठी स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक न्यायावर विशेष भर दिला आहे.

दलित चळवळ ही सामाजिक क्रांतीसारखी आहे, तिचे ध्येय उदारमतवाद, समानता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या लोकशाही आदर्शांवर आधारित एक नवीनसामाजिक व्यवस्था स्थापन करणे आहे.दलितांवर शतकानुशतके चालत आलेल्या सामाजिक-आर्थिक, राजकीयआणि धार्मिक बहिष्कारामुळे दलित जाणीव उदयास आली आहे. यामध्ये फुले - आंबेडकर, दलित

साहित्य आणि दलित पँथर्स सारख्या घटकांनी मोठी भूमिका निभावली की, ज्यामुळे भारतात दलित चळवळीचा उदय झाला.भारतातील चालू असलेल्या सामाजिक चळवळींच्या पार्श्वभूमीवर दलित चळवळींनी समाजातील सर्व घटकांचे लक्ष वेधले आहे. डॉ. आंबेडकरांनीभारतातीलदलित समाजाला दिलेले योगदान आणि भूमिकेमुळे भविष्यातील दलित चळवळीला योग्य दिशा मिळाली. स्वतंत्र भारतातील विविध दलित नेत्यांनी संघटनेच्या माध्यमातून दलित समाजाला संघटित केले आहे. दलित नेत्यांनी राजकीय पक्ष आणि कार्यालये, कल्याणकारी कार्यक्रम,सरकारी धोरणे आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण वाढवण्यासाठी चळवळी सुरू केल्या आहेत. याला दलितांची नवीन राजकीय चळवळ असेही म्हणतात. सध्याची दलित चळवळ भारतीय समाजाच्या जाति व्यवस्थेला आव्हान देऊन स्वाभिमानी लढ्यावर विशेष भर देत आहे. प्रत्यक्षात दलित कोण आहे? समाजात त्यांचे स्थान काय आहे? दलित या शब्दचा अर्थ 'दबलेला समाज' असा होतो. दलित या शब्दाचा अर्थ असा की, शेकडो वर्षांपासून हिंदू सामाजिक व्यवस्थेत ज्यांना दीर्घकाळापासून छळलेलाकिंवासर्वात शोषित समाज होय.

भारतात दलित लोकसंख्या सुमारे १६.६% आहे. प्रामुख्याने ही लोकसंख्या उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, राजस्थान, ओरिसा आणि महाराष्ट्र या राज्यात जास्त आहे. या राज्यांमधील दलित प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेत गरीब शेतकरी, भागधारक शेतकरी आणि शेतमजूर म्हणून आहेत. तर प्रामुख्याने शहरी अर्थव्यवस्थेत कामगार आणि मजूर लोकसंख्येच्या स्वरूपात आहेत. भारतात, विविध राज्यांनी समाजातील गरीब घटकांच्या कल्याणासाठी धोरणे आखली, परंतु दलितांची स्थिती सुधारण्यात त्यांना अपयश आले. भारत स्वातंत्र्यानंतरशासन व्यवस्था समाजातील दलित वर्गातील लोकांना पद्धतशीर संसाधनांचे वाटप करण्यात अपयशी ठरली आहे, की ज्यामूलभूत सुविधामध्येआरोग्य, शिक्षण आणि समाजकल्याण यासारख्या सुविधा होत्या. संरक्षणात्मक धोरणामुळेदलितांमध्ये एक मध्यम वर्ग निश्चितच उदयास आला आहे. आणि या मध्यम वर्गाने सरकारी धोरणांचा आणि नोकऱ्यांचा फायदा घेतला आहे. स्वतंत्र भारतातील दलित वर्गांना दोन भागात विभागले गेले. एक म्हणजे, ज्यामध्येलहान संकुचित वर्ग जो मोठ्या दलित वर्गापेक्षा अधिक उत्साही आहे. तो एक भारतीय समाजातील सकारात्मक बदल आहे. तर दुसरा म्हणजे, लहान नवमध्यम वर्ग जो दलित समाजाच्या मागण्या आणि हक्कांबद्दल अधिक सक्रिय झाला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये व गृहितके पुढीलप्रमाणे समजून घेत येतील.

**उद्दिष्ट्ये**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित चळवळीमधील योगदान आणि भूमिका समजून घेणे.

२. सद्यकालीन दलित चळवळी पुढील समस्या सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे विचार व कार्याचे औचित्य समजून घेणे.

**गृहितके**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतामधील दलित मुक्ती चळवळ प्रभावीपणाने राबविली.

२. आजही दलित चळवळ योग्य दिशेने मार्गक्रमणा करण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचार व कार्याची आवश्यकता आहे.

**डॉ. आंबेडकरपूर्वदलित चळवळ**

डॉ. आंबेडकरपूर्वीच्या दलित चळवळींची पार्श्वभूमी पाहिली तर आपल्याला त्याची सुरुवात भक्ती काळातील चळवळीतून दिसून येते. मुख्यतः ही चळवळ १५ व्या शतकात सुरू होते. या चळवळीत समाजातील सर्व घटकांनी आपली भूमिका बजावली. यामध्ये कबीरआणि रविदास यांच्यासारखे समाजसुधारक प्रमुख भूमिकेत होते. अशा सर्व व्यक्तिमत्त्वांनीहिंदू धर्मात प्रचलित असलेल्या जातिव्यवस्थेला नाकारले आणित्यांच्या कवितांद्वारे समाजातील समानतेबद्दल बोलले ज्याचासमाजाच्या सर्व घटकांवर परिणाम झाला.देशाच्या काही भागात नववेदांतिक चळवळी आणि ब्राह्मणेतर चळवळींनीमहत्त्वाची भूमिका बजावली.आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांच्यासारख्या लोकांचा यामध्ये समावेश आहे. अशा समाजसुधारकांचा असा विश्वासहोता की,जातिव्यवस्था ही एक राजकीय संस्था होती की जीविशिष्ट नैसर्गिक किंवा धार्मिक आधारावर नव्हे, तर काही समाजाच्या भल्यासाठी निर्माण करण्यात आली होती.इ.स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी पेशवाईचा पराभव करून स्वतःचे साम्राज्य स्थापन केले. पेशवाईच्या राजवटीत अस्पृश्य लोकांचे अतोनात हाल झाले होते. त्यांच्या मानवी हक्कांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाले होते. अत्यंत वाईट 'गुलामगिरीत जगत असल्याने त्यांनी इ.स. १८१८ च्या लढाईत ब्रिटिशांच्या बाजूने लढायचे ठरविले. त्यात ते यशस्वीही झाले.ब्रिटिशांनी युद्धानंतर मोठ्या प्रमाणात अस्पृश्यांना सैन्यात सामावून घेतले. त्यांचे दोन हेतू दिसून येतात. पहिला हेतू इ.स. १८१८च्या लढ्यात त्यांनी त्यांचा पराक्रम दाखविला, तर दुसरा हेतू पुन्हा पेशवाईची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत ते विशेष खबरदारी घेतील आणि आपल्याशी एकनिष्ठ राहतील. म्हणून महार लोकांना ब्रिटिशांच्या सैन्यात मोठ्या प्रमाणात नोकऱ्या दिल्या. त्यामुळे महार, अस्पृश्यांना ही राजवट पेशवाईपेक्षा जास्त जवळची वाटू लागली. या राजवटीत त्यांचा विकास झाला. इंग्रजी सैन्यातील महार लोकांना सक्तीचे इंग्रजी शिक्षण मिळाले. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीतील सैन्यामध्ये पहिली पिढी शिक्षित बनली.तसेच खिश्चन मिशनरी यांनीही अस्पृश्यांना शिक्षण दिले. याचा परिणाम व्यापक प्रमाणात झाला.

१९ व्या शतकातदलित चळवळीचा पाया रचणारे आणि दलितांना शिक्षणाचे अधिकार देणारे ज्योतिबा फुले यांनी सामाजिक सुधारणांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि सन १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आपण ज्योतिबा फुले यांना दलित चळवळीचे प्रणेते मानतो. दरम्यान ब्रिटिश कालखंडात अस्पृश्यांच्या उद्धारासाठी गोपाळ बाबा वलंगकर गुरुजी यांचे नेतृत्व उभे राहिले. वलंगकर गुरुजी यांच्यावर महात्मा जोतीराव फुले यांचा प्रभाव होता. त्यांनी १८९३ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यात 'अन्याय दोष परिहार मंडळा'ची स्थापना केली. तिला अस्पृश्यांची पहिली चळवळ मानली जाते. सामाजिक जागृती करणारी ही अस्पृश्यांची पहिली संस्था होय. त्यांनी समाजान अस्पृश्यता कोणी आणि कधी उत्पन्न केली, अस्पृश्यता समाजावर कशी लादली ?, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. वलंगकर गुरुजींनी 'विटाळ विध्वंसक' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी हिंदू धर्माची चिकित्सा केली. गोपाळबाबा वलंगकर यांनी धर्मचिकित्सा, धर्मसुधारणेतून अस्पृश्यांच्या सुधारणांची सुरुवात केली, त्यामुळे ते अस्पृश्यांच्या चळवळीचे आद्य सुधारक ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित चळवळीतील दुसरे प्रभावशाली नेते म्हणजे पुण्यातील शिवराम जानवा कांबळे हे होते. शिवराम कांबळे ह्यांना गोपाळ बाबा वलंगकर गुरुजींकडून प्रेरणा मिळाली. ती प्रेरणा घेऊन ते

अस्पृश्यांच्या उद्धाराच्या चळवळीत सहभागी झाले. महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर या क्रांतिकारक सुधारकांचे लेख वाचून त्यांचा अस्पृश्यता सुधारणाविषयक दृष्टिकोन बदलला होता. समाजातील लोकांना शिक्षण मिळावे,तसेच महार जातीतील लोकांचे पुनर्वसन करून लष्कर तसेच पोलीस नोकऱ्यांमध्ये त्यांना समाविष्ट करून घ्यावे, अशी त्यांनी मागणी केली.इ.स. १९०२ साली पुणे जिल्ह्यातील सासवड येथे ५१ गावांतील महारांची परिषद बोलाविली. आधुनिकभारताच्या इतिहासात अस्पृश्यांना संघटित करण्याचा पहिला प्रयत्न त्यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अगोदर गोपाळ बाबा वलंगकरगुरुजी, शिवराम ज्ञानबा कांबळे या अस्पृश्य समाजातील समाजसुधारकांनी आपल्या विचारांनी आणि कार्याने अस्पृश्य समाजात जागृती केली. त्याचप्रमाणे त्या काळात अस्पृश्य समाजासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३ ते १९४४), रामकृष्ण गोपाळ भांडारकर (१८३७ ते १९२५), दादाभाई नौराजी (१८२५ ते १९१७) यांनीसुद्धा अस्पृश्य समाजात जागृती केली.

भारतातील दलित चळवळीचा मार्ग बदलणाऱ्या ज्योतिबांचा वारसा पुढे नेण्यात आंबेडकरांची भूमिका महत्त्वाची होती.हिंदू धर्मातील अस्पृश्यतेचे दुष्टत्व संपवण्याच्या क्रमात गांधीजींची भूमिका आपण कमी लेखू शकत नाही.म. गांधी दक्षिण आफ्रिकेत असताना ते स्वत: सामाजिक भेदभावाच्या समस्येचे थेट उदाहरण बनले होते. गांधीजी या वस्तुस्थितीच्या बाजूने होते कीअस्पृश्यांची सामाजिक स्थिती सुधारूनच राष्ट्राचा विकास आणि उभारणी करू शकतो. गांधीजींनी ज्या दलितांना हरिजन म्हटले त्याचा अर्थ 'देवाची लोकं' असा होतो. गांधीजींनी हरिजनांच्या उद्धारासाठी सन १९३२ मध्ये हरिजन सेवक संघाची स्थापना केली होती. स्वातंत्र्यापूर्वी, दलित चळवळीपेक्षा सामाजिक सुधारणाघटकांवर जास्त भर देण्यात आला होता. परंतु,डॉ. आंबेडकर हे अशा नावांपैकी एक आहेत की, जेदलित चेतना आणि दलित उत्थानाचे एकमेव नेते राहिले.त्याची पुढे इंतभूत चर्चा केलेली आहे.

**स्वातंत्र्योत्तर दलित चळवळ**

भारतीय स्वातंत्र्यानंतरडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर हे दलित चळवळीसाठी एक नवीन मार्ग म्हणून अस्तित्वात आला. यामुळे दलित समाजाला नवीन धर्म स्वीकारण्याची एक संधी मिळाली. या बदलत्या परिस्थितीमुळे दलित चळवळीला एक नवीन दिशाही मिळाली. सन १९३६ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी येथे झालेल्या महार परिषदेदरम्यानआंबेडकरांनी असा विश्वास व्यक्त केला की,दलितांना विविध सामाजिक बंधनातून मुक्त करण्यासाठी धर्मांतराशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. आंबेडकरांना हे समजले कीहिंदू धर्माचा पाया जातिव्यवस्था आहे, जोपर्यंत दलितहिंदू राहतील तोपर्यंत ते अन्न, पाणी, सामाजिकसभा इत्यादींसाठी लढत राहतील. म्हणून १९५६ मध्ये आंबेडकरांनी त्यांच्या लाखो अनुयायांसहबौद्ध धर्माचा मार्ग स्वीकारला. आंबेडकर हे या चळवळीचा पाया रचणारे मुख्य शिल्पकार होते.जसे आंबेडकर मार्क्सवादी विचारसरणीला अशा राष्ट्रासाठी योग्य मानत होते जे त्याच्या प्रभावाखाली येत नव्हते, त्याचप्रमाणे त्यांनी दलित चळवळीसाठी एक मजबूत पाया रचला.या क्रमाने, दलित पँथर चळवळीने स्वतंत्र भारतात महत्वाची भूमिका बजावली. दलित पँथर चळवळ ही एक नवीन सामाजिक चळवळ होती. ही ब्लॅक पँथर चळवळ सन १९७० च्या दशकातील अमेरिकन निग्रो लोकांनी वर्णभेदाबाबत केलेल्या चळवळीनेप्रभावित झाली होती.तिचे संस्थापक नामदेव ढसाळ यांनी प्रसिद्ध मराठी साहित्यिक जे.व्ही. पवार यांच्यासमवेत १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना केली.

दलित पँथर ही प्रामुख्याने मूलगामी आणि क्रांतिकारी विचारतरुण वर्गाची चळवळ होती. त्यांच्याअनुयायांनी प्रामुख्याने फुले-आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा प्रचार केला.स्वतंत्र भारतातील दलित चळवळीला या दलित पँथरमुळेच विकासाची दिशा मिळाली. दलित पँथरची चळवळ पूर्वीच्या दलित चळवळींपेक्षा जास्त आक्रमक होती. तथापि, ज्या वेगाने ही चळवळ उदयास आली, त्याच वेगाने ती देखील शांत झाली.भारतातील दलितांसाठी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक हक्कांचे समर्थन करणारे आंबेडकर हे पहिले होते. परंतु ज्या दलित नेत्याने त्यांची विचारसरणी पुढे नेऊन भारतीय राजकारणात आणि दलित समाजात मोठा बदल घडवून आणण्याची भूमिका बजावली आहे ते कांशीराम आहेत. कांशीराम यांचे चरित्र लिहिणारे बद्रीनारायण असे म्हणतात की, कांशीराम यांची विचारसरणी ही डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीचे एक रूप आहे. तसेच कांशीराम यांनी हिंदी प्रदेशातील राजकीय व्यवस्था आणि तिचे कार्य खोलवर अनुभवले होते आणि ती बदलण्याचा मार्ग शोधला होता. पुढे जाण्याचा मार्ग म्हणजे राज्याची सत्ता ताब्यात घेणे, लोकांचा विकास करणे आणि त्याद्वारे सामाजिक बदल घडवून आणणे म्हणून कांशीराम यांनी सन १९८४ मध्ये 'बहुजन समाज पक्ष' या राजकीय पक्षाची स्थापना केली. कांशीराम यांनी बहुजनवाद निर्माण केला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी त्यांनी केलेले संयोजन भारतीय राजकारणासाठी एक नवीन प्रयोग होता. दलित चळवळ आणि संघटनेद्वारे दलितांना सत्तेवर आणण्यात कांशीराम बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलित चळवळीमधील भूमिका**

भारतातील दलित आणि दलित चळवळींची जाणीव निर्माण करण्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच ते भारतातील दलित चेतनेचे जनक आहेत. त्यांनी दलितांना मुक्त करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. आंबेडकरांच्या जीवनाकडे पाहिले तर एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून दिसून येते.ते एक कार्यक्षम सामाजिक, राजकीय आणि सुधारक आहेत तसेच व्यवसायाने शिक्षणतज्ज्ञ, वकील, पत्रकार आहेत. धनंजय कीर यांच्यामते, डॉ. आंबेडकर हे भारतातील शतकानुशतके शोषित असलेल्या वंचित वर्गाला दृष्टी देणारे समाजसुधारक व सामाजिक क्रांतिकारक होते. जर आपण आंबेडकरांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर त्यांच्या जीवनाचे दोन पैलू आहेत की, ज्यामध्ये पहिले त्यांचे सामाजिक जीवन आणि दुसरे त्यांचे राजकीय जीवन. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक जीवनाकडे पाहिले तर असे स्पष्टपणे दिसून येते की, त्यांनी 'महाड सत्याग्रह' चळवळीने त्यांचे सामाजिक जीवन सुरू केले. महाड सत्याग्रह चळवळ ही दलितांना तलावातील पाणी पिण्याचा अधिकार मिळावा यासाठी ही एक चळवळ होती. महाड सत्याग्रह ही दलितांना सामाजिक हक्क देणारी आंबेडकरांची पहिली सामाजिक चळवळ होती. या क्रमाने डॉ. आंबेडकरांनी मार्च सन १९३० मध्ये नाशिकच्या प्रसिद्ध काळाराम मंदिरात अस्पृश्यांसाठी प्रवेश मिळवण्यासाठीचा दुसरे सर्वात मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनातून दलितांमध्ये त्यांच्या हक्कांबद्दल जागरूकता निश्चितच झाली होती. या सर्व घडामोडीतून फ्रेंच राज्यशास्त्रज्ञ ख्रिस्तोफ जाफ्रेलॉट यांनी डॉ. आंबेडकरांना भारतातील पहिला राजकीय दलित नेता मानले. डॉ. आंबेडकर दलितांसाठी पहिल्याच गोलमेज परिषदेत राजकीय हक्क म्हणून स्वतंत्र मतदार संघांची मागणी करतात. त्यानंतर म.

गांधीजींचे आमरण उपोषण आणि पूना करार करारामुळे डॉ. आंबेडकरांना भारतीय समाजात एक नवीन राजकीय नेता म्हणून मान्यता मिळाली.

सन १९३६ मध्ये, हिंदू धर्म सोडण्याची आंबेडकरांच्या घोषणेमुळे आणि 'जातीचे उच्चाटन' असा संक्षिप्त लेख लिहिण्याने भारतीय जनमाणस व राजकारणात गोंधळाची परिस्थिति निर्माण झाली. कालांतराने, आंबेडकरांनी स्वतःला मजबूत करण्यासाठी अनेक राजकीय आणि सामाजिक संघटना स्थापन केल्या. काही महत्त्वाच्या संघटनांमध्ये प्रामुख्याने स्वतंत्र कामगार पक्ष (१९३६), अनुसूचित जाती महासंघ(१९४२),रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (१९५७)इत्यादी संघटना स्थापन केल्या होत्या. दरम्यान आंबेडकरांनी दलितांना सजग करण्याच्या अनुषंगाने समता आणि मुकनायक यासारखी मासिके देखील प्रकाशित केली. सन १९४२ ते १९४६ पर्यंत, आंबेडकरांनी राष्ट्रवादी नेते म्हणून त्यांची प्रतिमा कायम ठेवली. तर सन १९४६ मध्ये त्यांना संविधान सभेवर नियुक्त करून संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर त्यांना भारताचे संविधान निर्माता म्हणून ओळखले जावू लागले. तर काही विश्लेषक त्यांना आधुनिक मनू असेही म्हणतात. व्यापक अर्थाने, त्यांनी दलितांच्या मुक्ततेचे दरवाजे उघडले. त्यांचे जीवन दलित समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. स्वातंत्र्यानंतर, भारतातील संघटनेच्या दलित नेत्यांनी आणि आंदोलकांनी डॉ. आंबेडकर यांना आपला नेता मानले. भारतातील दलित चळवळी नेहमीच डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या विचारांना केंद्रबिंदू मानून सुरू झाल्या. आंबेडकरांनी लिहिलेले साहित्य दलित समाज जागृत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सध्याच्या भारतातील सर्व राजकीय आणि सामाजिक संघटना आंबेडकरांचा वैचारिक वारसा पुढे चालविण्यासाठी पुढाकार घेताना दिसताहेत. परंतु हे सर्व असूनही, आज आधुनिक समाजात अजूनही जातीव्यवस्था अस्तित्वात आहे. सध्याच्या काळात जातीचे अडथळे थोडे कमी झाले असले तरी, जातीव्यवस्था पूर्णपणे संपवण्यासाठी बराच संघर्ष करावा लागत आहे.

**निष्कर्ष**

सारांशात, दलित चळवळींमुळे भारतीय समाजाच्या पारंपारिक जातीय व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे यात शंका नाही. त्यामुळे विविध जाती आणि वर्गातील लोकांमध्ये स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक न्याय या लोकशाही मूल्याना प्रोत्साहन मिळाले आहे. दलित चळवळींनी दलितांशी संबंधित असलेल्या समस्यांविषयी भारतीय प्रस्थापित अन्यायी व्यवस्थेला कायम विरोध केला आहे. तसेच राजकीय पदांवर आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये दलितांसाठी आरक्षणाच्या कल्पनांनी भेदभाव आणि अस्पृश्यतेच्या प्रथेला तीव्र विरोध केला आहे. दलित चळवळींनी त्यांच्या मागण्या राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणल्या आणि त्यांना देशाच्या विविध भागांमध्ये महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवर बसवले. दलित चळवळींनी दलित साहित्य आणि दलित बुद्धिजीवींना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी आणि पदानुक्रमित समाजात त्यांची ओळख टिकवून ठेवण्यासाठी संघटित केले आहे. समकालीन भारतातील दलित संघटना आणि चळवळींचा थोडक्यात आढावा घेतल्यास असे दिसून येते की अखिल भारतीय स्तरावर दलित संघटनांचे काम स्वातंत्र्यापूर्वीच आंबेडकरांच्या प्रयत्नांनी सुरू झाले होते. स्वातंत्र्यानंतरही आंबेडकरांच्या दलित

चळवळीबद्दलच्या वचनबद्धतेची आणि त्यांच्या कामगिरीची प्रतिमा अजूनही इतकी शक्तिशाली आहे की ती कोणत्याही नवीन दलित चळवळीला आणि राजकीय कृतीला नवीन उंचीवर नेण्यास सक्षम आहे.

**संदर्भ सूची**

१. Shah Ghanshyam, (**2002**), 'Ambedkar and After: The Dalit movement in India',Sage Publication, New Delhi.

२. जाधव रमेश (संपा.), (२०१६), 'राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची दिशा', राजर्षी शाहू चरित्र प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

३. पवार जयसिंगराव, (२००१),'राजर्षी शाहू महाराज', महाराष्ट्र इतिहास प्रबोधन, कोल्हापूर.

४. गायकवाड सुभाष, (२००२), दलित चळवळ: चिंता आणि चिंतन, सुगावा प्रकाशन, पुणे.

५. फुलूके श्रीराम, (१९९०), 'दलितांचे प्रश्न नि आम्ही', ज्ञानेश प्रकाशन, नागपूर.

६. लिंबाळे शरणकुमार, (१९९१), 'दलित चळवळ', प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.

७. www.journalofpoliticalscience.com

# ९. 'आदिवासी समुदायातील मानव विकास निर्देशांकाचे मूल्यांकन' - विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा

**प्राचार्य. डॉ. दिलीप रामभाऊ जगताप**
कै. अण्णासाहेब पितांबर शंकर वाडिले, कला महाविद्यालय, थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे.
**प्रा. रामदास रमेश वसावे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली.

**सारांश**

मानव विकास निर्देशांकाचा संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने १९९० च्या अहवालात मानव विकास निर्देशांक तयार केला होता. ही एक प्रगती मानली जाते जी सामाजिक-आर्थिक विकासासाठी संदर्भ म्हणून देशातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान, शिक्षण व दरडोई उत्पन्न हे तीन घटक वापरले जातात. आदिवासी समाजाचे सामाजिक आणि आर्थिक स्तरावरचे विद्यमान स्थितीचे विश्लेषण. शिक्षा, आरोग्य, आणि उत्पन्नाच्या बाबतीत आदिवासी समाजाच्या विविध समस्या इत्यादी.

**प्रस्तावना**

मानवी विकास निर्देशांक हा जगातील विविध देशांचे विकसित,विकसिनशील व अविकसित असे वर्गीकरण करण्यासाठी वापरला जातो. हा निर्देशांक तयार करण्यासाठी देशातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान, शिक्षण व दरडोई उत्पन्न हे तीन घटक वापरले जातात.

इ.स. १९९० साली पाकिस्तानी अर्थतज्ञ महबूब उल हक आणि भारतीय अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांनी मानवी विकास निर्देशांकाची निर्मिती केली व तेव्हापासून हा निर्देशांक संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रम ही संयुक्त राष्ट्रांची संस्था मानवी विकास अहवाल तयार करण्यासाठी वापरला जातो. महबूब् उल हक यांना "मानव विकास निर्देशाकाचे जनक" म्हणून संबोधले जाते. १९९० पहिल्या मानवी विकास अहवालात मानवी कल्याणासाठी प्रगती करण्याचा एक नवीन दृष्टीकोन सादर केला.१९९० मध्ये पहिला मानवी विकास अहवाल प्रकाशित करण्यात आला.

**मानव विकास निर्देशांक (HDI) बद्दल माहिती**

- मानव विकास निर्देशांक हा देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाची पातळी मोजण्यासाठी वापरला जातो.
- हा निर्देशांक संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने विकसित केला आहे.
- हा निर्देशांक आयुर्मान, शिक्षण आणि दरडोई उत्पन्न या तीन स्वतंत्र निर्देशांकांचा वापर करून तयार केला जातो.
- मानव विकास निर्देशांक (**HDI**) च्या आधारे देशांची कामगिरी आणि जागतिक पातळीवरील स्थान निश्चीत केले जाते.

- मानव विकास निर्देशांक (**HDI**) च्या आधारे देशाच्या सर्वांगीण विकासाचे मूल्यांकन केले जाते.

"आदिवासी समुदायातील मानव विकास निर्देशांकाचे मूल्यांकन" हा एक संशोधनाचा महत्त्वाचा विषय आहे. जे आदिवासी समुदायाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाची स्थिती समजून घेण्यास मदत करतो. मानव विकास निर्देशांक (**Human Development Index - HDI**) हे एक असे उपकरण आहे जे व्यक्तींच्या जीवनमानाचा, आरोग्याच्या स्थितीचा, शिक्षणाचा आणि आर्थिक स्थिरतेचा विचार करून त्यांच्या विकासाची मोजणी करत असतो. आदिवासी समुदायांचे ऐतिहासिक पार्श्वभूमी ही देशातील इतर समाजाच्या मानाने विभिन्न स्वरुपाची आहे. आदिवासी समुदायाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनशैलीचे महत्त्व जागतिक पातळीवर वाढतांना दिसत आहे. कारण आदिवासी समुदाय पर्यावरण व निसर्गाचा रक्षणकर्ता आहे त्यामुळे तो निसर्गाच्या सानिध्यात राहणे पसंत करतो. परंतु नैसर्गिक जीवन जगात असतांना मानव विकासाच्या व जीवनावश्यक पायाभुत सुविधांच्या पासून वंचित राहिला आहे. त्यामुळे विकासाच्या मुख्य प्रवाहातून आदिवासी समुदाय बाहेर होत गेला आणि मानव विकास निर्देशांक काय असते याची कल्पनासुद्धा निर्माण झाली नाही. त्यामुळे मानव विकास निर्देशांक व त्याचे महत्त्व आणि उपयोगिता याची जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहेत. कारण राष्ट्राच्या एकुण मानव विकास निर्देशांक मोजतांना सर्व समाज घटकांचा एकत्रित विचार केला जातो. त्यामुळे काही विशिष्ट समुदायाला विकास गतीत मागे ठेऊन देशाचा आर्थिक व सामाजिक विकास साध्य करता येणार नाही.

**शोधनिबंध उद्दिष्टे**

१. आदिवासी समाजाचे शिक्षण, आणि आर्थिक स्थितीचे विश्लेषण विश्लेषण करणे.

२. आदिवासी लोकांच्या मानव विकास निर्देशांकाचा संदर्भात आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे.

३. आदिवासी बहुल जिल्यातील मानव विकास निर्देशांकाचा आढावा घेणे.

४. अनुसूचित भागात मानव विकास निर्देशांक सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधनाचे गृहीतके**

१. आदिवासी बहुल जिल्ह्यात मानव विकास निर्देशांकाचा निम्न स्तर आहे.

२. आदिवासी अतिदुर्गम भागात पायाभुत सुविधांचा अभाव आहे.

३. आदिवासी भागात रोजगार साधनांची कमतरता आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधात निरीक्षणात्मक व सर्व्हेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केला असून तथ्य संकलनासाठी काही प्राथमिक सामग्री व दुय्यम सामग्रीत यात संदर्भग्रंथ, शोधनिबंध, वर्तमानपत्र, इंटरनेट, सरकारचे आरोग्यविषयक संकेतस्थळ, आरोग्यविषयक नियतकालिके .मासिके .व विविध आरोग्यविषयक लेखांचा इत्यादीचा वापर केला आहे .

**माहितीचे विश्लेषण**

**मानव विकास निर्देशांक (HDI) मध्ये भारताची स्थिती**

मानव विकास निर्देशांक (**HDI**) च्या आधारे भारताचा विकास मोजला जातो. या निर्देशांकात भारताची स्थिती चिंताजनक आहे. १९९० ते २०२२ दरम्यान, भारताचे मानव विकास निर्देशांक मूल्य ०.४३४ वरून ०.६४४ पर्यंत बदलले. २०२२ मध्ये भारताचे मानव विकास निर्देशांक मूल्य ०.६४४ होते. २०२१ मध्ये मानव विकास निर्देशांक मूल्यात घसरण झाल्यानंतर आणि गेल्या काही वर्षांच्या नंतर, भारताचे मानव विकास निर्देशांक मूल्य २०२२ मध्ये ०.६४४ पर्यंत वाढले आहे. आणि २०२३-२४ मध्ये ०.६४४ एवढे स्थिर असून जागतिक मानव विकास निर्देशांकात भारत १३४ व्या क्रमांकावर आहे. जगातील १९३ देशामध्ये भारताचा १३४ वा क्रमांक लागतो ही किती शोकांतिकेची बाब आहे. त्यावरून आपल्या लक्षात येते कि संपूर्ण देशाची अवस्था अशी असेल तर विकासाच्या प्रवाहातून अलिप्त राहिलेल्या आदिवासी समुदायाची काय स्थिती असेल याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**मानव विकास निर्देशांक (HDI) मध्ये नंदुरबार जिल्ह्याची स्थिती**

नंदुरबार जिल्ह्यांचा विचार करता एकुण मृत्यदर, माता मृत्यदर, बाल मृत्यदर, अर्भक मृत्यदर, कुपोषण इत्यादी घटकांचा विचार केला तर शहरी भागांपेक्षा ग्रामीण भागातील लोकांची आरोग्य स्थिती बिकट असल्याचे लक्षात येते. सातपुड्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासी जिल्ह्यात एकुण मृत्यदर, माता मृत्यदर, बाल मृत्यदर, अर्भक मृत्यदर, कुपोषण व इतर आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात उद्भवलेल्या आहेत. राज्यात दर वर्षी हजारो बालमृत्यूंची नोंद होते. यात बहुतांश मृत्यू राज्यातील १६ आदिवासीबहुल जिल्ह्यांतच आहेत.

नंदुरबार जिल्ह्याचा विचार केला असता मार्च २०२३ दरम्यान तपासणी केलेल्या एक लाख ४३ हजार ११५ पैकी सुमारे ३४ हजार १३६ बालके मध्यम, तर १० हजार ९३ बालके तीव्र कुपोषित आढळल्याचे महिला व बालकल्याण विभाग सांगतो. एप्रिल २०२२ अखेर झालेल्या सर्वेक्षणात जिल्ह्यात सुमारे १५ हजार २५३ इतके बालविवाह झाले. केंद्र व राज्य सरकार कुपोषण निर्मूलनाच्या नावाखाली इतका खर्च करते; परंतु त्याची ठोस अंमलबजावणी मात्र होताना दिसत नाही. २०२२-२३ च्या अहवालानुसार राज्यात सुमारे ३३ हजार ७०० कुपोषित बालके आढळली आहेत. त्यांपैकी सुमारे २४ हजार इतकी एकट्या नंदुरबार जिल्ह्यात असल्याने कुपोषणाच्या बाबतीत जिल्हा राज्यात प्रथमस्थानी आणून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई का करत नाही, असा सामान्य आदिवासी जनतेत प्रश्न निर्माण होत आहे.

राज्यात कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, देशाच्या स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत बालमृत्यू रोखणे व कुपोषण निर्मूलन या माथ्याखाली हजारो कोटी खर्च करणारे सरकार अद्यापपर्यंत यावर मात करू शकले नाही. हा खरेच संशोधनाचा विषय असल्याचे दिसुन येते. एकीकडे स्वातंत्र्याच्या ७५ वर्षेपूर्तीचे बिगुल वाजविले जात असताना आदिवासी समाजावर मात्र नियमित अन्याय केला जातो, हे देशात घडलेल्या विविध घटनांतून समोर आले आहे. एकीकडे केंद्र व राज्य शासन बालमृत्यूवर आळा

बसावा याकरिता अनेक उपाययोजना करत असल्याचे भासवून कोट्यवधींचा निधी खर्ची पाडत असताना २०१९ ते २०२३ दरम्यान सुमारे ३७ हजार २९२ इतक्या बालमृत्यूंची नोंद शासनदरबारी आहे

नंदुरबार हा जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो आणि या जिल्ह्यात स्थलांतर, कुपोषण आणि आरोग्याच्या समस्यांनी ग्रासलेला आहे . तरीदेखील सातपुडा पर्वत रांगेतील नंदुरबार जिल्हा काही वर्षांपासून अडथळ्यांवर मात करून प्रगतीच्या पायऱ्या चढू लागला आहे. आपली मागासलेपणाची ओळख पुसण्यासाठी प्रयत्नशील आहे. मुद्रा कर्ज योजनेतून युवकांना स्वयंरोजगारास प्रोत्साहन देऊन स्थलांतराच्या समस्येवर उत्तर शोधले जात आहे. उद्योगधंदे आणि रोजगाराअभावी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न सुरू असून मुद्रा कर्जाच्या माध्यमातून उद्योजकांना मिळालेली बळकटी त्याचेच फलित मानले जात आहे. शासनाच्या अनेक आरोग्य विषयक सेवा व विविध योजनांमुळे लोकांचा जीवनमानात सुधारणा होऊन सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना मिळत आहेत.परतू त्या लोकसंख्याच्या मानाने फार कमी प्रमाणात आहेत. उद्योगधंद्यांचा अभाव असताना शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून दाखवण्याची कृषी विभागाने केलेली किमया आणि तुटपुंज्या मनुष्यबळावर प्रशासनाकडून जिल्ह्याचा गाडा ओढण्याची लगबग, यातून नंदुरबार जिल्हा विकासाच्या दिशेने कशा प्रकारे मार्गक्रमण करत आहे, ते स्पष्ट होते. धुळे जिल्ह्यातून एक जुलै १९९८ रोजी विभक्त होऊन निर्माण झालेला नंदुरबार जिल्हा आता २७ वर्षांचा होऊ घातला आहे. तरीदेखील उद्योगधंदे आणि रोजगाराअभावी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी प्रशासनाची सातत्याने धडपड सुरू आहे. मागील पाच वर्षांत जिल्ह्यातील २८ हजार ६१६ उद्योजकांना मुद्रा लोनच्या माध्यमातून ३४० कोटी ७८ लाखांचा कर्ज पुरवठा करण्यात आला. मुद्रा कर्ज योजनेतून स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीचे प्रयत्न खऱ्या अर्थाने आशेचा किरण ठरत आहेत. तसेच जिल्ह्यातील दळणवळण सुधारण्यासाठी रस्ते निर्मितीवर भर दिला गेला आहे. तीन वर्षांत जिल्ह्यांत राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्यमार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते याप्रमाणे सात हजार ५३६ किलोमीटर रस्त्यांची बांधणी करण्यात आली आहे. आदिवासीबहुल भागातील आश्रमशाळांचे रूप बदलण्यात आले. जिल्ह्यातील दोन्ही प्रकल्पांतील बहुसंख्य आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या नव्या इमारती बांधण्यात आल्या. केवळ वास्तू उभ्या करण्यावर न थांबता त्यातून आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि सर्वांगीण शिक्षण मिळावे, यासाठी प्रशासन प्रयत्नरत आहे.

राज्यात मानव विकास निर्देशांकात सातत्याने खालच्या क्रमांकावर राहिलेला नंदुरबार जिल्हा विकासाची भरारी घेत असताना त्यास पाठबळाची गरज आहे. राज्यात मिरची उत्पादनात अग्रेसर मानल्या जाणाऱ्या नंदुरबारमध्ये चिली पार्कसारख्या प्रकल्पांना चालना मिळण्याची आवश्यकता आहे. मिरची, कापूस, ऊस, पपई, सोयाबीन आणि कडधान्य उत्पादन यांचा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात हातभार लागत आहे. असे असले तरी हा जिल्हा मानव विकासाच्या अनेक घटकांची कमतरता असल्यामुळे लोकांचे जीवनमानात पाहिजे त्या प्रमाणात सुधारणा झालेली नाही.

**महाराष्ट्र राज्याची विविध जिल्ह्यांची सापेक्ष मानवी विकास स्थिती: सन २०११**

| **जिल्हा** | **मानव विकास निर्देशांक २०११** | **मानव विकास सापेक्ष श्रेणी** |
|---|---|---|
| नंदुरबार | ० ६०४. | |
| गडचिरोली | ०६०८. | |
| वाशिम | ०६४६. | |
| हिंगोली | ०६४८. | |
| उस्मानाबाद( धाराशिव ) | ०६४९. | |
| नांदेड | ०६५७. | **निम्न** मानव विकास **स्तर** |
| जालना | ०६६३. | |
| लातूर | ०६६३. | |
| धुळे | ०६७१. | |
| बीड | ०६७८. | |
| परभणी | ० ६८३. | |
| बुलढाणा | ०६८४. | |
| यवतमाळ | ० ७००. | |
| गोंदिया | ०७०१. | |
| अमरावती | ०७०१. | |
| भंडारा | ०७१८. | मध्यम मानव विकास स्तर |
| चंद्रपूर | ०७१८. | |
| अहमदनगर | ०७२०. | |
| अकोला | ०७२२. | |
| वर्धा | ०७२३. | |
| जळगाव | ०७२३. | |
| औरंगाबाद ( संभाजीनगर) | ०७२७. | |
| सोलापूर | ०७२८. | |
| रत्नागिरी | ०७३२. | उच्च मानव विकास स्तर |
| सातारा | ०७४२. | |
| सांगली | ० ७४२. | |
| नाशिक | ० ७४६. | |
| सिंदुदुर्ग | ०७५३. | |
| रायगढ | ०७५९. | |
| कोल्हापूर | ०७७०. | |
| नागपूर | ०७८६. | अति उच्च मानव विकास स्तर |

| | | |
|---|---|---|
| ठाणे | ०८००. | |
| पुणे | ०८१४. | |
| मुंबई | ०८४१. | |
| महाराष्ट्र | ०७५२. | |

**Maharashtra Human Development Report 2012**

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की सन २०११ च्या जणगणनेचा विचार करता महाराष्ट्र राज्यातील बहुतेक सर्वच आदिवासी बहुल लोकसंख्या असेलल्या जिल्ह्यातच सर्वात कामी म्हणजे निम्न मानव विकास निर्देशांक आहेत. त्यात नंदुरबार, गडचिरोली, वाशिम, हिंगोली, धुळे इत्यादी त्यातही नंदुरबारचा ०.६०४ एवढा सर्वात कमी आहेत. मध्यम मानव विकास निर्देशांक स्तराचा विचार करता अमरावती, भंडारा , चंद्रपूर , गोंदिया , जळगाव हे काही आदिवासी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांचा समावेश आहे . एकंदरीत विचार करता अनेक आदिवासी समुदाय वसलेल्या भागात राज्यातील मानव विकास निर्देशांकापेक्षा कमी व निम्न मानव विकास निर्देशांक आहेत. त्याचबरोबर उच्च मानव विकास स्थर व अतिउच्च मानव विकास स्थर असलेल्या जिल्ह्यामध्ये एकाही आदिवासी बहुल लोकसंख्या असलेल्या जिल्ह्याचा समावेश होतांना दिसत नाही यावरून असे लक्षात येते की आदिवासी व बिगर आदिवासी लोकसंख्या असलेल्या भागात प्रादेशिक , आर्थिक , सामाजिक विकासातील विषमता फार मोठ्या प्रमाणात दिसुन येते.

**आदिवासी समाजाच्या मानवी विकास निर्देशांक कमी असण्याचे प्रमुख कारणे**

**सुयोग्य आरोग्य सेवांचा अभाव**

नंदुरबार जिल्ह्यात एकुण १५ रुग्णालये, ०१ विशेष रुग्णालये कॅन्सर व टीबी, ६४ प्रसूतिगृहे, ६० प्राथमिक आरोग्य केंद्र २९० उपकेंद्र, २७१ डॉक्टर, ६३१ परिचारिका असून जिल्ह्याची एकुण लोकसंख्या १३७२९१९ एवढी असून तसेच जिल्ह्यातील बराचसा प्रदेश अतिदुर्गम असल्यामुळे शासकीय आरोग्य सेवा लोकसंख्येचा मानाने कमी प्रमाणात आहेत

**शिक्षणाची कमी पातळी**

२०११ च्या जनगणनेनुसार राज्यात सर्वात कमी साक्षरतेचा जिल्हा म्हणून नंदुरबार प्रचलित आहे. जिल्ह्यात ६४.३८ साक्षरता असून परुष साक्षरता ७२.१७ % आणि महिला साक्षरतेचे प्रमाण ५६.४७ % इतक्या कमी प्रमाणात आहे .

**रोजगाराच्या समस्या आणि स्थलांतर**

जिल्ह्यात एकही मोठा शासकीय उद्योग किंवा प्रकल्प नसल्यामुळे तसेच अतिदुर्गम भागात सकल शेती योग्य जमीन नसल्यामुळे जिल्ह्यात अजूनही ७२% लोक दारिद्र्य रेषेखालील आहेत. त्यामुळे आदिवासी लोकांची दारिद्र्याची भीषण समस्या आहे. तसेच रोजगारासाठी गुजरात राज्यात हंगामी स्थलांतर मोठ्या प्रमाणत होत आहे. हे राज्याचा दृष्टीने धोक्याची स्थिती आहे.

**पायाभुत सुवूधांचा अभाव**

जिल्ह्यात प्रादेशिक व भौगलिक विषमता जास्त असल्यामुळे अनेक भागात अजूनही जीवनावश्यक पायाभुत सुविधा मिळाल्या नाही. किंवा काही ठिकाणी मिळाल्या आहेत तेथे पुरेशा प्रमाणात नाहीत त्यामुळे आरोग्य सुविधा , शासकीय योजना व विविध प्रकल्प सुरु करण्यात अतिदुगम भागामध्ये अडचणी निर्माण होतांना दिसुन येतात.

**परंपरागत शेती व्यवसाय**

जिल्ह्यात ७० % आदिवासी लोकसंख्या असून या लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. परंतु शेती करत असतांना शेतीसाठी लागणारे आदाने किंवा साहित्य हे परंपरागत असल्याने बहुतांश शेती ही परंपरागत उदरनिर्वाह पद्धतीची केली जाले. आधुनिक शेती साधने व यंत्राचा कमी प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे शेती उत्पन्नाची पातळी वाढतांना दिसत नाही.

**शासकीय, प्रशासकीय भ्रष्टाचार**

नंदुरबार हा आदिवासी लोकांचा जिल्हा असल्यामुळे आदिवासी लोककल्याणासाठी मोठ्या प्रमाणात विविध शासकीय योजना व विशेष निधीची तरतूद केली जाते. परंतु त्या योजनांची अंमलबजावणी करत असतांना मोठ्या प्रमाणात राजकीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांकळून भ्रष्टाचार केला जातो त्यामुळे लोकांना त्या योजनेचा लाभ पुरेशा प्रमाणात मिळत नाही. म्हणून आदिवासी लोकांच्या कल्याणात वाढ झाली नाहीत.

**सावकारांचे वर्चस्व**

जिल्ह्यातील आदिवासी लोकांना शेतीकरिता बी बियाणे, खते, शेती उपकरणे व शेतीतील हंगामी खर्च भागविण्यासाठी पैशांची गरज असते ही गरज पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेच्याकडून कर्ज उपलब्ध होत नाही. तसेच बँकाच्या किचकट कर्ज प्रक्रियेमुळे अनेक लोक सावकार किंवा सोने- चांदीच्या दुकानदाराकडे आपल्याकडील सोने- चांदी किंवा जमीन गाहाण (तारण) ठेऊन कर्ज मिळविले जाते ते कर्ज देतांना हे सावकार किंवा दुकानदार ४० ते ५० टक्के दराने व्याज वसूल करून मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकांचे आर्थिक शोषण केले जात आहेत.

**निष्कर्ष**

१. आदिवासी समुदायाचे मानव विकास निर्देशांक इतर समाजाच्या तुलनेत निम्न स्तरावर आहे.

२. रोजगार साधनांचा कमतरतेमुळे उत्पन्नाच्या बाबतीत आदिवासी समाजाची प्रगती निम्न आहे त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण अधिक दिसुन येत आहेत.

३. आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी प्रमाणात दिसुन येत आहेत.

४. आदिवासी व बिगर आदिवासी लोकसंख्या असलेल्या भागात प्रादेशिक, आर्थिक, सामाजिक विकासातील विषमता फार मोठ्या प्रमाणात दिसुन येते.

५. जिल्ह्यात अतिदुर्गम भागात पायाभुत सुविधांची कमतरता अधिक आहे.

६. जिल्ह्यात उद्योगाच्या कमतरतेमुळे स्थलांतराचे प्रमाण वाढत आहे.

**शिफारसी**

१. आदिवासी समुदायाच्या विकासासाठी रोजगार निर्मिती यामध्ये वाढ करणे .

२. सरकार आणि अन्य संघटनांकडून कशा प्रकारे अधिक प्रभावी पावले उचलली जाऊ शकतात

३. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समुदायाचा मानव विकास निर्देशांक सुधारणा आवश्यक आहेत त्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

४. आदिवासी समुदायाचे आरोग्य जीवन सुधारण्यासाठी विशेषतः महिलांच्या व बालकांच्या आरोग्यासाठी विशेष उपयोजना तयार करणे.

५. केंद्र व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करून महिलांच्या व बालकांच्या आरोग्यासाठी निधीची पूर्तता करण्यात यावी.

६. सावकाराचे उच्चाटन करून कमी व्याजात सरल पद्धतीने राष्ट्रीय व सहकारी बँकेमार्फत शासकीय कर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात यावी.

**संदर्भ सूची**

१. https://sdgs.un.org/partnerships/tribal-hdi-development

२. Tribal HDI Development: Assessing the Human Development Index in Tribal Communities

३. https://www.loksatta.com/nashik/loksatta-district-index-nandurbar-district-self.employment-progress-css-98-4940667/ सोमवार, १० मार्च, २०२५

४. https://mahasdb.maharashtra.gov.in/docs/pdf/mhdr_2012.pdf

५. chahalacademy.com

६. “ राष्ट्रीय आरोग्य धोरण आणि आदिवासी लोकांच्या आरोग्याविषयक स्थितीचा अभ्यास ” -विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा. शोध निबंध - डॉ. दिलीप रामभाऊ जगताप

७. .महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी मुलांची आरोग्य आणि पोषण स्थिती-अभिजित बनसोडे प्रकाशित लेख गुरुवार, मे 23, 2019

१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२० जिल्हा नंदुरबार, जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन. स्रोत: १.जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय नंदुरबार

# १०. संत गाडगेबाबांची सत्यशोधकीय भूमिका-एक चिकित्सक अभ्यास

**Mr. Hariprasad Vitthal Pawar**
Assistant Professor, Department of History, Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe Mahankal, Dist. Sangli, Maharashrta.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी, संत नरहरी सोनार, बंका महाराज, संत सेना महाराज, एकनाथ, संतशिरोमणि तुकाराम महाराज, जनाबाई, बहिणाबाई ते अगदी अर्वाचीन महाराष्ट्रातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशी महाराष्ट्राच्या भूमीला संतांच्या क्रांतिकारी आणि प्रदीर्घ प्रबोधनाच्या परंपरेसोबतच रचनात्मक कार्याची एक विशिष्ट परंपरा लाभली आहे. महाराष्ट्राचा इतिहास अभ्यासल्यानंतर आपल्या लक्षात येते की, महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांच्या परंपरेचे बीजारोपण संतांच्या विद्रोहातून आणि शोषण-कर्मकांडादी गोष्टींना त्यांनी केलेल्या विधायक विरोधातून होते. सर्वसामान्य शोषित जनतेबद्दल असणारा कळवळा, 'जे जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळजन' या उक्तीप्रमाणे सर्व समाजाला ज्ञानाने समृद्ध करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा ही सर्वज्ञात आहेच.

संतांनी आपल्या अभंगातून, कीर्तन-प्रवचनांच्या माध्यमातून समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा, कर्मकांड आणि समाजातील सर्व प्रकारचे शोषण यावर जोरदार हल्ला केला. समतेसाठी आणि विधायक मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी मानवधर्माची महापूजा बांधणाऱ्या संतांनी खऱ्या अर्थाने खरा धर्म, खरी नीती, खरा आचार-विचार यांचा अर्थ समाजाला सांगून समतेच्या प्रकाशात समाजमनाचा कोपरान्-कोपरा उजळून टाकणे, हेच आपले जीवितकार्य मानले. आपल्या विचार-कार्यातून समाजाच्या डोळयातील शतकानुशतकांच्या वेदनांचे अश्रू पुसावेत, त्यांच्या चेहऱ्यावर निखळ हास्य फुलवावे आणि अनेक प्रकारच्या यातनांनी घायाळ झालेल्या समाजमनावर सुखाची फुंकर घालावी असे कार्य महाराष्ट्रात ज्या प्रमुख संतांनी केले त्यात अग्रभागी असणारे नाव म्हणजे डेबुजी झिंगराजी जाणोरकर तथा गाडगेबाबा होय.

**हेतू/उद्देश**

१. महात्मा फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीने चालवलेले कार्य संत गाडगेबाबांनी कशाप्रकारे पुढे नेले ते अभ्यासणे.

२. संत गाडगेबाबांच्या सत्यशोधकीय भूमिकेचा समाजमनावरील परिणाम अभ्यासणे.

३. समाजसुधारणेच्या क्षेत्रातील संत गाडगेबाबांच्या सत्यशोधकीय विचारांचा आढावा घेणे.

४. संत गाडगेबाबांनी परंपरेला धक्का देत विवेकाचा प्रवास कसा केला हे अभ्यासणे.

५. संत गाडगेबाबांनी समाजप्रबोधनासाठी सत्यशोधकीय भूमिकेतून उपयोगात आणलेल्या 'कीर्तन' या माध्यमाचा वापर कशाप्रकारे केला हे अभ्यासणे.

**विषय विवेचन**

डेबुजी झिंगराजी जाणोरकर तथा गाडगेबाबा (23/02/1876 ते 20/06/1956) यांचे गावोगावच्या पायी भ्रमंतीतून वाट्यास आलेले अनुभव, व्यापक जनसंपर्क, सामान्यातील सामान्य माणसाविषयी असणारा जिव्हाळा आणि त्यातून केलेले सत्यशोधन यामुळे त्यांचे कीर्तन समाजाला एक नवा विधायक दृष्टीकोन देत होते. ग्रामीण भागातील सामान्यातील सामान्य माणसापासून ते अगदी भाऊसाहेब तथा पंजाबराव देशमुख ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या ख्यातनाम विद्वानांपर्यंत त्यांना विविध वर्गातील श्रोते लाभले. ज्या काळात त्यांनी कीर्तन सुरू केले तो काळ अज्ञानाने ग्रासलेला होता. अंधश्रध्देकडे वाढत जाणारा कल, शिक्षणाचा अभाव, वाढती सामाजिक दरी आणि तत्सम मानवी जीवनाला ग्रासून टाकणाऱ्या विघातक बाबींचा पगडा मोठ्या प्रमाणवर असतानादेखील लोकांना आपल्या वाटाव्या अशा त्यांच्याच भाषेत आणि त्यांच्याच दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन आपल्या तर्कसंगत विवेचनामुळे जनतेच्या श्रद्धांना अजिबात धक्का लागू न देता, त्यांनी समाजपरिवर्तनाचे कार्यमोठ्या प्रमाणावर केले. संत गाडगेबाबांनी लोकांच्या प्रबोधनासाठी माध्यम म्हणून कीर्तनाचा अतिशय प्रभावीपणे वापर केला. शिक्षणाचा अभाव असलेल्या घरातून डेबुजी झिंगराजी जाणोरकर नावाचा सामान्य माणूस समाजपटलावर येतो आणि गावोगावी शिक्षणाचे यज्ञ पेटवून समाजाला शिक्षित, सुशिक्षित आणि सर्जनशील बनवण्याचा यशस्वी प्रयत्न करतो, ही गोष्ट विसाव्या शतकातील महाराष्ट्राची राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक बाबींचा विचार करता आश्चर्यकारक आहे. संत गाडगेबाबा हे काही समाजातील अनिष्ठ रूढी-प्रथा-परंपरा आणि तत्सम विघातक गोष्टींवर फक्त टीका करून गप्प बसणारे वाचाळवीर नव्हते. तर आपल्या कीर्तनाने महाराष्ट्रभर प्रबोधन करत सामाजिक सुधारणांवर भर देत आपल्या रचनात्मक कार्याने नवा मानदंड निर्माण करून, तितकाच सशक्त पर्याय देऊन मोठ्या प्रमाणावर समाजात बदल घडवून आणणारे क्रियाशील समाजसुधारक होते. त्यांच्या कार्याची पार्श्वभूमी अभ्यासताना त्यांची सामाजिक-आर्थिक आणि एकूणच वैचारिक समज ज्या विचारधारेने पक्की केली त्याचा अभ्यास केल्यानंतर किंवा गाडगेबाबांच्या जीवनकार्याचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, गाडगेबाबांच्या जडणघडणीमध्ये समाजसुधारकांचे अग्रणी महात्मा जोतिराव फुले यांचा आणि सत्यशोधक समाजाचा मोठा वाटा आहे.

जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी सहभोजनाचा पर्याय त्यांनी पुढे आणला. "हिंदुस्तानले लागलेला शिवाशिवीचा डाग आपल्याला पुसून टाकायचा आहे", हा संदेश त्यांनी आपल्या कीर्तनातून दिला. तत्कालीन शेतकऱ्याची परिस्थिती ही निसर्ग आणि सावकार या दोहोंकडून नाडली जात होती. शेतकऱ्यांचे अज्ञान हेच सावकारशाहीच्या अनिर्बंध दमनाला कारणीभूत आहे हे गाडगेबाबांनी ओळखले होते. त्यांनी आपल्या कीर्तनातून शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन या सावकारशाहीविरुद्ध प्रबोधन केले. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून केलेले हे प्रबोधन म्हणजे शेतकऱ्यांच्या मुक्तीचे आंदोलनच होते. 'बुडती हे जन न देखवे डोळा। म्हणूनी कळवळा येत असे' या उक्तीप्रमाणे गाडगेबाबांनी आयुष्यभर सत्यशोधकीय भूमिकेतून समाज सुधारण्याचे कार्य अविरतपणे केले.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, अस्पृश्योद्धार, बालविवाहाला विरोध, विधवाविवाहाचा पुरस्कार, शेतकऱ्यांचे प्रश्न, सावकारशाहीचा जुलूम, ब्राह्मणी शोषण, बालहत्याप्रतिबंधक गृह अशा व्यापक पातळीवर काम केले होते. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या प्रमाणावर समाजप्रबोधन केले. महात्मा फुले यांचा हा वारसा राजर्षि शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे तितक्याच सक्षमपणे चालवला. संत गाडगेबाबासुद्धा सत्यशोधक चळवळीचे पाईक आणि वाहक होते. महात्मा फुले यांनी सामान्यजनांच्या, स्त्रीयांच्या, शोषितांच्या ज्या प्रश्नांसाठी आयुष्यभर लढाई उभी केली नेमक्या त्याच प्रश्नांसाठी गाडगेबाबांनीसुद्धा आयुष्यभर संघर्ष केला. महात्मा फुले यांची 'निर्मिक' ही संकल्पना संत गाडगेबाबांनी बहुजन समाजात कीर्तनाच्या माध्यमातून रुजवली. शेतकऱ्यांना त्यांच्या गुलामीची, अवनतीची, शोषणाची कारणे जशी महात्मा फुले यांनी सांगितली तशीच ती गाडगेबाबांनी कीर्तनातून गावोगावी जाऊन सांगितली. 'सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नको मध्यस्थी' या संदेशातून ज्याप्रमाणे महात्मा फुले यांनी भिक्षुकी यंत्रणेला विधायक विरोध केला आणि ती यंत्रणा उलथवून टाकण्याचा प्रयत्न केला तसाच विरोध गाडगेबाबांनी कीर्तनातून केला.

**विद्येविना मती गेली**, **मतीविना नीती गेली**,

**नितीविना गती गेली**, **गतीविना वित्त गेले**,

**वित्ताविना शूद्र खचले**, **इतके अनर्थ एका अविद्येने केले.**

हा महात्मा फुले यांचा विचार एका बाजूला आणि संत गाडगेबाबांनी "हे लोक गरीबीत का रायले? कारण त्याले विद्या नाही. उपाशी रहा पण शाळेत जा", हा जो संदेश आहे तो एका बाजूला घेऊन पाहिला असता, त्यातील एक समान सूत्र आपल्याला दिसते आणि ते म्हणजे दोघांनीही शिक्षणाला दिलेला अग्रक्रम आणि आपल्या गुलामीचे सर्वात महत्त्वाचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे, हा दिलेला संदेश. महात्मा फुले यांच्या समाजक्रांतीचा उल्लेख संत गाडगेबाबांनी अनेकदा आपल्या कीर्तनातून केला आहे. "शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी तळमळणारा शेतकरी म्हणजे महात्मा फुले", असे महात्मा फुलेंच्याबाबत गौरवोद्गार संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनांमधून काढल्याचे सर्वज्ञात आहे. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीने ज्या प्रश्नांवर रान उठवले, त्याच प्रश्नांना घेऊन सत्यशोधक गाडगेबाबांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला, आपल्या वाणीने महाराष्ट्रातील तत्कालीन प्रबोधनाला मोठे बळ दिले. महात्मा फुलेंनी चालवलेली अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ गाडगेबाबांनी अत्यंत ताकतीने पुढे नेली. सामूहिक भंडाऱ्याचे आयोजन केले. सर्व जाती-जमातीचे आणि धर्माचे लोक एका पंक्तीत बसवून त्यांनी जातीव्यवस्थेवर प्रहार केला. अर्वाचीन महाराष्ट्रातल्या जातीनिर्मुलनाला त्यांनी रसद पुरवली. अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याला त्यांनी गती दिली.

स्वतःची जात कधी महार- तर कधी मांग ही सांगितली आणि प्रसंगी उच्चवर्णीय-उच्चजातीय लोकांच्या रोषाला बळी पडून मारही खाल्ला. परंतु अस्पृश्यतेचा 'याची देही, याची डोळा' अनुभव घेण्यासाठी, अस्पृश्यांच्या वाटेला येणारी मानहानी आणि अस्पृश्यतेच्या झळा सोसण्यासाठी आणि त्याचे प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी गाडगेबाबांनी ही केलेली त्यावेळची एक कृती होती. धर्मशाळेचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी चोखामेळा धर्मशाळा स्थापन केली आणि 1949 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पीपल्स

एज्युकेशन सोसायटीकडे हस्तांतरित केली. मुंबई सरकारने अस्पृश्यता निवारणाचे काम श्री गाडगे महाराज मिशनवर सोपवले होते. ही बाब लक्षात घेता गाडगेबाबांच्या कार्याची महती पटते आणि तत्कालीन शासनालासुद्धा त्यांच्या कार्याची घ्यावी लागलेली दखल आणि त्यांच्यावरील विश्वास यातून दिसून येतो. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी कीर्तनाचा वापर केला. कर्मवीर भाऊराव पाटील स्थापित रयत शिक्षण संस्थेचे अनुदान तत्कालीन मुंबई सरकारने बंद केले, त्यावेळेस संत गाडगेबाबा बाळासाहेब खेरांना भेटले आणि ते अनुदान पूर्ववत करण्यासाठी त्यांनी खेरांना विनंती केली. गाडगेबाबांच्या विनंतीवरुन ते अनुदान पुन्हा सुरू केले गेले. बाबांनी कीर्तनातून रयत शिक्षण संस्थेला मदतीचे आवाहन केले. गाडगेबाबांचे एक अनुयायी बंडो गोपाळ मुकादम यांनी एक लाख रुपये रोख आणि जमीन दिल्याचे इतिहासात नमूद आहे. पंजाबराव देशमुख यांच्या शिवाजी शिक्षण संस्थेलाही त्यांनी मोठ्या प्रमाणावर मदत केलेली होती.

‘ जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा’ या संतोक्तीप्रमाणे अमरावतीला तपोवननगर येथे मेहेरबाबांच्या आश्रमात जाऊन कुष्ठरुग्णांची सेवा गाडगेबाबांनी केलेली आहे. महिला सक्षमीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर गाडगेबाबांनी काम केले होते. बाळंतपणादरम्यानचे मृत्यू टळावेत म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र मोठ्या प्रमाणावर स्थापन करण्यावर त्यांनी भर दिला. महिला कीर्तनकारांना प्रोत्साहन दिले. मीराबाई शिरकर आणि गयाबाई मनमाडकर ही त्याची दोन उत्तम उदाहरणे आहेत. कुटुंबनियोजनाचे महत्त्व समाजाला त्यांनी त्यावेळी समजावून सांगितले. हुंड्याला विरोध करणे, बालविवाहाला विरोध, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार त्यांनी केला. गाडगेबाबा हे फक्त टीका करून गप्प बसणारे निष्क्रिय टीकाकार नव्हते. तर समाजातील ज्या विघातक प्रथांवर त्यांनी टीका केली त्यांस सशक्त पर्याय देऊन ते त्यामध्ये बदल घडवून आणण्यामध्ये अग्रणी होते. त्यांनी आपल्या विधवा सुनेचा पुनर्विवाह संपतराव तऱ्हेकर यांच्याशी केलेला होता. धर्मशाळा, आश्रमशाळा, आदिवासी मुलांसाठी शाळा, अन्नछत्र, पाणपोया, दवाखाने, कुष्ठरुग्णांची सेवा, वस्त्रदान या गोष्टीही गाडगेबाबांनी केल्याला इतिहास साक्षी आहे. गाडगेबाबांच्या एकुण कार्याचा आवाका हा फुलेप्रणीत सत्यशोधक समाजाच्या विचारधारेकडे आणि कार्याकडे घेऊन जातो.

संत गाडगेबाबांनी रोकडा धर्म सांगितला. त्या धर्माची दशसूत्री खालीलप्रमाणे होती-

| | |
|---|---|
| **भुकेलेल्यांना- अन्न**, | **तहानलेल्यांना-पाणी**, |
| **उघड्या-नागड्यांना- वस्त्र**, | **बेघरांना- आसरा**, |
| **गरीब मुला-मुलींना- शिक्षण**, | **अंध-अपंग-रोग्यांना- औषध**, |
| **बेकारांना- रोजगार**, | **पशुपक्षी आणि मुक्या प्राण्यांना- अभय**, |
| **दुःखी आणि निराशांना- हिंमत**, | **गरीब तरुण-तरुणींचे- लग्न.** |

उपरोल्लिखित दशसूत्रीची वैचारिक नाळ ही महात्मा फुलेंसोबत आणि पर्यायाने सत्यशोधक समाजाशी जोडलेली आहे. गाडगेबाबा हा काही आधुनिक महाराष्ट्रात जन्माला आलेला केवळ एक संत नाही तर तो एक विचार आहे. समाजाला सर्व प्रकारच्या विषमतेतून मुक्तीच्या दिशेने घेऊन जाणारा विचार. समाजाला भयमुक्त करणारा विचार, शतकानुशतके अंधारात चाचपडत असणाऱ्या

समाजाला प्रकाशाकडे नेणारा विचार, हा विचार सत्यशोधकीय परंपरेतून आलेला आहे. शोषणव्यवस्था, धार्मिक पाखंडीपणा, अस्पृश्यता आणि अज्ञान याविरुद्ध एक जनआंदोलन गाडगेबाबांनी उभारले.

**संत गाडगेबाबांच्याबद्दल समकालीनांनी काढलेले गौरवोद्गार यानिमित्ताने पाहणे अनुचित होणार नाही.**

**आचार्य अत्रे- "सिंहाला पहावे वनात, हत्तीला पहावे रानात, तर गाडगेबाबांना पहावे कीर्तनात"**

**गो.नि.दांडेकर- "गाडगेबाबांचे संपूर्ण जीवन म्हणजे धगधगत्या अग्नीकुंडाची कहाणी"**

प्राचार्य शिवाजीराव भोसले- ''विश्वंभर पाहणारा, जगात जगदीश शोधणारा, जनी जनार्दनाचे चिंतन करणारा कर्मयोगी म्हणजे संत गाडगेबाबा''

**आचार्य अत्रे- "महाराष्ट्रातील समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ"**

**प्रबोधनकार ठाकरे- "समाजवादी सत्यशोधक"**

**कर्मवीर भाऊराव पाटील- "महाराष्ट्राचा आधुनिक तुकाराम"**

**समारोप**

काळाच्या पुढे असणारे लोक आपल्या कार्यकर्तृत्वाने समाजाला वेगळ्या उंचीवर घेऊन जात असतात आणि समाजाला विधायक मार्गावर आणण्याचे काम करत असतात. समाजातील साचलेपण घालवून समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम करत असतात. समाजातील अनिष्ठ रूढी-प्रथा-परंपरा, कर्मकांड, शोषण यांवर फक्त टीका करून गप्प न बसता विधायक, रचनात्मक कार्यक्रम आपल्यासमोर ठेवत असतात. यादृष्टीने कर्तृत्ववान व्यक्तीचा समग्र व ऐतिहासिक अभ्यास समाजाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने उपयुक्त आणि मार्गदर्शक असतो.

संत गाडगेबाबांच्या वारशाचा विचार करता त्यांच्या कार्याला सामाजिक व ऐतिहासिक संदर्भ प्राप्त झालेले आहेत. स्वतःच्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी इतिहासाच्या कालपटावर व्यापक असा प्रभाव निर्माण केला आहे. यादृष्टीने महाराष्ट्राच्या सामाजिक अभिसरणामध्ये, समाजसुधारणेच्या क्षेत्रामध्ये त्यांचा एकूणच मोठा प्रभाव जाणवतो. संत गाडगेबाबांनी निरक्षर असताना सुरू केलेल्या शिक्षणाच्या या यात्रेमध्ये निरक्षरांपासून ते बॅरिस्टरांपर्यंत, पत्रकारांपासून ते लेखकांपर्यंत समाजातील विविध पातळीवरील लोक सामील झालेले होते. संत गाडगेबाबा हे खरे सत्यशोधक समाजाचे वारसदार होते. त्यांनी महात्मा फुलेंनी दाखवून दिलेल्या वाटेवरून प्रवास केला. अस्पृश्यतानिवारण, मद्यपानबंदी, कर्मकांडाचा निषेध, अंधश्रद्धेवर प्रहार, कुष्ठरुग्णांना आधार, भुकेकंगालांना अन्नदान, ग्रामसफाई, सणसमारंभ आणि विवाहावेळी साधेपणाचा आग्रह, श्रमप्रतिष्ठेचा पुरस्कार, स्त्री-पुरुष समानता हेच ध्येय डोळ्यांसमोर ठेऊन संत गाडगेबाबांनी आयुष्यभर सामाजिक कार्यात योगदान दिले. नेमक्या याच प्रश्नांना महात्मा फुले यांनी आपल्या एकुण जीवनकार्यात अग्रक्रम दिला होता.

'गाडगेबाबा जर गाव खेड्यात हिंडले नसते तर हा महाराष्ट्र पुन्हा अनेक वर्षे अज्ञान, अंधश्रद्धा, पशुहत्या, रुढी, परंपरा आणि शोषणाच्या क्रूर सावटात सापडला असता', असे संत गाडगेबाबांच्या चरित्राचे अभ्यासक श्री. संतोष अरसोड म्हणतात. संत

गाडगेबाबांच्या विचारांना, कार्याला, लढ्याला सत्यशोधक समाजाचे अधिष्ठान होते. महात्मा फुले यांनी केलेली सत्यशोधकीय मांडणी संत गाडगेबाबांनी पुढे नेण्याचे कार्य केले. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीने ज्या प्रश्नांवर रान उठवलं, त्याच प्रश्नांना घेऊन सत्यशोधक गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजप्रबोधनाचे कार्य केले. महाराष्ट्रातील संत चळवळीने उभ्या केलेल्या कार्याला आपल्या प्रखर बुद्धिवादाने प्रशस्त करण्याचे काम संत गाडगेबाबांनी केले. संत गाडगेबाबांनी समाजातल्या शेवटच्या माणसासाठी सत्यशोधकीय भूमिकेतून सांस्कृतिक लढाई उभी केली. संत गाडगेबाबांनी आपल्या सत्यशोधकीय भूमिकेतून समाजाला धार्मिक, मानसिक, आर्थिक भ्रमातून मुक्त करण्याचे कार्य केले, ज्ञानवंचितांना ज्ञानाभिमुख करण्याचे कार्य केले आणि शिक्षण हा समाजविकासाचा पाया आहे हे त्यांनी आपल्या कीर्तनातून सिद्ध केले. गाडगेबाबांना या सर्व लढाईमध्ये सत्यशोधक चळवळीने रसद पुरवण्याचे काम केले आहे.

आयुष्यभर कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, अंगावर चिंध्या पांघरून, ज्या गावात मुक्काम असेल तो सारा गाव स्वच्छ करून, तळहातावर भाकरी घेऊन खाणाऱ्या, मोठमोठ्या धर्मशाळा बांधूनही आपण स्वतः मात्र आयुष्यभर झोपडीत राहणाऱ्या, कोट्यवधी रुपयांच्या देणग्या मिळूनही एक पैचाही मोह न ठेवणाऱ्या गाडगेबाबा नावाच्या फकिराने विसाव्या शतकातील समाजसुधारणेच्या क्षेत्रामध्ये घेतलेली सत्यशोधकीय भूमिका अभ्यासणे अपरिहार्य बनले.

**संदर्भग्रंथ यादी**

१. अरसोड संतोष, प्रबोधन पंढरीचा क्रांतिकारी संत गाडगेबाबा, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०२१
२. ठाकरे केशव सीताराम, संत गाडगेबाबा, न्यू इरा पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०२४
३. दांडेकर गो. नी., श्रीगाडगे महाराज, मृण्मयी प्रकाशन, पुणे, २०१६
४. दुधे अविनाश (संपा.), संत गाडगेबाबा विशेषांक, मीडिया वॉच पब्लिकेशन, अमरावती, २०२४
५. नरके हरी (संपा.), महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८
६. भोसले द. ता., लोकोत्तर गाडगेबाबा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००९
७. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङमय गृह, मुंबई, २०१६
८. सरदार गं. बा., महात्मा फुले: व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००५

# ११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय

**डॉ. शिवाजी संभाजी गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव.

**प्रस्तावना**

आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान असणारे, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल, १८९१ रोजी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील दलित शोषित समाजाच्या न्याय हक्कांसाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यांना समतेची वागणूक मिळावी. देशातील जातिव्यवस्थेला विरोध आणि भारतीय समाजाच्या विकासासाठी लढा दिला. यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तथा भीमराव रामजी आंबेडकर यांना सामाजिक न्यायाची संकल्पना अभिप्रेत काय होती, याची जाणीव देशामधील तरुण पिढीला होण्यासाठी हा लेख प्रपंच आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक न्याय स्पष्ट करणे
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्याय स्पष्ट करणे
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक न्याय स्पष्ट करणे
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय न्याय स्पष्ट करणे

आपल्या भारत देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असतानासुद्धा देशातील दलित-शोषित समाज स्वतंत्र झाला का? या प्रश्नाचे उत्तर आपणा सर्वांना शोधावे लागेल. म्हणजे बाबासाहेबांच्या संकल्पनेतील सामाजिक न्यायाची संकल्पना सहज लक्षात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायाची संकल्पना स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेवर आधारित आहे; परंतु भारतीय राज्य घटनेमुळे दलितांवरील अत्याचार काही प्रमाणात कमी झाले आहेत. कारण भारतीय राज्य घटना कोणत्याही जातीची पर्वा करीत नाही. देशातील नागरिकांना समान अधिकारांची हमी देते. दुर्दैव असे की, भारतीय राज्य घटनेची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही याचा परिणाम लोक सामाजिक न्यायापासून वंचित राहतात.

**सामाजिक न्याय**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, सामाजिक न्याय म्हणजे समाजातील सर्व फायदे आणि विशेषाधिकार याचे सर्व सदस्यांनी सामायिक केले पाहिजेत. कोणत्याही विशिष्ट विभागाबाबत संरचनात्मक असमानता असल्यास, सरकारने अशा असमानता दूर करण्यासाठी सकारात्मक पावले उचलायला हवी. सोप्या भाषेत ते सकारात्मक उदारमतवादाच्या कल्पनेशी आणि कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेशी संबंधित आहे. हे अशा प्रकारचे राज्य आहे ज्याची कार्ये केवळ कायदा आणि सुव्यवस्थेपुरती

मर्यादित नाहीत; परंतु स्वत:ला मदत करण्याच्या स्थितीत नसलेल्या लोकांची काळजी घेण्यासाठी विस्तारित आहेत. सामाजिक न्याय नैतिक मूल्यांवर आणि स्वाभिमानावर आधारित आहे. भारतीय राज्य घटनेद्वारे विनियमित सामाजिक, राजकीय आणि आर्थिक न्यायांद्वारे न्याय होतो असा ठाम विश्वास बाबासाहेबांना होता.

एक व्यक्ती, एक मत हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतावादी संदेश दिला. देशातील समाजव्यवस्थेला आव्हान म्हणून जाती आणि वर्गावर उभी असलेली विद्यमान समाजव्यवस्था बदलण्यासाठी लढा दिला. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता, मानवी हक्क, कामगार, महिला हक्क आणि सर्वाहून अधिक अशा विविध मुद्द्यांचा पुरस्कार करून 'सामाजिक न्यायाचे' बीज रोवण्याचा प्रयत्न केला. सामाजिक न्यायाची संकल्पना 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' या तत्त्वावर आधारित आहे. त्यामुळे देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळायलाच हवी. त्यासाठी सामाजिक न्यायाचे क्षेत्र मजबूत करणे आवश्यक आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समता आणि तर्कसंगततेवर समाजाची पुनर्रचना करायची होती. त्यामुळे त्यांनी विचार केलेल्या सामाजिक रचनेवर आधारित जातीला विरोध केला, ज्यात वर्गीय असमानता आहे. हिंदू समाज हा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णांनी मिळून बनलेला आहे. हे वर्ग जात नावाचे एक बंदिस्त एकक बनले आणि त्यांनी लाभ आणि विशेषाधिकारांचे असमान वितरण केलेले दिसते. समता आणि बंधुत्वावर आधारित समाज घडवायचा असेल, तर जातिव्यवस्था संपुष्टात आलीच पाहिजे, यावर बाबासाहेबांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे अशा भेदभावाला बळी पडून त्यांनी या व्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी जीवाचे रान करण्याचा निर्णय घेतला.

भारताचे पहिले कायदा व न्याय मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचा जवळचा संबंध आहे. अस्पृश्यता हा जातिव्यवस्थेचा विस्तार आहे म्हणून दोघांमध्ये कोणतेही विच्छेद होऊ शकत नाही. दोन एकत्र उभे राहतात आणि एकत्र पडतात असे त्याचे मत होते. म्हणून त्यांनी जातिव्यवस्था संपुष्टात आणणे आणि समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या आधारे समाजाची पुनर्रचना केल्यास सामाजिक न्याय मिळू शकेल, असे मत बाबासाहेबांनी व्यक्त केले होते. त्यांनी देशातील कामगारांच्या कल्याणासाठी सुट्टीचे फायदे, मातृत्व लाभ, आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक सुरक्षा यांचाही पुरस्कार केला. म्हणून स्वातंत्र्य, समानता, नैतिकता आणि बंधुत्वावर आधारित राज्य नियंत्रण समाज स्थापन करण्यासाठी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा सर्व क्षेत्रांमध्ये सर्व प्रकारच्या समानता लागू करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारतातील कामगार कल्याणासाठी मार्गदर्शक तत्त्वे असलेली कामगार सनदही मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना समानतेचा हक्क मिळावा यासाठी भारतीय राज्य घटनेतील कलम १४, १५, १६, १७ अनुक्रमे समानता, भेदभाव करण्यास मनाई, सार्वजनिक सेवायोजनांच्या बाबींमध्ये समान संधी आणि अस्पृश्यता नाहीशी करणे याची अंमलबजावणी नि:पक्षपातीपणे झाली पाहिजे.

थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की, देशात भारतीय राज्य घटनेची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली असती तर आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा सामाजिक न्याय देशातील जनतेला मिळाला असता.

मात्र देशातील दलित समाजावरील वाढत्या अत्याचाराचा विचार करता त्यांना सामाजिक न्याय मिळण्यासाठी अजून किती वर्षे वाट पाहावी लागेल हे सांगणे कठीण आहे.

**आर्थिक न्याय**

या देशातील आर्थिक परिस्थिती अतिशय गुंतागुंतीचे व जगातील परिस्थितीपेक्षा वेगळी आहे. येथे धर्माने प्रत्येक जातीला काम वाटून दिले असल्याने काहींना अर्थ प्राप्तीचा धंदा मिळाला व काहींना त्यांच्यावर आर्थिक दृष्ट्या अवलंबून राहावी लागले. त्यामुळे हजारो वर्षे काही लाचार,दरिद्री तर काही सुखचैनीत लोळणारे श्रीमंत असा फरक राहिला. त्यांनी अत्यंत मूलगामी विवेचन आपल्या लेखन भाषणातून बाबासाहेबांनी केले आहे. म्हणून त्यांनी आपल्या समाजाला परंपरेने व धर्माने सांगितलेले व्यावसाय आणि धंदे सोडून देण्यास सांगितले. ज्या कामाला प्रतिष्ठा नाही ज्या कामामुळे आर्थिक परिस्थितीत कोणताच बदल होत नाही उलट लाचारी दारिद्र्य वाढते व गुलामीची वागणूक मिळते ती कामे करू नका. असा बाबासाहेबांचा संदेश मिळताच दलित समाजाने परंपरेने आलेली गावकीची कामे नाकारली त्यासाठी त्यांना सवर्ण हिंदू कडून भयानक छळ सोसावा लागला. तो छळ सहन करून बाबासाहेबांनी उभारलेल्या आर्थिक लढ्यात दलित समाज सहभागी झाला.देशाच्या आर्थिक विकासाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार स्पष्ट करताना वामन निंबाळकर लिहितात की, " डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक धोरणे चलनवाढ,भाववाढ, शेतीच्या समस्या,शेतीतील उत्पन्नावरील निर्धारित किमती, इत्यादी विषयी त्यांनी मूलभूत विचार मांडले. गरिबी, लोकसंख्येचा प्रश्न याबाबतही त्याने स्पष्ट मार्गदर्शन केले आहे.परंतु येथील सामाजिक व्यवस्था आर्थिक परिस्थितीचा पाया आहे असे त्यांचे ठाम मत होते.म्हणून त्यांनी राज्यघटनेत समाजातील सर्व स्तरांना कोणताही व्यवसाय धंदा करण्याची समान संधी दिली यातच त्यांच्या आर्थिक न्यायाचा हेतू स्पष्ट होतो".

**शैक्षणिक न्याय**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजाला संदेश दिला होता की, "शिका" नुसते शिका म्हणून भागणार नव्हते.शिक्षणाने माणूस कसा मोठा होतो. डोळस होतो. शिक्षणाच्या आवश्यकता उपयुक्तता आणि जीवनात शिक्षणाचे महत्त्व इत्यादी विषयाच्या अनुषंगाने बाबासाहेबांनी या समाजात जागृती निर्माण केली. त्यामुळे या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटले. ज्या समाजाला शिक्षणाचे दरवाजे हजारो वर्ष बंद होते ते उघडल्याने त्यांच्या उत्साहाला उधान येणे स्वाभाविकच होते.मुले मुली शाळेत जाऊ लागली. गरिबी त्यांना ज्ञान लालशेपासून थांबू शकली नाही. उच्च शिक्षणासाठी गरीब पालकांनी घरावरील टीनाचे पत्रे, भांडीकुंडी, किडूक मुडूक मोडून गहाण ठेवले,विकले आणि आपल्या मुला मुलींना शिकून बाबासाहेबांचा संदेश तंतोतंत पाळला. शिक्षण घेऊन आलेली ही मुले वाचू लागली.बोलू लागली. बाबासाहेब एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी तळागाळातील समाजासाठी १९४५ ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. आणि त्या संस्थेच्या वतीने मुंबई सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबाद येथे १९४९ साली मिलिंद महाविद्यालय काढले. आज या संस्थेची बरीच महाविद्यालय विद्यालय वस्तीगृह इत्यादी शैक्षणिक संस्था आहेत. या संस्थांमधून हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. हजारो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात उच्च

अतिउच्च महत्त्वपूर्ण पातळ्यावर पदावर कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक न्याय संबंधी विचार स्पष्ट करताना वामन निंबाळकर लिहितात, "या शैक्षणिक चळवळीचा फायदा सामाजिक, साहित्यिक आणि एकूण सांस्कृतिक जाण येण्यास झाला. समाज प्रबुद्ध झाला.आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या अनेक शैक्षणिक संस्था आहेत या समाजात स्वतःची जाण आणि स्वाभिमान या दोघांची निर्मिती व वाढ करणे हाच त्यांच्या शैक्षणिक न्यायाचा उद्देश होता."

**राजकीय न्याय**

स्वातंत्र्यलढ्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेचे महत्व तत्कालीन नेत्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु गांधीजीसह सर्व नेत्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले नाही. गांधीजींनी उभारल्या हरिजन सेवा संघाचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हे वरवरचे व तकलादु होते. देशाला स्वातंत्र्य मिळाले की या प्रश्नाकडे पाहता येईल असे या काँग्रेस नेत्यांना वाटे पण तसे होणे शक्य नव्हते.म्हणून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात बाबासाहेबांनी सामाजिक न्यायासाठी राजकीय चळवळीचा उपयोग हत्यार म्हणून केला. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. त्यांना पुरेपूर ठाऊक होते. म्हणून त्यांनी अस्पृश्यांना सत्तेत योग्य वाटा मिळाला पाहिजे या मागणीवर वेळोवेळी भर दिला. त्यानंतर मिळालेल्या संधीचा अधिकारांचा जास्तीत जास्त उपयोग दलितांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीतून वर आणण्यासाठी केला.

१९४२ च्या जुलैमध्ये व्हाईसरॉयच्या हुकमांवर गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलवर बाबासाहेबांची नियुक्ती झाली व त्यांना मजूर खात्याचे मंत्री करण्यात आले तेव्हा त्यांनी मजुरांच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या. मालक मजुरांचे संबंध आणि मालकांनी मजुरांचे हित यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना दिल्या. मागासवर्गीयांसाठी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिल्या, अस्पृश्यांची लष्करात बंदी झालेली भरती सुरू केली. अशा प्रकारच्या कितीतरी गोष्टी त्यांनी सत्तेत सहभागी होऊन केल्या इसवी सन १९३६ साली स्वतंत्र्य मजूर पक्ष व नंतर १९४२ शेडूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना ही काळाणुरूप बदलत्या राजकीय परिस्थितीची दर्शक ठरतात. भारतीय राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी स्वीकारून ती लिहिताना आर्थिक दृष्ट्या गोरगरीब व सामाजिक दृष्ट्या दलित असलेल्या समाजाचा व स्त्रियांचा विचार त्यांनी केला. त्यांच्या राजकीय, आर्थिक,सामाजिक न्यायाबद्दल ते अतिशय जागृत होते म्हणून त्यांनी त्याबाबत घटनेत अनेक तरतुदी केल्या. घटना लिहिताना त्यांच्यापुढे भारताचे अखंड लोकशाहीची बळकटी इत्यादी मुद्दे अग्रक्रमाने होते. या वेगवेगळ्या राजकीय भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेबांची दलितांच्या उत्थानाची भूमिका मात्र कुठेही बदललेली दिसत नाही. देशाची प्रगतीसंबंधी बाबासाहेब लिहितात, "जोपर्यंत दलित सामाजिक आर्थिक दृष्ट्या इतरांच्या बरोबर येत नाही तोपर्यंत आमच्या देशाची प्रगती झाली असे मान्य करायला बाबासाहेब तयार नव्हते."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात येते द्विपक्षीय लोकशाही असावी डाव्या आणि उजव्या असे दोनच पक्ष असावे असे त्यांचे मत नंतर झाले होते.सत्तास्थानी असलेल्या काँग्रेसच्या विरोधात डाव्या विचारसरणीचा एकच बलाढ्य विरोधी पक्ष असावा व त्याचे नाव रिपब्लिकन पक्ष असावे असा विचार त्यांनी मांडला डॉ. राम मनोहर लोहिया व इतर डावे या पक्षांच्या नेत्यांना तसा विचार त्यांनी बोलून दाखविला होता त्यानंतर त्यांचे लवकर झालेल्या महापरिनिर्वाणामुळे हा विचार पुढे अमलात आला नाही.

**समारोप**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची भूमिका स्पष्ट होती त्यांना सर्वांची बलाढ्य एक्झिट अभिप्रेत होती सामाजिक आर्थिक समता प्रस्थापित करून भारतीय लोकशाही आणि धर्मातील राष्ट्र बलशाली करणे हे ध्येय उद्दिष्ट त्यांच्यासमोर होते धर्मांधतेमुळे देशाचे तुकडे होऊ शकतात हा देश जसा हजारो वर्ष गुलामीत राहिला तसा पुन्हा गुलाम होऊ शकतो हा त्यांचा स्पष्ट व ठाम विचार होता. त्याची चिन्हे आज आपणाला दिसू लागली आहेत. आज सामाजिक चळवळीत कोणतीच एक सूत्रतता व कार्यक्रम राहिला नाही. संघटना अनेक असल्यामुळे अन्याय अत्याचार वाढले बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर या संघटनात फाटाफुटी झाली परिणाम असा झाला की, दलितांच्यावर अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

तसेच शैक्षणिक व आर्थिक चळवळीत ही शिथिलता आली आहे. शिक्षणाचे प्रमाण घटले.बेकारी वाढली.सवर्णांच्या शैक्षणिक संस्था म्हणजे पोट भरण्याची दुकाने झाली. मग दलितांच्या शैक्षणिक संस्था त्याला अपवाद कशा असतील.नोकरी लागल्याने काम धंद्यात यश प्राप्त झाल्याने ज्यांची आर्थिक परिस्थिती बदलली त्यांची समाजाची नाळ तुटली.कोणत्याही चळवळीशी त्यांनी आपला संबंध ठेवला नाही. जो तो आपल्या पुरते पाहू लागला या सर्व दूषित वातावरणातही दलित समाजामध्ये कुठेही अन्याय, अत्याचार झाला की,सर्व संघटना एकत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावावर एकजूट होऊन धावून येतात. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांसाठी पुढे येताना दिसतात याचे उदाहरण" रिडल्स ऑफ हिंदूइझम "या मोर्चावेळी दिसून आले. आणि आज ही वेळोवेळी येताना दिसते.

**संदर्भसूची**

१. वामन निंबाळकर 'आंबेडकरी विचारांची दिशा' प्रथम आवृत्ती प्रबोधन प्रकाशन नागपूर १९९०. पृ. क्र. ६३.

२. तत्रेव, पृ. क्र. ६०

३. तत्रेव, पृ. क्र. ६१

# १२. भारतीय राज्यघटना आणि स्त्रिया

**सनदकुमार शंकर खराडे**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**गोषवारा**

प्राचीन काळापासून भारतीय इतिहासात स्त्रियांचे एक स्वतंत्र अस्तित्व जाणवते परंतु त्यांची इतिहासात नोंद कायम वंचित राहिलेली आढळते. भारतात स्त्रियांच्या आजच्या स्थितीला जबाबदार असलेल्या स्त्री- पुरुष  असमानता कशी निर्माण झाली हे अभ्यासणे खूप महत्त्वाचे आहे. भारतीय राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी स्त्रियांची असणारी समाजातील स्थिती मग ती प्राचीन काळातील असो, मध्ययुगीन काळातील असो किंवा ब्रिटिश राजवटीतील असो, याच बरोबर भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना दिलेले अधिकार यांचा तुलनात्मक अभ्यास या शोधनिबंधात होणार आहे.

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी भारतामध्ये जेवढी स्त्रियांची अवनती झाली तेवढी अन्य कोणत्याही देशात झाली नाही. स्त्रियांना या देशात अत्यंत हिन वागणूक व पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थान देण्यात आले. स्त्रियांच्या या स्थितीला व्यवस्था कारणीभूत आहे, स्त्रियांना परंपरागत गुलामीतून काढून तिला स्वातंत्र्य देण्याचे व तिचा उद्धार करण्याचे कार्य भगवान बुद्ध, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी विविध कालखंडात केले. त्यांनी जे काही स्त्रीमुक्तीसाठी केले त्याला भारतीय इतिहासात तोड नाही.

काळ जसा पुढे सरकेल येणारी पिढी जेंव्हा प्राचीन भारतातील स्त्री जीवन व आधुनिक भारतातील स्त्री जीवन यांचा तुलनात्मक अभ्यास करेल, तेंव्हा महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्यापुढे नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाही. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत स्त्रियांचा समाजातील दर्जा कसा होता हा प्रवास बघणे महत्त्वाचे आहे.

**अश्मयुग काळातील स्त्रिया**

प्राचीन काळात मानव हा रानटी अवस्थेत जीवन जगत होता. नवाश्मयुगात शेतीचा शोध लागल्याने मानव घरे बांधून राहू लागला व स्थिर जीवन जगू लागला. त्यातून कुटुंब व्यवस्थेची निर्मिती झाली त्यातूनच पुढे समाजाची निर्मिती झाली समाज निर्माण झाल्याने स्त्री व पुरुष हे दोन घटक अस्तित्वात आले. परंतु 'शेतीचा शोध' स्त्रियांनी लावल्यामुळे समाजातील स्त्रियांचा दर्जा हा उच्च होता.

**सिंधू संस्कृतीतील स्त्रिया**

सिंधू संस्कृती भारतातील प्रगत नगर संस्कृती होती. या संस्कृतीत भारतातील 'मातृसत्ताक पद्धती' अस्तित्वात होती असे मानले जाते, स्त्रियांचा दर्जा समाजात श्रेष्ठ मानला जात होता. स्त्रिया सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी होत होत्या. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मोठ्या प्रमाणात मातृदेवतेच्या मुर्त्या सापडल्या आहेत. त्या काळातील स्त्रिया नृत्यकलेत प्रगत होत्या. पडदा पद्धत अस्तित्वात नव्हती. तेथील सापडलेल्या पुरातत्वीय साधनांच्या आधारे त्या काळातील स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ होता.

**वैदिक काळातील स्त्रिया**

त्यानंतर वैदिक कालखंडात चातु:वर्ण् व्यवस्था अस्तित्वात आली, पितृसत्ताक पद्धती याच काळात भारतात अस्तित्वात आली. ज्या पद्धतीमुळे समाजातील पुरुषांचे स्थान श्रेष्ठ झाले व स्त्रियांना दुय्यम दर्जा देण्यात आला. वैदिक काळात वर्णव्यवस्था अस्तित्वात आली असली तरी वैदिक साहित्यातून स्त्रियांचा दर्जा कसा होता याची माहिती मिळते वैदिक काळात स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाचा अधिकार दिला होता. त्या काळात होणाऱ्या वादविवाद, चर्चा यामध्ये स्त्रिया सहभागी होत असत. अपाला, घोषा, लोपामुद्रा, इंद्रायणी, उर्वशी व निवावरी या विद्वान स्त्रियांनी वेदातील काही ऋचांची रचना केली.

**उत्तर वैदिक काळातील स्त्रिया**

उत्तर वैदिक कालखंडात समाजात कर्मकांड मोठ्या प्रमाणात वाढले याच काळात भारतात जातीव्यवस्था निर्माण झाली. याच काळात अनेक हिंदू देव-देवतांची निर्मिती झाली. याच काळात मनुस्मृति ग्रंथाची रचना झाली. मनूने स्त्रियांवर अनेक बंधने घातली त्यामुळे समाजातील स्त्रियांचा दर्जा घसरला. बालविवाह, सती प्रथा, स्त्री शिक्षणावर बंदी, संपत्तीचा अधिकार नाकारण्यात आला. स्त्रियांना क्षुद्र लेखले जाऊ लागले. अशा अनिष्ट प्रथा समाजात निर्माण झाल्या. वेद सुकते रचनारी, यज्ञ करणारी ब्रह्मवादिनी म्हणून गौरवलेली स्त्री मनुस्मृतीने क्षुद्र ठरविली, यामुळे तिच्या मनाची व बुद्धीची वाढ खुंटली.

**बौद्ध काळातील स्त्रिया**

इ.स. पूर्व 6 व्या शतकात भारतात जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. त्यांनी कर्मकांडाला जोरदार विरोध केला. त्यांनी समाजातील जुन्या चालीरीती, जातीव्यवस्था याला प्रखर विरोध केला. बुद्धांनी स्त्री व पुरुष भेद न करता सर्वांना संघात समानतेची वागणूक दिली. महाप्रजापती गौतमी व तिच्या सोबत आलेल्या स्त्रियांना बुद्धांनी संघात स्थान दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर **"Rise and fall of Hindu Women"** या ग्रंथात त्यांनी "भारतीय स्त्रियांच्या अवनतीला व नाशाला बुद्ध नव्हे, तर मनु जबाबदार आहे" असे म्हटले आहे. बुद्धांनी स्त्रियांना ज्ञान मिळावे व आपली प्रगती करून घेता यावी अशी परवानगी बौद्ध धर्मात स्त्रियांना दिली होती. भारतीय स्त्रीला स्वातंत्र्य व प्रतिष्ठा देणारी ती फार मोठी क्रांती होय असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत.

**मध्ययुगीन काळातील स्त्रिया**

मध्ययुगीन काळात भारतीय स्त्रियांच्यात कोणतीही सामाजीक, धार्मिक, आर्थिक प्रगती झाली नाही. पडदा पद्धत याच काळात अस्तित्वात आली. सती प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले पण त्यात कोणालाही यश आले नाही.

**ब्रिटिश काळातील स्त्रिया**

भारतात इंग्रजांचे आगमन झाल्यावर थोड्याफार प्रमाणात सुधारणा होण्यास सुरुवात झाली. भारतात इंग्रजांनी सर्वांसाठी शिक्षण चालू केले, त्यामुळे अनेक समाजसुधारक निर्माण झाले. राजा राममोहन रॉय यांनी 'ब्राम्हो समाजाची' स्थापना करून सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. गव्हर्नर लॉर्ड बेंटिंग यांच्या मदतीने 1829 ला सती बंदीचा कायदा केला.

त्यानंतर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाला महत्व देऊन पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली व स्त्रियांना शिक्षणाची दारी खुली केली आज स्त्रिया सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत त्याचे श्रेय महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना जाते.

**भारतीय राज्यघटना आणि स्त्रिया**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारताचे कायदामंत्री असताना 1 एप्रिल 1948 रोजी 'हिंदू कोड बिलाचा' मसुदा तयार करून संसदेसमोर मांडला त्यात 139 कलमे (1) परिशिष्टे होती हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना दत्तक विधान, विवाह विच्छेदन, घटस्फोटाचा अधिकार, वारसा अधिकार, पोटगीचा अधिकार प्राप्त झाला. 12 ऑगस्ट 1948 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल कायदेमंडळापुढे सादर केले, परंतु हिंदू कोड बिलाला सनातनी करमट हिंदूंनी मोठ्या प्रमाणात विरोध केला. नंतर हिंदू कोड बिल टप्प्या टप्प्याने भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले. त्याची अंमलबजावणी करण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेद्वारे पुढील अधिकार स्त्रियांना मिळवून दिले.

- कलम 29 नुसार प्रत्येक स्त्रीला शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळवून दिला आहे.
- कलम 14 नुसार देशातील सर्व स्त्री-पुरुषांना कायद्याने सर्वांना समान ठरविले व स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार दिला.
- कलम 31(घ) नुसार स्त्रीया व पुरुषांना समान काम व समान वेतनाचा अधिकार दिला.
- कलम 23 (1) नुसार स्त्रियांचा व्यापार व विक्री करण्यास मनाई,
- कलम 25 नुसार धार्मिक विधीत सहभागी होण्याचा अधिकार स्त्रियांना मिळवून दिला.
- कलम 6 अनुसूचित (3) (झ) नुसार नवरा अन्याय व अत्याचार करत असेल तर घटस्फोट घेण्याचा अधिकार स्त्रीला मिळवून दिला.
- कलम 300 (क) नुसार स्त्रीला कुटुंबातील संपत्तीचा हक्क मिळाला.

- कलम 14 नुसार स्त्रियांना व्यवहाराबाबतचे स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला.
- कलम 51 (ड) नुसार स्त्रियांच्या अनिष्ट परंपरावर बंदी आणली.

**समारोप**

वरील कलमे भारतीय स्त्रीला मुक्त करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेद्वारे घटनेत समाविष्ट केली. हिंदू धर्मातील सनातनी व्यवस्थेने व मनूच्या कायद्याने स्त्रियांना व बहुजन समाजाला गुलाम केले होते, म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे दि. 25 डिसेंबर 1927 ला 'मनुस्मृती' जाळली व समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्यायावर आधारित भारतीय राज्यघटना 26 नोव्हेंबर 1949 ला राष्ट्राला अर्पण केली. आज फुले, शाहू, आंबेडकर यांच्या कार्यामुळेच भारतीय स्त्री देशाच्या प्रधानमंत्री, राष्ट्रपती यांसारख्या उच्च पदावर आहेत.

परंतु आज देखील एकविसाव्या शतकात स्त्रिया सर्व क्षेत्रात आघाडीवर असताना देखील कांही प्रमाणात सामाजिक दृष्ट्या, धार्मिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या स्त्रिया स्वतंत्र आहेत का? आजही समाजात त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे का? असे कांही प्रश्न पडतात, जेंव्हा आपण वर्तमानपत्रातील स्त्री अन्यायाच्या, अत्याचाराच्या बातम्या वाचतो. आजही विविध क्षेत्रात स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार तसेच शारीरिक, मानसिक शोषण मोठ्या प्रमाणावर केले जाते, असे निदर्शनास येते.

त्यामुळे भारतात सध्या **'Me Too'** यासारख्या चळवळींनी स्त्री अत्याचाराला वाचा फोडलेली आपल्याला दिसते. स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार कमी करण्यासाठी त्याबाबतचे असणारे कायदे आणखीन कठोर करणे आवश्यक बनलेले आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्री व पुरुष समानता अस्तित्वात येईल.

**संदर्भ ग्रंथ**

१. प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता - डी.डी. कोसंबी
२. भारतीय इतिहासाचा अभ्यास - डी.डी. कोसंबी
३. हिंदू कोडबिल - रत्नाकर गणवीर
४. भारतीय राज्यघटना - डॉ.बाबासाहेब आंबेडकर
५. हिंदू संस्कृती आणि स्त्रिया - डॉ.आ.हं. साळुंखे
६. स्त्री धर्मनीती - पंडिता रमाबाई
७. मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था - कृ.ना.चिटणीस
८. भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान - शरयू अनंतराम
९. आधुनिक महाराष्ट्रातील प्रमुख विचारवंतांचे स्त्रीजीवनाविषयी विचार - सरिता पत्की

# १३. स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखनः तत्त्वज्ञान, पद्धती आणि प्रभाव

**श्री. विशाल तानाजी भानुसे**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

इतिहास म्हणजे फक्त मोठमोठ्या युद्धांचं, राजांचं किंवा साम्राज्यांचं वर्णन नाही; तो तर समाजाच्या रोजच्या जगण्याचा, त्याच्या सुख-दु:खांचा आणि छोट्या-छोट्या घटनांचा आरसा आहे. इतिहास हा समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आणि राजकीय प्रक्रियेचे प्रतिबिंब आहे. स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखन या आधुनिक पद्धती इतिहासाला एक नवीन दृष्टिकोन देतात. स्थानिक इतिहास लेखनातून प्रादेशिक घटना, व्यक्ती, आणि समाजाचे योगदान समजून घेतले जाते, तर सूक्ष्म इतिहास लेखनाद्वारे सामान्य लोकांच्या अनुभवांवर आधारित इतिहासाची निर्मिती होते. या दोन पद्धती इतिहासाचे विकेंद्रीकरण करतात आणि इतिहासाला लोकाभिमुख बनवतात. इतिहासकारांनी दीर्घकाळ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनांवर लक्ष केंद्रित केले असले तरी स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखनाच्या माध्यमातून समाजाच्या विविध स्तरांमध्ये घडलेल्या लहानसहान पण महत्त्वपूर्ण घडामोडींचा अभ्यास शक्य होतो.स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखन या दोन आधुनिक पद्धतींनी इतिहासाला एक नवा चेहरा दिलाय. इतिहासकारांनी कित्येक वर्षं फक्त राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गोष्टींवरच का लक्ष दिलं पण खरं तर समाजाच्या खऱ्या कहाण्या तर त्या छोट्या गावातल्या बाजारात, मंदिरातल्या उत्सवात किंवा एखाद्या शेतकऱ्याच्या झोपडीत दडलेल्या असतात. स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखन या गोष्टी इतिहास लेखनातून बाहेर काढतं आणि म्हणूनच त्याचं महत्त्व वाढतंय. या पेपरमध्ये आपण या दोन्ही पद्धतींचं तत्त्वज्ञान, त्यांच्या पद्धती आणि त्यांचा प्रभाव समजून घेणार आहोत.

**स्थानिक इतिहास लेखनाचे तत्त्वज्ञान**

स्थानिक इतिहास लेखनामध्ये विशिष्ट प्रदेशाच्या ऐतिहासिक घटनांचे, व्यक्तींच्या योगदानाचे, आणि समाजाच्या जीवनशैलीचे बारकाईने निरीक्षण केले जाते. स्थानिक इतिहासाचे संशोधन करताना त्या प्रदेशातील लोकांची सांस्कृतिक आणि आर्थिक स्थिती, शासन व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, आणि सामाजिक सुधारणांच्या हालचाली यांचा अभ्यास केला जातो. स्थानिक इतिहास लेखनामुळे व्यापक इतिहासाच्या समजुतीस मदत होते आणि त्या भागातील सांस्कृतिक जडणघडण समजण्यास मदत होते.

**स्थानिक इतिहास लेखनाचे प्रमुख घटक**

१. भौगोलिक संदर्भ – प्रदेशाचे नैसर्गिक वैशिष्ट्ये आणि भौगोलिक परिस्थिती

२. सामाजिक आणि आर्थिक घटक – समाजातील घटकांची रचना, जीवनशैली आणि उपजीविका

३. स्थानिक सत्ता आणि प्रशासन – संस्थानिक शासन, ब्रिटिश काळातील स्थानिक प्रशासन

४. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा – स्थानिक उत्सव, धार्मिक चळवळी, लोककला

५. संशोधन साधने – हस्तलिखिते, शिलालेख, सरकारी नोंदी, मंदिरांच्या दानपत्रांची माहिती

**स्थानिक इतिहास लेखनाची काही उदाहरणे**

कोल्हापूरच्या धार्मिक परंपरांचा अभ्यास – महालक्ष्मी मंदीर आणि धार्मिक परंपरांचा इतिहास, रंकाळा तलाव आणि कोल्हापूरच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा इतिहास – स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा अभ्यास. इत्यादी

**सूक्ष्म इतिहास लेखनाचे तत्त्वज्ञान**

सूक्ष्म इतिहास लेखन एका विशिष्ट घटनेच्या किंवा व्यक्तीच्या जीवनाचे सखोल विश्लेषण करते. यात समाजाच्या दैनंदिन जीवनातील घटनांना केंद्रस्थानी ठेवले जाते. सूक्ष्म इतिहासाचे वैशिष्ट्य म्हणजे तो सामान्य लोकांच्या अनुभवांवर आधारित असतो आणि तो इतिहासाच्या लहान परंतु महत्त्वाच्या पैलूंना स्पष्ट करतो.

**सूक्ष्म इतिहास लेखनाचे महत्त्व**

१. इतिहासाचे मानवीकरण होते.

२. विशिष्ट घटना आणि व्यक्तींचा व्यापक इतिहासावर कसा प्रभाव पडतो, हे स्पष्ट होते.

३. स्थानिक संस्कृती आणि परंपरांचे समज वाढते.

४. मौखिक इतिहासाच्या संशोधनाला महत्त्व मिळते.

५. स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखनाच्या पद्धती

**सूक्ष्म इतिहास लेखनाची काही उदाहरणे**

कार्लो गिंझबर्गचे **The Cheese and the Worms –** सूक्ष्म इतिहास लेखनाचे उत्तम उदाहरण.

**स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखनाच्या पद्धती व संशोधनातील आव्हाने**

**१. स्थानिक इतिहास लेखनाच्या पद्धती**

१. दस्तऐवजांचा अभ्यास – स्थानिक सरकारी नोंदी, न्यायालयीन दस्तऐवज, ऐतिहासिक पत्रकांचा अभ्यास.

२. पुरातत्त्वीय पुरावे – किल्ले, मंदिरे, शिलालेख, अवशेष यांचा सखोल अभ्यास.

३. लोककथा आणि मौखिक परंपरा – लोकगीत, कथा, आणि पारंपरिक माहितीचा वापर.

४. स्थानिक वर्तमानपत्रे आणि पत्रव्यवहार – स्थानिक बातम्यांमधून ऐतिहासिक घटनांचा अभ्यास.

**2. सूक्ष्म इतिहास लेखनाच्या पद्धती**

१. वैयक्तिक पत्रे आणि नोंदी – विशिष्ट व्यक्तींच्या जीवनाशी संबंधित दस्तऐवज.

२. स्मृतिचित्रे आणि मौखिक इतिहास – प्रत्यक्षदर्शींच्या अनुभवांचे संकलन आणि विश्लेषण.

३. तात्कालिक पुरावे – तत्कालीन वर्तमानपत्रे, हस्तलिखिते, आणि समाजातील बदल यांचा अभ्यास.

४. सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाचा अभ्यास – एखाद्या घटनेच्या व्यापक सामाजिक परिणामांचा अभ्यास.

**3. संशोधनातील आव्हाने**

१. पुराव्यांचा अभाव – मौखिक साक्ष आणि लिखित पुरावे यांची मर्यादित उपलब्धता.

२. तथ्यांच्या सत्यतेची पडताळणी – मौखिक इतिहासातील सत्यता तपासणे हे आव्हानात्मक ठरते.

३. संशोधनातील तटस्थता – स्थानिक घटकांवर अती भर देणे किंवा अतिरेक होण्याची शक्यता.

स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखनामुळे इतिहासाचे विकेंद्रीकरण होते. यामुळे व्यापक इतिहासाला अधिक स्पष्टता आणि लोकाभिमुखता मिळते. स्थानिक स्तरावर घडणाऱ्या घटना आणि लहान सामाजिक घटकांचे महत्त्व समजल्यामुळे समाजाचा समृद्ध वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन होतो.निष्कर्ष स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखन हे आधुनिक ऐतिहासिक संशोधनाच्या महत्त्वाच्या शाखा आहेत. स्थानिक इतिहास लेखनामध्ये विशिष्ट प्रदेशाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय घडामोडींवर भर दिला जातो, तर सूक्ष्म इतिहास लेखन विशिष्ट व्यक्ती, घटना किंवा समुदायाच्या दैनंदिन जीवनाचा सखोल अभ्यास करते. या दोन्ही पद्धती पारंपरिक इतिहास लेखनाच्या चौकटीत राहून इतिहासाला लोकाभिमुख बनवतात आणि दुर्लक्षित घटकांचा समावेश करून व्यापक इतिहास समजून घेण्यास मदत करतात. स्थानिक आणि सूक्ष्म इतिहास लेखनाच्या संशोधन पद्धतींमध्ये पुरातत्त्वीय पुरावे, दस्तऐवज, मौखिक इतिहास आणि सामाजिक संदर्भांचा समावेश असतो. यामुळे इतिहासाचा शोध अधिक वैज्ञानिक आणि सर्वसमावेशक होतो. इतिहासाचे विकेंद्रीकरण, सामान्य लोकांचा इतिहासात समावेश आणि मौखिक परंपरांचे दस्तऐवजीकरण या पद्धतींच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे स्थानिक व सूक्ष्म इतिहास लेखनाचे भविष्य उज्ज्वल आहे.

**संदर्भ**

१. local history: https://en.m.wikipedia.org/wiki/Local_history

२. Micro history : https://en.m.wikipedia.org/wiki/Microhistory

३. Concept and Method of Local History: Shivaji University M.A **2**

४. https://publishingcentral.net/articles/writing-local-history.html

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 10**

# १४. सामाजिक न्यायः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका

**प्रा. डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत**
राज्यशास्त्र विभाग रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव.

आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक विचारवंताच्या मालिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. वर्षानुवर्षे अन्याय अत्याचारात खितपत पडलेल्या उपेक्षित – दुर्लक्षित अशा दिन - दलितांना आत्मभान- स्वाभिमान आणि सन्मानची शिकवण डॉ. बाबासाहेबांनी दिली. सामाजिक न्यायासाठी, समतेसाठी रक्ताचा एकही थेंब न सांडता जगप्रसिध्द सामाजिक क्रांती घडविणारा महामानव म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता या मानवतावादी मूल्यावर विश्वास ठेवून,वैश्विक शांततेसाठी बौध्द धर्माचा स्विकारणारा, सामाजिक न्यायासाठी क्रांती लढा उभारणारा भारतीय राज्यघनेचा शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अत्यंत मानाचे स्थान आहे.

सामाजिक न्याय हा डॉ. बाबासाहेबांच्या एकूण जीवन कार्यातील अत्यंत महत्वाचा गाभा घटक असून सामाजिक न्याय आणि समता यासाठी पाण्यापासून ते परमेश्वरा पर्यंत त्यांनी लढा दिला. संपूर्ण आयुष्यभर सामाजिक न्याय, स्मता समताभाव निर्माण व्हावा यासाठी त्यांनी अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले. संपूर्ण आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, सामाजिक समता यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. दिन-दलित, वंचित, पिचलेल्याना, माणूस म्हणून जगण्याची शिक्षा भोगणा-या उपेक्षित समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी मोलाचे कार्य करून सामाजिक न्यायाची जोपासना केली.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायाच्या भूमिकेचा आढावा घेणे.

२. भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचा तरतुदींचा अभ्यास करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायासाठी केलेल्या विविध संघर्षाचा आढावा घेणे.

**संशोधन अभ्यासाची गृहीतके**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक क्रांती लढ्यामुळे सामाजिक न्यायावर आधारित समाजाची निर्मिती होण्यास मदत झाली.

२. डॉ.बाबसाहेबांच्या सामाजिक न्याय संकल्पनेमुळे राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समता आणि शांतता यास चालना मिळाली

३. डॉ. बाबसाहेबांच्या सामाजिक न्याय संकल्पनेमुळे भारतीय समाजात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाला चालना मिळाली.

**संशोधन अभ्यास पद्धती**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी ऐतिहासिक, विशेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून प्रस्तुत शोध निबंधात प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांच्या आधार घेण्यात आला.

डॉ.बाबासाहेबांची सामाजिक न्याय ही संकल्पना मानवी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि प्रतिष्ठा यावर आधारित होती. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक वंचित समाज घटकाला आत्मसन्मान, स्वाभिमान याची जाणीव करून 'जगा आणि जगू द्या' अशी सामाजिक न्यायावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. आदर्श समाज घडविण्यासाठी सर्व नागरिकांचा सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रात सर्वांगीण विकास व्हावा यासाठी डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक न्याय संकल्पना मांडली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेत जात, धर्म, वंश, लिंग, प्रदेश अशा संकुचित विचारापेक्षा गरिबांना केवळ न्यायचं नव्हे तर त्यांचे अधिकार व हित सुरक्षित असावेत, वंचितांचे जगणे सुखाचे व्हावे यासाठी डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायास महत्व देवून विविध क्रांती लढे यशस्वी केले. जात- धर्म, लिंग, वंश अशा संकुचित विचाराच्या जागी सर्वांना समान अधिकारची हमी देणारी सर्वसमावेशक अशा संविधानाची निर्मिती केली. संविधानामुळे सामाजिक न्यायाला विशेष महत्व प्राप्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्याय हा नैतिक मुल्यांवर, स्वाभिमान आणि आत्मसन्मानावर अवलंबून आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू समाजव्यवस्थेतील वर्षानुवर्षे चालत आलेली जुनाट अन्यायी रूढी परंपरा टोकाची अस्पृश्यता, जातीयता, धर्मांधता याविरोधी आवाज उठवून दुर्बल समाज, महिला कामगार, यांच्या न्याय हक्कासाठी विविध लढे उभारून सामाजिक न्यायासाठी मानवतावादी बिजांचे रोपण केले.

स्वतंत्र भारताच्या नवसमाज निर्मितीसाठी बाबासाहेबांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या आधारे समाजाची पुनर्रचना करून सामाजिक न्यायाची जोपासना करण्यावर भर दिला. कार्ल मार्क्सचा सशस्त्र क्रांतीकारी जहाल साम्यवादाच्या जागी समाजवादी लोकशाही महत्वाची मानली. सामाजिक समता, शांतता यांना प्राधान्य देणा-या तत्वांचा पुरस्कार केला. कामगारांच्या न्याय हक्कासाठी, कामगारांच्या कल्याणासाठी सुट्टीचे फायदे, महिलांना मातृत्व लाभ, आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक सुरक्षा या घटकांना घटनात्मक स्थान देवून कामगारांच्या कल्याणास विशेष महत्व दिले.. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारतातील कामगार कल्याणासाठी नितीनिर्देशक तत्वांची कामगार सनदेची निर्मिती केली. डॉ.बाबासाहेबानी सामाजिक न्यायासाठी अविरतपणे प्रयत्न केले. बाबासाहेबांची न्यायाची संकल्पना ही फक्त राजकीय न्याय यापुरती मर्यादित न राहता ती सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी महत्वाची मानली जाते. न्याय हा व्यक्तिसापेक्ष न राहता तो व्यक्तिनिरपेक्ष असला पाहिजे म्हणून त्यांनी संविधानातून समानतेचे तत्त्व अंतर्भूत करताना न्यायासमोर समानता, कायद्याची समान वागणूक, संधींची समानता, विषमताविरहीत समाजव्यवस्था या घटकांना घटनेचा आत्मा मानल्या जाणा-या ,मुलभूत हक्कांत समावेश केला.

डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक न्याय संकल्पनेत समाजातील सर्व माणसांना सर्व प्रकारचे समान अधिकार मिळाले पाहिजेत, सर्व नागरी अधिकाराचे वाटप समान न्यायपूर्ण झाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. समाजातील गरीब, दलित. अस्पृश्य वर्गातील समाज घटकांचा उध्दार व्हावा यावा यासाठी सामाजिक न्यायासाठी विविध लढे उभारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत विविध देशाच्या राज्यघटनेचा सखोल अभ्यास करून भारतीय समाजातील विविधता लक्षात घेवून देशाच्या घटनेत सामाजिक न्याय तत्वांची मांडणी केली. कलम १४ मध्ये सर्वांसाठी समानता निर्माण व्हावी, कलम १५ नुसार समाजात अनेक वर्षापासून चालत आलेल्या सामाजिक भेदभाव करणे कायद्यानुसार गुन्हा मानला जाईल आणि कलम १७ नुसार अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा आहे असे तरतूद करून अस्पृश्यतेची वागुणूक देणा-याना कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. सामाजिक न्यायाचे उल्लंघन करणा-

यांना शिक्षा देण्याची तरतूद करून सामाजिक न्यायाला घटनात्मक स्थान देवून सर्वांना समान संधी देवून कायद्याने अस्पृश्यता बंदी केली. सामाजिक बहिष्काराला त्यांनी विरोध केला. स्त्रियांना दुय्यम वागणूक देणा-या पुरुष प्रधान व्यवस्थेला त्यांनी विरोध केला.

डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय संपत्तीचे न्याय वितरण व्हावे कृषिप्रधान भारतातील सर्व शेती शासनाने ताब्यात घेवून कष्टकरी समाजावर अन्याय करणारी सरंजामदार पद्धत नष्ट करून शेतीत राबणारा कष्टकरी वर्गात जमिनीचे न्यायपूर्ण व सार्वत्रिकीकरण व्हावे शेती मालाला योग्य हमी भाव मिळावा सर्वांची प्रगती व्हावी स्त्रियानाही वडिल व पतीच्या संपत्तीत न्याय वाटा मिळावा असे सामाजिक न्यायाची भूमिका डॉ. बाबसाहेबांची होती. समाजामध्ये कोणत्याही प्रकारची असमानता राहू नये, तसेच कोणाही एका विशिष्ट घटकावर अन्याय होऊ नये समाजात सर्वांना समान मानले जावे,शांतता सुव्यवस्था निर्माण होवून जनतेत राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागावी, एकसंघ समाजाची निर्मिती व्हावी यासाठी संवैधानिक मार्गाने सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायावर आधारित तरतुदी संविधानात प्रभावीपणे मांडल्या परिणामी वंचित समाजातला माणूस देशाचा राष्ट्रपती होवू शकला आणि जातीव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये बहुजन समाजातील माणसे देशाच्या धोरणात्मक प्रक्रियेत मानसन्मानाच्या पदावर विराजमान झाले हा सर्वात मोठा सामाजिक न्यायाचा पुरावा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्याय केवळ न्याय केवळ ठराविक जातीपुरता नव्हता, तर बहुसंख्याक आणि अल्पसंख्याकाच्यान्याय हक्का बद्दलही होता. याबाबत डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, “बहुसंख्यकांनी अल्पसंख्यकांना नामशेष करू नये, तसेच अल्पसंख्याकांनीही अल्पसंख्याकत्वाचा फायदा घेऊ नये, तर दोघांनीही समन्वय साधावा.” असे त्यांचे मत होते. श्रीमंतांना लुटून श्रम न करणाऱ्या गरिबाचे घर भरा. असा विचार नव्हता डॉ. आंबेडकरांच्या मते, ज्याचे त्याच्याकडेच राहू द्या. पण, ज्याच्याकडे काहीच नाही, त्याला स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी द्या. त्यासाठी साथ द्या. राजकारणामध्येही बाबासाहेबांच्या सामाजिक न्यायाचे तत्त्व होते. बहुजनांनाही धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळावा यासाठी त्यांनी ‘रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया’ पक्षाची स्थापना केली. सामाजिक न्यायाचे त्यांचे लढे यामध्ये महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिराचा सत्याग्रह, कोकणची खोतशाही बंद करणे, मनुस्मृतीचे दहन, अशा सर्व समतेसाठीच्या क्रांती संगरात बाबासाहेबांनी सर्व समाजबांधवांना सामील करून घेतले. त्यांच्या मते,’मानवी हक्काचा लढा कोण्या एका जातीचा नाही, तर स्वत:ला ‘माणूस’ समजणाऱ्या साऱ्यांचा आहे, अशी त्यांची कायम धारणा होती कसल्याही विषमतेला त्यांनी विरोध केला, म्हणून आज केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सामाजिक समता आणि न्यायाच्या लढ्याचे प्रतिक म्हणून डॉ. बाबासाहेबांचा उल्लेख केला जातो.

**संदर्भ सूची**

१. आनंद तेलतुंबडे, सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण, लोकवाङ्मयगृह.

२. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन, २०१६.

३. रावसाहेब कसबे,आंबेडकर आणि मार्क्स ,सुगावा प्रकाशन

४. डॉ. बी.आर. आंबेडकर, संविधान सभेतील भाषणेक्षितीज पब्लिकेशन,नागपूर,१५.

५. रावसाहेब कसबे,आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, नागपूर.

# १५. भारतातील जातीव्यवस्था आणि आर्थिक असमानता

**श्री. सागर हरिचंद्र एडके**
सहाय्यक प्राध्यापक, पी.व्ही.पी. महाविद्यालय, कवठेमहांकाळ, सांगली.

**प्रस्तावना**

भारतातील जातीव्यवस्था हा अतिशय गुंतागुंतीचा आणि मानवी मुल्यांचा फेरविचार करायला लावणारा विषय आहे. जातिव्यवस्थेच्या पदानुक्रमात, प्रत्येक वर्गाला एक महत्त्वाची भूमिका, स्थान आणि दर्जा आहे. गेल्या काही वर्षांपासून संशोधकांनी संपत्ती आणि जातिव्यवस्थेतील संबंधांचा अभ्यास केला आहे आणि निष्कर्ष काढला आहे. भारतात अनेकदा असे दिसून आले आहे की कनिष्ठ वर्गाला मूलभूत सुविधांची मर्यादित उपलब्धता उपलब्ध आहे तर उच्च वर्गाला शिक्षण आणि इतर सुविधांमध्ये प्राधान्य दिल्याने सामाजिक आणि आर्थिक असमानता निर्माण होते. भारतात जाती आहेत म्हणून आर्थिक असमानता आहे, कि आर्थिक असमानता आहे म्हणून जातीव्यवस्था टिकून आहे हा संशोधानाच विषय आहे.

**उद्दिष्ट**

संशोधन पत्राचे मुख्य उद्दिष्ट अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून भारतीय जातीव्यवस्था आणि तिचे स्वरूप पाहणे हा आहे. भारतातील जातीव्यवस्थेचा आर्थिक असमानतेशी कसा संबंध आहे याचे संशोधन करणे. हे संशोधन पूर्णपणे विद्यमान साहित्यावर आधारित आहे जे पुस्तके, इंटरनेट, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी आहेत.

**विषय विवेचन**

पूर्वीपासून भारतीयांच्या आर्थिक जीवनात जात ही एक महत्त्वाची भूमिका बजावते. श्रम विभागणी मध्ये जात हि मुख्य बाब असायची किंबहुना आजही थोड्याफार प्रमाणात आहे. सुरुवातीपासूनच खालच्या जाती अनेक दशकांपर्यंत कमी पगाराच्या किंवा कोणत्याही कौशल्याशिवाय असलेल्या नोकऱ्यांमध्ये अडकल्या, कोणी काय काम करावे आणि त्याला त्याचा किती मोबदला मिळावा हे सुद्धा जातीवर ठरलेले असायचे. अर्धा तास मंत्र-तंत्र म्हणून ब्राम्हणाला ४ ते ५ रुपये मिळायचे, पण एखादा निरोप पोचवायला ५ ते ६ कोस जणार्या महार व्यक्तीला १ पैसा मिळायचा हि परिस्थितीत पुढे पुढे बदलत गेली, विशिष्ट व्यवसाय विशिष्ट्य जातीमध्ये आजही बांधेलेले दिसतात. एखाद्या मराठा जातीच्या पोराने चप्पलांच्या व्यवसायातून जास्त पैसे मिळतात म्हणून चप्पलचा व्यवसाय करायचा ठरवलं तर त्यातही त्याला जातीचे बंधन तोडून जाण्याची भीती असते. त्यात तो याचा कधीच विचार करणार नाही की आपल्याला त्या व्यवसायातून भरपूर पैसे मिळतील. कोणताही व्यवसाय करताना त्याला जातीचा लागलेला ठपका काढला तर सामाजिक-आर्थिक असमानता कमी होण्यास नक्कीच मदत होईल. कोणालाही मागे न ठेवता सर्वांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम करणे आणि प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. वय, लिंग, अपंगत्व, वंश, वांशिकता, मूळ, धर्म किंवा आर्थिक स्थिती

काहीही असो असमानता आणि त्यांचे परिणाम यांचा प्रश्न केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील विकासात्मक अर्थशास्त्र आणि समाजशास्त्रात संशोधनाचा एक प्रमुख क्षेत्र आहे. हे सर्वमान्य आहे की व्यक्तींच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे निर्धारण करण्यासाठी जात ही एक केंद्रीय निर्धारक आहे जी समाजातील राजकारण आणि सत्तेशी देखील संबंधित आहे. जगात अशा फार कमी व्यवस्था आहेत ज्या यासारख्या दीर्घकाळ टिकून राहिल्या आहेत. भारतात, जातिव्यवस्था ही "जगातील सर्वात दीर्घकाळ टिकून राहणाऱ्या स्तरीकरण प्रणालींपैकी एक" आहे. ती ``हिंदू धर्मग्रंथांमधील विश्वनिर्मितीच्या धर्मशास्त्रीय मॉडेलमध्ये रुजलेली आहे'' या व्यवस्थेची मुळे हिंदू वर्ण व्यवस्थेतून ओळखता येतात जिथे लोक चार वर्गात विभागले गेले आहेत: प्राचीन काळात पुरोहित आणि शिक्षक असलेले ब्राह्मण, मूलतः योद्धे असलेले क्षत्रिय, वैश्य व्यापारी आणि सावकार होते आणि सेवा-आधारित नोकऱ्या करणारे शुद्र. या चार वर्गांव्यतिरिक्त, पाचवा वर्ग देखील अस्तित्वात आहे जो 'अतिशुद्र' म्हणून ओळखला जात असे जे निम्न जातीतील सर्वात खालचे होते. त्यांना वर्ण व्यवस्थेतून वगळण्यात आले होते.

परस्पर-विशिष्ट असण्याव्यतिरिक्त, वर्णांचे हे गट वंशपरंपरागत, विवाहित आणि व्यवसायांवर आधारित होते. आज आपण ज्या जातिव्यवस्थेचे पालन करतो ती वर्ण व्यवस्थेचा उत्तराधिकारी आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जातिव्यवस्थेचे उच्चाटन करण्याचा खरा प्रयत्न झाला. भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कलम १४ (कायद्यासमोर समानता), कलम १५ (धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव न करणे) कलम १६ (रोजगाराची समान संधी) आणि कलम १७ (अस्पृश्यता निर्मूलन) यासारख्या कलमांचा समावेश केला.

आंबेडकरांच्या मते, ग्रामीण भारतात, जातिव्यवस्थेचे एक अडचणीचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळया जातींना एकामागून एक उभ्या स्थितीत ठेवले जाते. अस्पृश्यांचे नंतर 'अनुसूचित जाती' म्हणून वर्गीकरण करण्यात आले; ते भारतातील सर्वात भेदभावग्रस्त आणि निराश लोक होते. परंतु त्यांच्याव्यतिरिक्त, मोठ्या प्रमाणात एक गट आदिवासी भागात राहत होता तो सुद्धा भेदभाव ग्रस्त होता परंतु निराश नव्हता. त्यांना नंतर 'अनुसूचित जमाती' म्हणून ओळखले गेले आणि अलीकडेच, जातींचा आणखी एक गट ज्याला इतर 'मागास जाती' (ओबीसी) म्हणतात. ज्या जाती गटांना उच्च दर्जा मिळाला आणि त्यांच्याविरुद्ध भेदभाव केला गेला नाही त्यांना 'फॉरवर्ड कास्ट' म्हटले गेले ज्यामध्ये ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा समावेश होता. अशाप्रकारे, आज आपण पाहत असलेली रचना ऐतिहासिक पद्धतींवर आधारित आहे. जातीवादामुळे समाजात अत्यंत असमानता निर्माण होते म्हणून व्यवस्था दुरुस्त करण्यासाठी आणि प्रत्येक व्यक्तीला समान सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीसह समान दर्जा प्रदान करण्यासाठी, 'आरक्षण व्यवस्था' सुरू करण्यात आली जिथे सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये काही टक्के जागा महिला आणि अल्पसंख्याकांसाठी राखीव ठेवल्या जातात जसे की अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्ग. कालांतराने एकूण सामाजिक-आर्थिक कार्यक्रमांमध्ये सुधारणा झाल्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची सामाजिक-आर्थिक रचना आणि परिस्थिती सुधारली आहे. आजही भारतातील लोक त्यांच्या जाती आणि त्यांच्या अस्तित्वाच्या सामाजिक गटाद्वारे स्वतःची व्याख्या करत आहेत. अशाप्रकारे असे म्हणता येईल की भारतीय संदर्भात जातिव्यवस्था सामाजिक ओळखीवर परिणाम करते ज्याला दर्जा म्हणून लेबल केले जाऊ शकते.

अशाप्रकारे भारतीय आर्थिक क्षेत्रांच्या विविध आर्थिक क्षेत्रांमध्ये जातींच्या सहभागाचे परिणाम समजून घेतले पाहिजेत. कालांतराने, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या असमानतेची दरी कमी होत असल्याने चित्र बदलत असल्याचे दिसून येते परंतु तरीही, या व्यवस्थेचे पूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे, कारण याची मुळे खोलवर रुजलेली आहेत आणि ज्यांमध्ये मोठे नुकसान करण्याची क्षमता आहे. जात आणि अर्थव्यवस्थेतील संबंध गेल्या काही दशकांमध्ये संरचनात्मक आणि आर्थिक बदलांमुळे नवीन संधी आणि आव्हाने निर्माण झाली आहेत. व्यापार आणि उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे भारताला जगातील सर्वात मजबूत अर्थव्यवस्थांपैकी एक होण्यासाठी मोठी बढती मिळाली आहे. प्राचीन भारतातील व्यवसाय वर्ण व्यवस्थेवर आधारित आहे जो जातीवर आधारित आहे. विशिष्ट जातीचे लोक विशिष्ट काम करत असत. इतर जातींच्या लोकांमध्ये नोकऱ्यांची देवाणघेवाण होत नाही.

जातीची व्याख्या —एंडोगामी, वंशपरंपरागत सदस्यता आणि विशिष्ट जीवनशैलीने युक्त व्यक्तींचा एक लहान गट अशी केली जाऊ शकते. भारतीय जातिव्यवस्थेत व्यवसायासारख्या सामाजिक भूमिका वारशाने मिळाल्या, परिणामी मर्यादित सामाजिक गतिशीलता आणि निश्चित श्रेणीबद्ध पदानुक्रम निर्माण झाले. विविध संशोधनांवरून असे दिसून येते की ही व्यवस्था हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहे. स्वातंत्र्यानंतर १९४७ नंतरच या जाळ्याला आर्थिक महत्त्व प्राप्त झाले, कारण भारत व्यापारासाठी जगासाठी अधिक आक्रमकपणे खुला झाला परंतु विद्यमान जातिव्यवस्थेच्या ऐतिहासिक असमानतेच्या समांतर अस्तित्वासह. भारतातील अनेक सुधारकांनी जातिव्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु आजही ती अस्तित्वात आहे, ज्यामुळे लोकांच्या मानसिकतेवर परिणाम झाला आहे. जातिभेद दूर करण्यासाठी केलेल्या सुधारणा अयशस्वी झाल्या कारण लोकांचे अंतर्गत सहकार्य अपुरे होते. स्वातंत्र्यानंतरच्या दशकांमध्ये, विविध जाती गटांमध्ये शिक्षण, उत्पन्न आणि सार्वजनिक संसाधनांमध्ये एकरूपता आली आहे. असे दिसून आले आहे की जाति-आधारित व्यवस्था आर्थिक संधींवर वर्चस्व गाजवते आणि त्यांचे शोषण करते. हे अगदी खरे आहे की सुरुवातीपासूनच खालच्या जाती अनेक दशकांपर्यंत कमी पगाराच्या किंवा कोणत्याही कौशल्याशिवाय असलेल्या नोकऱ्यांमध्ये अडकल्या होत्या. अशाप्रकारे, जाति-आधारित असमानतेचे महत्त्व या वस्तुस्थितीत आहे की त्यात वरपासून खालपर्यंत आर्थिक आणि सामाजिक हक्क समान करणे समाविष्ट आहे. भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये किंवा राज्यव्यवस्थेमध्ये आजही आपल्याला जात ही शिक्षण आणि व्यवसाय यामध्ये प्रमुख भूमिका बजावताना दिसते. म्हणून आपण असे म्हणू शकतो की जात ही व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीवर विविध प्रकारे प्रभाव पाडण्याशी संबंधित आहे.

अभ्यासांनी सिद्ध केले आहे की मर्यादित आर्थिक आणि कमकुवत नेटवर्क असलेल्या खालच्या जातीतील पुरुष आणि महिलांना त्यांच्या जातीय पार्श्वभूमीसह सतत ओळखले जाते आणि परिणामी, दुर्मिळ सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये स्थान मिळवण्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो. खालच्या जातीतील व्यक्तींना बाजारातून वगळल्याने अर्थव्यवस्थेवर गंभीर आणि प्रतिकूल परिणाम होऊ शकतो कारण देशाचा फक्त एकच क्षेत्र प्रबळ असेल तर दुसरे क्षेत्र अजूनही अवलंबून राहील, यामुळे गरिबी, भेदभाव, असमानता इत्यादींना चालना मिळू शकते. जातीय भेदभावामुळे आंतरसमूह संघर्ष देखील होऊ शकतो जो अर्थशास्त्राशी

संबंधित असू शकतो कारण श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढत जाते. ही दरी जितकी जास्त असेल तितकी ती अर्थव्यवस्थेच्या विनाशाकडे नेईल. स्वतःला भेदभावाचे बळी समजणाऱ्या कामगारांमधील कामाची वचनबद्धता आणि प्रयत्न कमी झाल्यामुळे आणि भेदभावग्रस्त गटांकडून मानवी भांडवलातील गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाल्यामुळे आर्थिक कार्यक्षमतेवर परिणाम होतो. भारतासारख्या देशाने आर्थिक धोरण राबवताना भेदभाव कमी करणे व आर्थिक समानता हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आर्थिक धोरण राबवले पाहिजे आर्थिक धोरण म्हणजे भेदभाव कमी करण्याचा आणि समानता मिळवण्याचा प्रयत्न असला पाहिजे. ही धोरणे आणि विशेषतः समान आर्थिक दर्जा नाकारणाऱ्या दलित वर्गाला पुढे आणण्याचा प्रयत्न असला पाहिजे. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटूनही, भारत अजूनही विकासाच्या टप्प्यात आहे. देशाचे स्वरूप बदलण्यासाठी आणि विकसनशील दर्जापासून विकसित देशात पोहोचण्यासाठी, सामाजिक आणि आर्थिक उपाययोजना करायच्या आहेत, ज्यामध्ये दलित वर्गासाठी विविध सरकारी योजना, अनुदान आणि सवलती यासारख्या आर्थिक उपाययोजना आणि लिंगभेद कमी करायच्या आहेत.

जातीभेद कमी करण्यासाठी भारताने घेतलेले उपक्रम

जातीभेद दूर करण्यासाठी संविधानाद्वारे भारतात विविध उपक्रम घेतले जातात. काही प्रमुख कलमे अशी आहेत:

**अनुच्छेद १५- भेदभाव प्रतिबंध**

या कलमात धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर कोणताही भेदभाव नसावा असे म्हटले आहे. या तरतुदीमुळे, दलित वर्गाला मानवी परिस्थितीत काम करण्याची आणि जगण्याची संधी मिळाली.

**अनुच्छेद १६- समानतेची संधी**

या कलमाचा संविधानात समावेश करण्याचा मूळ उद्देश दबलेल्या वर्गांना रोजगाराची समान संधी देणे हा होता. कलमात असे म्हटले आहे की नागरिकांना केवळ त्यांच्या धर्म, वंश, जात, लिंग, वंश किंवा जन्मस्थानाच्या कारणावरून राज्याच्या अंतर्गत कोणत्याही पदावरून वगळले जाणार नाही.

**अनुच्छेद २१-अ- सक्तीचे शिक्षण**

हा कलम २००२ मध्ये ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे संविधानात समाविष्ट करण्यात आला. शिक्षण हे जातीय भेदभाव दूर करण्यासाठी आणि उच्च आर्थिक दर्जा मिळविण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे, त्यामुळे हा अजेंडा पूर्ण करण्यासाठी या कलमांमध्ये अनिवार्य शिक्षणाचा समावेश करण्यात आला. या कलमात असे म्हटले आहे की राज्य कायद्याने ठरवेल त्या पद्धतीने, सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देईल.

**जमीन मर्यादा**

व्यक्ती आणि महामंडळांना अमर्यादित जमीन ठेवण्यास प्रतिबंधित करण्यात आला होता, ज्याला जमिनीवरील 'मर्यादा' म्हणून ओळखले जाते. अतिरिक्त जमीन सरकारने भूमिहीनांना पुनर्वितरण केली.

**अनुच्छेद २४३ड. जागांचे आरक्षण**

पंचायतींच्या निवडणुकीसाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी व महिलांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागांची संख्या आणि राखीव जागांची संख्या यांच्यात शक्य तितके जवळचे प्रमाण असेल जेणेकरून ते त्या पंचायतीतील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येशी किंवा त्या पंचायतीतील अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येशी जुळतील आणि अशा जागा वेगवेगळ्या मतदारसंघांना आळीपाळीने वाटप केल्या जाऊ शकतात.

**निष्कर्ष**

या संशोधन पत्राचा मुख्य उद्देश जातीय असमानता आणि आर्थिक विषमतेशी त्याचा संबंध यांच्यातील संबंध तपासणे आणि समजून घेणे हा होता. असा निष्कर्ष काढला जातो की हिंदू धर्म वर्ण व्यवस्थेला व्यक्तींच्या जातीव्यवस्थेत विभाजनाचा कणा मानतो. आजपर्यंत काम आणि जात एकमेकांशी जोडलेले आहेत. म्हणून असे म्हणता येईल की जातीने गतिमान भूमिका बजावली. कनिष्ठ जातीच्या लोकांना वरिष्ठ जातीकडून विविध आव्हाने आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. स्वातंत्र्यानंतरही जात व्यवस्था पूर्णपणे नष्ट झाली नव्हती. आजही अस्पृश्यता आणि लिंचिंगच्या घटना नोंदवल्या जातात ज्यावरून हे सिद्ध होते की समाज अजूनही ते पाळत आहे आणि यामुळे अर्थव्यवस्थेवर मोठा सामाजिक परिणाम होत आहे. दोन्ही घटकांचा थोडक्यात अभ्यास केल्यानंतर, असा निष्कर्ष काढता येतो की, जाती आणि आर्थिक असमानतेचा त्याच्याशी संबंधित इतर घटकांशी खोल संबंध आहे जसे की शिक्षण, गरिबी, दरडोई उत्पन्न, उपभोग इत्यादी. शिक्षण, विशिष्ट काम करण्यासाठी कौशल्ये, इतर जातींशी सामाजिक भेदभाव यासारख्या संसाधनांच्या अनुपलब्धतेमुळे गरिबी आणि असमानता वाढते. हे कमी करण्यासाठी केवळ मालमत्ता संपादन पुरेसे नाही असे दिसून येते. जात आणि धर्मावर आधारित श्रेष्ठतेच्या भावनेतून निर्माण होणारी मानसिकता आणि दृष्टिकोन बदलले पाहिजेत. उच्च वर्ग आणि इतर जातींमधील सध्याची दरी मोठी आहे जी सरकारी धोरणांचा आणि लोकांमध्ये सामाजिक जागरूकतेचा योग्य वापर करून कमी करणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१. आंबेडकर बाबासाहेब, भारतातील जाती: त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०
२. योजना मासिक
३. भारताचे संविधान
४. आंबेडकर बाबासाहेब यांचे लेखन आणि भाषणे (खंड ३)
५. परिवर्तनाचा वाटसरू
६. दै. लोकसत्ता वर्तमानपत्र

# १६. हिंदू खाटिक समाज-सामाजिक सुधारणा चळवळ ऐतिहासिक आढावा

**मेघाराणी रमेश सरगर**
संशोधक विद्यार्थिनी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

हिंदू खाटिक् समाज हा पारंपारिक व्यवसाय आणि सामाजिक संरचनेशी जोडलेला एक समाजघटक आहे. मुख्यतः कत्तलखान्यांशी संबंधित असल्याने आणि मांस विक्री व्यवसायात गुंतलेला असल्यामुळे खाटिक समाजाला ऐतिहासिकदृष्टया अनेक सामाजिक आणि आर्थिक आव्हांनाना सामोरे जावे लागले. तथापि, आधुनिक काळात हा समाज शैक्षणिक आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या दिशेने मोठया प्रमाणात प्रगती करत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. खाटिक समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२. खाटिक समाजाच्या स्थिर राहणीमानासाठी येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

३. खाटिक समाजाने देशाच्या राष्ट्र बांधणीसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

४. समाजचळवळींना आलेल्या यश अपयशाचा आढावा घेणे.

५. खाटिक समाज चळवळींना आलेल्या यश अपयशाचा आढावा घेणे.

**अभ्यासाची संशोधन पध्दती**

या संशोधनाचे ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल. या संशोधन पेपरचा आराखडा प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या आधारे रचना केली आहे. 1) प्राथमिक ऐतिहासिक लिखित साधने 2) दुय्यम ऐतिहासिक लिखित साधने 3) मुलाखत 4) वर्तमानपत्रे आणि मासिके 5) इंटरनेट

**'खाटीक' समाज संकल्पना**

'खाटीक' या संस्कृत शब्दावरून खाटिक या शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. ''खाटीक'' या संस्कृत शब्दाचा अर्थक सैनिक असा आहे. सैनिकी पेशातील पराभूत सैनिकांचा मांस विक्रीचा व्यवसाय हा उपजिविकेचा शेवटचा आसरा असावा. आज जे हिंदू लोक मांस विक्रिचा व्यवसाय करतात त्यांना खाटिक म्हणतात. मुसलमांनाना कसाब असे म्हणतात. संपूर्ण महाराष्ट्रातील हिंदू खाटिक जातीच्या लोकांचा अनुसूचित जाती यादी क्रं 31 वर समावेश करण्यात आला तद्नंतर या जातीच्या लोकांना शासकिय फायदे सवलती मिळू लागल्या आहेत.

**सामाजिक सुधारणा संकल्पना**

सामाजिक सुधारणा म्हणजे समाजातील चुकीच्या प्रथा, विषमता आणि अन्याय दूर करून अधिक न्याय, समताधिष्ठित आणि सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी केलेले प्रयत्न् भारताच्या इतिहासात विविध समाजसुधारकांनी वेगवेगळया काळात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी योगदान दिले आहे.

**खाटिक जातीतील सामाजिक चळवळी**

ब्रिटीशांनी आपल्या सत्तेस प्रखर विरोध करणा-या खाटिक जातीस इ.स. 1891 च्या सेन्सेसमध्ये "अपराधी जात" अर्थात क्रिमीनल कास्ट म्हणून घोषित केले. परकिय शासनकर्त्यांकडून होणारा अन्याय व शोषण त्याचप्रमाणे शस्त्राचे धाकाने बलपूर्वक धर्मांतरासाठी होणारी सक्ती इ. अनेक कारणामुळे खाटिक जातीचे लोक देशभर विखुरले गेले. हिंदुस्थानच्या दक्षिण भागामध्ये स्थलांतरित झाले. अस्वच्छ व्यवसाय सामाजिक हनन, अज्ञान व दुर्बल आर्थिक परिस्थिती यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा सुध्दा खालावला गेला. ब्रिटीश काळामध्ये खाटिक जातीच्या लोकांचे आर्थिक सामाजिक व शैक्षणिक जीवन उध्वस्त् करण्याचा प्रयत्न् झाला. त्यांच्यावर प्रदूषण कर लादणे, मुस्लिमांना मांस निर्यातीस परवानगी देणे. क्रिमिनल कास्टचा दर्जा देणे इ.चा उद्देशच तसा होता.

**समाजातील समाजसुधारकाचे समाजन्नती कार्य**

स्वातंत्र्य संग्रामाचे काळामध्ये इंग्रज न्यायाधीश जात विचारून शिक्षा फर्मावित होते. आरोपिने खाटिक जात सांगितल्यास त्याला जास्तीत जास्त् शिक्षा दिली जावू लागली. याचा परिणाम असा झाला कि या जातीचे लोक कठ, कठिक, खेटिक, सैनिक, सुनकर, सोनकर, कसाई, खटिक, कटिक इ. नावाचा उल्लेख करू लागले. दक्षिणेतील खाटिक, रैय्या, चिक, चिकवा, लाढ, लाड, सुर्यवंशी, सुर्यवंशी लाड, कलाल, मसालेदार इ. नावाने तर महाराष्ट्रातील विदर्भामध्ये हिंदू खाटिक पश्चिम महाराष्ट्रामध्ये धनगर खाटिक, कोल्हापूर संस्थानमध्ये मराठा खाटकी तसेच निजामशाहीमध्ये असणा-या मराठवाडयामध्ये कलाल इ. प्रकारे नोंद असल्याचे निदर्शनास येते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील काही भागांमध्ये क्षत्रिय मराठा धनगर, सुर्यवंशी लाड खाटिक, सूर्यलाड अशाप्रकारे जातीची नोंद झाल्याचे आढळते. 1904 साली त्र्यंबकेश्वर येथील ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेण्यासाठी आणि गोदावरी तिर्थ नाशिक येथे आंघोळ करण्यासाठी हिंदू खाटिक जातीच्या लोकांनी आंदोलन केले होते. दि. 30 जुलै 1906 रोजी नाशिक येथे या समाजाला दर्शन व आंघोळ करण्यासाठी शासनाने मान्यता दिली. महाराष्ट्रामध्ये सामाजिक समतेचा पहिला लढा हिंदू खाटिक जातीच्या लोकांनी केलेला आहे. याच प्रेरणेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 20 मार्च 1927 रोजी महाड चवदार तळयाचे पाणी प्राशन करून क्रांतीकारी सत्याग्रह करण्यात आला. व कोटयावधी अस्पृश्यांच्या मुलभूत मानवी न्याय हक्कांची प्रस्थापन करण्यात आली. या ऐतिहासिक सामाजिक परिवर्तनाच्या सत्याग्रहातील अस्पृश्य सत्याग्रहींच्या नामावलीमध्ये रामचंद्र खंडुजी कांबळे उर्फ चंदुमामा खाटिक यांचा सहभागी सत्याग्रही म्हणून समावेश आहे. 1970-71 नियतकालीक हवेली तालुक्यातील च-होली गावचे खाटिक समाजातील डॉ. संतुजी रामजी लाड (1841-1916) यांनी सत्यशोधक चळवळीमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या बरोबर निष्ठावंत सहकारी म्हणून सामाजिक कार्य केले. ठाण्याला मोफत दवाखाना व स्त्रीपुरूषासाठी रात्र प्रशाला सुरू करू न समाजकार्य केले. 1, 2, 3 नोव्हेंबर 1920 साली पुणे जिल्हयातील जेजुरी येथे धनगर समाजाची एक परिषद आयोजित करण्यात आली होती. पुणे जिल्हयातील कार्यकर्त्यांनी या परिषदेमध्ये सहभाग घेवून खाटिक समाज हा धनगर समाजाचाच एक भाग आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न् केला.

डिसेंबर 1920 मध्ये पुण्यात खाटिक जातींच्या लोकांचे अधिवेशन ठाण्याचे प्रसिद्ध पुढारी नारायण आबाजी घोलप आणि रामचंद्र हरी जव्हार यांच्या पुढाकाराने घेण्यात आले. 20 एप्रिल 1928 पुणे येथील “क्षित्रय मराठा धनगर” तरूण मंडळाची स्थापना झाली होती. या मंडळाचे सल्लागार महर्षि विठ्ठल रामजी शिंदे ॲड. केशव गणेश बागडे श्री.कृ.गो.पाताडे आणि श्री. शं. बा. क्षीरसागर हि मंडळी होती. याच तरूण मंडळाचे सहकार्यातून 1931 चे खाटिक जातीचे दुसरे अधिवेशन पुण्यात झाले. समाजामध्ये ऐक्य व प्रेम वाढून समाजाची प्रगती व्हावी या उद्देशाने “क्षित्रय मराठा धनगर” असे नाव धारण करण्याचा ठराव श्री. रामचंद्र हरिबा जव्हारे यांनी सातारा येथे मांडला. 27, 28, 29, 30 नोव्हेंबर 1931 साली अखिल क्षित्रय मराठा धनगर समाजोन्ती परिषदेचे अधिवेशन पुण्यामध्ये झालेले होते. या अधिवेशनामध्ये कोंडिबा राजाराम थोरात या समाज नेत्याने समाजाच्या नावाबद्दल असलेले मतभेद दूर करून समाजाच्या उन्तीसाठी सर्वांनी इटले पाहिजे असे आवाहन केले. 1933 मध्ये पुणे येथे खाटिक समाजबांधवांनी सदाशिवराव गांलिदे यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशन पार पाडले खाटिक समाजाला प्राप्् झालेले गौण् स्थान या विषयावर त्यांनी आपले अधिक विचार मांडले. खाटिक या नावाऐवजी “क्षित्रय मराठा धनगर” असे जातीचे नाव धारण करावे. असा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. इ.स. 1961 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना केल्यांनतर विदर्भातील खाटिक जातीचे लोक अनुसूचीत जातीमध्ये तर उर्वीरित महाराष्ट्रातील खाटिक ओबिसीमध्ये समाविष्ट होते. उद्धवराव इंगुले यांच्या अध्यक्षतेखाली 1982 साली “महाराष्ट्र खाटिक” महासंघाची स्थापना करण्यात आली. 28 मे 1982 रोजी राज्यपातळीवरील पहिले अधिवेशन बारामती येथे पार पाडले. या अधिवेशनामध्ये काही महत्वाचे ठराव समंत करण्यात आले होते.

१. 1930 सालानंतर स्थापन झालेल्या क्षित्रय धनगर खाटिक, कलाल, लाड, खाटिक, सूर्यवंशी खाटिक या नावाने स्थापन झालेल्या संस्थाना खाटिक जातीच्या संस्था मानून सवलती दयाव्यात.

२. हुंडाबंदी विषयक कायदे शासनाने कडक करून त्यांची अंमलबजावणी करावी अशा स्वरूपाचे अनेक ठराव या अधिवेशनात समंत करण्यात आले होते.

३. अखिल भारतीय खाटिक महासंघाचे अधिवेशन मा. रघुनाना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार राजनाथ शास्त्री सोनकर, मा. श्रद पवार यांच्या उपस्थितीत नाशिकला 31 जानेवारी 1996 रोजी झालेले होते. समाजामध्ये शैक्षिणक जागृती निर्माण व्हावी. समाजातील गरिब विदयार्थ्यांना शिक्षण उपलब्ध व्हावे. म्हणून शिक्षण फंडाची स्थापना करण्यात आली आहे.

1) आर.के.बागुल शिक्षण फंड 2) तुकाराम घोडके शिक्षण फंड 3) गंगानाथ महाराज शिक्षण फंड 4) गणपतराव काथवटे शिक्षण फंड अशा प्रत्येक तालुक्यामध्ये समाजसंघटना कार्यरत आहेत. ही सर्व् समाजाच्या सामाजिक जागृतीचीच लक्षणे आहेत.

**निष्कर्ष**

भारतीय लोकशाहीमध्ये समता आणि सामाजिक न्याय ही संविधानिक शासन व्यवस्था अस्तित्वात आहे. असे असतानाही आपल्या देशामध्ये हिंदू-खाटिक जातीच्या लोकांबाबत दुहेरी नीती वापरणे न्यायसंगत वाटत नाही. उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये हिंदू-खाटिक ही जात मागासवर्गीय जातीमध्ये समाविष्ट केल्याचे दिसून येत आहे. खाटिक समाजाने राष्ट्रीय एकजूट आणि सामूहिक शक्तीची आवश्यकता आहे. वेगवेगळया राज्यामध्ये खाटिक जातीच्या लोकांना वेगवेगळया नावाने संबोधले जात असले तरी या

लोकांचा पारंपारिक व पिढीजात व्यवसाय हा छोटया प्राण्यांचे मांस विक्रीचाच आहे. संपूर्ण भारत देशातील खाटिक समाज बांधव आर्थिक, शैक्षिणक व सामाजिक बाबीमध्ये खूपच मागासलेले आहेत. राष्ट्रीय पातळीवर सर्वच राज्यामध्ये त्यांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळत नसल्यामुळे त्यांची प्रगती होवू शकलेली नाही.

खाटिक जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करीत असताना अस्वच्छ व्यवसायाचा निकष लावण्यात आलेला आहे. त्यांची आर्थिक स्थिती दयनीय होती. त्यामुळेच हिंदु खाटिक (चक/चकवा) जातीचा समावेश घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातीमध्ये केलेला आहे. केंद्र शासनाने या जातीच्या आर्थिक शैक्षिणक, सामाजिक व राजनैतिक विकासासाठी संपूर्ण भारतभर प्रत्येक राज्यामध्ये अनुसूचित जातीमध्ये समावेश करणे आवश्यक आहे. वेगवेगळया राज्यामध्ये हि एकच खाटिक जात वेगवेगळया श्रेणीमध्ये समाविष्ट करून या जातीवर अन्याय केला जात आहे.

**शिफारसी**

1. महाराष्ट्रामध्ये 1977 मध्ये खाटिक जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीमध्ये घटनादुरूस्ती अन्वये स्विकारण्यात आला म्हणून 1977 च्या पुर्वीचा पुरावा स्विकारणे व गृहित धरणे.
2. शासन स्तरावर खाटिक समाजाचे समाजसुधारक म्हणून डॉ. सतुंजी रामजी लाड यांची जयंती साजरी करावी.
3. जातप्रमाणपत्र व जातपडताळणीचे दाखले देताना समाजबांधवाची अडवणूक होवू नये यासाठी योग्य ते आदेश शासनस्तरावर व्हावेत.
4. समाजाच्या सर्वागीण विकासासाठी खाटिक समाज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना शासनाने करावी.
5. महाराष्ट्रात महानगरपालिका, नगरपालिका कृषीउत्पन्न बाजार समितीच्या प्रत्येक मार्केटमध्ये बक-याच्या मंडीसाठी जागा राखीव ठेवण्यात यावी. स्थानिक समाज बांधवाना लिलाव न करता प्राध्यानाने देण्यात यावी या समितीवर खाटिक समाजाचा प्रतिनिधी घेण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथसूची**


1. प्रा.डॉ. घोडके शरद, "खाटिक समाज राजकिय जागृती", शार्प प्रकाशन, एप्रिल, 2002
2. शहा घनश्याम, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, 2008
3. डॉ. आंबेडकर भी.रा, जातीसंस्थ्ोचे उच्चाटन, नाग-नालंदा प्रकाशन, प्रथमा आवृत्ती, 14 एप्रिल, 1986
4. क्षत्रिय मराठा धनगर समाज विश्वस्त् द्विवार्षीक अहवाल संपादक कल्याणकर भानुदास भवानी पेठ सन 2001-2002
5. **People of India Maharashtra Volume-**2, **Kumar Suresh Singh, B.R. Bhatnagar, Edition** 2004
6. **Nomadic Tribes & Social Work in India, Dr. B.S. Ghatage**
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हिंदु खाटिक (अनुसूचित जाती यादी क्रं 31) जातीचा अहवाल वर्ष 2014-15.
8. हिंदु खाटिक समाज महाराष्ट्र हिंदू खाटिक मागासवर्गीय संस्था जिल्हा अमरावती दि. 2 एप्रिल 2013.

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com)** **CC - 10**

# १७. १८५७ च्या उठवामधील दलित महिलांचा सहभाग

**शुभम शामराव खरात**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्यलढा हा जनतेचा लढा होता, जिथे समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांनी ब्रिटिश साम्राज्यवादाचा विरोध केला. मात्र, दलित महिलांचे योगदान हे या महत्वाच्या चळवळीतील सर्वाधिक दुर्लक्षित पैलूंपैकी एक आहे. जात आणि लिंग या दोन्ही स्तरांवरील भेदभावाचा सामना करूनही, दलित महिला स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक आणि समाजसुधारक म्हणून पुढे आल्या.

१८५७ च्या उठावासारख्या सशस्त्र बंडांमध्ये सहभागी होण्यापासून ते सामाजिक आणि राजकीय चळवळींचे नेतृत्व करण्यापर्यंत, दलित महिलांनी दडपशाहीच्या सर्व बंधनांना झुगारून राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला. झलकारीबाई, उदा देवी, महावीरी देवी आणि कुइली यांनी ब्रिटिशांविरुद्ध अपूर्व शौर्य दाखवले.

त्यांच्या अतुलनीय त्याग आणि नेतृत्व असूनही, मुख्य प्रवाहातील इतिहासाने दलित महिलांच्या योगदानाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांचा संघर्ष फक्त ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यासाठी मर्यादित नव्हता, तर त्यांनी जातीय शोषणाविरुद्ध लढा दिला आणि शिक्षण व राजकीय अधिकारांसाठी आवाज उठवला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या समग्र आणि व्यापक दृष्टिकोनासाठी त्यांच्या योगदानाला मान्यता देणे आवश्यक आहे.

हा अभ्यास दलित महिलांच्या शौर्य, संघर्ष आणि नेतृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून इतिहासात त्यांचे योग्य स्थान निश्चित होईल.

**उद्देश**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत दलित महिलांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यामागील उद्देश म्हणजे त्यांच्या महत्त्वपूर्ण पण अनेकदा दुर्लक्षित योगदानाला ओळख देणे. जात आणि लिंगभेदाच्या अडचणींना तोंड देऊनही या महिलांनी स्वातंत्र्यासाठीच्या लढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि सामाजिक न्याय, समता व राष्ट्रनिर्मितीसाठी संघर्ष केला.

**या अभ्यासाचे उद्देश**

१. त्यांच्या भूमिकेचा गौरव करणे – स्वातंत्र्य लढ्यात दलित महिलांनी दिलेल्या त्याग व प्रयत्नांना ओळख देणे.
२. ऐतिहासिक दुर्लक्ष दूर करणे – मुख्य प्रवाहातील इतिहासात दलित महिलांच्या योगदानाची अनुपस्थिती भरून काढणे.
३. त्यांच्या संघर्षांचा अभ्यास करणे – स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी भोगलेल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अडचणी समजून घेणे.
४. भविष्यातील पिढ्यांना प्रेरणा देणे – त्यांच्या संघर्ष आणि धैर्याच्या कथा तरुण पिढीसमोर मांडून त्यांना प्रेरित करणे.

५. समावेशक इतिहासाला चालना देणे – भारताच्या भूतकाळाचे अधिक संपूर्ण आणि अचूक चित्र उभे करण्यासाठी विविध योगदानांचा समावेश करणे

**विषय विवेचन**

**१. झलकारीबाई**

झलकारीबाई या १८५७ च्या भारतीय बंडातील एक महान दलित योद्ध्या होत्या. २२ नोव्हेंबर १८३० रोजी झाशीजवळील भोजला गावात त्यांचा जन्म झाला. त्या कोरी (किंवा कोळी) समाजातील होत्या, जो पारंपरिकरीत्या वंचित राहिला आहे. लहानपणापासूनच त्यांची शौर्याची ओळख होती. त्यांनी घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि कुस्ती यासारख्या कौशल्यांमध्ये प्रावीण्य मिळवले. कथा सांगतात की त्यांनी काठीने बिबट्याला ठार मारले होते, ज्यामुळे त्यांचा निर्भय स्वभाव स्पष्ट होतो.

त्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या महिला सेनेत, दुर्गा दलात सामील झाल्या आणि लवकरच विश्वासू सहकारी बनल्या. जेव्हा ब्रिटीशांनी झाशीवर हल्ला केला, तेव्हा झलकारीबाई यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्याशी असलेल्या साम्याचा फायदा घेत राणीच्या वेशात युद्धभूमीवर उभ्या राहिल्या. या युक्तीमुळे ब्रिटीश गोंधळात पडले आणि खरी राणी बचावासाठी वेळ मिळवू शकली. त्यांच्या या शौर्यपूर्ण कृत्यामुळे लढाई लांबणीवर टाकली गेली आणि झाशीच्या प्रतिकाराला बळ मिळाले.

त्यांच्या मृत्यूबाबत विविध मतप्रवाह आहेत, परंतु असे मानले जाते की एप्रिल १८५८ मध्ये त्या युद्धभूमीवर शौर्याने लढताना शहीद झाल्या.

झलकारीबाई यांची आठवण आजही प्रतिकार आणि सशक्तीकरणाचे प्रतीक म्हणून केली जाते, विशेषतः दलित समाजासाठी. त्यांची कथा लोककथा, गाणी आणि सांस्कृतिक उत्सवांमध्ये जिवंत आहे. मणिकर्णिका: द क्वीन ऑफ झांसी (२०१९) या चित्रपटात त्यांची भूमिका दाखवण्यात आली आहे. भारत सरकारनेही त्यांचा सन्मान म्हणून टपाल तिकीटे जारी केली आणि त्यांच्या स्मृतीसाठी स्मारके उभारण्यातही पुढाकार घेतला आहे. त्यांचे जीवन हे शौर्य आणि दृढतेचे प्रतीक आहे, जे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात वंचित घटकांनी बजावलेल्या महत्त्वाच्या भूमिकेची आठवण करून देते.

**२. उदा देवी**

उदा देवी या १८५७ च्या भारतीय बंडातील अनेक विस्मृतीत गेलेल्या महिला योद्ध्यांपैकी एक होत्या. दलित (पासी) समाजातील सदस्य म्हणून त्यांनी ब्रिटिश सैन्याविरुद्ध पराक्रमाने लढा दिला. त्यांचे धैर्य आणि बलिदान त्यांना प्रतिबंध आणि दलित सशक्तीकरणाचे एक शाश्वत प्रतीक बनवते.

**प्रारंभिक जीवन आणि पार्श्वभूमी**

- **जन्म आणि जात ओळख:** उदा देवी यांचा जन्म अवध (आताचा उत्तर प्रदेश) येथे झाला, पण त्यांची अचूक जन्मतारीख ज्ञात नाही. त्या पासी समाजात जन्मल्या, जो पारंपरिकरित्या सैन्य आणि सुरक्षा सेवांमध्ये गुंतलेला होता.

- **प्रेरणा आणि प्रशिक्षण:** त्या अवधच्या राणी बेगम हजरत महल यांच्यापासून प्रेरित झाल्या, ज्या ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध सक्रियपणे लढल्या होत्या. ब्रिटिशांविरुद्ध सुरू झालेल्या लढ्याने प्रेरित होऊन, उदा देवी यांनी लढाईचे प्रशिक्षण घेतले आणि इतर दलित महिलांना लढ्यासाठी प्रोत्साहित केले.

**१८५७ च्या बंडातील भूमिका**

**महिला सैन्याचा गट तयार करणे**

बेगम हजरत महल यांच्या मार्गदर्शनाखाली, उदा देवी यांनी महिला लष्करी संघटना स्थापन केली जी पुरुष सैनिकांसोबत लढली. त्यांच्या पतीचे, मक्का पासी यांचेही सैन्यात योगदान होते.

**सिकंदर बागची लढाई (नोव्हेंबर १८५७)**

त्यांच्या जीवनातील सर्वात स्मरणीय घटनेपैकी एक म्हणजे लखनौच्या वेढ्यातील सिकंदर बागची लढाई. जेव्हा जनरल कॉलिन कॅम्पबेल यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सैन्याने किल्ल्यावर हल्ला केला, तेव्हा उदा देवी यांनी एक शौर्यपूर्ण निर्णय घेतला.त्या झाडावर चढून रायफलने ब्रिटिश सैनिकांवर गोळया झाडू लागल्या.

- **युद्धतंत्र:** झाडावरून लपून बसून त्यांनी अनेक ब्रिटिश सैनिकांना ठार केले, ज्यामुळे मोठे नुकसान झाले.
- **शहादत:** शेवटी, ब्रिटिशांना समजले की त्यांच्यावर झाडावरून हल्ला होत आहे. त्यांनी प्रत्युत्तर दिले आणि उदा देवी युद्धभूमीवर शहीद झाल्या.
- **प्रभाव:** त्यांच्या त्यागाची कथा अमर झाली, आणि त्यांनी सिद्ध केले की स्त्रियांनी जातपात विसरून स्वातंत्र्य संग्रामात महत्त्वाची भूमिका बजावली.

**वारसा आणि सन्मान**

दलित आणि महिला सशक्तीकरणाचे प्रतीक: उदा देवी यांचा दलित समाजासाठी विशेष महत्त्वाचा वारसा आहे, कारण त्यांनी जात आणि लिंगाच्या बंधनांना झुगारून स्वातंत्र्यासाठी लढा दिला. त्या सन्मान, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जातात.

**स्मरण आणि गौरव**

दरवर्षी दलित संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते लखनऊमधील सिकंदर बाग स्मारकाजवळ एकत्र येऊन त्यांच्या पराक्रमाला श्रद्धांजली अर्पण करतात. कांशीराम आणि मायावती यांसारख्या दलित नेत्यांनी त्यांच्या योगदानाचा उल्लेख आपल्या भाषणांमध्ये आणि चळवळींमध्ये केला आहे. उदा देवी यांच्या सन्मानार्थ पुतळे आणि सांस्कृतिक कार्यक्रम आजही प्रेरणादायी आहेत

**निष्कर्ष**

उदा देवी यांची कथा झलकारीबाई आणि इतर विस्मृतीत गेलेल्या १८५७ च्या वीरांप्रमाणे, भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या अदम्य लढाऊ वृत्तीचा दाखला देते. त्यांच्या त्याग, युद्धनीती आणि धैर्याने सिद्ध केले की स्वातंत्र्यासाठी सर्व जाती-धर्मातील लोकांनी लढा दिला, विशेषतः सामाजिक बंधनांना झुगारून लढणाऱ्या दलित महिलांनी.

त्या आजही शौर्याचे प्रतीक आहेत, हे दर्शवून की इतिहास फक्त राजे-राण्यांनीच नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्या लढवय्यांनी घडवला आहे.

**३. महावीरी देवी**

**महावीरी देवी या १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य**

संग्रामातील एक विस्मृतीत गेलेल्या दलित योद्ध्या होत्या. त्यांनी बिहारमध्ये महिलांच्या एका सैन्याच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांविरुद्ध शौर्याने लढा दिला आणि मोठे बलिदान दिले. जरी त्यांचा उल्लेख मुख्य प्रवाहातील इतिहासात फारसा आढळत नाही, तरी त्या दलित प्रतिकार, महिला सशक्तीकरण आणि ब्रिटिशविरोधी संघर्षाचे प्रतीक राहिल्या आहेत.

**प्रारंभिक जीवन आणि पार्श्वभूमी**

जन्म आणि जात ओळख: महावीरी देवी यांचा जन्म बिहारमध्ये झाला, परंतु त्यांची अचूक जन्मतारीख ज्ञात नाही. त्या पारंपरिक लष्करी पण ऐतिहासिकदृष्ट्या शोषित असलेल्या दलित (पासी) समाजातील होत्या. काही पासी लोक स्थानिक राजवटींसाठी सैन्य आणि सुरक्षा सेवांमध्ये कार्यरत होते, आणि याच लष्करी संस्कृतीचा वारसा महावीरी देवी यांना मिळाला.

**प्रेरणा आणि प्रशिक्षण**

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील इतर क्रांतिकारकांप्रमाणे, महावीरी देवी यांना स्वातंत्र्याच्या हाकेतून प्रेरणा मिळाली. ब्रिटिशांचे अत्याचार पाहून, त्या लढण्यासाठी पुढे सरसावल्या. युद्ध हे पुरुषांचे क्षेत्र मानले जात असताना, त्यांनी संपूर्ण महिलांचे सैन्य उभे केले, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते.

**१८५७ च्या बंडातील भूमिका**

महिला सैन्याचा गट तयार करणे: महावीरी देवी यांनी त्यांच्या गावातील आणि आसपासच्या भागातील २२ महिलांना एकत्र करून सैन्य तयार केले. हे ब्रिटिशांविरुद्ध दलित महिलांनी उभारलेल्या थोडक्या ज्ञात सैन्यांपैकी एक होते.

**ब्रिटिशांविरुद्ध लढाई**

महावीरी देवी आणि त्यांच्या महिला सैन्याने ब्रिटिश छावण्यांवर हल्ले चढवले, ज्यामध्ये त्यांनी तलवारी, धनुष्यबाण आणि पारंपरिक शस्त्रांचा वापर केला.  त्या गनिमी कावा तंत्राने लढल्या, आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांवर आणि सैनिकांवर अचानक हल्ले केले.  संख्येने कमी असूनही आणि आधुनिक शस्त्रांशिवाय, त्यांनी ब्रिटिश सैन्याला मोठे नुकसान केले.

**शहादत आणि वारसा**

महावीरी देवी यांनी पराक्रमाने लढा दिला, परंतु शेवटी त्यांना पकडून ब्रिटिशांनी फाशी दिली. झलकारीबाई आणि उदा देवी यांच्या प्रमाणेच, महावीरी देवी यांचे बलिदान दलित महिलांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा जिवंत पुरावा आहे.

जरी त्यांचे योगदान मुख्य प्रवाहातील इतिहासात कमी प्रमाणात दिसते, तरी त्या ब्रिटिशविरोधी संघर्ष आणि जातीय शोषणाविरुद्धच्या प्रतिकाराचे प्रतीक आहेत.

**वारसा आणि गौरव**

दलित आणि स्त्री सशक्तीकरणाचे प्रतीक: महावीरी देवी यांची कथा महत्त्वाची आहे कारण ती भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात दलित महिलांचे योगदान अधोरेखित करते, हा इतिहास मुख्य प्रवाहात सहसा दुर्लक्षित राहिला आहे.

**स्मरण आणि गौरव प्रयत्न**

दलित इतिहासकार आणि सामाजिक कार्यकर्ते त्यांच्या वारशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कार्यरत आहेत आणि त्यांच्या योगदानाचा अधिकृत सन्मान मिळावा यासाठी मागणी करत आहेत. त्या दलित महिला सशक्तीकरणाच्या प्रेरणादायी प्रतीकांपैकी एक बनल्या आहेत.

**निष्कर्ष**

महावीरी देवी यांचे १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील योगदान हे दलित महिलांच्या अद्वितीय शौर्याचा आणि स्वातंत्र्यासाठीच्या संघर्षाचा पुरावा आहे. जरी त्यांच्या योगदानाला अधिकृत मान्यता मिळालेली नसली, तरी त्यांचे बलिदान सामाजिक अन्याय आणि विषमतेविरुद्ध लढणाऱ्यांसाठी प्रेरणादायी राहिले आहे. त्यांची कहाणी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात फक्त राजे-राण्यांनीच नव्हे, तर शोषित आणि शूर योद्ध्यांनीही योगदान दिले, याचे ज्वलंत उदाहरण आहे.

**४. कुइली**

कुइली या शूर दलित स्वातंत्र्यसैनिक होत्या आणि भारतातील ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यात बलिदान देणाऱ्या पहिल्या महिला योद्ध्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जातात. त्या राणी वेलू नाचियार यांच्या महिला सैन्याच्या सेनापती होत्या आणि १८व्या शतकात ब्रिटिशांविरुद्ध लढणाऱ्या पहिल्या भारतीय राणीच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन मिळवलेल्या विजयामुळे त्या प्रेरणादायी तरीही इतिहासात दुर्लक्षित राहिलेल्या वीरांगना ठरल्या.

**प्रारंभिक जीवन आणि पार्श्वभूमी**

जन्म आणि जात ओळख: कुइली यांचा १८व्या शतकात तमिळनाडूमध्ये जन्म झाला. त्या अरुंधतियार समाजातील, जो इतिहासात दलित समाजातील वंचित आणि शोषित घटकांपैकी एक मानला जातो. जरी त्या वंचित पार्श्वभूमीतील असल्या, तरी राणी वेलू नाचियार यांच्या विश्वासू आणि पराक्रमी योद्ध्यांपैकी एक बनल्या.

**राणी वेलू नाचियार यांच्याशी संबंध**

शिवगंगाच्या राणी वेलू नाचियार या ब्रिटिश सैन्य आणि त्यांचे सहयोगी नवाब आर्कोट आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्याविरुद्ध लढत होत्या. कुइली त्यांच्या सैन्यात निष्ठावान आणि कुशल सेनापती बनल्या आणि लढाई, नेतृत्व आणि युद्धनीतीत अपूर्व कौशल्य दाखवले.

**ब्रिटिशांविरुद्ध प्रतिकारात भूमिका**

**महिला सैन्याची सेनापती**

कुइली यांची राणी वेलू नाचियार यांच्या महिला सैन्याची सेनापती म्हणून नियुक्ती झाली, ज्यामुळे त्या भारतीय इतिहासातील पहिल्या महिला सैन्यप्रमुखांपैकी एक ठरल्या. त्यांनी महिला सैनिकांना प्रशिक्षित केले आणि युद्धात त्यांचे नेतृत्व केले, यामध्ये त्यांचे धाडस आणि युद्धनीतीचे कसब स्पष्ट दिसते.

**अंतिम बलिदान (१७८० मधील आत्मबलिदान मिशन)**

भारतीय इतिहासातील सर्वात धाडसी आणि प्रेरणादायी घटनांपैकी एक म्हणजे कुइली यांचे ब्रिटिश सैन्याच्या शस्त्रागारावर केलेले आत्मबलिदान. ब्रिटिशांनी शिवगंगा ताब्यात घेतले होते, आणि त्यांनी आपले शस्त्र आणि दारुगोळा एका भक्कम किल्ल्यात साठवला होता.कुइली यांनी हे गुपित ओळखले आणि शत्रूच्या शस्त्रागाराचा नाश केल्यास त्यांचे सामर्थ्य संपेल, हे लक्षात घेऊन एक धाडसी योजना आखली.त्यांनी आपल्या शरीरावर तेल आणि तूप लावले, स्वतःला पेटवून या बलिदानामुळे राणी वेलू नाचियार यांना निर्णायक विजय मिळवता आला, आणि त्यांनी पुन्हा शिवगंगा जिंकली.

**वारसा आणि सन्मान**

**विस्मृतीत गेलेली दलित वीरांगना**

त्यांच्यामध्ये अतुलनीय शौर्य असूनही, कुइली यांचा मुख्य प्रवाहातील भारतीय इतिहासात फारसा उल्लेख होत नाही. पण त्यांचा त्याग आणि युद्धनीतीतील हुशारी यामुळे त्या १८५७ च्या उठावाच्या अनेक दशकांपूर्वीच भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या मार्गदर्शक ठरल्या.

**त्यांच्या वारशाचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न**

तमिळनाडू सरकार आणि दलित कार्यकर्ते कुइली यांचे योगदान मान्य करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.त्यांच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी पुतळे आणि स्मारके उभारण्याच्या योजना आखल्या जात आहेत. त्या ब्रिटिशविरोधी प्रतिकार, दलित अभिमान आणि महिला सशक्तीकरणाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या आहेत.

**निष्कर्ष**

कुइली यांचे धैर्य, निष्ठा आणि बलिदान यामुळे त्या भारतीय इतिहासातील सर्वात थोर स्वातंत्र्यसैनिकांपैकी एक ठरतात. ब्रिटिशांविरुद्ध आत्मघातकी हल्ला करणाऱ्या पहिल्या महिला योद्ध्या म्हणून, त्यांनी युद्धाचा संपूर्ण प्रवाह बदलला आणि शिवगंगाच्या मुक्ततेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांची असामान्य गाथा अधिक ओळखली जाण्याची गरज आहे, कारण त्या फक्त

ब्रिटिशांविरुद्ध प्रतिकाराचे प्रतीक नाहीत, तर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील दलित महिलांच्या बळकटी आणि संघर्षाचा जिवंत पुरावा आहेत.

**सारांश**

दलित महिला भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग होत्या. जात आणि लिंग या दोन्ही आधारांवर भेदभाव सहन करूनही, अनेक दलित योद्ध्या, कार्यकर्त्या आणि क्रांतिकारकांनी सशस्त्र संघर्ष, सामाजिक चळवळी आणि ब्रिटिशांविरुद्ध प्रतिकारात सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या पराक्रमाची काही उदाहरणे म्हणजे झलकारीबाई, ज्यांनी १८५७ च्या बंडात राणी लक्ष्मीबाई यांना रणनीतिक मदत केली, उदा देवी, ज्यांनी सिकंदर बागच्या लढाईत ब्रिटिशांविरुद्ध शौर्य दाखवले.महावीरी देवी, ज्यांनी बिहारमध्ये महिलांचे सैन्य उभे केले.आणि कुइली, ज्यांनी ब्रिटिशांच्या दारुगोळा कोठार नष्ट करण्यासाठी स्वतःचे बलिदान दिले.

सशस्त्र संघर्षांव्यतिरिक्त, दलित महिलांनी सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, जिथे त्यांनी शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि राजकीय हक्कांसाठी संघर्ष केला. त्या विरोधी जातीय चळवळींच्या अग्रस्थानी होत्या, ज्या भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी घट्ट जोडलेल्या होत्या.

त्यांचे अतुलनीय योगदान असूनही, मुख्य प्रवाहातील इतिहासाने दलित महिलांच्या संघर्षाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांचे बलिदान आणि नेतृत्व ओळखले जाणे गरजेचे आहे, जेणेकरून भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा अधिक समावेशक आणि अचूक दृष्टिकोन विकसित होईल. आजही, त्यांचा वारसा सामाजिक न्याय, लिंग समानता आणि दलित सशक्तीकरणासाठी प्रेरणादायी ठरतो.

**निष्कर्ष**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील दलित महिलांची भूमिका ही महत्त्वाची असली तरी इतिहासात अनेकदा दुर्लक्षित राहिली आहे. जात आणि लिंगभेदाचा सामना करत या धैर्यशील महिलांनी केवळ ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढा दिला नाही, तर सामाजिक न्यायासाठीही संघर्ष केला. त्यांचे योगदान केवळ राजकीय चळवळीपुरते मर्यादित नव्हते; तर शिक्षण, सामाजिक सुधारणांमध्ये आणि लोकचळवळींमध्येही त्यांचा मोलाचा वाटा होता, ज्यामुळे अधिक न्याय्य समाज घडवण्याचा पाया रचला गेला.

त्यांचे योगदान ओळखणे हे समावेशक आणि योग्य इतिहास लेखनासाठी आवश्यक आहे. त्यांची जिद्द, नेतृत्व आणि त्याग आपल्याला आठवण करून देतात की भारताच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या संघर्षात समाजातील सर्व स्तरांतील लोकांचा सहभाग होता. या महिलांना योग्य सन्मान देऊन आपण केवळ त्यांचा वारसा जपणार नाही, तर भविष्यातील पिढ्यांनाही न्याय, समता आणि सबलीकरणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देऊ.

**संदर्भग्रंथ सुची**

1. Namishray Mohan Dass, Dalit Freedom Fighters, Gyan Publishing House, Delhi, **2010**
2. National Commission for women (NCW), Dalit Women and their role in Indian History, NCW Report, 2020
3. The Print & Scroll.in – Various articles on Jhalkaribai, Uda Devi, Mahaviri Devi, and Kuyili.
4. साळुंखे आ. ह., एकलव्य, शंबुक आणि झलकारीबाई, लोकायत प्रकाशन, सातारा, २०२०

# १८. ऐतिहासिकदृष्ट्या दलितांचे सशक्तिकरणामध्ये शिक्षणाची भूमिका

**श्री. माने प्रशांत पांडुरंग**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**प्रस्तावना**

भारतीय समाजव्यवस्थेत दलितांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या दुय्यम स्थान देण्यात आले. परंतु शिक्षण हा त्यांच्या जीवनातील महत्वाचा परिवर्तनाचा घटक ठरत. भारतामध्ये ब्रिटिश सत्तेच्या स्थापणेनंतर दलितांवरिल शिक्षणाची अधिकार मिळाला. यासाठी अनेक समाजसुवाल दलितांच्या बंधने दूर झाली. यानंतर शिक्षणासाठी पुढाकार घेतला यासाठी त्यांनी समाजाचा रोष पत्करून दलितांना शिक्षित करण्यासनि त्यांच्यांत जाणिव व जागृती निर्माण केलीन करून त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले आणि त्यामुळे दलितांच्या सशक्तीकरणाला चालना मिळाली या सर्व सशक्तीकरणाच्या प्रवासाचेक अनेक त्यो यामध्ये अंतर्भुत आहेत.

**1. पारंपरिक समाजव्यवस्था आणि दलितांचे शिक्षण**

भारतीय समाज पारंपारिकरित्या वर्णव्यवस्थेवर आधारित होता, ज्यामध्ये लोकांचे स्थान जन्मानुसार ठरवले जात असे. या व्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे चार प्रमुख वर्ण होते. दलित समाज हा या वर्णव्यवस्थेच्या बाहेर ठेवला गेला होता याबरोबस्व त्यांच्यावर अनेक सामाजिक बंधने लादली गेली. त्यांचे दलितांना समाजाच्या बाहेर ठेवण्यात आले तसेच संस्थांची माणुस म्हणून असणारे अधिकार नाकारण्यात येउन त्यांच्या शिक्षणाचा अधिकार नाकारण्यांत आला.

**शिक्षणावर घालण्यात आलेली बंधन**

परंपरागत समाजव्यवस्थेत दलितांना कोणताही शिक्षणाचा अधिकार नव्हता. जर दलिताने शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला कठोर शिक्षा देण्यात येत असे. मनुस्मृतीनुसार, दलितांनी जर संस्कृत मंत्राचे उच्चारण केले, तर त्यांचे कान शिसे ओतुन बंद करावेत असे सांगितले गेले. दलितांना सार्वजनिक शाळांमध्ये प्रवेश मिळत नसे त्यामुळे त्यांना शिक्षण मिळण्याची संधी नव्हती. दलितांना शिक्षणापासून दूर ठेवल्यामुळे ते आर्थिकदृष्ट्या कमजोर राहिले आणि त्यांची सामाजिक स्थितीही अत्यंत वाईट बनत गेली.

**2. ब्रिटिशकालीन सुधारणा आणि दलित शिक्षण**

- **ब्रिटिश आधीची स्थिती -** ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारतात शिक्षणाची व्यवस्था मुख्यतहा गुरुकुल पद्धतीवर आधारित होती. ही पद्धत प्रामुख्याने ब्राम्हण आणि उच्चवर्णीयांसाठी होती. दलितांना शिक्षण घेण्याची परवानगी नव्हती.
- **ब्रिटिश प्रशासन आणि शिक्षणातील बदल-** ब्रिटिशांनी भारतात आपली सत्ता प्रस्थापित केल्या-नंतर त्यांनी येथे अस्तित्वात असलेल्या शिक्षणव्यवस्थेत बदल करून ब्रिटिशांना त्यांचे प्रशासन चालवण्यासाठी त्यांना एतद्देशीय भारतीय

लोकांची गरज भासू लागणार होती. ती गरज पूर्ण करण्यासाठी ब्रिटिशांनी त्यांना अनुकुल असणारी पश्चिमी शिक्षण प्रणाली टप्प्याटप्प्याने भारतात लागू केली या प्रक्रियेमध्ये दलितांनादेखील शिक्षणाच्या काही संधी उपलब्ध झाल्या.

- **1813 चा चार्टर अ‍ॅक्ट** - या चार्टर अ‍ॅक्टनुसार ब्रिटिशांनी प्रथमच भारतातील शिक्षणासाठी, आर्थिक तरतूद केली. दरवर्षी 1 लाख रुपये. भारतातील शिक्षणासाठी खर्च करण्याच परवानगी दिली गेली. ब्रिटिशांनी नवीन शिक्षणपद्धती स्विकारण्याची तयारी दाखवली. या कायदयाने ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात धर्मप्रसार आनि शैक्षणिक संस्था स्थापण करण्याची परवानगी दिली. त्यामुळे पुढे मिशनरी शाळा स्थापण होउन दलीतांना शिक्षणाच्या संधी मिळू लागल्या."
- **1835 चा मेकॉलेचा अहवाल** - या अहवालानुसार इंग्रजीला शिक्षणाची मुख्य भाषा बनवीत अहवाल मुख्यतः उच्चवर्णिय आणि मध्यमवर्गीय इंग्रजी शिक्षण देण्यावर भर त्यामुळे दलीतांना फारसा फायदा झाला नाही. परंतु पुढील काळात महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी इंग्रजी शिक्षण घेतले आणि त्याचा उपयोग दलित सशक्तीकरणासाठी उपयोग झाला. हे इंग्रजी शिक्षण घेतलेल्या दलितांना सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी मिळू लागल्या.
- **1854 चा वुड्चा डिपार्टमेंटल डिस्पैच** - या अहवालामुळे मिशनरी आणि सरकारी शाळांमध्ये दलितांना प्रवेश मिळू लागला. दलितांसाठी स्वतंत्र शाळा स्थापण करण्याच्या कल्पणेला चालना मिळाली.

**3. स्वातंत्र्यानंतरचे धोरण आणि दलित शिक्षण**

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानात अनुच्छेद 46 नुसार राज्याने मागासवगीय दलितांच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करणे बंधन कारक ठरवले.

**शैक्षणिक धोरणे आणि योजना** - आरक्षण धोरण (अनुच्छेद 15(4) आणि 340) - दलितांसाठी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण देण्यात आले.

डॉ. आंबेडकर वसतिगृह योजना

**4. दलित सशक्तीकरणावर शिक्षणाचा प्रभाव**

दलित समाजाच्या सशक्तीकरणामध्ये शिक्षणाने अत्यंत क्रांतिकारी भूमिका बजावली आहे. शिक्षणामुळे दलित समाजाला सामाजिक, सजकिन्त्य, आर्थिक, राजदिय आणि सांस्कृतिक स्तरांवर प्रगती करण्यास मदत झाली.

**1. सामाजिक प्रभाव " जातिव्यवस्थेच्या बंधनातून मुक्तता**

१. शिक्षणाने अस्पृश्यता, अन्याय आणि भेदभावाविरोधात सढण्याचे साधन उपलब्ध करून दिले. डॉ. आंबेडकरांनी स्वतः शिक्षण घेउन समाजसुधारणा घावुन आणल्या, "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला. शिक्षणामुळे दलित समाजाला स्वतःच्या हक्कांची जाणीव होण्यास मदत झाली.

२. आत्मसन्मान आणि आत्मविश्वास वाढला. शिक्षणामुळे दलितांना स्वतःच्या अधिकारांची जाणिव झाली आणि त्यांनी समानतेसाठी संघर्ष सुरू केला.

उच्चशिक्षित दलितांनी समाजातील चांगल्या संधी शोधून स्वतःचे जीवनमान सुधारले. आज दलित युवक आत्मनिर्भर होउन व्यवसाय, संशोधन, राजकारण आणि विविध क्षेत्रामध्ये पुढे येत आहेत.

**२. आर्थिक प्रभाव**

**2.1 रोजगार आणि आर्थिक स्वावलंबन**

शिक्षणामुळे दलितांना सरकारी आणि खाजगी क्षेत्रात रोजगार मिळू लागले त्याचे आर्थिक स्थान सुधारले आणि त्यामुळे ते स्वावलंबी झाले. उच्चशिक्षण घेतलेल्या दलितांनी व्यवसाय व उदयोजन क्षेत्रातही यश मिळविले आहे.

**गरिबी आणि आर्थिक विषमता कमी होण्यास मदत**

शिक्षणाने दलित समाजाला विविध क्षेत्रांमध्ये उच्च पगाराच्या नोकऱ्या मिळण्याच्या संधी उपलब्ध होड बागल्या आहेत. तसेच चांगल्या शिक्षणामुळे दलित कुटुंबे शहरी-करणाच्या प्रक्रियेत सामील झाल्यामुळे त्यांची जीवनशैल देखील सुधारण्यास मदत झाली आहे.

**2.3. आधुनिक व्यवसाय आणि नव्या संधी**

आन दलित समाजातील अनेकजण डॉक्टर, अभियंते, शिक्षक, सरकारी अधिकारी उद्योजक आणि संशोधक म्हणून कार्यरत आहेत. काहींनी स्वताचे उद्योग सुरु केले आहे.

**3. राजकीय प्रभाव**

**3.1 राजकीय जागरूकता आणि नेतृत्व**

शिक्षणामुळे दलित समाणात राजकीय जाणीव निर्माण झाली आणि त्यांनी सत्ता आणि धोरणनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यायला सुरुवात केल शिक्षणामुळे दलित समाजात राजाकीय जागरुकता निर्माण झाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेचा मसूदा समितीवर काम करत असताना घटनेत दलितांचे संरक्षण व हक्क यासंदर्भात तरतूदी केल्यानुसार दलितांसाठी निवडणुकीत काही जागा राखीव ठेवल्यागेल्या.

**आरक्षण आणि सामाजिक न्याय**

- दलित समाजाला राजकारणात निवडनुकांमध्ये काही जागा राध्क्षिव ठेवल्यास सुरुवात झाल्याने वलित समाजालेदेखील राजकारणात महत्वपूर्ण भूमिका बजावायला सुरुवात केली व यातुनच त्यांना सामाजिक न्याय प्राप्ता होण्यास मदत झाली.

**3.2 हक्कांसाठी संघर्ष करण्याची क्षमता वाढल**

शिक्षणामुळे दलितांना स्वतःच्या अधिकारांची जाणिव झाली. समाजात अनुभवावयास येणाऱ्या भेदभावाविरुद्ध अन्यायाविरुद्ध संवैधानिक मार्गाने सामाजिक न्याय मिळवण्यासाठी व स्वतःच्या हक्कांसाठी लढा देण्याची विजिगीषु वृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण झाली. विविध सामाजिक चळवळी आणि संघटनांच्या माध्यमातुन दलितांच्या हक्कांसाठी व सामाजिक विषमतेविरोधात आवाज उठवला गेला, डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलितांनी संविधानात हक्क मिळविले. आज अनेक दलित नेते लोकप्रतिनिधी म्हणून काम करत आहेत.

**आंतरजातीय विवाह आणि सामाजिक एकात्मता**

शिक्षणामुळे आंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढते आहे, ज्यामुळे जातीय भेदभाव कमी होत आहे. शिक्षित युवक आणि युवती जातीपलिकडे जाउन विचार करू लागले आहेत.

- **सामाजिक चळवळींमध्ये योगदान** - शिक्षणामुळे दलित समाजाने सामाजिक चळवळींमध्ये मोठे योगदान दिले आहे. दलित पँथर आणि बहुजन चळवळींनी दलितांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. अनेक दलित शिक्षित दलित सामाजिक सुधारक लेखक आणि विचारवंत म्हणून पुढे आहे. विविध धोरणे आणि कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी, दबावगट निर्माण केले.

**4. सांस्कृतिक प्रभाव**

4.1 जातिव्यवस्थेविरुद्ध विचारधारा विकसीत झाली. शिक्षणामुळे दलित समाजाने परंपरागत अन्यायकारक प्रथा आणि अंधश्रद्धांना विरोध करण्यास सुरुवात केली

4.2 समानता आणि एकता वाढली - शिक्षणामुळे दलित आणि इतर समाजातील लोकांमध्ये परस्पर समजुतीची आणि सहकार्याची भावना वाढीस लागली.

**निष्कर्ष**

शिक्षणामुळे समान पारंपरिक समाजव्यवस्थेमुळे दलितांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले मात्र सामाजिक सुधारणांमुळे आधुनिक शिक्षण व्यवस्थेमुळे त्यांना हळूहळू समान हक्क मिळू लागले. दलितांच्या जीवनमानात क्रांतिकारी बदल घडले आहेत. त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली आर्थिक स्थैर्य व राजकीय प्रभाव निर्माण झाला स्वतःच्या अधिकारांची जाणीव होउन संघर्ष करण्याची क्षमता आणि आत्मसन्मान वाढविला आहे.

**संदर्भ साहित्य**

- Education & social change among dalits in India - लेखक जयजी जाध
- Dalit empowerment & education- लक्ष्मण पुजारी

- संशोधन लेख : "महाराष्ट्रातील दलित शिक्षण चळवळ एक ऐतिहासिक दृष्टीकोन" लेखक - डॉ. वसंत मून पुस्तक - दलित चळवळ आणि शिक्षण - लेखक: डॉ. के. एन. जोगदंड संशोधन लेख- दलित सशक्तीकरण आणि शिक्षण

**महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा इतिहास -** BA II (IDS) **शिवाजी विद्यापीठ**

- लेख - दलीत सशक्तीकरण आणि शिक्षण: एक ऐतिहासिक दृष्टीकोन" - प्रकाशित लोकसत्ता दैनिक - 15-04-2019
- शिक्षणामुळे दलित समाजाची प्रगती : काल आणि आज प्रकाशित - दैनिक सकाळ, 10 डिसेंबर 2020

**लोकराज्य मासिकातील संदर्भ लेख**

- लेख - दलित सशक्तीकरणातील शिक्षणाची भूमिका लोकराज्य मासिक, माहिना - जानेवारी 2018
- शैक्षणिक क्रांती आणि दलित समाज

**लोकराज्य मासिक आक्टोबर २०११ इंटरनेटवरील स्त्रोत**

- दलित सशक्तीकरण आणि शिक्षण : ऐतिहासिक परिप्रेक्ष्य. वेबसाईट - मराठी विश्वकोश
- शिक्षण आणि दलित समाज : एक ऐतिहासिक अभ्यास. वेबसाईट - मराठी साहित्य परिषद
- शिक्षण आणि दलित सशक्तीकरण : एक ऐतिहासिक दृष्टीकोन, लेखक - प्रो. रमेश थोरात कुमार, प्रकाशित : योजना मासिक, जुन 2018.

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 10**

# १९. जातिनिर्मुलनाबाबत आंबेडकरांचे विचार

**हणमंत शिवाजी नरळे**
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि. सांगली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील महान दार्शनिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या रूपाने भारताला एक युगप्रवर्तक नेता, उर्जस्वी समाजचिंतक, क्रांतिकारी तत्त्ववेत्ता मिळाला. त्यांनी आपल्या जीवनात केलेले नवभारताच्या निर्मितीसाठी केलेले कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. त्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि वाङ्मयीन स्तरावरील त्यांचे कार्यकर्तृत्व महत्त्वाचे ठरते. या कार्याला जोडूनच त्यांनी लिहिलेले ग्रंथ, त्यांची भाषणे, त्यांचा पत्रव्यवहार आणि त्यांचे विचार हे सुद्धा वैचारिक दस्तऐवज आहेत. डॉ. आंबेडकरांच्या लेखनात भारतातील जातींची मीमांसा प्राधान्याने येते. कारण जातींचा अंत झाल्याशिवाय नवभारतीय समाज निर्माण होऊ शकत नाही. अशी त्यांची भूमिका होती. त्यांची जातिनिर्मूलनाची विचारतत्त्वे लक्षात घेण्यासाठी त्यांचा १९३६ मधील जातिव्यवस्थेचे निर्मूलन हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. यात त्यांनी भारतीय जातिसंस्थेची केलेली मीमांसा मूलगामी स्वरूपाची असून, या ग्रंथातून त्यांचे वैचारिक चिंतन आविष्कृत होते.

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रंथांच्या सुरुवातीला भाषणाच्या पहिल्या भागात जात-पात तोडक मंडळाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना अध्यक्षपदाच्या निवडीवरून मंडळाला सवर्ण हिंदू समाजाकडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची वेळ आल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी प्रश्न विचारणाऱ्यांना सडेतोड उत्तर देताना लिहिलेले आहे की, "माझ्या निवडीमुळे सर्व सामान्य धार्मिक वृत्तीच्या हिंदूंना आनंद नक्कीच वाटणार नाही. अध्यक्षाची निवड करताना धर्मशास्त्रांच्या निषेधाज्ञेचा भंग का केला याचे मंडळाला स्पष्टीकरण विचारले जाऊ शकते. सवर्णांना संबोधित करण्यासाठी मंडळाने मुंबईसारख्या दूरच्या ठिकाणी जाऊन हिंदूंना एवढा तिरस्करणीय व त्यातही एक अस्पृश्य, माणूस निवडण्याएवढे मंडळ अधःपतित का झाले, याची कारणे मंडळालाच माहीत आहेत. माझ्या दृष्टीने म्हणाल तर, आपण हे मान्य कराल की, मी हे निमंत्रण माझ्या स्वतःच्या आणि माझ्या अनेक अस्पृश्य सहकाऱ्यांच्या इच्छेच्या अगदीविरुद्ध स्वीकारले आहे. मला माहीत आहे की, हिंदूंना माझा उबग आलेला आहे. मला माहीत आहे की, त्यांच्यासाठी मी स्वीकारार्ह व्यक्ती नाही. हे सर्व माहीत असल्यामुळे मी स्वतःला त्यांच्यापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे. स्वतःला त्यांच्यावर लादण्याची माझी मनिषा नाही. मी माझ्या विचारांना माझ्या स्वतःच्या मंचावरून व्यक्त करीत आलो आहे. त्यामुळे आधीच खूप जळफळाट आणि वैताग - निर्माण झाला आहे. आतापावेतो माझे विचार दुरून फक्त त्यांच्या कानावर पडत होते, तेच विचार आता - साक्षात त्यांच्यासमोर मांडण्यासाठी हिंदूंच्या मंचावर पाऊल ठेवण्याची माझी इच्छा नाही. मी जो इथे आलो आहे तो आपल्या निवडीमुळे, माझ्या इच्छेखातर नव्हे. आपले कार्य समाजसुधारणेचे आहे. त्या कार्याने मला नेहमीच आकृष्ट

केलेले आहे आणि म्हणूनच विशेष करून या कार्याला मी मदत करू शकतो असे आपले मत झाले असताना त्यास मदत करण्याची संधी नाकारू नये, असे मला वाटते. मी आज जे काही बोलणार आहे त्याचा आपण ज्या प्रश्नाशी झुंजत आहात तो सोडविण्यासाठी काही उपयोग होईल की नाही याचा निर्णय आपणास करावयाचा आहे. केवळ त्या प्रश्नासंबंधी माझे विचार आपल्यासमोर मांडण्याचा माझा इरादा आहे.

**१. जातिसंस्था व हिंदू समाज**

डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेची चिकित्सा करताना जातीमागील विविध संदर्भाचा शोध घेतलेला आहे. शेवटी जातिसंस्था ही भारतीय हिंदू समाजातील निर्मिती आहे. हिंद समाज कसा आहे? याविषयी मांडणी करताना ते लिहितात, जातीची परिणती आर्थिक कार्यक्षमतेत होत नाही. जात ही वंश सुधारणा करू शकत नाही आणि तिने असे केलेही नाही. तथापि, एक गोष्ट केली आहे. तिने हिंदूंना संपूर्णपणे विघटित आणि नाउमेद केले आहे. हिंदू समाज ही एक भ्रामक कल्पना आहे. हिंदू हे नावसुद्धा परकीय आहे. मुस्लिमांनी आपली वेगळी ओळख दर्शविण्याच्या उद्देशाने स्थानिक लोकांना हे नाव दिले आहे. मुस्लीम आक्रमणापूर्वीच्या कोणत्याही संस्कृत साहित्यकृतीत ते आढळत नाही. त्यांना सर्वांसाठी एक सामान्य नाव असण्याची कधीच गरज वाटली नाही. कारण एकसंघ समाज गठित केल्याची कल्पनाही त्यांना कधी शिवली नाही. हिंदू हा एक समाज या अर्थाने अस्तित्वात नाही. तो केवळ जातींचा एक समूह आहे .

**2 .हिंदूंमधील धर्मांतर आणि शुद्धिकरणाची चळवळ**

भारतीय समाजाचा इतिहास पाहिल्यास आपल्याला त्यामध्ये सातत्याने बदल झालेले आहेत. अनेक वेळा परकीय आक्रमणांमध्ये इथल्या एतद्देशीय लोकांनी धर्मांतर केलेले आहे. अशा धर्मांतराला रोखण्यासाठी हिंदू समाजात शुद्धिकरणाची प्रक्रिया राबविली गेली. वास्तविक, धर्मांतर आणि शुद्धिकरण या वेगळ्या गोष्टी आहेत. डॉ. आंबेडकरांनी या विषयावर ग्रंथातील दहाव्या भागात प्रकाश टाकलेला आहे. यामध्ये ते लिहितात, जात ही धर्मांतर या कल्पनेशी विसंगत आहे. धर्मांतरामध्ये नवीन धार्मिक श्रद्धा आणि तत्त्वे मनावर ठसविणे, ही एकमेव समस्या अंतर्भूत नाही. धर्मांतरिताला नवीन धार्मिक समूहाच्या सामाजिक जीवनात स्थान शोधणे ही दुसरी आणि अधिक महत्त्वाची समस्या धर्मांतराच्या संदर्भात उद्भवते. हिंदू समाज जातींच…त्यात सामावून घेण्यास हिंदूंना जातीनेच आडकाठी केली आहे. जोपर्यंत जात अस्तित्वात आहे तोपर्यंत हिंदूधर्माला मिशनरी स्वरूपाचा धर्म बनविले जाऊ शकत नाही आणि परिणामी शुद्धिकरणाची चळवळ ही केवळ मुर्खपणाचीच नव्हे, तर निरुपयोगीही ठरेल .

**3. जातिव्यवस्थेचे निर्मूलन**

डॉ. आंबेडकरांनी १५ मे १९३६ मध्ये 'एनाहिलेशन ऑफ कास्ट' या नावाचे पुस्तक प्रकाशित केले. त्यांचा मराठी अनुवाद पुढे 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन' या नावाने प्रकाशित झाला. हा ग्रंथ म्हणजे डॉ. आंबेडकरांनी लाहोर येथील 'जात-पात तोडक' मंडळाच्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय पदासाठी तयार केलेले भाषण होते. परंतु भाषणातील काही भागाविषयी अधिवेशन संयोजक व डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये मतभेद झाले. अधिवेशन होऊ शकले नाही. मात्र डॉ. आंबेडकरांनी अत्यंत परिश्रम घेऊन तयार

केलेले भाषण स्वतः ग्रंथरूपाने प्रकाशित केले. कारण जातिसंस्थेविषयी अत्यंत परखडपणे केलेले चिंतन सर्व लोकांपर्यंत पोहचणे गरजेचे होते. डॉ. मांडणी केलेली आहे. या मांडणीतून त्यांची परखड वैचारिक भूमिका दिसते. तसेच प्रस्थापित समूहांचा सामाजिक सुधारणेचा मुखवटाही प्रकट होतो.

**4 . जात नष्टतेसाठी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथाच्या विसाव्या भागात जातीनिर्मूलनासंबंधी मूलभूत चिंतन मांडलेले आहे. जात कशी नष्ट करायची? असा प्रश्न मांडून त्यांनी याचे उत्तर विशद केलेले आहे. डॉ. आंबेडकर लिहितात, 'आंतरजातीय विवाह हाच त्यावरचा खरा उपाय आहे, अशी माझी खात्री पटली आहे. केवळ रक्ताची सरमिसळच आप्तस्वकीय असल्याची भावना निर्माण करू शकते आणि नातेसंबंधाची, एकसारखे असल्याची ही भावना सर्वात महत्त्वाची ठरल्याशिवाय जातीने निर्माण केलेली विभक्तवादी परका असल्याची भावना नाहीशी होणार नाही. अहिंदूपेक्षा हिंदूंच्या सामाजिक जीवनात आंतरजातीय विवाह हा निश्चितपणे अधिक शक्तिशाली घटक असणे आवश्यक आहे. जात मोडण्याचा खरा उपाय आंतरजातीय विवाह हाच आहे.

**5 . जातिनिर्मूलनाची चतु:सूत्री**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ग्रंथाच्या शेवटी सदर ग्रंथातील विषयाच्यासंबंधी निष्कर्षात्मक मांडणी केलेली आहे. ते सर्वांना उद्देशून म्हणतात, "हिंदू श्रोत्यांसमोर, त्यांच्याशी संबंधित अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर हे माझे बहुधा शेवटचे भाषण असेल" असा सूतोवाच करतात. जातीचा प्रश्न अतिशय गंभीर असून तो सोडविण्यासाठी त्यांनी सर्व हिंदू समूहाला आवाहन केलेले आहे. जातिसंस्थेच्या निर्मूलनासाठी त्यांनी "प्रथमतः जगभरातल्या विविध लोकांमध्ये रूढ असलेल्या श्रद्धा, सवयी, नीतिमूल्ये आणि जीवनविषयक दृष्टिकोन यांच्या संदर्भाने त्यांच्यात बऱ्याचदा तफावत असते, या व्यतिरिक्त त्यांच्याबद्दल काहीही बोलायचे नाही. अशी मानववंशशास्त्रज्ञाप्रमाणे सौम्य भूमिका घेणे पुरेसे आहे का, की कोणत्या प्रकारच्या नैतिकता, श्रद्धा, सवयी आणि दृष्टिकोन यांनी उत्तम कार्य केलेले आहे आणि ते बाळगणाऱ्या लोकांची भरभराट करण्यास, त्यांना सशक्त करण्यास, पृथ्वी व्यापण्यास आणि तिच्यावर अधिपत्य गाजवण्यास सक्षम बनविले आहे हे शोधून काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक नाही काय त्याचा हिंदूंनी सर्वप्रथम विचार केला पाहिजे" डॉ. आंबेडकरांनी यासाठी प्रो. कार्व्हर यांच्या निरीक्षणाचा आधार घेतला आहे. नीती आणि धर्म याचे अनुबंध मांडताना एकमेकांप्रति आपुलकीवर ते भर देतात. डॉ. आंबेडकरांनी दुसरा मुद्दा विचारात घेताना म्हटलेले आहे की, दुसरी गोष्ट अशी की, हिंदूंना त्यांना त्यांचा संपूर्ण सामाजिक वारसा जतन करायचा आहे की, त्यातील उपयुक्त असलेला भाग निवडून फक्त तेवढाच पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवायचा याचा विचार केला पाहिजे. ज्यांचा मी खूप ऋणी आहे असे माझे शिक्षक प्रो. जॉन डयुई म्हणतात, प्रत्येक समाज भूतळातील क्षुल्लक, निरुपयोगी व निष्फळ बाबी आणि निश्चितपणे विकृत असलेल्या गोष्टींच्या ओझ्याखाली दबलेला असतो. समाज जसा अधिक प्रबुद्ध होतो तसे त्याच्या ध्यानात येते की, तो सगळ्याच बाबी जतन करण्यास आणि त्यांच्या सगळ्याच उपलब्धी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास जबाबदार नाही तर ज्यामुळे भविष्यातील समाजाला अधिक चांगला करण्यास उपयोगी पडतील तेवढ्याच पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास जबाबदार आहे डॉ. आंबेडकरांनी यामध्ये सामाजिक दायित्वाची भूमिका मांडलेली आहे.

तिसरे सूत्र मांडताना त्यांनी म्हटलेले आहे की, हिंदूंनी त्यांना आदर्श प्रविणारा स्रोत म्हणून भूतकाळाचे जतन करणे थांबविले पाहिजे डॉ. आंबेडकरांनी प्रो. डयूई यांनी इतिहास पूजनाचे घातक परिणाम विशद करताना मांडलेल्या विचारांचा आधार घेतलेला आहे. चौथी गोष्ट अशी की कुठलीही गोष्ट निश्चित नाही, कुठलीही गोष्ट शाश्वत नाही. कुठलीही गोष्ट सनातन नाही. प्रत्येक गोष्ट बदलत असते. व्यक्ती तसेच समाजासाठीही बदल हाच जीवनाचा नियम आहे. हे मान्य करण्याची वेळ आलेली आहे की नाही याचा हिंदूंनी विचार केला पाहिजे. बदलत्या समाजात, जुन्या मूल्यांत सतत क्रांती घडविली पाहिजे आणि हिंदूनी हेसुद्धा समजून घेतले पाहिजे की, जसे माणसाच्या कृतीचे मूल्यमापन करण्यासाठी मानक असले पाहिजे; तसेच त्या मानकामध्ये बदल करण्याची तयारीसुद्धा असली पाहिजे.

**6 . आदर्श समाज**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाची चिकित्सा करताना त्यातील विविध अंतर्विरोध मांडलेले आहेत. विशेषतः जातीसंस्थेमुळे उत्पन्न सामाजिक विषमता, अंघटितता, विभाजनाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या भेदांचा समाचार त्यांनी येथे घेतलेला आहे. या सर्व मांडणीच्यामागे डॉ. आंबेडकरांची व्यापक सामाजिक भूमिका होती. या ग्रंथातील चौदाव्या भागात त्यांनी आदर्श समाज कसा असावा? याची मार्मिक, तात्त्विक मांडणी केलेली आहे. ती अतिशय महत्त्वाची असून यासंबंधी ते म्हणतात, "माझा आदर्श समाज स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर आधारित असेल. आणि तो का असू नये? बंधुत्वाला काय आक्षेप असू शकतो? मला तरी त्याची कल्पना करता येत नाही. आदर्श समाज परिवर्तनास अनुकूल असला पाहिजे. एका भागात होत असलेले बदल दुसऱ्या भागात पोहोचण्यासाठी त्यात पुष्कळ मार्ग असावेत. आदर्श समाजामध्ये विविध हितसंबंध जाणीवपूर्वक एकमेकांपर्यंत पोहोचवून त्यात भागीदार होता आले पाहिजे. त्यात इतर संस्थांशी संपर्कासाठी विविध आणि मुक्तस्थळे असली पाहिजेत, यालाच बंधुभाव म्हणतात. जे लोकशाहीचे दुसरे नाव आहे. लोकशाही ही केवळ शासनपद्धती नाही. मूलतः ती सहजीवनाची पद्धती आहे, परस्पर आदानप्रदानाचा तो एक सहअनुभव आहे. स्वातंत्र्याला काय आक्षेप असू शकतो? मुक्तसंचाराचा अधिकार, जीवित आणि सुरक्षेचा अधिकार या अर्थाने स्वातंत्र्याला क्वचितच कुणी आक्षेप घेईल. शरीर आरोग्यपूर्ण ठेवण्यासाठी, उपजीविका कमावण्याच्या हेतूने मालमत्तेचा अधिकार, औजारे आणि साहित्याचा हक्क या अर्थाने स्वातंत्र्याला काही आक्षेप नसतो. व्यक्तीच्या क्षमतेच्या प्रभावी आणि सक्षम वापरातून लाभ होण्यासाठी त्याला स्वातंत्र्य का असू नये? जीवित, सुरक्षा आणि मालमत्तेचा अधिकार या अर्थाने स्वातंत्र्य मान्य करणारे जातीचे समर्थक, स्वातंत्र्याच्या कल्पनेत व्यक्तीच्या व्यवसाय निवडण्याच्या स्वातंत्र्याला तत्परतेने मान्यता देणार नाहीत. तथापि, अशा रीतीने स्वातंत्र्याला आक्षेप घेणे गुलामगिरीला चिरंतन स्वरूप देण्यासारखे आहे. समता केवळ कल्पना असू शकेल तरीसुद्धा तिला नियामक तत्त्व म्हणून स्वीकारले पाहिजे" . डॉ. आंबेडकरांनी मांडलेली आदर्श समाजाची संरचना मानवतावादी मूल्यांवर अधिष्ठित आहे. ज्यामधून परंपरावादी जातीय विषमतेवर त्यांनी प्रहार केलेले आहेत.

**समारोप**

डॉ. आंबेडकरांनी शेवटी सव्विसाव्या भागात भाषणाचा समारोप केलेला आहे. त्यामध्ये ते भाषण फारक लांबलचक झाल्याचे म्हणतात. परंतु विषय अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे त्याची मूलगामी चिकित्सा करणे गरजेचे होते. आपले विचार हे कसे

निरपेक्ष आहेत याविषयी ते येथे म्हणतात, आपली परवानगी असेल तर मी हे सांगू इच्छितो की, सत्तेच्या हातचे बाहुले नसलेल्या, मोठेपणाची भाटगिरी न करणाऱ्या व्यक्तीचे हे विचार आहेत. गरीब आणि शोषित जनतेच्या मुक्तीसाठी ज्याचे सगळे सार्वजनिक प्रयत्न हा एक अविरत संघर्ष आहे आणि त्याचे बक्षीस म्हणून राष्ट्रीय वृत्तपत्रे आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांनी त्याच्यावर निंदा-नालस्ती आणि शिव्यांचा वर्षाव केलेला आहे. कारण काय तर, शोषितांना जुलूम करणाऱ्यांच्या सोन्याने मुक्त करण्याच्या आणि गरिबांना श्रीमंतांच्या पैशाने उभे करण्याच्या, लबाडी हा शब्द मी वापरणार नाही. त्यांच्या चमत्कारात मी सहभागी होण्याचे नाकारले, अशा माणसाचे हे विचार आहे . एकूणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातिसंस्थेचे निर्मूलन हा अतिशय महत्त्वाचा वैचारिक ग्रंथ आहे. या ग्रंथाची निर्मिती प्रसंगपरत्वे झालेली असली तरी या ग्रंथातील विचारतत्त्वे भारतीय समाजास दिशादर्शक अशीच आहेत.

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 10**

# २०. महाराष्ट्रातील दलितांच्या आर्थिक स्थितीचा आढावा

**दिपक लक्ष्मण सकट**
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**गोषवारा**

दलित किंवा वंचित यासारख्या धार्मिक व सामाजिक गट इतरांपेक्षा अधिक गरीब व वंचित का आहेत याचे प्रस्तुत शोध निबंधामध्ये मांडणी केलेली आहे. सदर शोधनिबंधामध्ये दालितासोबत जातीय-आर्थिक व सामाजिक भेदभाव केला जातो, त्यामुळे त्याची गरिबी सर्वाधिक आहे. म्हणूनच हा शोध निबंधामध्ये राज्यातील गरिबी व वंचिततेचे प्रश्न केंद्र स्थानी ठेऊन मांडणी केलेली आहे.

**बीज शब्द :** दलित,अनुसूचित जाती, बहिष्कृत, अस्पृश्य.

**प्रस्तावना**

दलित म्हणजे संवैधानिकरित्या अनुसूचित जातींचा समूह होय. भारतीय राज्यघटनेच्या अंबलबजावणीपूर्वी याला अस्पृश्य म्हणले जात होते. "दलित" हा शब्द वापरायला भारतीय हायकोर्टांनी बंदी घातली आहे. हा समाज शोषित, पिडीत, दबलेला व पिचलेला होता. हे हिंदू धर्माच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील शूद्रांनंतर जो पाचवा वर्ण आहे तो दलित (अस्पृश्य) हा वर्ण होता. संवैधानिक भाषेत दलितांना अनुसूचित जाती म्हणले जाते. दलित हा अनेक अस्पृश्य जातींचा समूह आहे ज्यांना सुमारे अडीच ते पाच हजार वर्षांपासून धार्मिक गुलामीच्या बंधनात जखडून ठेवले होते. ज्या पददलित समाजघटकाला सर्व समाजबांधवांनी सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक दृष्ट्या युगानुयुगे उपेक्षित ठेवला, त्या घटकाला दलित म्हणतात.

महाराष्ट्रातील दलित हा सामाजिक बहिष्कृत होता. परंतु आज देखील समाजामध्ये फारसा बदल जाणवत नाही. गरिबांमध्ये अनुसूचित जमाती, भटके व विमुक्त जमाती, अनुसूचित जाती, धर्मांतरित बौद्ध अधिक गरीब असून भूक व कुपोषणाने ग्रासलेले आहेत. धर्मांतरित बौद्ध अधिक गरीब आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे की, धर्मांतरित बौद्धांमध्ये बहुतांश अनुसूचित जातीतीलच लोक आहेत, ज्यांची गरिबी अनुसूचित जमातीनंतर दुसऱ्या क्रमांकावर येते. धर्मांतरित बौद्ध हे अग्रेसर समूहात आहेत असा एक भ्रम आहे, परंतु वास्तविकता त्याउलट आहे. त्यांच्या रोजच्या कामधंद्यांकडे काळजीपूर्वक लक्ष दिले तर त्यातून त्यांच्या उच्च गरिबी व उपासमारीची कारणे आपणास मिळतात. त्यांच्या उच्च गरिबीचे कारण, त्यापैकी बहुतांश भूमिहीन आहेत, व्यवसाय धंदे नाहीत, त्यामुळे बहुतांश लोक रोजमजुरीवरच जगत आहेत. त्यातही रोजगार, शेती व व्यवसायामध्ये आजही मोठ्या प्रमाणावर त्यांना जातीय भेदभाव सहन करावा लागतो. आणखी यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हापासून ते धर्मांतरित झाले तेव्हा त्याना राज्यात व केंद्रातील सरकारी नोकरीतील आरक्षणापासून बौद्ध धर्म स्वीकारल्याने त्यांना वंचित ठेवण्यात आले.

समजामध्ये प्रचलित जातिव्यवस्थेची उतरंड या दलित समाजावर होणाऱ्या आर्थिक परिणामाला बहुतांशी कारणीभूत आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील दलितांची आर्थिक परिस्थितीमध्ये कशा पद्धतीने बदल झाला, हे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये व गृहीतके पुढील प्रमाणे लक्षात घेता येतील.

**उद्दिष्ट्ये**

१. महाराष्ट्रातील दलितांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

**गृहीतके**

१. महाराष्ट्रातील जातीय व्यवस्थेचा दलितांच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

**शिक्षण**

शुद्रातिशूद्रांना गुलामगिरीतून बाहेर काढणे आणि समाजात तत्त्व अधिष्ठित करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे महात्मा फुले यांनी ओळखून बहुजन समाजाच्या शिक्षणास चालना मिळावी म्हणून अविरत प्रयत्न केले . याचीच गरज पुढे जाऊन राज्यघटनेतील अनुच्छेद 21- अ हा 6 ते 14 वर्षाच्या सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षणाची हमी देते.परंतु सद्यस्थितीला शालेय शिक्षणात खाजगीकरण मोठ्याप्रमाणात वाढले आहे.महाराष्टात गरिबांच्या व अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे .महाराष्ट्रात खाजगीकरण हे गरिबांची शालेय नुकसान करणारे चुकीचे धोरण राबवत आहे.

शालेय शिक्षण हा राज्यघटनेने हमी दिलेला "मूलभूत हक्क" ठरतो कारण तो "सर्वांनासमान संधी " या मूलभूत हक्कातील तत्वाशी सुसंगत आहे. परंतु खाजगी' स्वयंअर्थसहाय्यत ' शाळांनाच प्रोत्साहन देण्यामुळे मात्र संधीची विषमता वाढते. आणि याच्या परिणामी शिक्षणातील विषमता दिसते आहे. खाजगी विनाअनुदानित शाळांनाच मुक्त द्वार देणारे सरकारी धोरण असले, तर सक्तीच्या शिक्षणाचे ध्येय दूरच राहणार हे उघड आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या पाहिली तर 2018 मध्ये शाळेत कधीच प्रवेश न घेतलेली अनुसूचित जाती जमाती मुले -मुलींचे प्रमाण 9 ते 20 टक्क्यावर होते.

- 1960-1980 चे दशक: साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी, शिक्षणापासून गंभीर बहिष्कार.
- 1991 ची जनगणना: दलित पुरुषांसाठी साक्षरता दर 36%, दलित महिलांसाठी 19%.
- 2001 ची जनगणना: सुधारित दर, पुरुष साक्षरता 50%, महिला साक्षरता 30%.
- 2011 ची जनगणना: पुरुष साक्षरता 68.9%, महिला साक्षरता 47.4%.
- 2020 चे दशक: पुरुष साक्षरता सुमारे 80%, महिला साक्षरता सुमारे 60%, सतत वाढ होत आहे परंतु उच्च शिक्षण आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता यासारख्या आव्हानांसह बरीच प्रगती झाली असली तरी, दलित समुदायांना अजूनही भेदभाव, आर्थिक अडचणी आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता नसणे यासारख्या अडथळयांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे सुधारणांची गती मंदावते.

**गरिबी**

महाराष्ट्राची समृद्धी वाढत असतानाच गरीब आणि श्रीमंत मधील ची आर्थिक परिस्थितीची दरी आहे ती खूप जास्त आहे. गरिबीमध्ये अनुसूचित जाती आणि जमाती, इतर मागास जाती आणि दुर्बल गटातील लोकांचे प्रमाण अधिक आहे आणखी पुढे जाऊन पाहिलं तर महाराष्ट्रातील शहरी भागात, ग्रामीण भागाच्या तुलनेत गरिबी कमी आहे. 2012 च्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील सरासरी 17 टक्के लोकसंख्या दरिद्री आहे. तथापि दलित व आदिवासी समाज घटकांचा विचार केल्यास दारिद्र्याची समस्या अधिकच गंभीर स्वरूपाचे असलेली आढळून येते. या सर्वेक्षणानुसार आदिवासी 54%, दलित 20 %,इतर मागास जाती 14% असे दारिद्र्याचे प्रमाण असल्याची आकडेवारी आहे. याउलट सवर्णापैकी नऊ टक्के लोकसंख्या दारिद्र्यात आढळते. धार्मिक गटाचा विचार केला तर बौद्ध धर्मीय 27 %मुस्लिम 20% हिंदू धर्मीय 12% लोक गरीब आहेत.

ग्रामीण महाराष्ट्रात जवळपास 55 % राहतात त्यामध्ये सुद्धा गरिबांच्या प्रमाणामध्ये आदिवासींचे प्रमाण 62% त्या खालोखाल 23 %दलित, 20% ओबीसी, 15 %उच्च जातीतील लोक गरीब आहेत. या गरीबीतून कुपोषण ही मोठी समस्या महाराष्ट्राला भेडसावत आहे. अन्न व इतर पोषक द्रव्याचे अपुरे आणि निकृष्ट दर्जाचे सेवन याचा दारिद्र्यशी कारक घटक म्हणून खूप जवळचा संबंध आहे. गरीबीत वाढलेली लहान मुले कमी वजनाची उंचीची आणि आणि आजाराने ग्रासलेली असतात. 2013 मधील सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील सरासरी 47% मुले कमी आणि अपुऱ्या वजनाची आढळली.

एकूणच विकासाच्या गप्पा मारत असताना महाराष्ट्रातील दलित हिंदू, आदिवासी आणि बौद्ध (दलित ) हा समाजातील वंचित घटक मोठ्या प्रमाणात दारिद्र्यात खितपत पडला आहे हे विसरून चालणार नाही. शासनाच्या बऱ्याच आदिवासी दलित आणि नवबुद्ध यांचे दारिद्र्य आणि कुपोषण हटवण्याबाबतच्या योजना अयशस्वी ठरल्या आहेत. हे आकडेवारी म्हणून सिद्ध होते.

**रोजगार**

कोणत्याही राज्याच्या किंवा देशाच्या आर्थिक प्रगतीतील महत्त्वाचं अडसर म्हणजे बेरोजगार महाराष्ट्राची आर्थिक प्रगती नोकऱ्या किंवा रोजगार देण्यास असमर्थ ठरते आहे. सन 2012 मध्ये राज्यातील चार टक्के व्यक्ती बेरोजगार होते परंतु नोकरीच्या शोधात असलेल्या 15 ते 29 या वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगाराचे प्रमाण अधिक होते. निरक्षरामध्ये बेरोजगार चे प्रमाण जास्त दिसून आले व ते प्रमाण उच्च शिकलेल्या गटात कमी होत जाते यावरून शिक्षणामुळे नोकरी व रोजगारांच्या संधी उपलब्ध होतात. बेरोजगारी ही आर्थिक समस्या जवळ आहे हे जरी खरे असले तरी बेरोजगारीचा फटका सर्व समाजातील घटकांना सारखाच बसलेला आहे असे दिसत नाही.आधीपासून वंचित असलेल्या समूहालाच इतरांपेक्षा अधिक बेरोजगारीचा का फटका बसला आहे. आर्थिक वर्ष 2017-18 मध्ये अनुसूचित जाती आणि मुस्लिम यांच्यातील बेरोजगारीचे प्रमाण हे अनुसूचित जमाती ओबीसी यासारख्या अन्य वंचित पेक्षा तसेच उच्च जातीतील बेरोजगारीपेक्षा कधी असल्याचे दिसते.

देशामध्ये आर्थिक दृष्ट्या प्रगत मानले जाणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र हे बेरोजगारीच्या बाबतीत मात्र खूप मागे असलेले दिसून येते. 2011 - 12 ते 2017-18 या कालखंडामध्ये आर्थिक विकास करून आलेल्या आहे. परंतु रोजगाराची संधी खूप कमी झाले आहेत. याला रोजगार संधी कमी करणारा विकास म्हणता येईल.

**संपत्तीतील विषमता**

हिंदू धर्मीय चातुरवर्णी व्यवस्थित मध्ये संपत्तीचा विषमतेचाच म्हणजे गरीब आणि श्रीमंत यांच्यामधील दरी मध्ये कमालीचे अंतर असल्याचे दिसते. 2014-15 मध्ये महाराष्ट्राचा क्रमांक देशाच्या प्रमुख राज्यातील दरडोई उत्पन्न मध्ये तुलनात्मक रित्या पहिला होता. मात्र राज्याच्या गरिबींच्या प्रमाणामध्ये महाराष्ट्र अकराव्या क्रमांकावर होते हे भयावह लपवता येत नाही. 2012 साली मालमत्ता धारणेतील विषमते बाबत महाराष्ट्राच याविषयी पहिल्या क्रमांकावर होता.

मालमत्ता म्हणजे काय,तर जमीन, इमारत,यंत्रसामग्री, सोने नाणे, बँकातील ठेवी, समभाग अशा घटकांचा समावेश होतो महाराष्ट्रात मालमत्ता मध्ये सर्वाधिक म्हणजे 66 टक्के मालमत्ता इमारती या प्रकारात आहे. त्यानंतर 28% मालमत्ता जमिनी स्वरूपात आहे या दोन्ही मिळून महाराष्ट्रातील 94% मालमत्ता होता या दोन गटात आहेत. उरलेली सहा टक्के इतर गटात असल्याचे दिसून येते. मालमत्ता विषमते बाबत जातीचा घनिष्ठ संबंध असल्याचे आढळून आले आहे. सन 2013 च्या आकडेवारीनुसार एकंदर मालमत्ता पैकी 66 %की मालमत्ता उच्चवर्णी यांच्या मालकीचे आहेत. ओबीसी 18%,अनुसूचित जाती 4%,अनुसूचित जमातीकडे 2%, मुस्लिम समाजाकडे 5% मालमत्ता आहे. या आकडेवारीवरून चित्र स्पष्ट होते की मालमत्ता विषमता ही उच्चवर्णीयांना झुकतेमाप देणारी जाती व्यवस्था हे महत्त्वाचे कारण आहे. मालमत्ता घटकांनुसार विचार केल्यास राज्यातील 76 % इमारतीवर उच्चवर्णीयांची मालकी आहे त्यानंतर ओबीसी 9% अनुसूचित जातील 5.5 % असा क्रम लागतो ग्रामीण भागातील शेतजमीचा विचार केल्यास 43% ओबीसींच्या 41% जमीन उच्च जातीच्या मालकीच्या असल्याचे दिसून येते या उलट अनुसूचित जातीकडे अवघे 5% जमिनीचा वाट आहे.

समाजात एकीकडे मूठभर लोकांच्या हाती मोठ्या प्रमाणात संपत्तीची संचयन आहे तर दुसरीकडे अनुसूचित जाती जमाती केवळ मूठभर संपत्तीचे संचयन आहे या विषमता कमी करण्यासाठी आरक्षणाच्या छोट्याशा मदतीने संपत्तीचे विषमता कमी होण्यासाठी किती कालावधी लागेल याबाबत संभ्रम आहे.

**सारांश**

हजारो वर्ष शोषित राहिलेला अनुसूचित जाती आणि जमाती या वर्गामध्ये शिक्षण व कल्याणकारी राज्य ही संकल्पना राबवण्यात सरकारचे धोरण कुठेतरी कमी पडल्याचे दिसून येते. त्यासाठी त्यांना कमी व्याज दराने उद्योजकासाठी कर्ज सुविधा शैक्षणिक कर्जे उपलब्ध करून दिली पाहिजेत. दलितांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना कितपत यशस्वी होतात याचा आढाव देखील शासनाने घेणे गरजेचे आहे. आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी दलितांच्या रोजगार संख्येमध्ये वाढ होणे आवश्यक आहे सर्व

समाजातील कार्यक्षम लोकांची संख्या वाढीने राज्यातील त्याचबरोबर देशाच्या आर्थिक विकासामध्ये मोठी भर पडेल. शासनाने बहुआयामी धोरण राबवून दलितांचा उद्धार करावा.

**संदर्भ सूची**


१. Dr. Ambedkar B.R., (**1979**), 'state and monitories, Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches, Vol.**1**, Education Department, govt. Mumbai.

२. थोरात सुखदेव, (२०२३), 'वंचितांचे वर्तमान: गरिबी, विषमता व भेदभाव समस्या व धोरणांचे विश्लेषण', लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई

३. Banerjee A.V. & Esther Duflo, (**2011**), 'Poor Economics', Random House Publishers, India.

४. देशपांडे अश्विनी, (२०११), 'जातिव्यवस्थेचे व्याकरण: आधुनिक भारतातील आर्थिक भेदभाव', ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, यु. के.

५. थोरात सुखदेव,आणि कॅथरिन एस. न्यूमन.,( २०१०), 'जातीय अडथळे: आधुनिक भारतातील आर्थिक भेदभाव', ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, यु. के.

६. कांबळे, एन. डी. (१९८१), 'वंचित जाती आणि त्यांचा समानतेसाठी संघर्ष', आशिष पब्लिशिंग हाऊस, पटना

# २१. संत चोखामेळा यांच्या अभंगातील दलित वेदना

**डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार**
सहाय्यक प्राध्यापक, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**प्रस्तावना**

भारतीय समाजातील प्रत्येकांचे जीवन हे वेगळेपणाचे आहे.भारतामध्ये विविध जाती समूहाचे लोक राहतात आणि या जातीसमूहातून साहित्याची निर्मिती होत असते. साहित्याची निर्मिती करणारा कोणत्या जातीत जन्माला आला किंवा कुठल्या धर्मात जन्माला आला हे मुळीच महत्त्वाचे नाही तर शोषण उपेक्षा जन्मावरून उच्च नीच भेद ठरणाऱ्या रुढी यांचा पराभूत करायला हे साहित्य फक्त माणुसकीला समजावून घेते 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हीच साहित्याची मूळ प्रतिज्ञा आहे वास्तवाची जाणीव ठेवून अन्यायविरुद्ध आवाज उठवणे या ध्येयाने प्रेरित झालेले हे साहित्य माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे.हा विश्वव्यापी विचार घेऊन लढलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी हिंदू समाजातल्या अस्पृश्यांचे पुढारी म्हणून मानले आहे. समाजक्रांतीसाठी सर्वस्व पणाला लावणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे एक महापुरुष होते या सार्वभौम देशाला राज्यघटना अर्पण करणारे ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत त्यांनी आयुष्यभर ज्ञानसाधना केली आणि आपल्या जवळचे ज्ञान दलित समाजाला दिले. जीवनाचे असे एकही क्षेत्र नाही की ज्या क्षेत्रात बाबासाहेब ज्ञानाचा दिवा घेऊन गेले नाहीत आपल्या अज्ञानी बांधवांना त्यांनी ज्ञानाची वाट दाखविली. दारिद्र्यात कितपत पडलेल्या दलितांची अस्मिता जागृत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र साहित्यातून त्यांच्या वाटचालीतून त्यांच्या विचारातून त्यांच्या जीवनदृष्टीतून सर्व सामान्यांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जीवनालाच सार्थ करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.

दलितांच्या साहित्यातून व्यक्त होते ते युगानुयुगाची चिरवेदना या वेदनाचे स्वरुप आपल्याला दिसून येते ते संत चोखामेळा यांच्या अभंग गाथेत. संत काव्याचे अभ्यासकानी तरी चोकोबांच्या अभंगाला कुठे न्याय दिला आहे? ज्ञानेश्वरांच्या नेतृत्वाखाली जमलेल्या संत मेळ्यातील एक महार संत म्हणून त्यांचा विचार करण्यापलीकडे या संत वाङ्मयाच्या उपासकांनी दुसरे केले काय? श्री. म.माटे यांनी मात्र महार संतांच्या मनाचे सामाजिक दुखणे त्यांच्या लेखणीतून स्पष्ट केले आहे. की चोकोबांच्या मनाचे सामाजिक दुःख व्यक्त करणारे बरेचसे अभंग आहेत हे अभंग चोकोबाचे अतिशय तळमळीने आणि कष्टी मनाने गायलेले आहेत चोकोबांच्या अभंगात वेदना होती. हे त्यांनी नमूद केले.

**संत चोखामेळा यांची महती**

संत चोखामेळा हे एक संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावाळीतले संत होते संत नामदेव हे त्यांचे गुरु होते तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोकामेळा होरपळून निघाले ते शूद्र अति शूद्र गावगाडा समाजजीवन भौतिक व्यवहार उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या

विळख्यात अडकले.संत चोखामेळा हे प्रापंचिक ग्रस्त होते ते आपल्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत गावगाड्यातील शिवा शिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता जीवनात अस्वस्थ होते परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले त्यांना संतसंग लाभला त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता श्री विठ्ठलाला त्यांना इतरांप्रमाणे उरावरी भेटावे असे खूप वाटत होते परंतु ते सावळे गोजिरे रूप महाद्वारातूनच पहावे लागेल ही खंत त्यांच्या मनात नेहमी सलत होती.संत चोखामेळा म्हणतात घटना यावे शुद्ध होऊनी जावे दवंडी पिठी भावे डोळा असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ अभेद भक्तीचे लेणे आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोचवले आत्मविकासाची संधी तत्कालीन समाज रचनेतील अगदी तळातील लोकांनाही मिळावी असे ज्ञानेश्वरांची सर्वच संतांना प्रांजलपणे वाटत होते त्याचवेळी संत चोखामेळांनी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगातून समाज बांधवांना दिला.

संत चोखामेळांचे भाव विश्व अनुभवण्याचा प्रयत्न केला असता एकमुख आक्रमणाचा अनुभव येतो संस्कार संपन्न संवेदनक्षम भक्ती प्रवण आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या चोखामेळांच्या रचनातून त्यांची आंतरिक वेदनांची सुर चढलेले जाणवतात हीन मजमंती देवा कैसे घडू तुमची सेवा असा उपरोधिक प्रश्न ते देवालाच विचारतात का म्हणून आम्ही या यातना सहन करावयाच्या भगवंताच्या लेखी सर्व त्याचीच लेकरे आहेत ना मग असा दुजाभाव का असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होऊन ते व्यतीत होतात ना दिसतात त्यांच्या अभंग रचना हृदयाला भिडणारे आहेत त्यांना भोगावे लागलेले दुःख त्यांची झालेले अक्षम्य उपेक्षा मानसिक छळ यांचे पडसाद भाव व विभागतेसह त्यांच्या काव्यरचनेत अभिव्यक्त झालेले दिसून येतात. संत चोखामेळांची सुमारे ३५० अभंग सध्या उपलब्ध आहेत.संत चोखामेळा हे मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील मेहूण या गावचे रहिवाशी ते उदरनिर्वाहासाठी पंढरपुरी शके बाराशे मध्ये आले पंढरपुरी आल्यानंतर त्यांनी विठ्ठल भक्तीने दंग झाले.ते सदैव पांडुरंगाचे नामस्मरणात व भजनात रंगून जायचे त्यावेळी मंगळवेढे नगरी भरभराटीस आली होती शके १२६० ला मंगळवेढ्यातील वेशीच्या तटाची भिंत कोसळली होती व तिचे बांधकाम करण्यासाठी पंढरपूरचे मजूर आणण्यासाठी दूत पंढरपुरी आला. आणि त्या मजुरा सोबत चोखामेळा तठाच्या भिंतीचे बांधकाम करण्यासाठी सहकुटुंब मंगळवेढास आले संत चोखामेळा हे प्रापंच गृहस्थ ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग होते त्यांच्या कुटुंबातील सर्वच जण हरिभक्ति करीत होते.त्या सर्वांचे श्री विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते त्यांची पत्नी सोयराबाई हिचे बाळंतपण स्वतः विठाई माऊलीने म्हणजे नणंदेचे रूप घेऊन केले अशी कथा प्रचलित आहे.संत चोखामेळांचा मुलगा कर्ममेळा हा पण संत परंपरेत आहे.सोयराबाई व कर्ममेळा यांच्याही काही सुंदर अभंग रचना आहेत. संत चोखामेळांचे मेहुणे बंका महार व बहिण निर्मळा यांच्याही काही उत्तम रचना आहेत संत चोखामेळांच्या भक्तीची उंची फार मोठी होती ते स्वतःला विठू पाटलाचा बलुतेदार म्हणून समजत असत गावगाड्यातील शिवा शिवीच्या वातावरण अत्यंत श्वास कोंडला जात होता दैन्य ,दारिद्र, वैफल्य यामुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते.किल्ल्याच्या पूर्वेकडील वेशीचे बांधकाम चालू असताना ते एकाएकी कोसळले व त्याखाली श्री चोखामेळा राया आणि त्यांचे अनेक सोबतचे मजूर मयत झाले अशी ही घटना शके १२६० म्हणजे इसवी सन १३३८ मध्ये वैशाख वद्य पंचमीस झाली पुढे श्री संत नामदेव महाराज मंगळवेढ्यात आले व ज्या अस्ती मधून विठ्ठल विठ्ठल असा आवाज

होता त्या असती श्री चोखामेळा रायांच्या आहेत असे ओळखून त्यांनी त्या पंढरपुरी विठ्ठल मंदिरापुढे सध्या नामदेव पायरी जवळ समाधी बांधली, अशी ही चोखोबांची महती.संत चोखोबांचे अभंग संत चोखोबांच्या अभंगातून आपल्या जमातीची वेदना तीव्रतेने उत्कटतेने व्यक्त होताना दिसते त्यांच्या शब्द शब्दातून जे दुःख झिरपत होते ते अंतकरणाला जाऊन भिडत होते.

**'धाव घाली विठू आता I चालू नको मंद I**

**बडवे मज मारिती I ऐसा काहीतरी अपराध II**

**'जोहार मायबाप जोहार I तुमच्या महाराचा मी महार I**

**बहु भुकेला जाहलो I तुमच्या उष्टासाठी आलो II**

**'आमुची केली हीन याती I तुज का न कळे श्रीपती I**

**जन्म गेला उष्टे खाता II लाज न ये तुमचे चित्ता II**

**'ऊस डोंगा परी I रस नोहे डोंगा I**

**काय भुललासी वरलीया रंगा II**

**चोखा डोंगा परी I भाव नोहे डोंगा II**

**विठ्ठल विठ्ठल गजरी I अवघी दुमदुमली पंढरी I**

हे त्यांचे अभंग आजही लोकप्रिय आहे या सर्वांचे विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते संत चोखोबा मंगळवेढ्याचे होते त्यांना आयुष्यभर उपेक्षा मिळाली त्यांना उपेक्षित बांधवांच्या उद्धाराची सतत काळजी वाटत होती आपल्या बांधवांना समान हक्क मिळावेत समाजातील तेढ कमी व्हावी जातीमधील संघर्षाची भ्रमक कल्पना नष्ट व्हावी यासाठी त्यांनी भक्तिमार्गाद्वारे प्रयत्न केले.त्यांच्या या अभंगातून त्यांच्या मनीचे दुःख कोणी जाणून घेतलेच नाही तेरावे शतक महाराष्ट्रात अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे याच शतकात ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सिद्ध केला आणि भागवत धर्मप्रंथाला त्यांचे स्वतःचे असे तत्त्वज्ञान प्राप्त करून दिले याच शतकात त्यांना संत मंडळाचे चक्रवर्तीत्व लाभले. नामदेव, गोरा कुंभार, विसोबा खेचर, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, जनाबाई इत्यादी कितीतरी संत समाजाच्या विविध थरातून आले होते एका अर्थाने या मराठीच्या नगरात ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला. ज्ञानदेवांच्या अमृतवाणीनेच चोकोबा घडले ज्ञानदेवांचा विचार हेच चोखोबांचे बळ होते. येथील वर्णव्यवस्थेमुळे आणि जाती व्यवस्थेमुळे जी त्यांच्या वाट्याला आलेली दुःखे होती. त्यावर ती दुखे नष्ट करण्याचे बळ ज्ञानदेवांनी दिले असे ते अंतकरणातून बोलतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते की चोखामेळा हे वराड प्रांताचे होते चोकोबा हा एक प्रामाणिक माणूस त्याचाही बाभळा भाव होता की आपल्या ला अस्पृश्य जाती जन्म लाभला तो आपल्या पूर्व संचितामुळे येथल्या सनातली धर्म प्रवृत्तीने पूर्वजन्मीची फळे या जन्मी भोगण्यासाठी त्याला अस्पृश्य जातीत यावे लागते हे सूत्र इथल्या शुद्रातील सूत्रांच्या मनात रुजवले होते म्हणून चोकोबा म्हणतात,

**शुद्ध चोखामेळा I करी नामाचा सोहळा**

**यातीहीन मी महार I पूर्वी निळाचा अवतार**

**कृष्णनिंदा घडली होती I म्हणोनि मी महार जन्मप्राप्ती**

**चोखा म्हणे विटाळ I आम्हा पूर्वीचे हे फळ**

पूर्वजन्मीच्या पापामुळे माणूस दुःख भोगतो असे म्हणणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होता.पण त्या काळात अशा समजुतींनाच भोळीभाबडी जनता कवटाळून बसे.सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे आहेत व म्हणून परमेश्वराची भक्ती करण्यास जात अडवी येत नाही असे एका बाजूने मनायचे  व दुसऱ्या बाजूला शूद्र म्हणून हिनवायचे. निर्मळ मनाच्या चोखोबाला या विपरीत स्थितीचा अर्थ कळत नाही तो आपली गाराने विठ्ठलाच्या दरबारी नेतात आणि चोखोबा म्हणतात,

**हीन याती माझी देवा I कैसे घडेल तुझी सेवा**

**मज दूर दूर हो म्हणती I तुज भेटू कवण्या रीती**

आपल्या वेदना चोकबांच्या प्रत्येक अभंगातील ओळीतून जाणवते.चोखोबांच्या गळयात पांडुरंगाचा हार दिसला म्हणून सवर्णांनी त्यांच्या अनन्वित छळ केला तरी चोकोबा आपले घायाळ अंतकरण विठ्ठला पाशी प्रगट करतात ते लिहितात,

**घाई घाई विठू चालू नको मंद I मज मारिती बडवे काहीतरी**

**अपराध विठोबाचा हार I तुझ्या कंठी कैसा आला**

**शिव्या देऊनी मारा म्हणती I देव का बाटविला**

या अभंगातून चोकोबांचे दुःख व्यक्त करतात कारण वर्णव्यवस्था जाती व्यवस्था मानणारा हिंदू समाज अस्पृश्यांना जनावरापेक्षाही नीच वृत्तीने वागवीत होताचोकोबांच्या मनात या व्यवस्थेचा अर्थच लक्षात येत नव्हता प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुद्ध चोकोबा आपला निषेध कसा नोंदवणार त्यांना फक्त एवढेच म्हणता येत होते की, उठ विठ्ठला तूच याचा निवाडा कर.चोकोबांच्या मनातले दुःख अनेक अभंगातून व्यक्त झालेले आपल्याला दिसून येतात कधी या दुःखाचे रूप सामाजिक आहे तर कधी त्यांचे रूप पारमार्थिक आहे असेच करणे होते तुला तरी जन्म का दिला मला असा अर्थ प्रश्न ते देवाला विचारतात तर कधी त्यांच्या मनातील दुःखाची भावना व्यक्त करतात.सामाजिक अन्याय विरुद्ध ते लिहितात तेव्हा मन गलबलून जाते. अशा अनेक अभंगातून त्यांनी स्वतःचे दुःख व्यक्त करताना दिसतात.

ते म्हणतात,

हीन याती माझी देवा I कैसे घडे तुझी सेवा

मज दूर दूर हो म्हणती I तुझे भेटू कवण्यारीती

असेही ते म्हणतात, चोकोबांच्या या अभंगातला एक स्वर ईश्वर प्राप्ती बद्दल झुरणारा भाविक भक्तांचा होता म्हणून विठ्ठलाला उद्देशून म्हणतात विठ्ठलाचीच आपल्यावर सत्ता आहे तोच आपला मायबाप आहे म्हणून ते त्याला विनवितात. सर्व संतांच्या

दुःखापेक्षा चोखोबांचे दुःख व्यक्त करण्याची रीत वेगळी आहे कधी त्यांनी देवाची अर्जवे करावी तर कधी त्यांच्याशी भांडण मांडावे कधी प्रेम व्यक्त करावे तर कधी राग मानावे या अशा रीतीने हृदयाची त्यांची व्यथा व्यक्त करावी.असा इतर संतांचा राजमार्ग चोखोबांनी चोखाळाला होता. पारमार्थिक वेदनेचा अंत स्वर सामाजिक वेदनेचाच होता. चोकोबांचे अभंग निथळ, पारदर्शी आहेत जे जाणवले ते त्यांनी सरळ लिहिले प्रांजलपणे व्यक्त करणे हा त्यांचा स्वभाव धर्म आहे पंढरीचे रूप कितीतरी कवींनी व्यक्त केले आहे पण चोखोबा किती तल्लीनेतेने पंढरीचे चित्र रेखाटतात ते म्हणतात,

**विठ्ठल विठ्ठल गजरी ll अवघी दुमदुमली पंढरी**

**होतो नामाचा गजर l दिंड्या पताकांचे भार**

**निवृत्ती**, **ज्ञानदेव**, **सोपान** b**अपार वैष्णव ते जाण**

**हरी कीर्तनाची दाटी l तेथे चोखा घाली मिठी**

अशाप्रकारे अनेक अभंग ते रचतात.चोखोबा आणि अन्य संत अन्यायविरुद्ध बंड थोपटून उभे राहिले नाहीत पण त्यांनी धर्मावर डोंगावर वाणीचे कोरडे ओडले पण अपमानित जिने विसरण्यासाठी ते विठ्ठलाच्या दरबारी आले जीवितांच्या क्षणभंगुरतेचा प्रत्यय हा प्रधान प्रयत्न असल्यामुळे या संतांना दुसरे काही सुचत नव्हते वाट्याला आलेले दुःख निमुटपणे शोषित राहिल्यामुळे त्यांचे आत्मिक बळ वाढले पण स्थितीशील समाजात चैतन्य निर्माण होऊ शकले नाही. अशाप्रकारे अनेक अभंगातून चोखोबांचे दुःख व्यक्त होताना दिसून येते चोखोबांचे अभंग हे म्हणजे दलितांच्या वेदनेचे स्वरूप आहे.

**निष्कर्ष**

१. दलित साहित्याची निर्मिती वेगवेगळया जाती समूहातून होते.

२. दलित साहित्य हे माणसाला माणूस म्हणून जगवते.

३. संत चोखोबांच्या अभंगातून समाजातील वेदनेचे चित्र प्रकट होते.

४. समाजातील प्रत्येक वर्गाला भक्तीचा अधिकार मिळतो.

५. चोखामेळयाच्या अभंगातून अंतरिक मनाची संवेदना दिसून येते.

६. संत चोखामेळयाच्या अभंगातून दलित समाजाची वेदना तीव्रतेने प्रकट होताना दिसते.

**संदर्भसूची**

१. लिंबाळे शरण कुमार - भारतीय दलित पँथर, प्रचार प्रकाशन १९९२

२. कुंभोजकर (डॉ.)ललिता- दलित कविता एक दर्शन, प्रथम आवृत्ती १९९४.

३. फडके भालचंद्र -दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्री विद्या प्रकाशन पुणे,तिसरी आवृत्ती -२०००

४. पुरुषोत्तम खेडेकर - बहुजनांचा सांस्कृतिक इतिहास, जिजाई प्रकाशन, पुणे २००४

५. गायकवाड डॉ संपत - दलित आत्मकथने भाषिक समाज भाषा आणि भाषा व्यवहार, प्रज्ञा प्रबोध प्रकाशन, सांगली, प्रथम आवृत्ती २०१२

# २२. विदर्भातील विविध संस्था मंडळांचे अस्पृश्यता निवारण कार्य-एक अभ्यास

**प्रा. डॉ. अनिल आसाराम तुपकर**
दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्र मध्ये विविध सुधारकांनी अस्पृश्यतेचे निवारण करण्यासाठी नाना प्रकारच्या चळवळी सुरू केल्या.त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन विदर्भात अस्पृश्यतेचे निवारण करण्यासाठी विविध संस्था ,मंडळांची स्थापना झाली विदर्भात त्यांच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक ,धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात प्रशासनीय कामगिरी करून अस्पृश्यतेचे निवारण केले गेले.

विदर्भात अस्पृश्य लोकांमध्ये अनेक जाती होत्या .काही अपवाद वगळता तर जवळपास सर्वच आर्थिक व बौद्धिक दृष्टीने मागासलेल्या होत्या. त्यांना समाजात स्थान नव्हते .त्यांना विहिरीवर पाणी भरू दिले जात नव्हते, मंदिरात प्रवेश नव्हता ,सार्वजनिक शाळा रस्ते खुले नव्हती . अस्पृश्यता समाजाला कलंक होता .या पद दलित जातीचा कैवार घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी श्री किसन फगुजी बनसोडे यांनी इ. स.1901 ला नागपूर मध्ये सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाज ही संस्था स्थापन केली.1 या संस्थेच्या माध्यमातून जागृतीचे कार्य केले गेले .शिक्षणाशिवाय समाजामध्ये जागृती होणार नाही .त्यासाठी अस्पृश्य मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी इ. स. 1907 मध्ये नागपूरच्या पाचपावली भागात चोखामेळा कन्या शाळेची स्थापना केली .त्यानंतर नानासाहेब गवई आणि श्री किसन फगोजी बनसोड यांनी इ.स.1914 मध्ये चोखामेळा वस्तीगृहाची ची स्थापना केली.2 दुसऱ्या गावाहून शिक्षणासाठी येणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून हे वसतिगृह स्थापन करण्यात आलेले होते .याच प्रकारची वस्तीगृह अमरावती, अचलपूर ,यवतमाळ आणि चिखली या गावी स्थापन करण्यात आले होते .त्यामुळे ग्रामीण भागातील अस्पृश्य मुलांनी शिक्षण घेऊन त्यांच्यामध्ये जागृती घडून आली.

दलितांच्या शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास करण्यासाठी फतुझी बापूजी शेंडे यांनी इ. स.1904 ला तरुण महार मंडळाची स्थापना केली .या संस्थेद्वारे नागपूर येथील इंदुरा भागात कामगार लोकांची वस्ती होती. त्या वस्तीतील कामगारांच्या मुला मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी शाळा काढली. इ. स 1920 मध्ये विद्यार्थी वस्तीगृह निर्माण केले. त्यामुळे दलित मजुरांच्या विभागात भरीव शैक्षणिक कार्य झाले त्यामुळे अस्पृश्यता निवारणाला मोठी मदत झाली.3

अस्पृश्यता निवारण करण्यासाठी कालीचरण नंदा गवळी यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी इ. स. 1914 मध्ये त्यांनी भारतीय महार पंचायत नावाची संस्था स्थापन केली व त्या संस्थेद्वारे इ. स.1916 मध्ये अस्पृश्यता निवारणाच्या दृष्टीने एक परिषद भरविली तसेच त्यांनी गोंदिया येथे मुलींची शाळा स्थापन केली. भंडारा जिल्ह्यातील बिडी कामगारांमध्ये  अमंगल चालीरीती होत्या त्या नष्ट करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

**विसाव्या शतकाच्या प्रारंभीचा काळ**

अस्पृश्यांच्या दृष्टीने अतिशय कठीण होता .या काळात अस्पृश्य उद्धारात आपले सर्वस्व झोकून देणारे नानासाहेब गवई यांनी इ.स. 1910 मध्ये अमरावती येथे महार सुधारक मंडळ नावाची संस्था काढली.4 त्या अगोदर इ.स.1909 मध्ये भुगाव येथे महार लायब्ररी या नावाचे वाचनालय काढले .समाजाची धार्मिक वृत्ती लक्षात घेऊन त्यांनी भजन समाजाची निर्मिती केली. या भजन समाजामार्फत त्यांनी जनजागृती घडवून आणली .दलितांची न्याय बाजू मांडण्याचा व अस्पृश्य निवारण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

महात्मा गांधी व जमनालाल बजाज यांच्या प्रेरणेने प्रभावित होऊन सेवाग्राम येथील जालम सिंह छत्रे, बापूराव देशमुख, गोपाळराव शिंगारे, दशरथ गवई, बंकिम ताकसांडे अशा सर्व जातीय तरुणांनी स्पेशल क्लब ची स्थापना केली स्पेशल क्लबच्या माध्यमातून केलाल बकेलाल भंग्याच्या हस्ते विहिरीतून पाणी काढून येथील विहिरी खुल्या केल्या गेल्या .शिवाय विठोबा मंदिरात लिबशा मांगाला आणि दत्त मंदिरात हरिजन लोकांना प्रवेश दिला गेला.

अशाप्रकारे अस्पृश्य लोकांच्या उद्धारासाठी विदर्भात विविध संस्था, मंडळे स्थापन होऊन त्या माध्यमातून अस्पृश्यता निवारण्याचं कार्य केले गेले.

**संदर्भ**

1. डॉ. वककानी नी .आ., आधुनिक विदर्भाचा इतिहास 1947- 1950, श्री मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती 2003, पृ. क्र.167
2. कित्ता पृ. क्र.167
3. डॉ. कोलारकर शे .गो.,आधुनिक विदर्भाचा इतिहास 1885 - 1947 श्री मंगेश प्रकाशन नागपूर आवृत्ती 2016, पृ. क्र.516
4. कित्ता पृ. क्र. 518
5. डॉ. बैस वीरेंद्र गोपाल सिंह, वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन नागपुर प्रथम आवृत्ती 2005 , पृ. क्र. 190

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com)** **CC - 10**

# २३. संत तुकारामांच्या अभंगातील पर्यावरणविषयक विचार

**श्री. अर्जुन बंडू राठोड**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**१.१ प्रस्तावना**

आधुनिक काळ हा तंत्रज्ञान आणि भौतिक विकासाचा काळ आहे. हा विकास मानवी जीवनाला जेवढे सुखी बनवण्यासाठी नवनवीन अविष्कार घडवत आहे. या अविष्कारांतून भलेही भौतिक सुविधा निर्माण होत गेल्या, परंतु दुसरीकडे निसर्ग आणि पर्यावरणाकडे मानव जातीचेs प्रचंड दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. यातून निसर्गाचे संतुलन राखण्याचे मोठे आव्हान आज समस्त मानव जातीसमोर असल्याने नैसर्गिक साधन-संपत्तीसह पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व वाढत चालले आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस आणि एकविसाव्या शतकात भारतीय उपखंडासह जगातील अनेक भागांत आलेल्या नैसर्गिक आपत्ती आणि त्यातून झालेली मानवी जीवनाची हानी पर्यावरणाच्या रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करीत असल्याचे स्पष्ट होते. विशेषत: वाढत्या शहरीकरणामुळे बदललेले नदी-नाल्यांचे प्रवाह, रस्ते-महामार्गाच्या तसेच इमारत बांधकामासाठी शहरांलगत होत असलेले गौण खनिजांचे अमर्याद उत्खनन यामुळे भारतासारख्या विकसनशील देशात नैसर्गिक आपत्तींची समस्या अधिक गंभीर होत चालली असल्याचे दिसून येते. पर्यावरण संवर्धनाकडे वर्षानुवर्षे होत असलेल्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेले निसर्गाचे असंतुलन हे नैसर्गिक आपत्तींचे एक प्रमुख कारण आहे. म्हणूनच पर्यावरणाचे रक्षण ही आधुनिक काळातील अत्यंतिक गरज आहे.

भारतासारख्या खंडप्राय देशाला धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक अशी खूप मोठी परंपरा आहे. प्राचीन काळात येथील संस्कृती आदर्शवत होती. सामाजिक रचनेला धार्मिकतेचे अधिष्ठान देऊन धार्मिकतेसोबत सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परंपरा येथे निर्माण झाल्या. या परंपरा केवळ सोपस्कार म्हणून न राहता ती या भागातील लोकांची जीवनशैली झाली. याच परंपरेतून संत परंपरेचा उगम झाला. विशेषत: महाराष्ट्राला फार मोठी संत परंपरा लाभली आहे. या संत परंपरेत सामाजिक मूल्यांच्या जपणुकीपासून नैसर्गिक मूल्यांच्या जपणुकीच्या दृष्टीने खूप मोठ्या प्रमाणात जागरुकता निर्माण झाली असल्याचे दिसून येते. श्री संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६) हे या परंपरेतील आद्यसंत ठरतात. यानंतर भक्तिमार्गातून समाजाला नैतिकतेबाबत जागरुक करून आपल्या साहित्याच्या माध्यमातून अप्रत्यक्ष दीक्षा देण्याची एक परंपराच या राज्यात निर्माण झाली असल्याचे दिसून येते. यात श्री संत ज्ञानेश्वरांनंतर संत गोरोबा काका (१२६७-१३१७), संत चोखामेळा (१२७३-१३३८), संत जनाबाई (१२५८-१३५०), संत नामदेव (१२७०-१३५०), संत सेना महाराज (१२७८-१३५८), संत तुकाराम (१६०८-१६५०), समर्थ रामदास (१६०८-१६८२) असे कितीतरी संत होऊन गेले. या सर्वच संतांनी समाजाला धार्मिक श्रद्धेसोबतच जीवनमूल्यांचे शिक्षण देणारी साहित्यनिर्मिती केली, जी आजच्या आधुनिक काळातही प्रत्येक क्षणाला शिकवण देणारी आहे.

संत तुकाराम महाराजांनी आपल्या ओव्यांमधून प्रापंचिक समाजास मोलाचे उपदेश केले असल्याचे दिसून येते. संन्यास न घेता किंवा संसारत्याग न करता संसार सांभाळत नित्य परमेश्वराचे नामस्मरण केले तरी मोक्षप्राप्ती होते, हा उपदेश त्यांनी केला आहे.

म्हणूनच, '‘सत्यवादी करी संसार सकळ, अलिप्त कमळ जळी जैसे | घडे ज्या उपकार, भूतांची ते दया, आत्मस्थिती तया अंगी वसे’||' हे सांगताना तुकाराम महाराजांनी परमेश्वर प्राप्तीसाठी एक संदेश सकलजनांना दिला असल्याचे दिसून येते. संसाराचे हे महत्त्व सांगताना तुकाराम महाराजांनी निसर्गातील अन्य घटकांचे महत्त्वही तेवढेच ओळखले होते. म्हणूनच प्रापंचिक माणसाला उपदेश करताना तुकाराम महाराज निसर्गातील घटकांचे उदाहरण आपल्या ओवीतून देतात. ते म्हणतात, 'हे चि चिंता काय खावे म्हणउनि | भले तुजहुनी पक्षिराज||' पशु-पक्षांना रोजच्या जगण्यात कधीच उद्याची चिंता पडत नाही. माणूस मात्र कायम उद्याची चिंता करीत जगत असतो, असा दाखला ते देतात. निसर्गातील या घटकांशी नाते जोडताना तुकाराम महाराज पशु, पक्षी, वृक्ष, वेली अशा नैसर्गिक घटकांचे मानवी जीवनातील महत्त्वही नकळत विशद करताना दिसतात.

विशेषत: आज नैतिक मूल्यांसोबतच निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज ठरली आहे. निसर्गाने निर्माण केलेल्या जीवनचक्रातील प्रत्येक घटकांचे जीवनाच्या टप्प्यांत किती महत्त्व आहे याची जाणीव आजच्या आधुनिक काळात होत आहे. कारण, वारंवार येणा-या नैसर्गिक आपत्ती आणि त्यातून मानवी जीवनावर होणारे दीर्घकालीन परिणाम किती गंभीर आहेत याची जाणीव आधुनिक पिढीला होत आहे. यातूनच निसर्गाच्या रक्षणाची, अर्थातच पर्यावरण संवर्धनाची एक जबाबदारी या पिढीवर आली आहे. या पर्यावरणाच्या रक्षणाचे महत्त्व मध्ययुगीन काळात ज्या संतांनी ओळखले होते त्यात श्री संत तुकाराम महाराजांचे नाव अग्रस्थानी आहे. श्री तुकाराम महाराजांनी आपल्या साहित्यातून अर्थातच आपल्या गाथेमधून केवळ धार्मिक-आध्यात्मिक विचारच मांडले नाहीत, तर पर्यावरण रक्षणाच्या जबाबदारीची एक जाणीव समाजाला करून दिली असल्याचे दिसून येते.

**अभंगातून पर्यावरणाचा संदेश**

महाराष्ट्राला लाभलेल्या या थोर संत परंपरेत अनेक संतांनी निसर्ग हा केंद्रस्थानी मानून पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. संत हे प्रामुख्याने मानवी जीवनाबद्दल अध्यात्माच्या मार्गाने विचार करणारे असले तरी त्यांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी त्यांच्या साहित्यातून स्पष्ट दिसते. हीच या संतांची पर्यावरणवादी दृष्टी मानली जाते. संत श्री तुकाराम महाराजांनीही निसर्गाकडे याच दृष्टीने पाहिले असल्याचे स्पष्ट होते. मध्ययुगीत काळात जे संत होऊन गेले ते मुख्यत्वे कृषिप्रधान संस्कृतीतून आलेले होते. त्यामुळे निसर्गाशी या सर्वांची नाळ होती. संत तुकाराम महाराजही त्यातलेच. म्हणूनच माणूस आणि निसर्ग यातील एकात्मतेची भावना त्यांच्यात रुजलेली होती. म्हणूनच गाथेमध्ये मानवी जीवनाच्या विविध पैलूंसोबतच निसर्ग व्यक्त झालेला दिसून येतो. शेतीच्या माध्यमातून या निसर्गाशी एकरूप होताना त्याचा अभिमानही कसा आहे हे संत तुकारामांच्या रचनेतून सिद्ध होते. ते म्हणतात, 'बरे देवा कुणबी केलो। नाही तरी दंभी असतो मेलो।' एकूणच श्री तुकाराम महाराजांची निसर्गाशी असलेली एकात्मता त्यांच्या शब्दातून व्यक्त झाली असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच पर्यावरणाचे महत्त्व विशद करताना त्यांनी अनेक दाखले गाथेतून दिले आहेत. विशेषत: शेती आणि निसर्गाशी संबंधित सर्वाधिक संदर्भ श्री तुकाराम महाराजांच्या रचनेतून आल्याचे दिसून येते. चंदन, कमल अशा संदर्भापेक्षा कावळा, घुबड, चातक, चकोर, गाय, बैल, घोडा, अळी, उंदीर, मांजर असे निसर्गचक्रातील प्रमुख घटकांचे उल्लेख त्यांच्या रचनेतून अगदी स्पष्टपणे आले आहेत. एका ओवीत तुकाराम महाराज म्हणतात, 'उंबरातील कीटका | हेचि ब्रह्मांड ऐंसे लेखा || ऐसी उंबरे किती झाडीं | ऐशीं झाडें किती नवखंडी ||' उंबराच्या फळात असलेल्या असंख्य कीटकांसाठी ते उंबर हेच विश्व असते. अशा कितीतरी उंबरांतून विश्वाचा आनंद घेणारे प्राणीमात्र निसर्गचक्रातील अविभाज्य घटक कसे आहेत, हे तुकाराम महाराज सांगून जातात.

**एकांतात आत्मचिंतन आणि पर्यावरणाला महत्त्व**

आध्यात्मिक साधनेसाठी संसार सोडून एकांतात जाणे या संत परंपरेत फारसे मान्य नसले तरी सृष्टीचा विचार करून मानवी जीवनाचे तत्त्व अभ्यासताना निसर्गाचा सहवास तितकाच महत्त्वाचा आहे, हे या संतांच्या दिनचर्येवरून स्पष्ट होते. संत तुकाराम महाराजही याला अपवाद नव्हते. ते स्वत: या आध्यात्मिक चिंतनासाठी देहूजवळ असलेल्या भंडा-या डोंगरावर जात असत. तेथेच चिंतन करून निसर्गाशी तादात्म्य पावताना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणा-या रचना त्यांनी रचलेल्या गाथेतून उतरल्या आहेत.

**आध्यात्मिक परंपरांशी जोड**

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांतून करुणा, दया आणि सेवाभाव जनसामान्यांना सांगितला आहे. हे तत्त्व सांगताना त्यांनी निसर्गाचे महत्त्वही जाणले होते. म्हणूनच त्यांनी पशू-पक्षांच्या जीवनाला आध्यात्मिक परंपराशी जोडले आणि तश रचना त्यांनी आपल्या अभंगांतून केल्या. वृक्ष-वेलींना त्यांनी मानवी जीवनाशी जोडले आणि त्यातून नकळत पर्यावरण रक्षणाचा मोठा संदेश त्या काळात समाजाला दिला. आज आधुनिक युगात पर्यावरणाच्या असंतुलनामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. या समस्यांचे गांभीर्य चारशे वर्षांपूर्वी ओळखून तुकाराम महाराजांनी समाजाला भविष्यातील धोक्याच्या दृष्टीने एकप्रकारे जागरुक करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी...**

निसर्ग आणि पर्यावरणाशी एकरूप होत असताना त्याचे तुकाराम महाराजांनी अगदी स्पष्टपणे महत्त्व सांगितले असल्याचे दिसून येते. निसर्गातील वृक्ष आणि वेलींपासून मानवाला खूप मोठ्या प्रमाणात लाभ मिळत असतो किंवा तो मिळण्याच्या दृष्टीने या वृक्षवेलींचे मानवी जीवनात खूप मोठे महत्त्व आहे. म्हणूनच हे वृक्ष आणि वेली आपले सगे-सोयरे आहेत, असे तुकाराम महाराज म्हणतात. म्हणजेच ज्या वृक्ष-वेली आपल्याला कायम लाभ देत राहतात त्या वृक्ष-वेलींचे संवर्धन तेवढेच महत्त्वाचे कसे आहे, हे अप्रत्यक्षपणे तुकाराम महाराज या अभंगातून सांगतात.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षी ही सुस्वरे आळविती।। धृ ।।**
**येण सुखे रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष अंगा येत ।। १ ।।**
**आकाश मंडप पृथिवी आसन। रमे तेथे मन क्रिडा करी ।। २ ।।**
**कंथा, कमंडलू देह उपचारा, जाणवितो वारा अवसरु ।। ३ ।।**
**हरिकथा भोजन परवडी विस्तार। करोनि प्रकार सेवु रुची ।। ४ ।।**
**तुका म्हणे होय मनासी संवादु। आपलासी वाद आपणासी ।। ५ ।।**

मानवी जीवनात अत्यंतिक महत्त्वाच्या असलेल्या या वनांना आकाशाचे आवरण आहे आणि धरती हे अंथरूण. या निसर्गाच्या सानिध्यात एकांतवासात हलकेच येणारी वाऱ्याची झुळूक, पानांची सळसळ आणि त्यातून उमटणारा मनाचा नाद याचा आनंद लुटावा. याच वृक्ष-वेलींच्या सानिध्यात ऋषी-मुनी फक्त आसन आणि कमंडलू घेऊन राहिले. या एकांतवासात त्यांचे ज्ञानरूपी कमंडलू ओतप्रोत भरले. म्हणजेच निसर्ग केवळ भौतिक लाभ देतो असे नव्हे, तर आध्यात्मिक लाभही या निसर्गातूनच मिळत असतात, असे महाराज यातून सांगून जातात. आपण कोण आहोत, ही ओळख आपल्यालाच करून घ्यावयाची असेल तर या वनांच्या

सहवासात काळ घालवा, येथेच भजन-कीर्तनात मन रमवा म्हणजे आपला जन्म कशासाठी आहे, याची प्रचीती येईल, असेही महाराज नमूद करतात. एकूणच आपल्या मनाचा आपल्याशीच थेट संवाद साधण्यासाठी वनांचा, वृक्ष-वेलींचा सहवास किती महत्त्वाचा आहे, हे तुकाराम महाराजांनी या अभंगातून पटवून दिले असल्याचे दिसून येते.

**निसर्ग, पर्यावरण रक्षणाचा संदेश**

प्राचीन-पुरातन काळात वनसंपदा विपूल प्रमाणात होती. हळूहळू मानवी वस्त्यांचा विस्तार वाढत गेला तसा या वनांच्या जडण-घडणीत मानवी हस्तक्षेप सुरू झाला. आदीम काळात मानव या वनांचा उपयोग पशू-पक्षांच्या शिकारीसाठी करीत असे. याशिवाय वाळलेल्या लाकडांपासून अग्नी, झाडांच्या सालींपासून वल्कले, कंदमुळे, शिकारीसाठी लाकडी शस्त्रांची निर्मिती करणे असा वापर होत गेला. यानंतर काळ पुन्हा बदलला. आता शेतीप्रधान जीवनपद्धती अस्तित्वात आली. या शेतीसाठी मानवाने वनसंपदा तोडायला सुरुवात केली. या जागेत आता धान्याची शेती होऊ लागली. हा हस्तक्षेप इतका वाढला की, आता शेतीसाठी लागणारी अवजारे तयार करण्यासाठी वृक्षतोड सुरू झाली. कालांतराने फळे, सुगंधी फुले-वनस्पती, औषधी वनस्पती यासाठी मोठे वृक्ष तोडून तेथे फळबागा व उपयोगाच्या वनस्पतींची लागवड सुरू झाली. यामुळे आपोआपच वनक्षेत्र कमी होत गेले. एवढ्यावर वनांचा संहार थांबला नाही, तर शेतीचा विस्तार करण्यासाठी वने तोडून तेथे शेती केली जाऊ लागली. अशा प्रकारे वनसंपदेमध्ये मानवी हस्तक्षेप एवढा वाढला की आधुनिक काळात तर ठराविक देशांमध्ये वनक्षेत्रच कमी झाले आहे. साहजिकच त्याचा परिणाम थेट पर्यावरणावर झाला असून अगदी पावसाचे असंतुलित प्रमाण, प्रचंड उष्णता, दुष्काळ अशा समस्या निर्माण होत आहेत. पर्यावरण असमतोलाचे हे परिणाम आता एवढे गंभीर झाले आहेत की देशात वृक्षतोड ही कायद्याच्या चौकटीत आणावी लागली आहे. वनांचे संरक्षण हा आता एक कायदेशीर मुद्दा ठरला आहे. त्यामुळे संत तुकाराम महाराजांनी वनसंपदेच्या संरक्षणाचा चारशे वर्षांपूर्वी दिलेला संदेश नकळत त्यांना असलेल्या पर्यावरणाच्या ज्ञानाची एक साक्ष ठरतो.

**संदर्भ सूची**

१. माधव कानिटकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर २०१४.

२. कृष्णराव अर्जुन केळूस्कर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, जानेवारी २०१७.

३. डॉ. सुषमा लोखंडे-खोपडे, समाजप्रबोधनाचे अध्वर्यू संत तुकाराम व संत कबीर, विजय प्रकाशन, नागपूर, २४ जून २०२२.

४. श्री संत तुकाराम : व्यक्तित्त्व आणि कवित्व, शेट्ये पुष्पलता, प्रबंध -एनएनडीटी महिला विद्यापीठ, पुणे.

५. पंढरीनाथ धोंडगे, संत तुकारामांच्या अभंगांचा एक चिकित्सक अभ्यास, मराठी विभाग, प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.

# २४. भारतीय राजकारणात दलित महिलांसामोरील आव्हाने

**वैभव कृष्णा जानकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.

**१.१ सारांश**

दलित महिलांना भारतीय राजकारणात सामील होण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. जातीभेद, सामाजिक भेदभाव, आर्थिक दुर्बलता, शिक्षणाचा अभाव, लैंगिक भेदभाव, राजकीय हिंसा आणि मीडिया असमानता ही प्रमुख अडचणी आहेत. या अडथळयांमुळे दलित महिलांना आपला आवाज उठवणे आणि राजकारणात सक्रिय सहभाग घेणे कठीण जाते. परंतु, भारतीय राज्यघटना, शासकीय योजना, आणि सामाजिक चळवळींमुळे काही सकारात्मक बदलही झाले आहेत. महिला आरक्षण, शैक्षणिक संधी, आर्थिक मदत, आणि नेतृत्व प्रशिक्षण यामुळे दलित महिलांना सशक्तीकरणाचा मार्ग सापडत आहे. दलित महिलांना सशक्त करण्यासाठी काही महत्त्वाच्या उपाययोजना पुढे आल्या आहेत, जसे की, शिक्षण आणि कौशल्य विकास, आर्थिक मदत, राजकीय प्रशिक्षण, सामाजिक जागरूकता आणि कायदेशीर संरक्षण, मीडिया आणि समाजमाध्यमांमध्ये दलित महिलांच्या आवाजाला प्राधान्यदेणे आणि सकारात्मक कथाप्रसिद्ध करणे. राजकीय सहभाग वाढविणे, महिलांना नेतृत्वासाठी प्रोत्साहित करणे आणि संघटनात्मक बळकटीकरण करणे.

**१.२ प्रस्तावना**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. येथे विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती आणि वर्ग यांचा समावेश आहे. मात्र, या विविधतेच्या गर्दीत काही समाजघटकांना त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. त्यामध्ये दलित महिलांना दुहेरी अन्यायाचा सामना करावा लागतो जसे की जातीय भेदभाव आणि लैंगिक शोषण. भारतीय समाजात दीर्घकाळापासून दलित समुदायाला अस्पृश्यतेचा आणि सामाजिक भेदभावाचा त्रास सहन करावा लागला आहे. महिलांना यामुळे दुहेरी शोषणाचा सामना करावा लागतो. दलित महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, आणि राजकीय सहभाग यासारख्या मूलभूत हक्कांपासून दूर ठेवले गेले आहे.भारतीय राज्यघटनेनुसार, प्रत्येक व्यक्तीस समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचे अधिकार आहेत. तसेच, अनुसूचित जाती व जमातींना शिक्षण, रोजगार आणि राजकीय क्षेत्रात आरक्षणही दिले आहे. या आरक्षणामुळे दलित महिलांना राजकारणात प्रवेश करण्याचा मार्ग सुकर झाला आहे, परंतु प्रत्यक्षात त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाल्यावरही, दलित महिलांना जातीभेद, आर्थिक दुर्बलता, लैंगिक भेदभाव, राजकीय हिंसा, सामाजिक दबाव, आणि अपुऱ्या शैक्षणिक संधींसारख्या विविध समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे राजकीय प्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो.

**१.३ पारिभाषिक शब्दः** राजकारण, दलित , महिला, राज्यघटना.

**१. ४ उद्देश**

१. भारतीय राजकरणात दलित महिलांसामोरील आव्हाणांचा अभ्यास करणे.

२. दलित महिलांचा राजकारणातील सहभागाचा ऐतिहासिक आढावा घेणे

**१.५ राजकारण**

राजकारण म्हणजे समाजाच्या शासन आणि व्यवस्थापनाची प्रक्रिया. यात लोकशाही, धोरणे, निर्णय प्रक्रिया, सत्तेचा वापर, आणि नागरिकांच्या कल्याणासाठी आखण्यात येणाऱ्या योजना यांचा समावेश होतो. राजकारणाचा उद्देश सामाजिक व्यवस्थेत सुव्यवस्था, विकास, आणि न्याय निर्माण करणे असतो.

**१.६ दलित**

'दलित' हा संस्कृत शब्द आहे, ज्याचा अर्थ "दबलेला", "तोडलेला", किंवा "शोषित" असा होतो. हा शब्द भारतीय समाजातील जातीय अन्याय, भेदभाव, आणि अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर वापरण्यात आला आहे. "दलित" ही संज्ञा भारतीय समाजव्यवस्थेतील ऐतिहासिकदृष्ट्या वंचित, शोषित, आणि समाजातील अत्याचारग्रस्त घटकांसाठी वापरण्यात येतो. विशेषतः भारतातील अनुसूचित जाती (Scheduled Castes) या घटकांचा उल्लेख दलित असा केला जातो.

प्राचीन भारतीय वर्णव्यवस्थेनुसार, समाज चार मुख्य वर्गांमध्ये विभागलेला होता – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र. या व्यवस्थेच्या बाहेर ठेवले गेलेले लोक "अस्पृश्य" म्हणून ओळखले जात होते. त्यांनाच पुढे "दलित" म्हणण्यात आले. अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, आणि अन्याय यांना सामोरे जाणाऱ्या या समाजाने मोठा संघर्ष केला. त्यात दलित महिलांना या शोषणाचा सर्वाधिक सामना करावा लागला. प्राचीन काळात, महिलांना समाजात काही प्रमाणात मान्यता होती, परंतु दलित महिलांना अस्पृश्यतेच्या नावाखाली मुख्यधारेच्या समाजापासून दूर ठेवले गेले. त्यांना शिक्षण, सार्वजनिक जीवन, आणि धार्मिक क्रियांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार नव्हता. दलित महिलांना अत्यंत अपमानास्पद आणि अस्वच्छ कामे करावी लागत.

मध्ययुगात दलित महिलांची स्थिती आणखी बिकट झाली. समाजात महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले, आणि दलित महिलांना केवळ त्यांच्या जातिव्यवस्थेमुळेच नव्हे, तर त्यांच्या लिंगामुळेही दडपण्यात आले. या काळात अनेक दलित महिला सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक शोषणाचा बळी ठरल्या. त्यांना कोणतेही अधिकार नव्हते, आणि त्यांच्या सुरक्षेचे कोणतेही नियम अस्तित्वात नव्हते.

ब्रिटिश काळात सामाजिक सुधारणांचा विचार सुरू झाला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी दलित महिलांच्या शिक्षणासाठी आणि सन्मानासाठी लढा दिला. सावित्रीबाई फुले यांनी पहिल्या मुलींच्या शाळेची स्थापना करून महिलांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांसाठी शिक्षण, रोजगार आणि समानतेसाठी कठोर संघर्ष केला. त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला. १९२७ मध्ये बाबासाहेबांनी महाड

सत्याग्रह आणि चवदार तळे आंदोलन यामार्फत दलितांच्या सामाजिक हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांनी अस्पृश्यतेचा विरोध केला आणि दलितांच्या सक्षमीकरणासाठी संविधानिक अधिकार मिळवून दिले. १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून सामाजिक समतेचा संदेश दिला.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर, भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचे हक्क दिले. अनुसूचित जाती व जमातींसाठी शिक्षण, रोजगार आणि राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आली. महिलांसाठी समान हक्कांची हमी देण्यात आली, परंतु प्रत्यक्षात दलित महिलांना अजूनही अनेक अडचणींचा सामना करावा लागला. दलित महिलांच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि राजकीय सहभागाच्या संदर्भात अनेक धोरणे राबवली गेली, मात्र याचा परिणाम मर्यादित राहिला.

आजही, अनेक दलित महिला शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि राजकारणात मागे आहेत. काही महिला नेतृत्वाच्या भूमिकेत आल्या असल्या, तरी समाजातील रूढीवादी विचारसरणी, जातीभेद, आणि लैंगिक अन्यायामुळे त्यांच्या वाटचालीला अनेक अडथळे आहेत. समानतेच्या आणि हक्कांच्या आश्वासनांसहही, दलित महिलांना अद्यापही त्यांच्या अधिकारांसाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या ज्या अन्यायाचा वारसा त्यांनी सहन केला आहे, त्याचे परिणाम आजही त्यांच्या जीवनात दिसून येतात.

**१.८ राजकरणात दलित महिलांसामोरील आव्हाने**

भारतीय लोकशाहीत दलित महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण ते समाजातील सर्वात वंचित आणि शोषित घटकांपैकी एक आहेत. परंतु, राजकारणात प्रवेश करताना आणि टिकून राहताना दलित महिलांना अनेक प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागतो. या आव्हानांमध्ये जातीय भेदभाव, आर्थिक दुर्बलता, लैंगिक असमानता, शैक्षणिक अभाव, सामाजिक दडपण, आणि राजकीय हिंसा यांचा समावेश होतो.

**१. जातीभेद आणि सामाजिक भेदभाव**

भारतीय समाजात अजूनही जातिव्यवस्था टिकून आहे. दलित महिलांना निवडणुकीत भाग घेताना आणि राजकीय नेतृत्वात अडथळ्यांना सामोरे जावे लागते. अनेकदा दलित महिलांना राजकीय पक्षांकडून उमेदवारी देण्यात येत नाही. जर उमेदवारी दिली तरी प्रचाराच्या वेळी त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते एकंदरीत दलित महिलांना इतर महिलांच्या तुलनेत समान संधी दिली जात नाही. निवडून आल्यावरही, अनेकदा त्यांचे निर्णय घेताना ऐकले जात नाही. दलित महिलांच्या सल्ल्याला कमी महत्त्व दिले जाते. काही भागांमध्ये दलित महिलांना सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासही मज्जाव केला जातो. हा एक प्रकारचा सामाजिक बहिष्कारच आहे.

**२. आर्थिक दुर्बलता**

आर्थिक सामर्थ्य हे राजकारणातील यशासाठी महत्त्वाचे आहे. मात्र, दलित महिलांची आर्थिक परिस्थिती सामान्यतः दुर्बल असते. निवडणूक लढवण्यासाठी लागणाऱ्या प्रचार, सभा, आणि इतर खर्चासाठी निधीची कमतरता असते. प्रचारासाठी आवश्यक

संसाधनांची कमतरता भासते. प्रचारासाठी लागणारी वाहने, माणसे, साहित्य यांची व्यवस्था करणे त्यांच्यासाठी कठीण होते. राजकीय पक्षांकडून आर्थिक मदतीचा अभाव जाणवून येतो. अनेक पक्ष दलित महिलांना पुरेशी आर्थिक मदत देत नाहीत.

**३. लैंगिक भेदभाव**

भारतीय समाजात अजूनही पुरुषप्रधान मानसिकता प्रबळ आहे, त्यामुळे महिलांना अनेक ठिकाणी दुय्यम स्थान दिले जाते. महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळत नाही त्याचबरोबर महिलांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची संधी मिळत नाही. प्रॉक्सी प्रतिनिधित्व होते. अनेकदा महिला उमेदवार निवडून येतात, परंतु त्यांच्या कुटुंबातील पुरुष सदस्यच त्यांच्या नावावर राजकारण चालवतात. लैंगिक शोषण आणि अपमान यांना सामोरे जावे लागते. महिला नेत्यांना समाजातील पुरुषांकडून अनेकदा अपमानित केले जाते किंवा त्यांच्या कामात अडथळे निर्माण केले जातात.

**४. राजकीय हिंसा आणि धमक्या**

राजकारणातील स्पर्धेमुळे अनेकदा दलित महिलांना हिंसाचाराचा सामना करावा लागतो. धमक्या आणि दडपशाही वरिष्ठ वर्गाकडून केली जाते. दलित महिलांना निवडणुकीत भाग घेऊ नये म्हणून धमकावले जाते. शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांवर शारीरिक हल्ले किंवा लैंगिक शोषण केले जाते. राजकीय विरोधकांकडून दलित महिलांवर खोटे आरोप लावले जातात, जेणेकरून त्यांचे राजकारणातले भविष्य संपुष्टात येईल.

**५. शिक्षणाचा अभाव**

शिक्षण हे सशक्तीकरणाचे सर्वात मोठे साधन आहे, परंतु दलित महिलांमध्ये शिक्षणाचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. दलित महिलांना शिक्षणा अभावी राजकीय प्रक्रियेची समज कमी त्यामुळे शिक्षणाच्या अभावामुळे निवडणूक प्रक्रिया, राजकीय हक्क, आणि निर्णयप्रक्रियेची संपूर्ण माहिती नसते. दलित महिलांमध्ये समजीक दबावाणे नेतृत्व कौशल्याचा अभाव निरमर होतो. प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाच्या कमतरतेमुळे नेतृत्व करण्यास अडचणी येतात. माहितीच्या अभावामुळे निर्णयक्षमतेवर परिणाम होतो. कायदे, योजनांचा लाभ, आणि प्रशासनातील प्रक्रिया यांची माहिती नसल्यामुळे त्या निर्णय घेण्यात मागे राहतात.

**६. सामाजिक दबाव आणि रूढीवादी विचारसरणी**

अनेक दलित महिलांना त्यांच्या कुटुंबीयांकडून राजकारणात जाण्यास विरोध केला जातो. काही ठिकाणी महिलांनी राजकारणात येणे म्हणजे "संस्कारांचा भंग" मानले जाते. महिलांना घराबाहेर पडून काम करणे, निर्णय घेणे, किंवा नेतृत्व करणे स्वीकारले जात नाही.

**७. राजकीय पक्षांचा मर्यादित पाठिंबा**

अनेक राजकीय पक्ष दलित महिलांना उमेदवारी देताना उमेदवारी देण्यात अनास्था करतात. पक्षांतर्गत नेतृत्वाच्या भूमिकेत महिलांना संधी दिल्या जात नाहीत. राजकारणाच्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत नाही.

**८. मीडिया आणि समाजमाध्यमातील असमानता**

आजच्या डिजिटल युगात मीडिया आणि समाजमाध्यमे (Social Media) हे लोकशाहीतील महत्वाचे माध्यम आहे. हे माध्यम लोकांची मते, विचार, आणि अनुभव जगापर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी साधन आहेत. परंतु, दलित महिलांच्या संदर्भात या माध्यमांमध्येही असमानता दिसून येते. मीडिया आणि समाजमाध्यमे दलित महिलांना त्यांच्या संघर्ष, यश, आणि प्रश्न मांडण्याची संधी देऊ शकतात, परंतु अनेकदा या माध्यमांमध्ये त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. दलित महिलांच्या यशोगाथा किंवा समस्या मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये फारश्या दाखवल्या जात नाहीत. समाजमाध्यमांवर महिलांच्या मुद्द्यांवर कमी लक्ष दिले जाते.

**९. कायदेशीर संरक्षणाचा अभाव**

अनेकदा दलित महिलांवरील अत्याचारांची तक्रार घेतली जात नाही. न्यायप्रक्रियेत विलंब होतो, ज्यामुळे पीडित महिलांना न्याय मिळवणे कठीण होते.

**१.९ निष्कर्ष**

- दलित महिलांना भारतीय राजकारणात प्रवेश करताना अनेक सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय अडचणींना सामोरे जावे लागते. जातीभेद, लिंगभेद, आर्थिक दुर्बलता, शिक्षणाचा अभाव, आणि राजकीय हिंसा यांसारख्या अडथळ्यांमुळे त्यांचा राजकीय सहभाग मर्यादित राहिला आहे.
- भारतीय राज्यघटना, सामाजिक सुधारणा, शासकीय योजना, आणि सामाजिक संघटनांच्या प्रयत्नांमुळे दलित महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक सकारात्मक बदल झाले आहेत.
- राजकीय आरक्षण, शैक्षणिक संधी, आर्थिक सशक्तीकरण योजना आणि महिला नेतृत्वासाठी प्रोत्साहन यामुळे दलित महिलांना नव्या संधी प्राप्त झाल्या आहेत.तथापि, या संधींचा पूर्ण लाभ मिळवण्यासाठी ठोस उपाययोजना राबविणे आवश्यक आहे, जसे की, शिक्षणाचा प्रसार, आर्थिक मदत, नेतृत्व विकास, कायदेशीर संरक्षण, आणि सामाजिक जागरूकता वाढविणे.
- माध्यमांमध्ये दलित महिलांचा आवाज बळकट करणे आणि त्यांचे योगदान लोकांपर्यंत पोहोचविणे. राजकीय प्रशिक्षण आणि सशक्तीकरणासाठी अधिक कार्यक्रम आयोजित करणे. सशक्त आणि सुसंस्कृत लोकशाहीसाठी दलित महिलांचा राजकारणातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण आणि सशक्तीकरणासाठी सामूहिक प्रयत्न करणे काळाची गरज आहे.
- ज्या समाजात महिलांना समान अधिकार, सन्मान, आणि संधी दिल्या जातात, तोच समाज खर्या अर्थाने प्रगत होतो. म्हणूनच, दलित महिलांना राजकारणात सक्षम करण्यासाठी समाज, शासन, आणि प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे

आवश्यक आहे. अशा प्रकारे, दलित महिलांचे सशक्तीकरण केवळ त्यांच्या व्यक्तिगत प्रगतीसाठी नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या समतेच्या तत्त्वांना बळकटी देणारे ठरेल.

**१.१० संदर्भ सूची**


१. Ambedkar, B. R. (**1949).** The Constitution of India. Government of India.

२. Omvedt, G. (**1994).** Dalits and the Democratic Revolution: Dr. Ambedkar and the Dalit Movement in Colonial India. SAGE Publications.

३. Thorat, S., & Newman, K. S. (**2010**), Blocked by Caste: Economic Discrimination in Modern India. Oxford University Press.

४. Deshpande, A. (**2011).** The Grammar of Caste: Economic Discrimination in Contemporary India. Economic and Political Weekly, **46(50)**, **59-69.**

५. Guru, G. (2009**).** Humiliation: Claims and Context. Indian Journal of Social Work, 70(4)**,** 543-560**.**

६. https://legislative.gov.in/

७. https://socialjustice.gov.in/

८. https://ncsc.nic.in/

९. https://www.indiacode.nic.in/

VOLUME - XIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2025
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com)** **CC - 10**

# २५. दलित आत्मकथानातील संवेदना

